नवमहाराष्ट्र विचार प्रवाह

औद्योगिक विकास

चिंतामणि गणेश वैद्य

नवमहाराष्ट्रांतील विचारप्रवाह

औद्योगिक विकास

卐

चिं. ग. वैद्य

संपादक

प्रा. चंद्रकुमार डांगे

प्रकाशक

दे. श्री. जोशी व म द. लोखंडे

मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन,

सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २

मुद्रक

प्र. भा. काळे

प्रतिभा मुद्रणालय,

सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें

चित्रकार

अनंत सालकर

किंमत तीन रुपये

औद्योगिक विकास

★

★

ऋण-निर्देश

महाराष्ट्र-जीवन या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर, 'नवमहाराष्ट्रांतील विचार-प्रवाह' आणि 'महाराष्ट्रांतील वाङ्मयीन प्रवाह' अशा दोन मालांचें आयोजन आम्ही आमचे स्नेही प्रा. चंद्रकुमार डांगे यांच्या साहाय्यानें केलें. विषयांची आणि लेखकांची निवड, पुस्तकांच्या अंतरंगाचें स्वरूप आदि गोष्टी चिकित्सक दृष्टीनें व्हाव्यांत म्हणून कोणाचें तरी मार्गदर्शन घेतलें पाहिजे. या गरजेंतून एका सल्लागार-समितीची कल्पना सुचली. महाराष्ट्रांतील थोर विचारवंत प्रा. गं. बा. सरदार, प्रा. डॉ. रा. ना. दांडेकर व प्रा. दि. के. बेडेकर यांनीं या समितीवर काम करण्याचें मान्य केलें. या मालेंतील प्रस्तुतचें पुस्तक आम्ही आनंदानें सादर करीत आहोंत.

या दोन्ही मालांतील पुस्तकें प्रकाशित करण्यामागें एक विनम्र भूमिका समान आहे. नव्यानें प्रस्थापित झालेल्या आपल्या महाराष्ट्रांत विधायक वृत्तीचें संगोपन व्हावें आणि त्यायोगें भारताच्या आणि पर्यायानें महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचें उद्दिष्ट सफल व्हावें. तालुक्याच्या आणि विकसित होणाऱ्या छोटया मोठया शहरांतील सामान्य वाचकाला अशा प्रकारच्या साहित्याची तीव्र गरज आहे असा अनुभव आज सर्वांनाच येत आहे. ही उणीव भरून काढण्याचा हा एक नम्र पण प्रामाणिक प्रयत्न आहे.

भारताची सर्वांगीण प्रगति साधण्याच्या दृष्टीनें प्रत्येक प्रांतांतील उद्योग-धंद्यांचें स्वरूप प्रत्येक नागरिकाच्या नजरेसमोर असणें आवश्यक आहे. शेती हा तर भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. महाराष्ट्रांत आज अनेक छोटे-मोठे उद्योगधंदे उदयास येत आहेत.

या दृष्टीनें उपप्राचार्य प्रा. चिं. ग. वैद्य यांनीं केलेलें धांवतें विहंगमावलोकन आणि सूचित केलेल्या समस्या यांचा निश्चित असा उपयोग वाचकांस होईल. हें बिकट स्वरूपाचें कार्य प्रा. वैद्य यांनीं नेमक्या वेळांत व कुशलतेनें पार पाडलें, याबद्दल त्यांचे आभार मानणें हें आमचें कर्तव्य होय. या लेखनाच्या निमित्तानें प्रा. वैद्य यांनीं आपल्या व्यासंगाचा फायदा आम्हांला दिला ही भाग्याची गोष्ट आहे.

प्रा. सरदार, डॉ. दांडेकर आणि प्रा. बेडेकर यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणें व ती शब्दांकित करणें तर कठीण. वेळोवेळीं सल्ला देऊन, चर्चा करून आणि मार्गदर्शन करून त्यांनीं या मालेला व आम्हांला उपकृत करून

ठेविलें आहे. त्यांच्या परिपक्व अनुभवाचेंच हें फल आहे. तरी अत्यंत विनम्रपणें आम्ही त्यांचें मनःपूर्वक आभार मानतों.

या मालेचे संपादक प्रा. चंद्रकुमार डांगे यांनीं मालेच्या प्रारंभापासूनच जे अपरंपार श्रम केले त्याचें समग्र रूप या मालेच्या अंतरंगांत व बहिरंगावर स्पष्टपणें प्रतीत होत आहे. आपल्या विनम्र वृत्तीनें आणि अपूर्व उत्साहानें त्यांनीं ही योजना सफल केली. इतकेंच नव्हे तर, सल्लागार-समितीशीं अभ्यासू वृत्तीने वागून आणि आमच्याशीं संपूर्ण सहकार्य करून ही माला गुंफली हें विशेष उल्लेखनीय आहे. प्रा. चंद्रकुमार डांगे यांचा अतूट असा ऋणानुबंध उपचारानें व्यक्त करणें शक्य नाहीं. त्यांचें सहकार्य म्हणजे आमचें यश, इतकें म्हणून आम्ही त्यांचें ऋण मान्य करतों.

चित्रकार श्री. सालकर, प्रतिभा मुद्रणालयांतील कामगारबंधु आणि व्यवस्थापक शाखेंतील आमचे सर्व सहकारी यांचे अपरंपार श्रम या मालेला लाभले म्हणूनच ती वेळेवर प्रकाशांत येऊं शकली. या सर्वांचें आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

नवमहाराष्ट्रांतील जनतेला ही माला रुचेल व तिचें हर्षभरानें स्वागत होईल हीच अपेक्षा. ' न्यून तें पुरतें करोनि घ्यावें ' अशी प्रार्थना करून हा ऋण–निर्देश आटोपतां घेतों.

प्रतिभा मुद्रणालयाच्या रौप्य-महोत्सव-समयीं ही माला प्रकाशित होत आहे व भारताचे सुपुत्र डॉ. सी. डी. ऊर्फ चिंतामणराव देशमुख यांच्या शुभ हस्तें हें प्रकाशन होत आहे हा खरा माणि–कांचन योग आहे. माननीय श्री. चिंतामणराव देशमुख यांचा आशीर्वाद या मालेला आणि आमच्या संस्थेला लाभावा यासारखी आनंदाची, समाधानाची दुसरी कोणती गोष्ट असूं शकेल ? श्री. देशमुखांचा आशीर्वाद हें या मालेचें व आमचें भाग्य होय.

दे. श्री. जोशी
म. द. लोखंडे
प्रकाशक

भूमिका

भारतीय स्वातंत्र्याचा लढा १५ ऑगस्ट १९४७ सालीं संपला आणि एका नवयुगाला प्रारंभ झाला. आपण आपल्या भाग्याचे शिल्पकार खऱ्या अर्थानें झालों. याबरोबरच भारतीय जीवनांतील सर्व क्षेत्रांतील समस्या तीव्रपणें जाणवूं लागल्या तर काळाच्या ओघांत नव्या समस्या निर्माण झाल्या. नव्यानें प्रस्थापित झालेला महाराष्ट्र अर्थातच या परिस्थितीला अपवाद कसा राहाणार ? भारताची सर्वांगीण प्रगति म्हणजेच महाराष्ट्राची प्रगति हें मूलभूत सूत्र डोळ्या-समोर ठेवून **नवमहाराष्ट्रांतील विचार-प्रवाह** आणि **महाराष्ट्रांतील वाङ्मयीन प्रवाह** या दोन मालांची योजना आंखलेली आहे. महाराष्ट्रांत शिक्षण वेगानें पसरत आहे व नवशिक्षित प्रौढांची संख्याहि वाढत आहे. या विशाल जनतेला विधायक विचारांची ओळख करून देणें व त्यांच्या कर्तृत्व-शक्तीला आवाहन करणें हें उद्दिष्ट अल्पांशानें साधण्याचा हा एक विनम्र प्रयत्न आहे.

एखाद्या विषयाचें संपूर्ण विवेचन अशा मालेच्या सीमित कक्षेंत अपेक्षिलेलें नसतें. तसें करण्याचें योजिलें तर पृष्ठसंख्या आणि प्रकाशन-काळ यांचें गणित वाढून अशीं पुस्तकें केवळ परिस्थितीनें दुष्प्राप्त होतात. साहजिकच मूळ विचारधारांचें ऐतिहासिक पार्श्वभूमीवर धांवतें दर्शन घडवून विधायक स्वरूप ठळकपणें मांडून विषयाचा प्रपंच करावा लागतो. या मालेसाठीं योजिलेल्या लेखकांनीं ही दृष्टि समोर ठेवून लेखन केलेलें आहे हें नमूद करणें आवश्यक आहे.

भारतानें दोन पंचवार्षिक योजना पूर्ण करून तिसऱ्या योजनेचा प्रारंभ केलेला आहे. महाराष्ट्राचा औद्योगिक विकासहि प्रगमनशील होत आहे. अशा वेळीं आपल्या उद्योगधंद्यांचें व शेतीचें स्वरूप आणि भवितव्य डोळ्यांसमोर असणें फार अगत्याचें आहे. विशेषतः सर्वसामान्य जागरुक नागरिकाला तर अशा माहितीची तीव्र गरज असणें स्वाभाविक आहे. पुण्यांतील बृहन्महाराष्ट्र कॉमर्स महाविद्यालयाचे व्यासंगी उपप्राचार्य श्री. चिं. ग. वैद्य यांनीं आपल्या सोप्या निवेदन शैलीनें हें औद्योगिक विकासाचें दर्शन फार यथार्थ असें घडविलें आहे. उद्योग क्षेत्रांत कार्य करणाऱ्यांना व या क्षेत्रांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्यांना हें लेखन उपयुक्त ठरावें असा विश्वास आहे.

माझे ज्येष्ठ स्नेही, महाराष्ट्रांतील थोर विचारवंत प्रा. अण्णासाहेब सरदार, गुरुवर्य डॉ. प्रा. दांडेकर आणि प्रा. दि. के. बेडेकर यांचें निःस्पृह मार्गदर्शन नसतें तर हें काम माझ्या हातून झालें नसतें. त्यांच्या स्फूर्तिप्रद सहवासानें मला जें लाभलें आहे तो एक ठेवाच आहे. या सल्लागार-समितीचें ऋण हेंच माझें भूषण आहे.

जोशी-लोखंडे प्रकाशन आणि चिरंजीव ग्रंथ-प्रकाशन यांनीं आपली सर्व साधन-सामुग्री व कामाचें स्वातंत्र्य मला दिलें नसतें तर ही माला गुंफणें कठीण होतें. विशेषतः श्री. नानासाहेब जोशी यांनीं या कामीं घेतलेल्या श्रमांना सीमाच नाहीं. त्यांचा अनुभव, समतोल दृष्टिकोन आणि निर्विशेष ममता या कार्याचें खरें अधिष्ठान आहे. श्री. जोशी आणि श्री. लोखंडे यांनीं ही संधि देऊन मला उपकृत केलेलें आहे.

प्रतिभा मुद्रणालयांतील सर्व कामगार-बंधूंच्या आणि व्यवस्थापक-विभागाच्या अमोल सहकार्याबद्दल मी ऋणी आहें.

महाराष्ट्रांतील जनतेनें या मालांचें स्वागत करून उणीवा समजून घेऊन उत्तेजन द्यावें व या मालांचें उद्दिष्ट सफल होण्यास आशीर्वाद द्यावा ही प्रार्थना.

चंद्रकुमार डांगे

संपादक

लेखकाचें मनोगत

'नव-महाराष्ट्रांतील विचारप्रवाह' ह्या मालेंत एक पुष्प गुंफण्याची संधि मला दिल्याबद्दल मी प्रकाशक, संपादक व सल्लागार-समितीचा आभारी आहे. त्यांनीं माझ्यावर टाकलेली ही जबाबदारी योग्य प्रकारें पार पाडण्याचा मी यथाशक्ति प्रयत्न केला आहे.

ह्या पुस्तकांत महाराष्ट्रांतील उद्योगधंदे व शेती ह्यांची सध्यांची परिस्थिति, त्यांपुढील प्रश्न, ते सोडविण्यासाठीं सरकार व इतर संस्थांमार्फत करण्यांत येत असलेले प्रयत्न आणि उद्योगधंदे व शेती ह्यांच्या विकासाच्या भावी दिशा, ह्यांचें थोडक्यांत विवेचन केलें आहे. पुस्तक लिहितांना सरकारी प्रकाशनें व इतर अधिकारी व्यक्तींच्या ह्या विषयावरील पुस्तकांचा, लेखांचा व भाषणांचा उपयोग झालेला आहे. पुस्तकांत दिलेली आंकडेवारी मुख्यत्वेंकरून महाराष्ट्र राज्य-परिचय, महाराष्ट्राचें आर्थिक दर्शन, Handbook of Basic Statistics of Maharashtra State, 1960 व Statistical Companion to the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Bill, 1960 ह्या पुस्तकांतून घेतली आहे. ह्या सर्वांचें ऋण मी मान्य करतों. संदर्भ ग्रंथांची यादी पुस्तकाच्या शेवटीं जोडली आहे. ह्या सर्व मार्गांनीं गोळा केलेली माहिती मी सामान्य वाचकाला समजेल अशा सुबोध व मनोरंजक रीतीनें मांडण्याचा ह्या पुस्तकांत प्रयत्न केला आहे.

चिं. ग. वैद्य.

प्रास्ताविक

१ मे १९६० रोजीं आपल्या सर्वांचा आवडता असा एकभाषी महाराष्ट्र अस्तित्वांत आला. आतां ह्या राज्याची सर्वांगीण उन्नति करावयाची जबाबदारी आपणां सर्वांवर पडली आहे. प्रत्येक महाराष्ट्रियानें आपल्या शक्तीप्रमाणें ह्या कार्यास हातभार लावला पाहिजे. हे प्रयत्न अर्थातच नियोजनपूर्वक व्हावयास हवेत. त्यासाठीं प्रथम महाराष्ट्राची प्रत्येक क्षेत्रांतील सध्यांची परिस्थिति काय आहे हें समजून घेतलें पाहिजे. त्यानंतर पुढील विकासाची योजना आंखतां येईल. ह्या छोट्या ग्रंथामध्यें आपण महाराष्ट्रांतील उद्योगधंदे व शेती ह्यांचा विचार करणार आहोंत.

पहिल्या विभागांत आपण महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांचा विचार करणार आहोंत. विवेचनासाठीं साधारणपणें गेल्या पंचवीस वर्षांचा काळ मर्यादित केलेला आहे. १९३५ पर्यंतच्या औद्योगिक विकासाची ढोबळ रूपरेषा दिल्यानंतरच आपण मुख्य विवेचनाला सुरवात करणार आहोंत. गेल्या पंचवीस वर्षांतील औद्योगिक क्षेत्रांतील प्रमुख घटनांचा प्रथम उल्लेख केलेला आहे. नंतर महाराष्ट्रांतील प्रमुख उद्योगधंद्यांची माहिती दिलेली आहे. त्याचबरोबर लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग यांचें महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासांतील स्थान कोणतें याचें विवेचन केलेलें आहे. ह्यानंतर औद्योगिक विकास मुख्यतः ज्या तीन गोष्टींवर अवलंबून असतो म्हणजे वाहतुकीचीं साधनें, बँका व कामगार त्या गोष्टींबाबत कांहीं माहिती दिली आहे. शेवटीं, महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची भावी दिशा कोणत्या तत्त्वांवर ठरविण्यांत आली आहे हें सांगून त्या दिशेनें केलेल्या वाटचालीचा थोडक्यांत आढावा घेतला आहे.

मुख्य विषयाला सुरवात करण्यापूर्वी एकदोन गोष्टींचा उल्लेख करणें जरूर आहे. १ मे १९६० रोजीं जें महाराष्ट्र राज्य अस्तित्वांत आलें त्यामध्यें एकत्र आणलेले प्रदेश पूर्वी निरनिराळ्या प्रांतांत मोडत होते. त्यामुळें त्या सर्व प्रदेशांची मिळून अशी आंकडेवारी फारशी उपलब्ध नाहीं. त्यामुळें आंकडेवारी फारशी देतां आलेली नाहीं. त्याचप्रमाणें विवेचन सुबोध होण्याच्या दृष्टीनेंहि फक्त आवश्यक तेवढीच आंकडेवारी दिलेली आहे. पुस्तक लिहितांना नव-महाराष्ट्र राज्यांतील जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणीं राहणारा सर्व-सामान्य नागरिक असा वाचकवर्ग मीं नजरेसमोर ठेवला आहे. ह्या दृष्टीनें विवेचन शक्यतों सुबोध व मनोरंजक करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा प्रयत्न कितपत यशस्वी झालेला आहे हें वाचकांनींच ठरवावयाचें आहे.

●●●

१

★

१९३९ पर्यंतचा औद्योगिक विकास

महाराष्ट्रांतील औद्योगिक विकासाची पूर्ण कल्पना येण्यासाठीं तिन्ही प्रकारच्या उद्योगधंद्यांची माहिती मिळविली पाहिजे. पहिला प्रकार म्हणजे अतिप्राचीन काळापासून चालत आलेले खेडेगांवांतील व शहरांतील कारागिरीचे उद्योगधंदे. दुसरा प्रकार घरगुती व लहान उद्योगधंद्यांचा होय. तिसरा प्रकार म्हणजे मोठ्या प्रमाणावर भांडवल उभारून यंत्रशक्तीच्या साहाय्यानें सुरू झालेल्या कारखान्यांचा होय. कारखान्याची व्याख्या करण्याचे अनेक प्रकार आहेत. सरकारी कायद्याप्रमाणें २० पेक्षां जास्त लोक एका ठिकाणीं, एका धंद्यांत, एका मालकासाठीं काम करीत असतील तर ती कारखानदारी होते.

जुनी कारागिरी

(१) **खेडेगांवांतील कारागिरी**—प्राचीन काळीं महाराष्ट्रांतील प्रत्येक खेडेगांव हें आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होतें. म्हणजेच खेडेगांवांतील रहिवाश्यांच्या गरजा खेडेगांवांतच भागविल्या जात. प्रत्येक खेडेगांवामध्यें निरनिराळ्या गरजा भागविणारे निरनिराळे वर्ग असत. प्राचीन काळापासून जातिसंस्था चालत आली व या संस्थेतर्फे प्रत्येक जातीनें करावयाच्या कामाचे नियम लावून दिले गेले. धंदे हे जातिजन्य झाल्यामुळें ते धंदे करणाऱ्या लोकांना स्थैर्य व समाजांत एक स्थान प्राप्त झालें. बापाकडून मुलाला धंदा जाणार हें जवळजवळ स्पष्ट असल्यामुळें बाप मुलाला लहानपणापासूनच धंदा शिकवीत असे. एका कुटुंबांत एकच धंदा पिढ्यान् पिढ्या राहिल्यामुळें त्या धंद्यांत मुलगा वडिलांपेक्षा जास्त प्रावीण्य मिळविण्याचा प्रयत्न करी व तें त्याला शक्यहि होई.

जातींवरून धंदे ठरल्यामुळें खेडेगांवांत स्पर्धेला स्थानच नसे. प्रत्येक जातीला एकेका धंद्यामध्यें मक्तेदारी असे. तसेंच सर्व जातींच्या लोकांना एकमेकांवर अवलंबून राहणें भाग पडे. कारण त्याशिवाय त्यांच्या सर्व गरजा भागणें शक्य नसे. ह्या परस्परावलंबित्वामुळें खेडेगांवामध्यें सहकार्य असे. हें सहकार्य नैसर्गिक व परंपरागत असल्यामुळें अनेक शतकें टिकून राहिलें. औद्योगिक क्रान्तीनंतर जेव्हां सर्व समाजरचनाच बदलली, तेव्हां हें सहकार्य संपुष्टांत आलें.

प्रत्येक खेडेगांवांत मुख्यतः चार वर्ग असत. पहिला पाटील, कुलकर्णी वगैरे वतनदारांचा. दुसरा शेतकऱ्यांचा म्हणजे धान्य उत्पादन करणाऱ्यांचा. तिसरा बलुतेदारांचा. हे बलुतेदार म्हणजेच खरे कारागीर. ह्या बलुतेदारांमध्यें पुरोहित, गुरव, लोहार, चांभार, सुतार, न्हावी वगैरे लोकांचा समावेश होतो. हे लोक वर्षभर गांवांतील लोकांचे काम करीत व वर्षाकांठीं त्यांना शेतकऱ्यांकडून व इतर गांवकऱ्यांकडून ठराविक प्रमाणांत धान्य व इतर गोष्टी मिळत असत. ह्यावर ते आपली उपजीविका करीत असत. चौथा वर्ग म्हणजे स्वतंत्रपणें धंदा करणाऱ्यांचा. ह्या लोकांना एखादें काम केल्याबरोबर त्या कामाचा मोबदला पैशाच्या किंवा धान्याच्या स्वरूपांत मिळे.

अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रान्ति घडून आली. या क्रान्तीनें उत्पादनाचें स्वरूप बदलून टाकलें. नवीन वाहतुकीच्या साधनांमुळें दूर देशांत माल विकणें शक्य झालें. यंत्रांच्या साहाय्यानें मालाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर करणें शक्य झालें. इंग्लंडमध्यें उत्पादन झालेला सुबक माल बोटी भरभरून हिंदुस्थानामध्य येऊं लागला. त्या मालापुढें जुन्या कारागिरांच्या मालाचा टिकाव लागेना. हळूंहळूं जुने कारागीर नष्ट होऊं लागले. नवीन वाहतुकीच्या साधनांमुळें दळणवळण वाढलें व वाहतुकीच्या साधनांच्या अभावीं प्रभावी ठरलेली खेड्यांची स्वयंपूर्णता आतां नष्ट झाली. पुढारलेल्या देशांच्या संपर्कामुळें नवीन विचारमूल्यें व जीवनमूल्यें अस्तित्वांत आलीं व जुनी समाजरचना व जातिसंस्था नष्टप्राय झाली. कित्येक शतकांचा वारसा असलेली ही कारागिरी अर्थातच संपूर्ण नष्ट झाली नाहीं. घरगुती धंद्यांच्या स्वरूपांत अजूनहि ती जिवंत आहे.

(२) **शहरांतील कारागिरी**—पूर्वी महाराष्ट्रांत आजच्या अर्थानें शहरें नव्हतीं. परंतु राजधान्या, देवस्थानें व इतर अर्थानें ज्यांची शहरांत गणना करता येईल अशीं कांहीं ठिकाणें होतीं. पुणें, नाशिक, पैठण, पंढरपूर इत्यादि

ठिकाणें भरपूर वस्तीचीं होतीं. या शहरांतून हस्तव्यवसाय व हस्तकौशल्य यांत प्रसिद्ध असे कारागीर उद्योगधंदे चालवीत. हे हस्तव्यवसाय विविध तऱ्हेचे असत. उत्तम दर्जाचें तलम कापड व रेशीम, सोन्या–चांदीचे दागिने व भांडीं, तांब्या–पितळेचीं भांडीं, नक्षीदार व सुबक बांगड्या इत्यादि वस्तु त्या ठिकाणीं तयार होत. शहरांशहरांतून कारागिरांचे संघ असत व एका विशिष्ट दर्जाच्याच वस्तु बाजारांत येऊं शकत. त्यामुळें मालाचा दर्जा नेहमीं चांगला असे. पुणें व नाशिक येथील तांब्या–पितळेचीं भांडी, पंढरपूर येथील देवपूजेचें सर्व साहित्य व येवलें, पैठण व औरंगाबाद येथील तलम व रेशमी कापड विशेष प्रसिद्ध होतें. इंग्रजी राज्य आल्यानंतर देशी राजेरजवाड्यांचा आधार गेल्यामुळें हे उद्योगधंदे ऱ्हास पावले. त्याचबरोबर यांत्रिक उत्पादनाबरोबरील स्पर्धेमध्यें हे टिकाव धरूं शकले नाहींत. अजून थोड्याफार प्रमाणांत हे उद्योगधंदे अस्तित्वांत आहेत. परंतु ह्यापुढें सरकारनें मदत केली तरच ह्या उद्योगधंद्यांचा तरणोपाय आहे.

(३) आधुनिक उद्योगधंदे-- १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत भारतामध्यें आधुनिक उद्योगधंद्यांची सुरुवात झाली. भारतामध्यें पहिली कापडाची गिरणी यशस्वी रीतीनें स्थापन करण्याचा मान महाराष्ट्राला आहे. १९५४ सालीं मुंबईला कावसजी नानाभाई दावर या पारशी गृहस्थानें पहिली कापडगिरणी उभारून या धंद्याची या राष्ट्रांत मुहूर्तमेढ रोवली. १८६०–१८७० हें दशक कापड-उद्योगधंद्याच्या दृष्टीनें फारसें चांगलें गेलें नाहीं. अमेरिकेंत ह्याच वेळेस यादवी युद्ध सुरू झालें. त्यामुळें अमेरिकेंतून इंग्लंडमधील कापडगिरण्यांना होणारा कच्च्या कापसाचा पुरवठा बंद पडला. त्यामुळें भारतामधील कच्च्या कापसाला एकदम मागणी वाढली. मुंबईतील दलालांनीं वाढत्या किंमतीला कापूस इंग्लिश गिरण्यांना विकून भरपूर नफा मिळविला. परंतु त्यामुळें मुंबईतील कापडगिरण्यांना मात्र कापसाचा तुटवडा पडला. अमेरिकेंतील यादवी युद्ध संपल्यानंतर तेथून इंग्लंडमध्यें परत कापसाचा पुरवठा सुरू झाला व भारतामध्यें मंदीची लाट आली. तिचा कापडधंद्यावर थोडाफार परिणाम झालाच. त्यामुळें कापडगिरण्यांची वाढ व्हावी तितकी झपाट्यानें झाली नाहीं. तरी देखील १८७२ सालीं मुंबई प्रांतामध्यें १८ कापडाच्या गिरण्या होत्या. त्यानंतर मात्र कापडगिरण्यांमध्यें झपाट्यानें वाढ झाली. १८७८ सालीं मुंबई प्रांतामध्यें ४२ कापड-गिरण्या होत्या. ह्या सुमारास सरकी काढण्याच्या व कापूस दाबण्याच्या कारखान्यांत देखील वाढ झाली होती. १८८० सालापर्यंत यंत्रांनीं सुसज्ज असा हा एकच उद्योगधंदा महाराष्ट्रांत होता.

१८८०–१८९५ ह्या पंधरा वर्षांत कापडाच्या उद्योगधंद्यांत आणखी वाढ झाली. १८८५ पर्यंत चात्यांच्या संख्येंत मुख्यतः वाढ झाली. त्यानंतर मात्र मागांच्या संख्येंतहि वाढ होऊं लागली. १८९५ ते १९०० हीं पांच वर्षें महाराष्ट्रांतील लोकांना सर्व दृष्टीनें वाईटच गेलीं. ह्या पांच वर्षांत प्लेग व दुष्काळ ह्या दोन भस्मासुरांनीं महाराष्ट्रांतील लोकांची दैना उडवून दिलीं. ह्या प्रतिकूल परिस्थितींतहि कापडाच्या उद्योगधंद्याची हळूहळू प्रगति सुरूच होती. ह्यानंतरच्या सात वर्षांत कापडाच्या उद्योगधंद्यानें चांगलीच प्रगति दाखविली. १९०७ सालीं सर्व जगामध्येंच मंदीची लाट आली. त्याचा महाराष्ट्रांतील कापडधंद्यावरहि परिणाम झालाच. ह्यानंतर १९१४ पर्यंत मात्र कापड-गिरण्यांची भरभराट होत गेली. ह्या सुमारास कापडाशिवाय इतरहि कांहीं उद्योगधंद्यांमध्यें आधुनिक यंत्रांचा उपयोग करण्यास सुरुवात झाली होती. ह्यांत उसापासून गूळ तयार करणें, तेल काढणें, धान्य सडणें, धान्याचें पीठ करणें वगैरे उद्योगधंदे होते. इंजिनिअरिंगच्या उद्योगधंद्यांचीहि उदा०–मोटारी, सायकली व इतर लहान यंत्रांची जोडणी व दुरुस्ती वगैरे सुरुवात झालेली होती.

१९१४ सालीं पहिलें महायुद्ध सुरू झालें. त्यामुळें उद्योगधंद्यांच्या प्रगतीला थोडा पायबंद बसला. पण हा अगदीं तात्पुरत्या स्वरूपाचा होता. महायुद्धामुळें इतर देशांतून होणारी मालाचीं आयात थांबली. त्यामुळें परदेशी मालाशीं स्पर्धा एकदम थांबली. ह्याचा फायदा भारतीय कारखानदारांनीं घेतला व खूप नफा मिळविला. युद्ध संपल्यानंतर बाजारांत तेजीची लाट उसळली. इतर देशांतून देखील भारतीय मालाला मागणी येऊं लागली. कारण युद्धामुळें बऱ्याच देशांचें फार नुकसान झालें होतें. ह्या काळामध्यें महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांची जोरानें वाढ झाली. कांहीं नवीन उद्योगधंदेहि ह्या काळांत निघाले. युद्धामुळें आलेली ही तेजीची लाट १९२१ सालापासून एकदम मंदावली. ह्यापुढील कांहीं वर्षें महाराष्ट्रांतील उद्योधंद्यांच्या दृष्टीनें फारशी बरीं गेलीं नाहींत. १९२५ ते १९२९ ह्या चार वर्षांत उद्योगधंद्यांचा थोडाफार विकास झाला. परंतु १९२९–३० सालापासून सुरू झालेल्या जागतिक मंदीची झळ महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांना थोडीफार तरी लागलीच. १९१४ ते १९३५ ह्या काळाचा एकंदरींत विचार करतां ह्या काळांत औद्योगिक क्षेत्रांत महाराष्ट्रानें चांगलीच प्रगति केल्याचें आढळून येतें. ह्या काळांत पूर्वी अस्तित्वांत असलेले उद्योगधंदे उदा०–कापड-गिरण्या, सरकी काढण्याचे व कापूस दाबण्याचे कारखाने, इंजिनिअरिंगचे उद्योगधंदे, धान्य सडण्याच्या व दळण्याच्या गिरण्या, तेलाच्या गिरण्या वगैरे–चांगलेच वाढले. त्याचबरोबर कांहीं नवीन उद्योगधंदेहि अस्तित्वांत आले.

उदा०—उसापासून साखर तयार करण्याचे कारखाने, औषधि-कारखाने, रासायनिक कारखाने, रंगांचे कारखाने वगैरे.

१९३५ पर्यंत महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांचा विकास कसा होत गेला हें आपण ह्या प्रकरणांत थोडक्यांत पाहिलें. १९३५ पासून पुढें महाराष्ट्राची औद्योगिक प्रगति कशी होत गेली हें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

२

★

औद्योगिक विकास (१९३५-१९६०)

१९३५ च्या सुमारास जागतिक मंदी ओसरली होती उद्योगधंदे व व्यापार यांच्या विकासास पोषक असें वातावरण सर्वत्र निर्माण झालें होतें. अर्थातच प्रत्येक देश औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांत जास्तींत जास्त प्रगति करण्याचा प्रयत्न करीत होता. उद्योगधंद्यांसाठीं कच्च्या मालाचा भरपूर व वेळेवर पुरवठा ही बाब अत्यंत महत्त्वाची असते. उद्योगधंद्यांच्या उत्पादन-क्षमतेवर ह्या बाबीचा फार मोठा परिणाम होतो. कच्च्या मालाचा भरपूर व वेळेवर पुरवठा होण्यासाठीं वाहतुकीचीं साधनें व मार्ग ह्यांवर प्रभावी नियंत्रण करण्याची सत्ता असणें जरूर असतें. ही सत्ता आपल्या हातांत ठेवण्यासाठीं प्रत्येक देश साहजिकच प्रयत्न करूं लागला. त्यामुळें व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांतील पुढारलेल्या देशांत फार मोठी स्पर्धा निर्माण झाली. पहिल्या महा-युद्धांतील पराभवामुळें १०–१२ वर्षें स्वस्थ बसलेला जर्मनी ह्याच सुमारास परत मान वर काढूं लागला. ह्या सर्व गोष्टींतून पुढें संघर्ष निर्माण झाला. दुसरें महायुद्ध सुरूं होण्यास ज्या अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या, त्यांमध्यें ही एक गोष्ट आहे. अशा ह्या काळांत भारतामध्यें असहकारितेच्या चळवळीचा जोर होता. ह्या असहकारितेच्या चळवळीचा एक प्रभावी कार्यक्रम विलायती मालावर बहिष्कार व स्वदेशी मालाचा स्वीकार हा होता. भारतीय व्यापारी व कारखानदार मंडळींनीं ह्या चळवळीला चांगला पाठिंबा दिला. ह्या काळामध्यें भारतांत स्वदेशी मालाच्या उत्पादनाचे अनेक कारखाने सुरूं झालेले आढळतात.

महाराष्ट्र हा भारताचा एक भागच असल्यामुळें ह्या स्वदेशी चळवळीचे पडसाद येथें देखील उमटले. महाराष्ट्रामध्यें देखील ह्या काळांत कांहीं स्वदेशी

उद्योगधंदे अस्तित्त्वांत आले. ह्या उद्योगधंद्यांमध्यें बँका, विमा-कंपन्या, साखर-कारखाने, रासायनिक कारखाने वगैरे प्रकारचे उद्योगधंदे होते. दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, प्रेसिडेन्सी बँक, भारत इंडस्ट्रिअल बँक वगैरे बँका, आणि कॉमनवेल्थ, ट्रस्ट ऑफ इंडिया, सह्याद्री, नवभारत, लॉंग लाईफ इन्शुअरन्स वगैरे विमा-कंपन्या ह्या काळांत सुरू झाल्या. कोल्हापूर शुगर फिनिक्स केमिकल, मुंबइ; मार्सलॅंड ॲंड प्राईस, रावळगांव शुगर मिल्स्, महाराष्ट्र शुगर मिल्स वगैरे कारखाने ह्याच काळांत उघडले गेले. सरस्वती सिनेटोन, प्रभात फिल्म कंपनी ह्या चित्रपट–उत्पादन–संस्था ह्याच काळांत स्थापन झाल्या.

१९३९ च्या अखेरीस दुसऱ्या जागतिक महायुद्धाची आग भडकली. इतर देशांतून भारतांत होणारी मालाची आयात एकदम थांबली. भारतांतील बरेच उद्योगधंदे कांहीं जरुरीच्या गोष्टींसाठीं परदेशांवर अवलंबून होते. ह्या उद्योग-धंद्यांपुढें ह्या गोष्टी कशा मिळवाव्या हा एक मोठा प्रश्न उभा राहिला. त्याच-बरोबर युद्धसाहाय्यासाठीं म्हणून नाना तऱ्हेच्या मालाला तावडतोबीची मागणी मोठ्या प्रमाणावर येऊं लागली. जपान युद्धांत शिरल्यावर इंग्रजी साम्राज्याला पूर्वेकडून फार मोठा धोका निर्माण झाला. पूर्वेकडील व अतिपूर्वेकडील सैन्याला सर्व तऱ्हेचा माल पुरविण्याची जबाबदारी भारतावर व ऑस्ट्रेलियावर टाकण्यांत आली. साहजिकच भारतामध्यें जास्तींत जास्त वस्तु जास्तींत जास्त प्रमाणावर निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यांत आले. ह्या काळामध्यें भारतामध्यें अनेक नवीन उद्योगधंदे सुरू झाले व अस्तित्वांत असलेल्या कारखान्यांची मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यांत आली. व्यापारी व कारखानदार यांना ही पर्वणीच अनुभवावयास मिळाली. सल्फ्यूरिक ॲसिड, सिन्थेटिक अमोनिया, कॉस्टिक सोडा, क्लोरिन, ब्लीचिंग पावडर वगैरे रासायनिक पदार्थांचें उत्पादन ह्याच काळांत सुरू झालें. भारतांत मोटारींचें उत्पादन करण्याचा कारखाना काढावा अशी सूचना १९३६ सालींच सरकारपुढें मांडली होती. १९३७ सालीं अधिकारावर आलेल्या मुंबई राज्याच्या कॉंग्रेस सरकारनें ह्या कारखान्यांत गुंतलेल्या भांडवलावरील व्याजाची १० वर्षेंपर्यंत हमी घेण्याची तयारी दर्शविली होती. परंतु १९४० सालीं सरकारनें ही योजना दुसऱ्या महायुद्धाचें कारण देऊन नामंजूर केली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत भारतांतील औद्योगिक शक्तीचा जास्तींत जास्त उपयोग केला गेला. ह्या काळांत अस्तित्वांत आलेले बरेच कारखाने युद्ध संपल्यानंतर डबघाईस आले व त्यांतील कांहीं नामशेषहि झाले कारण हे उद्योगधंदे एका विशिष्ट परिस्थितींत स्थापन झाले होते व त्या विशिष्ट

परिस्थितींतच टिकाव धरूं शकत होते. ही विशिष्ट परिस्थिति बदलल्याबरोबर ह्यांपैकीं बरेचसे उद्योगधंदे डबघाईस आले व त्यांतील कित्येक नामशेषहि झाले. यांतील कांहीं महाराष्ट्रांतीलहि होतेच.

दुसऱ्या महायुद्धामुळें जागतिक राजकीय परिस्थितींत एकदम बदल झाला. एके काळचें जगांतील सर्वांत बलवान् म्हणून समजलें जाणारें ग्रेट ब्रिटन हें राष्ट्र दुर्बल झालें. इंग्लंडला युद्धामुळें बसलेला तडाखा इतका जोराचा होता कीं, खुद्द इंग्लंडमधील आर्थिक स्थिति मूळपदावर आणण्यासाठीं अनेक वर्षांच्या सतत परिश्रमांची जरूर होती. तेव्हां भारताकडे लक्ष देणें त्यांना शक्य नव्हतें. त्याचबरोबर भारतामध्येंहि ह्या वेळेपर्यंत राजकीय जागृति मोठ्या प्रमाणावर झालेली होती. भारतांतील वाढत्या राजकीय आकांक्षांना आणि चळवळीला तोंड देणें इंग्रजांना फार जड जाऊं लागलें होतें. तेव्हां प्राप्त परिस्थितींत आपणहून शांततेच्या मार्गानें सत्तान्तर करून भारतीयांना संपूर्ण स्वातंत्र्य द्यावयाचें त्यांनीं ठरविलें आणि १५ ऑगस्ट १९४७ ह्या दिवशीं भारत स्वतंत्र झाला. कॉंग्रेस सरकार अधिकारावर आलें. औद्योगिक विकासाशिवाय भारताची उन्नति कधींच होऊं शकणार नाहीं हें जाणून कॉंग्रेस सरकारनें योग्य तीं पावलें टाकण्याचें ठरविलें. ह्या वेळेस भारतांतील उद्योगधंद्यांची परिस्थिति चांगली नव्हती. साहजिकच महाराष्ट्रांतील उद्योगधंदेहि ह्याला अपवाद नव्हते. दुसऱ्या महायुद्धाचा भारतांतील यंत्रसामुग्रीवर फार ताण पडला होता. त्यामुळें बरीचशी यंत्रसामुग्री निरुपयोगी झाली होती. कांहीं यंत्रांना तांतडीची दुरुस्ती पाहिजे होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत अनेक उद्योगधंदे अस्तित्वांत आले होते. हे उद्योगधंदे स्थापन करतांना त्यांना लागणारी विविध प्रकारची सामुग्री भरपूर प्रमाणांत मिळेल कच्च्या मालाचा वेळेवर व पुरेसा पुरवठा होईल काय, व ज्या ठिकाणीं हे नवीन उद्योगधंदे काढले तीं ठिकाणें ते उद्योगधंदे काढण्यासाठीं खरोखर योग्य आहेत काय ? वगैरे बाबींचा फारसा विचार केला गेला नव्हता. महायुद्धाच्या काळांतील विशिष्ट परिस्थितीमुळें हे उद्योगधंदे टिकून राहिले. परंतु युद्धानंतरच्या काळांत ह्यांपैकीं बरेचसे उद्योगधंदे टिकाव धरूं न शकल्यामुळें डबघाईला आले. फाळणीमुळें मुंबईच्या कापड-उद्योगधंद्यावर परिणाम झाला. कारण हा उद्योगधंदा लांब धाग्याच्या कापसासाठीं सिंध व पंजाब ह्या दोन प्रांतांवर अवलंबून होता. हे दोन्ही कापूस-उत्पादनाचे प्रदेश पाकिस्तानांत गेल्यामुळें मुंबईच्या गिरण्यांना पाकिस्तानावर अवलंबून रहाण्याची वेळ आली. डिसेंबर १९४७ मध्यें सरकारनें उद्योगधंद्यांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं एक त्रिपक्ष-परिषद् बोलावली.

ह्या परिषदेमध्यें भारतांतील ३२ उद्योगधंद्यांपुढील समस्या सोडविण्यासाठीं उपाय सुचविण्यांत आले. १९४८ मध्यें सरकारचें औद्योगिक धोरण एका जाहीरनाम्यातर्फे स्पष्ट करण्यांत आलें. ह्याला Industrial Policy Resolution of 1948 असें म्हणतात. राष्ट्रीय सरकारनें भारताचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठीं एक मोठा कार्यक्रम हातीं घेण्याचें ठरविलें. ह्याच पंचवार्षिक योजना होत. पंचवार्षिक योजनेचा आराखडा ठरविण्यासाठीं सरकारनें एक नियोजन-मंडळ नियुक्त केलें. या मंडळानें पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार केला व पहिली पंचवार्षिक योजना १९५१ पासून अंमलांत आली. ही पहिली योजना १९५६ सालीं संपुष्टांत आली. १९५६–६१ ह्या पांच वर्षांसाठीं दुसरी पंचवार्षिक योजना तयार करण्यांत आली. सध्यां तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्याचें काम सुरू आहे. ह्या दोन पंचवार्षिक योजनांमध्यें औद्योगिक विकासाकडेहि लक्ष देण्यांत आलें होतें. ह्या योजनांमुळें गेल्या दहा वर्षांत भारतीय उद्योगधंद्यांची चांगलीच प्रगति झाली आहे. अर्थात् ह्यांत महाराष्ट्रांतील उद्योगधंदेहि आलेच. तेव्हां ह्या दोन्ही पंचवार्षिक योजनांची येथें थोडक्यांत माहिती दिली तर तें फारसें अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटतें.

पहिली पंचवार्षिक योजना (१९५१–१९५६)

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें प्रथम एकूण २,०६९ कोटी रुपये खर्च करावयाचें ठरलें होतें. १९५३ सालीं ही रक्कम २,२४९ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यांत आली आणि पुढें ही रक्कम २,३५६ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यांत आली. १९५७ सालीं भारताचें प्रत्येक माणशीं उत्पन्न १९५१ च्या उत्पन्नाच्या दुप्पट झालें पाहिजे, हें ध्येय डोळ्यापुढें ठेवून योजनेंतील विकासाचा कार्यक्रम आंखला. योजनेसाठीं भारतीय अर्थव्यवस्थेचे दोन विभाग करण्यांत आले आहेत. (१) सार्वजनिक क्षेत्र (Public Sector) व (२) खाजगी क्षेत्र (Private Sector). सार्वजनिक क्षेत्रांतील विकास-योजना पार पाडण्याची जबाबदारी संपूर्णतया सरकारची—ह्यांत केंद्र-सरकार व राज्य-सरकारें दोन्हीहि आलीं—आहे. खाजगी क्षेत्रांतील विकास-योजना पार पाडण्याची जबाबदारी निरनिराळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या खाजगी संस्थांची व व्यक्तींची आहे. अर्थात् ह्या लोकांना सरकार जरूर ती मदत करतेच. योजनेच्या मूळ आराखड्यामध्यें नंतर थोडा बदल करण्यांत आला. अंतिम आराखड्याप्रमाणें पहिल्या योजनेमध्यें खालीलप्रमाणें अग्रक्रम दिले गेले व प्रत्येक बाबीवरील खर्चाचें प्रमाण खालीलप्रमाणें होतें.

अग्रक्रम	खर्च (कोटी रुपये)	एकूण खर्चाशीं प्रमाण
(१) शेती, धरणें व विद्युत्शक्ति	१०१८	४३·२%
(२) दळणवळण व वाहतूक	५५७	२३·६%
(३) उद्योगधंदे	१७९	७·६%
(४) समाजसेवा व पुनर्वसन	५३३	२२·६%
(५) इतर	६९	३·०%
	२३५६	१००·%

भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळें व अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्णता मिळवावयाची हें पहिलें ध्येय असल्यामुळें शेतीला अग्रक्रम मिळणें साहजिकच होतें. औद्योगिक क्षेत्रामध्यें पुढीलप्रमाणें अग्रकम ठरविण्यांत आले होते—(१) ताग, प्लायवुड वगैरे उत्पादक वस्तूंचे उद्योगधंदे व कापड, साखर, साबण, वनस्पति तूप वगैरे उपभोग्य वस्तूंच्या उद्योगधंद्यांमधील सध्यां अस्तित्वांत असलेल्या औद्योगिक शक्तीचा संपूर्ण उपयोग करणें. (२) लोखंड व पोलाद, ॲल्युमिनिअम्, सीमेंट, खतें, रासायनिक द्रव्यें, यंत्रसामुग्री तयार करण्याचे कारखाने वगैरे भांडवली व उत्पादक वस्तूंच्या उद्योगधंद्यांची वाढ करणें. (३) जे कारखाने अजून बांधून पूर्ण झालेले नाहींत ते पूर्ण करणें. (४) उद्योगधंद्यांना अत्यंत आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उदा.—गंधक, रेऑनसाठीं लगदा वगैरे-नवीन कारखाने काढणें. असे अग्रक्रम लावल्यामुळें केलेल्या खर्चाचा योग्य विनियोग झाला व कोणत्याहि उद्योगधंद्याकडे दुर्लक्ष झालें नाहीं अशी खात्री बाळगण्यास हरकत नाहीं. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें एकूण ४२ उद्योगधंद्यांसाठीं विकास-योजना आंखण्यांत आली होती व पांच वर्षांच्या शेवटीं त्यांनी गांठावयाचें उद्दिष्ट ठरवून देण्यांत आलें होतें. हीं उद्दिष्टें साधण्यासाठीं एकूण ७०७ कोटी रुपयांचा खर्च आवश्यक आहे असा अंदाज करण्यांत आला होता. ही सर्व रक्कम खाजगी क्षेत्रांतील संस्थांनीं व व्यक्तींनीं उभी करावयाची होती.

पहिली पंचवार्षिक योजना कितपत यशस्वी झाली?—भारताच्या भावी अर्थव्यवस्थेचा पाया तयार करण्याचें काम पहिल्या पंचवार्षिक योजनेला करावयाचें होतें. ह्या दृष्टीनें पहिल्या पंचवार्षिक योजनेनें बऱ्याच प्रमाणांत यश संपादन केलें. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं शेती व उद्योगधंदे ह्या

दोन्हींच्या उत्पादनांत वाढ झालेली आढळून येते. योजनेंतील महत्त्वाचीं जवळ-जवळ सर्व उद्दिष्टें पुरीं झालीं आहेत व कांहीं ठिकाणीं तर त्यांच्याहि पुढें विकास झालेला आहे. ह्या पांच वर्षांत सुमारें १७ दशलक्ष एकर जास्त जमीन लागवडी-खालीं आली. विद्युत्‌शक्तीचें उत्पादन २३ लक्ष किलोवॅट वरून ३४ लक्ष किलोवॅटवर गेलें. सार्वजनिक व खाजगी दोन्ही क्षेत्रांत बरेच नवीन उद्योगधंदे अस्तित्वांत आले व त्यांपैकीं कांहींमध्यें उत्पादन सुरू झालें. राष्ट्रीय उत्पन्नांत सुमारें १८ टक्क्यांनीं वाढ झाली.

द्वितीय पंचवार्षिक योजना (१९५६–६१)

पहिल्या पंचवार्षिक योजनेपेक्षां दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्टें, प्रगतीचें पुढचें पाऊल या दृष्टीनें, साहजिकच अधिक व्यापक स्वरूपाचीं आहेत. समाजांतील आर्थिक विषमता नष्ट व्हावी, देशांतील उत्पन्नाचीं साधनें समाजाच्या मालकीचीं असावींत व समाजांतील सर्वच थरांतील लोकांना उच्च दर्जाची रहाणी प्राप्त करून घेण्याची समान संधि मिळावी; अशा तऱ्हेच्या समाजवादी समाजरचनेच्या पुरोगामी विचारांचें जनतेनें हार्दिक स्वागत केल्यामुळें द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्टें, नव्या धर्तीच्या व समाजवादी अर्थव्यवस्थेच्या चौकटींत बसविण्यांत आलीं आहेत. ह्या आर्थिक योजनेंतील मूलभूत उद्दिष्टें पुढीलप्रमाणें ठरविण्यांत आलीं आहेत. (१) राष्ट्रीय उत्पन्नांत एकंदर २५% वाढ करणें. (२) मूलभूत उद्योगधंद्यांच्या विकासावर विशेष भर देऊन व ग्रामोद्योग आणि लहान प्रमाणावरील उद्योग यांच्या विकासाकडे खास लक्ष देऊन झपाट्यानें औद्योगीकरण करणें आणि (३) जास्तींत जास्त लोकांना रोजगार मिळण्याची संधि ज्यायोगें मिळेल असे प्रयत्न करणें.

औद्योगीकरणाला दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें अग्रक्रम दिला आहे हें उघड आहे. इतर विविध उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठीं पोलाद, रसायनें, विद्युद्‌उपकरणें, लहान व मोठीं यंत्रें यांचें उत्पादनहि प्रथम मोठ्या प्रमाणावर व्हावें लागतें. या गोष्टींसाठीं आपल्याला इतर देशांवर अवलंबून रहावें लागूं नये या हेतूनें द्वितीय योजनेंत मूलभूत उद्योगधंद्यांच्या विकासावर विशेष भर दिलेला आहे. सुदैवानें या मूलभूत उद्योगधंद्यांचा विकास होण्याच्या दृष्टीनें आपणांपाशीं नैसर्गिक संपत्तीचा भरपूर पुरवठा आहे. मूलभूत उद्योगधंद्यांस भांडवल फारच मोठ्या प्रमाणावर लागतें. त्यामुळें खाजगी भांडवल या क्षेत्रांत पडण्याची शक्यता कमी आहे. शिवाय देशाचें संरक्षण करण्याच्या दृष्टीनें कांहीं उद्योगधंदे सरकारच्याच मालकीचें असणें इष्ट असतें. या दोन्ही कारणांकरितां मूलभूत उद्योगधंद्यांतील बरेचसे धंदे राष्ट्रीय मालकीचेच असतील.

या मूलभूत व महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचा वेगानें विकास होण्यासाठीं आपल्या देशांतील खनिज पदार्थांचें भरपूर प्रमाणांत उत्पादन व कार्यक्षम अशा दळणवळणांच्या सोयींची वाढ जलद व्हावयास पाहिजे. खनिज पदार्थांच्या पुरेशा सांठ्याशिवाय व दळणवळणाच्या कार्यक्षम सोयींच्या अभावीं सारीच योजना ढासळून पडेल. मालाची वाहतूक वेळेवर न होऊं शकल्यास कारखान्यांच्या ठिकाणीं कच्चा माल वेळेवर जाऊन पोहोंचणार नाहीं व त्यांच्या उत्पादनाच्या कार्यक्रमावर त्याचा परिणाम होईल. ज्यांचा सांठा संपत आला अशा कोळशासारख्या खनिज पदार्थांचा वापर काटकसरीनें झाला नाहीं तर कारखान्यांतील उत्पादनास अधिक खर्च येईल व तांब्यासारख्या ज्या पदार्थांचा तुटवडा आहे अशा धातूंच्या ऐवजीं योग्य अशा दुसऱ्या धातूंच्या उत्पादनाची वाढ केली नाहीं तरीहि उद्योगधंद्यांपुढें मोठीच समस्या उभी राहील. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन खनिज पदार्थांचें क्षेत्र व दळणवळणाची वाढ या दोन्ही जबाबदाऱ्या सरकारनें आपल्याच ताब्यांत ठेवल्या आहेत.

लहान उद्योगधंद्यांना संरक्षण देणें व त्यांची वाढ होण्यासाठीं मदत करणें हें औद्योगिक धोरणांतील प्रमुख अंग राहील. लहान उद्योगधंद्यांना वाव देणें दुहेरी रीतीनें उपयोगी पडेल. देशांतील औद्योगीकरणास लागणारें भांडवल अपुरें असल्यामुळें, उपलब्ध असलेलें भांडवल जास्तींत जास्त महत्त्वाच्या व तांतडीच्या गरजेच्या उद्योगधंद्यांत गुंतविणें आवश्यक आहे व आपणांस अत्यंत गरज असलेल्या मूलभूत उद्योगधंद्यांतच इतकें भांडवल लागेल कीं, आपणां-जवळ उपलब्ध असलेलें मर्यादित प्रमाणावरील भांडवल मूलभूत उद्योगधंद्यांवर खर्च होऊन उपभोग्य वस्तूंच्या निर्मितीसाठीं शिल्लक रहाणार नाहीं उपभोग्य वस्तूंच्या निर्मितीची जबाबदारी ग्रामोद्योग व लहान उद्योग यांना सहज उचलतां येईल. यापुढें अर्थव्यवस्थेचा जसजसा विकास होत जाईल त्या प्रमाणांत लोकांचें उत्पन्नहि वाढून उपभोग्य वस्तूंची मागणीहि वाढत जाईल. म्हणजे उपभोग्य वस्तूंचें उत्पादनहि वाढवावयास हवें. लहान उद्योग व ग्रामोद्योग यांना ही जबाबदारी नीट उचलतां यावी म्हणून त्यांना सरकार योग्य ती मदत करील. ह्या उद्योगधंद्यांच्या विकासाची तरतूद द्वितीय योजनेंत केलेली आहे.

या योजनेच्या मूळ आराखड्याप्रमाणें या पांच वर्षांच्या काळांत एकूण ४८०० कोटी रुपये खर्च व्हावयाचा होता. परंतु पुढें या योजनेमध्यें वाढ करण्यांत येऊन हा खर्च ५३०० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यांत आला. प्रत्येक बाबीवरील खर्चाचें एकूण खर्चाशीं प्रमाण खालीलप्रमाणें आहे.

(१) शेती	८ %
(२) समाजविकासयोजना	४ %
(३) धरणें व विद्युत्‌शक्तीयोजना	१८ %
(४) उद्योगधंदे व खाणकाम	१९ %
(५) दळणवळण	२९ %
(६) समाजसुधारणा वगैरे	२० %
(७) इतर	२ %
एकूण	१०० %

द्वितीय पंचवार्षिक योजनेचा काळ आतां जवळजवळ संपत आला आहे. योजनेचीं उद्दिष्टें किती प्रमाणांत साध्य झालीं आहेत, ह्याची आंकडेवारी अजून उपलब्ध नाहीं. परंतु आपल्याला एवढें निश्चितपणें म्हणतां येईल कीं, ही योजना यशस्वी करण्याचे आटोकाट प्रयत्न सर्वांकडून होत आहेत. ही जी राष्ट्रीय जागृति झालेली आहे व होत आहे ती खरोखरच अमोल आहे.

महाराष्ट्र हा हिंदी संघराज्याचा एक घटक आहे. सहाजिकच ह्या भारत-व्यापी विकासयोजनेंतील कांहीं भाग पूर्ण करण्याची जबाबदारी महाराष्ट्रावर पडली आहे व महाराष्ट्रहि ही जबाबदारी पार पाडण्याचा पराकाष्ठा प्रयत्न करीत आहे. पंचवार्षिक योजनांच्या गेल्या दहा वर्षांच्या काळांत महाराष्ट्रांत आधीं आस्तित्वांत असलेल्या उद्योगधंद्यांत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. त्याचबरोबर कांही नवीन उद्योगधंदेहि अस्तित्वांत आले. या प्रगतीची यथार्थ कल्पना यावयास त्याबद्दलचा बराच तपशील सांगावा लागेल. महाराष्ट्रीयां-बरोबर महाराष्ट्रियेतरांनीं यांत बराच भाग उचललेला आहे. पार्शी, गुजराथी, सिंधी, मुसलमान, मारवाडी वगैरे अनेकविध ज्ञातींच्या लोकांनीं आज महाराष्ट्रांत स्वतःचें भांडवल गुंतवून लहानमोठे अनेक कारखाने चालविले आहेत. महाराष्ट्राच्या सध्यांच्या उद्योगधंद्यांमध्यें महत्त्वाचे उद्योगधंदे म्हणजे सुती कापड, सर्वसाधारण व विजेसंबंधीचें इंजिनिअरिंग, रसायनें, साखर, वनस्पतिजन्य पदार्थ, कागद व कागदाचे पुठ्ठे आणि साबण हे होत.

महाराष्ट्रियांनीं या काळांत औद्योगिक क्षेत्रांतील जबाबदारीचा बराच वांटा उचलला. या काळांत किर्लोस्कर, कूपर, कुल्को, पॅको वगैरे इंजिनांचे; स्वास्तिक रबर वगैरे रबरी मालाचे; साठें, शांग्रिला वगैरे बिस्किटांचे; पेपको, डेक्कन पेपर मिल्स, हँडमेड पेपर वगैरे कागदांचे; धुतपापेश्वर, अल्ट्रा

लॅबोरेटरीज, अर्कशाळा, रसशाळा वगैरे अनेकविध औषधांचे; ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक डिव्हायसेस, बिजली प्रॉडक्टस्, परांडेकर, किर्लोस्कर इलेक्ट्रिक वगैरे वीजसामानाचे; स्वस्तिक प्लॅस्टिक, डोमिनियन प्लॅस्टिक वगैरे प्लॅस्टिक मालाचे; वसंत शिवाजी, महाराष्ट्र मेटल शीट वगैरे तांब्यापितळी मालाचे; असे अनेकविध कारखाने माल-उत्पादनांत गुंतलेले आढळतात. तसेंच चष्म्याच्या लेन्सेस, फोटोचे कागद, पैसाफंडाच्या: रेल्वे सिग्नल लेन्सेस्, रासायनिक काटे, वजनें, मापें, शिसूपेन्सिली, त्यानंतरचीं फोटोग्राफीचीं रसायनें वगैरे उत्पादनाचे कारखानेहि महाराष्ट्रीय भांडवलावर महाराष्ट्रियांच्या नेतृत्वाखालीं आज चालविले जात आहेत. भातसडीसाठीं आणि गळितासाठीं लागणारीं मोठी यंत्रसामुग्री बनविणारा कारखानाहि महाराष्ट्रीय प्रयत्नांनीं चाललेला आढळेल. साखरमशिनरी, विजेचीं उपकरणें, फौंटनपेन, फौंटनपेनची शाई व त्यासाठीं लागणारा इंक ब्ल्यू यांचेंहि उत्पादन महाराष्ट्रीय कारखानदार करीत आहेत. कोयनायोजनेसारख्या मोठ्या योजनांसाठीं लागणारे पोलादी पेनस्टॉक पाईप यशस्वी रीतीनें बनविण्याचें काम महाराष्ट्रांत चालू झालेलें आढळतें. आरलॅब्स्, सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज, यांसारखे वैशिष्ट्यपूर्ण व उत्तम प्रतीचे रंग बनविण्याचे कारखानेंहि काढण्यांत महाराष्ट्रीय यशस्वी झालेले दिसतात. वेस्टर्न इंडिया टॅनरीज्, ईस्टर्न लेदर वर्क्स हे महाराष्ट्रीय कारखाने तर प्रथमपासूनच उत्तम कातडी माल तयार करीत आहेत. डायमंड वॉच कंपनी, स्वदेशी क्लॉक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी यांचीं विजेवर चालणारीं घड्याळें भारतांत सर्वत्र खपत आहेत. साबण, सुवासिक तेलें, अत्तरें यांचे अनेकविध लहान कारखाने आहेतच. महाराष्ट्रांतील ऊस व त्यापासून होणारा गूळ जगप्रसिद्ध आहे. उसापासून साखर बनविण्यासाठीं बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, सासवड माळी, महाराष्ट्र शुगर, रावळगांव शुगर, उगार शुगर वगैरे महाराष्ट्रीय भांडवलावर चाललेले खाजगी कारखाने कोणास माहीत नाहींत? अलीकडे सहकारी तत्त्वावर अहमदनगर, सोलापूर, पुणें, उत्तर सातारा आणि दक्षिण सातारा या जिल्ह्यांमध्यें १०–१२ नवीन साखर-कारखाने यशस्वी रीतीनें उभारण्यांत आलेले आहेत. ह्याशिवाय माधवनगर कॉटन मिल्स्, स्वस्तिक टेक्स्टाइल्स व पॉवर लूम्स् इचलकरंजी, भिवंडी वगैरे गांवीं आहेतच.

सरकारी उद्योगधंदे—खाजगी मालकीचे कारखाने सोडल्यास हिंदुस्थान अँटिबायोटिक्स (पेनिसिलीन), अॅम्युनिशन अँड हाय एक्सप्लोझिव्ह, एस्.टी. सेंट्रल वर्कशॉप, अॅटॉमिक रीअॅक्टर सेंटर, सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेस नाशिक, नाण्यांची टांकसाळ मुंबई, त्याचबरोबर सरकारी मदतीनें आणि प्रोत्साहनानें

परकीय भांडवलदारांचे निघालेले तेलशुद्धीचे कारखाने, रोझे कंपनीचा व्हिटॅमिनचा होऊं घातलेला कारखाना व कोयना वीज-केंद्रापाशीं होऊं घातलेला ॲल्युमिनिअमचा कारखाना यांचा उल्लेख होणें जरूर आहे. महाराष्ट्रांत जलविद्युत्, शक्ति मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झालेली आहे. टाटा हायड्रो, टाटा पॉवर, आंध्रव्हॅली असे टाटांचे व कोयना जलविद्युत् हा सरकारी आणि कल्याणजवळ चोला येथें वाफेवर वीज निर्माण होणारें सरकारी केंद्र आणि तुर्भे येथें तेलावर वीज निर्माण करणारें टाटाचें केंद्र हीं मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिणारीं केंद्रें स्वस्त दरांत विद्युत्-शक्ती पुरवीत आहेत. राधानगरी, भंडारदरा व इलेक्ट्रिसिटी बोर्डामार्फत स्थानिक केंद्रें—रत्नागिरी, चिपळूण वगैरेसारखीं अशीं वाढत्या प्रमाणावर वीज निर्माण करणारीं केंद्रें; शेतीसाठीं मुळा, कुकडी, वीर, खडकवासला, घोडगंगापूर अशीं पाणी-पुरवठ्याचीं धरणें पंचवार्षिक योजनेंत तयार होऊं घातलीं आहेत. यांशिवाय उद्योगधंद्यांसाठी लागणारा पैसा उपलब्ध करण्यासाठीं मुंबई स्टेट फायनान्स कार्पोरेशन, स्टेट बँकेची पायलट स्कीम, तसेंच स्टेट एड् टु इंडस्ट्रीज रूल्स् अन्वयें सरकारकडून मिळणारीं कर्जें वगैरे योजना आज चालू आहेत. लहान व मध्यम उद्योगांना तांत्रिक सल्ला देण्यासाठीं इंडस्ट्रीज सर्व्हिस इन्स्टिटयूट कार्यक्षमतेनें कार्य करीत आहे. हत्येबंदीनें उद्योगधंद्यांस लागणारीं यंत्रें देण्यासाठीं नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कार्पोरेशन अस्तित्वांत असून ती चांगलें कार्य करीत आहे. निरनिराळ्या सामुदायिक भांडवलाच्या बँकांना उद्योगधंद्यांना कर्जें देतां यावींत म्हणून त्यांनीं दिलेल्या कर्जापैकीं मोठ्या रकमेची हमी देण्याची व्यवस्था रिझर्व्ह बँकेतर्फें होत आहे.

सरकारी योजना मोठ्या प्रमाणावर जोंवर चालू आहेत तोंवर खाजगी उद्योगधंद्यांना फार मोठ्या प्रमाणावर गिऱ्हाईक उपलब्ध होत आहे व या योजना पूर्ण झाल्यावरहि जनतेच्या चढत्या जीवनमानामुळें तें तसेंच टिकून राहाणेंहि शक्य होईल. सध्याचा काळ हा उद्योगधंद्यांना अत्यंत अनकूल आहे आणि नव्या धंद्यांना सर्वतोपरी सरकारी साह्य व पाठिंबाहि मिळत आहे. नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीच्या काळीं ही फार अनुकूल अशी स्थिति आहे.

●●●

४

★

प्रमुख उद्योगधंदे

महाराष्ट्रांतील विद्यमान उद्योगधंद्यांची माहिती पुढें दिलेली आहे. फॅक्टरी ॲक्टखालीं नोंदण्यांत आलेल्या उद्योगांची माहिती मुख्यतः दिली आहे. त्याखेरीज इतर ग्रामोद्योगांची व कुटीरोद्योगांची माहिती उपलब्ध तेवढीच संकलित करून दिली आहे. कांहीं प्रमुख उद्योगांची माहिती—कापड व सूतगिरण्या, साखरेचे कारखाने यांबद्दलची—विस्तारानें दिली आहे.

सुती कापडाच्या गिरण्या—

महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांमध्यें सुती कापडाचा उद्योगधंदा सर्वांत मोठा व पुढारलेला आहे. भारतांत आणि त्यांतहि विशेषतः महाराष्ट्रांत कापडाच्या गिरण्या विपुल आहेत. भांडवल, कामगार वगैरे सर्वच दृष्टींनीं हा भारतांतील एक महत्त्वाचा उद्योगधंदा आहे. आज भारताच्या सर्व प्रांतांत व प्रमुख शहरांत कापडाच्या गिरण्या आहेत व नवीन स्थापन होत आहेत. तरीपण महाराष्ट्र या उद्योगधंद्यांमध्यें अग्रेसर आहे.

भारतांतील पहिली यशस्वी कापडाची गिरणी महाराष्ट्रांतच स्थापन झाली. ही गिरणी मुंबईला १८५४ सालीं सर कावसजी नानाभाई दावर ह्या पारशी सद्‌गृहस्थानें स्थापन केली. त्यानंतर मुंबईलाच अनेक कापडाच्या गिरण्या स्थापन झाल्या व मुंबई हें भारतांतील कापडधंद्याचें मुख्य केंद्र बनलें. मुंबई ह्या धंद्याचें मुख्य केंद्र होण्याचीं अनेक कारणें आहेत. मुंबई हें एक नैसर्गिक उत्तम बंदर असल्यामुळें व्यापाराच्या दृष्टीनें फार सोयीचें आहे. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचें पश्चिम

किनाऱ्यावरील तें एक महत्त्वाचें केंद्र होतें. त्यांनीं ह्या शहरांत उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या दृष्टीनें अनेक सोयी करून ठेवल्या आहेत. इंग्रजांच्या सान्निध्यांत व्यापारांत पुढें आलेल्या पारशी, भाटिये, मारवाडी, गुजराथी इत्यादि जमातींनीं फार मोठ्या संख्येनें या शहरांत वस्ती केल्यामुळें त्यांच्या व्यापारांतील कुशलतेचा, धंद्यांतील माहितीचा व भांडवलाचा उपयोग आपोआपच महाराष्ट्राला झाला. अजून देखील कापडाच्या उद्योगधंद्यांत महाराष्ट्रियांपेक्षां इतर लोकच आघाडीवर आहेत. ह्या सर्व गोष्टींबरोबर मुंबईची दमट हवा कापसाचा धागा टिकण्यास फारच अनुकूल आहे. परंपरेमुळें तंत्रज्ञ व इतर संघटनाकुशल अधिकारीवर्ग सहज मिळूं शकतो. उत्तम बंदर असल्यामुळें माल दुसरीकडे नेणें सोयीचें पडे. पूर्वी कोळसा देखील बोटींनें आणत असत. आतां विजेचा उपयोग सुरू झाला आहे व ही वीज मुंबईला भरपूर प्रमाणांत उपलब्ध होऊं शकते. ह्या सर्व कारणांमुळें मुंबई हें कापड–उद्योगधंद्याचें केंद्र झालें आहे. कांहीं काळानें मुंबईत गिरण्यांची फार गर्दी झाली व दुसऱ्या ठिकाणीं गिरण्या स्थापन होण्यास सुरवात झाली. सोलापूर, धुळें, जळगांव, चाळिसगांव, भोर, मिरज, सांगली वगैरे ठिकाणीं कापड–गिरण्या अस्तित्वांत आल्या.

वर सांगितल्याप्रमाणें इ. स. १८५४ सालीं मुंबईला पहिली कापडाची गिरणी स्थापन झाली. या कापडाच्या गिरणीला प्रथम परदेशांतून येणाऱ्या मागणीवर अवलंबून रहावें लागलें. कारण भारतीय लोकांच्या गरजा त्या वेळीं घरगुती धंद्यांच्या उत्पादनानें भागविल्या जात होत्या. १८६१ सालीं अमेरिकेंत यादवी युद्ध सुरू झालें. त्यामुळें अमेरिकेंतून इंग्लंडमधील कापड-गिरण्यांना होणाऱ्या कच्च्या कापसाचा पुरवठा बंद पडला. त्यामुळें भारतांतील कच्च्या कापसाला एकदम मागणी वाढली. मुंबईतील दलालांनीं वाढत्या किंमतीला कापूस विकून भरपूर नफा मिळविला. अमेरिकेंतील यादवी युद्ध संपल्यानंतर तेथून इंग्लंडमध्यें परत कापसाचा पुरवठा सुरू झाला व भारतामध्यें थोडी मंदीची लाट आली. तिचा कापडधंद्यावर थोडाफार परिणाम झालाच. त्यामुळें कापडगिरण्यांची वाढ व्हावी तितकी झपाट्यानें झाली नाहीं. तरी देखील १८७२ सालीं मुंबई प्रांतामध्यें १८ कापडाच्या गिरण्या होत्या. त्या-नंतर मात्र कापडगिरण्यांमध्यें झपाट्यानें वाढ झाली. १८७८ सालीं मुंबई-प्रांतामध्यें ४२ कापडगिरण्या होत्या. सुरवातीला या गिरण्यांतून फक्त सूतच काढण्यांत येत होतें. चीनमधून हिंदुस्थानांतील सुताला फार मागणी होती. १८८०च्या सुमारास कांहीं माग सुरू झाले पण मुख्य भर सुतावरच होता. याच सुमारास कापसाच्या उत्पादनाच्या ठिकाणीं सरकी काढण्याचे व कापूस

दावण्याचे कारखाने निघाले. यामुळें कच्चा कापूस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेणें सुलभ झालें.

१८८० ते १८९५ या काळांत कापडाच्या उद्योगधंद्यांत आणखी वाढ झाली. ह्याच काळांत मुंबई शहरांत गिरण्यांची फार गर्दी झाल्यामुळें इतर ठिकाणीं कापडाच्या गिरण्या निघाल्या. १८८५ पर्यंत चात्यांच्या संख्येंत मुख्यत: वाढ झाली. त्यानंतर मात्र मागांच्या संख्येंतहि वाढ होऊं लागली. ह्या काळांत सुताचा दर्जा वाढला व विविध प्रकारचें सूत व कापड यांचें उत्पादन होऊं लागलें. इतर देशांतून ह्या वस्तूंना मोठ्या प्रमाणावर मागणी येऊं लागली. विशेषत: चीन व जपान या देशांत या दोन्ही वस्तु अतिशय मोठ्या प्रमाणावर विकल्या जात. या काळांत भारतीय व्यापाऱ्यांनीं बरीच कमाई केली.

इ. स. १८९५ ते १९०० हा काळ कापडधंद्याच्या दृष्टीनें फारसा चांगला गेला नाहीं. दुष्काळ व प्लेग यांनीं महाराष्ट्रियांची अगदीं दैना उडवून टाकली. याच सुमारास भारतीय गिरण्यांना इंग्लंडमधील गिरण्यांच्या मालाकडून होणाऱ्या स्पर्धेला तोंड द्यावें लागलें. भारतावर त्या वेळीं इंग्रजांची सत्ता असल्याकारणानें इंग्लंडमधून भारतामध्यें आयात होणाऱ्या मालावरील कर कमी करण्यांत आले. त्याचबरोबर भारतीय मालावर उत्पादन-कर बसविण्यांत आला. त्यामुळें विलायती माल व भारतीय माल ह्या दोन्हींची किंमत बाजारांत जवळजवळ सारखीच राहिली. १८८२ सालीं पास केलेल्या मजुरांच्या कायद्याप्रमाणें मजुरांचे कामाचे तास कमी करण्यांत आले. त्यामुळें गिरण्यांचें उत्पादन कमी झालें. याच सुमारास भारतीय कापड–उद्योगधंद्या-समोर आणखी एक समस्या उभी राहिली. १८९३ नंतर चिनी नाणें व भारतीय रुपये यांच्या विनिमयमूल्यांत बदल पडला. चीनच्या नाण्यांत भारतीय रुपयाचें विनिमय–मूल्य वाढलें. त्यामुळें भारतीय मालाची चीनमधील किंमत वाढली. ह्याचा परिणाम भारतीय मालाची चीनला होणारी निर्यात कमी होण्यावर झाला. ह्यामुळें भारतीय उद्योगधंद्यांपुढें फार मोठी अडचण उभी राहिली. याच सुमारास अमेरिकेंतून भारतामध्यें मोठ्या प्रमाणावर मालाची आयात होण्यास सुरुवात झाली. ह्या मालाकडून होणाऱ्या स्पर्धेलाहि भारतीय गिरण्यांना तोंड द्यावें लागलें. याच काळांत जपान व चीन या देशांत आधुनिक यंत्र-सामुग्रीनें सुसज्ज अशा कापडाच्या गिरण्या सुरू झाल्या. त्यामुळें ह्या बाजारपेठा भारतीय मालाला जवळजवळ बंद झाल्या. एवढेंच नव्हे तर जपानी माल भारतीय बाजारपेठेंत भारतीय मालाची स्पर्धा करूं लागला.

भारतीय सरकारचें धोरणहि भारतीय उद्योगधंद्याला फारसें पोषक नव्हतें. ह्या अडचणींनीं भारतीय कारखानदार डगमगून गेले नाहींत. त्यांनीं धैर्यानें ह्या संकटांना तोंड दिलें. ह्या काळांतहि थोडया प्रमाणावर का होईना परंतु कापड-उद्योगधंद्याची वाढच झाली.

१९०६ सालीं वंगभंगाची चळवळ सुरू झाली. भारतांत सर्वत्र स्वदेशीचें वारें वाहूं लागलें. 'परदेशी मालावर बहिष्कार व भारतीय मालाचा स्वीकार' हें लोकांचें ब्रीदवाक्य झालें. परदेशी मालाचा भारतीय बाजारपेठेंतील खप एकदम कमी झाला व तितक्याच प्रमाणांत भारतीय मालाचा खप वाढला. जागतिक कापूस-बाजारांत १९०७ सालीं मंदीची एक लाट उसळली. परंतु त्याचा भारतीय कापडधंद्यावर फारसा परिणाम झाला नाहीं. १९१४ साला-पर्यंत भारतीय कापड-उद्योगधंद्याची उत्तरोत्तर भरभराटच होत गेली. नुसती संख्येंत नव्हे तर मालाच्या दर्जांतहि चांगलीच वाढ झाली. इतर देशांच्या स्पर्धे-मध्यें आपला माल कसा टिकाव धरून राहूं शकेल ह्याचा भारतीय कारखानदार विचार करूं लागले. ह्यामुळें जास्तींत जास्त चांगला दर्जा कमींत कमी किमतीला देतां यावा म्हणून कारखानदार झटून प्रयत्न करूं लागले.

१९१४ सालीं पहिलें जागतिक महायुद्ध सुरु झालें. त्यामुळें जागतिक व्यापार एकदम थांबला. इतर देशांतून भारतांत होणारी मालाची आवक एकदम थांबली. त्यामुळें भारतीय मालाला भारतीय बाजारपेठ संपूर्ण मोकळी मिळाली. ह्यामुळें ह्या काळांत भारतीय कापड-उद्योगधंद्याची वाढ होण्यास अनुकूल परिस्थिति होती. परंतु गिरण्यांना लागणारी यंत्रसामुग्री इतर देशांतून आणतां न आल्यामुळें ह्या काळांत भारतीय उद्योगधंद्यांची व्हावी तितकी वाढ झाली नाहीं. दुसरें, ह्या काळांत मिळालेला नफा कारखानदारांनीं भागदारांना लाभांश म्हणून वांटून टाकला. ह्यामुळें नंतर आलेल्या प्रतिकूल परिस्थितींशीं तोंड देण्यास त्यांच्या हातीं पैसा राहिला नाहीं.

युद्ध संपल्यानंतर भारतांत तेजीची लाट आली. इतर देशांतून देखील भारतीय मालाला मागणी येऊं लागली. कारण युद्धामुळें बऱ्याच देशांचें फार नुकसान झालें होतें. या काळांत या धंद्याची चांगलीच वाढ झाली. उत्पादनांत सुद्धां प्रमाण व दर्जा ह्या दोन्ही दृष्टींनीं सुधारणा झाली. लढाईमुळें वाढलेली मागणी १९२३ सालीं संपुष्टांत आली व उतरणीस सुरुवात झाली. १९२३ सालीं सुरू झालेला मंदीचा काळ साधारणपणें १९३७ पर्यंत चालू राहिला. अर्थात् थोडे चढउतार झालेच. परंतु हा १५ वर्षांचा काळ एकंदरींत मंदीचाच म्हणावा लागेल. या काळांत इंग्लिश व जपानी मालानें परत भारतीय बाजार-

पेठेवर आक्रमण केलें. जपानमधील कापडाच्या धंद्याला तेथील सरकारचें साहाय्य होतें व निर्यात कशी वाढेल या दृष्टीनें प्रयत्न करण्यांत येत होते. भारतांत परकी सरकार असल्यामुळें त्या सरकारचें धोरण नेमकें भारतीय धंद्याला प्रतिकूल होतें.

या काळांतील भारतीय कारखान्यांची अंतर्गत संघटनाहि दोषपूर्ण होती. भांडवलाचा नीट उपयोग केला जात नव्हता. राखीव निधि नसल्यामुळें प्रतिकूल परिस्थितीशीं झगडण्यासाठीं हातांत पैसा नव्हता. ह्यामुळें धंद्यांत सुधारणा करतां आल्या नाहींत. मंदीच्या काळामुळें नवीन भांडवलहि मिळणें शक्य नव्हतें. मजुरीचे वाढते दर, स्थानिक कर, इतर गिरण्यांची स्पर्धा, विजेचा वाढता खर्च इत्यादि कारणांमुळें मंदीचा तडाखा मुंबईतील गिरण्यांना सर्वांत जास्त बसला. त्यांतच १९२९ सालची जागतिक मंदीची लाट आली. या धंद्याला संरक्षण द्यावें अशी भारतीय कारखानदारांनीं सरकारकडे जोराची मागणी केली. १९३० सालीं कापड-धंद्याला तीन वर्षांपुरतें संरक्षण देण्यांत आलें. १९३० सालीं महात्मा गांधींनीं असहकाराची चळवळ जोरांत सुरू केली. साहजिकच स्वदेशीचा पुरस्कार हा या चळवळीचा एक भाग होता. ह्या चळवळीमुळें कापड-उद्योगधंद्याला एका प्रकारचें जादा संरक्षणच मिळालें व त्याचा खूपच फायदा झाला. १९३३ सालीं कापडधंद्याला संरक्षण देण्याच्या प्रश्नाचा फेरविचार केला व संरक्षण चालू ठेवण्याचें ठरलें. जपानी मालाविरुद्ध संरक्षण-कर न लादण्याचा १९०४ चा भारत व जपानमधील करार एप्रिल १९३३ मध्यें मोडून हे संरक्षण-कर जपानी मालाला देखील लावण्यांत आले. ह्यामुळें जपान व भारत यांमधील व्यापारी संबंध बिघडूं लागले. तेव्हां ७ जानेवारी १९३४ ला नवीन करार करण्यांत आला. याअन्वयें भारतांतील जपानी कापडाची आयात व जपानला निर्यात होणाऱ्या भारतीय कापसाची मात्रा निश्चित करण्यांत आली. १९३३ मध्यें 'लीज–मोदी' करार इंग्लिश गिरण्या व भारतीय गिरण्या यांमध्यें करण्यांत आला. या करारान्वयें इंग्लिश मालाला भारतीय बाजारपेठेंत इतर देशांच्या मालापेक्षां १९३५ पर्यंत जास्त सवलती द्याव्यात व भारतीय कापसाला ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व देशांमध्यें मागणी निर्माण करावी असें ठरलें. भारतीय कारखान्यांच्या दृष्टीनें हा करार अर्थातच अतिशय तोट्याचा होता.

संरक्षणाचा काल १९४० मध्यें संपत होता तो १९४७ पर्यंत वाढविण्यांत आला. १ एप्रिल १९४७ ला सुती कापड व सुतावरील आयात-करांचें भारत सरकारनें रेव्हिन्यू ड्यूटींत रूपांतर केलें.

१९३९ सालीं दुसरें महायुद्ध सुरू झालें. इतर देशांतून भारतांत माल येण्याचें बंद झालें. जपान शत्रुराष्ट्र समजलें गेल्यामुळें दोस्त राष्ट्रांत भारतीय कापडाची मागणी वाढली. भारतीय कापड-उद्योगधंद्याची ह्या काळांत चांगली वाढ झाली. अस्तित्वांत असलेल्या यंत्रसामुग्रीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्यांत आला. कांहीं नवीन गिरण्याहि अस्तित्वांत आल्या. परंतु उत्पादनाच्या वाढीपेक्षांहि मागणीची वाढ अधिक वेगाची होती. त्यामुळें कापडाच्या किंमती झपाट्यानें वाढूं लागल्या. या परिस्थितीला आळा घालण्यासाठीं १९४३ मध्यें कापड व सुतावर नियंत्रण जाहीर केलें गेलें. १९४५ मध्यें युद्ध संपलें तरी देखील कापडाची टंचाई कमी झाली नाहीं. जानेवारी १९४८ मध्यें नियंत्रण काढलें; परंतु त्यामुळें परिस्थिति अधिकच बिघडली. म्हणून डिसेंबर १९४८ मध्यें सर्व नियंत्रणें परत लागू करण्यांत आलीं. १९५० सालापासून भारत-सरकार व राज्य-सरकार दोघांनींहि निर्यातीस प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. १९५१ सालीं पहिल्या पंचवार्षिक योजनेस सुरुवात झाली. पहिल्या योजनेंत कापड-उद्योगधंद्याचें उद्दिष्ट ४७०० दशलक्ष वार कापड व १६४० दशलक्ष पौंड सूत असें ठरविलें होतें. प्रत्यक्षांत हीं उद्दिष्टें योजना संपण्यापूर्वींच साध्य केलीं गेलीं. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचीं उद्दिष्टें ६८५० दशलक्ष वार कापड व १९५० दशलक्ष पौंड सूत अशीं ठरविलीं आहेत.

महाराष्ट्राला कापडाचें कोठार असें सहज म्हणतां येईल. कारण भारतांतील इतर कोणत्याहि भागापेक्षां महाराष्ट्रामध्यें कापड गिरण्या जास्त आहेत. भारतांतील एकूण ५१६ गिरण्यांपैकीं १०१ गिरण्या महाराष्ट्रांत आहेत. भारताच्या एकंदर (गिरणी) कापड-उत्पादनापैकीं सुमारें ४६ टक्के कापड व सूत-उत्पादनापैकीं ४४ टक्के सूत महाराष्ट्रांत निर्माण होतें. महाराष्ट्रांतील एकट्या मुंबई शहरांतील सूत व कापड-निर्मिति एकंदर भारताच्या सूत व कापड-निर्मितीच्या अनुक्रमें २० व ३६ टक्के होईल.

महाराष्ट्रांतील कापड-गिरण्यांची सध्यांची परिस्थिति—महाराष्ट्र राज्यांतील ८०३६ कारखान्यांत असलेल्या ७ लक्ष कामगारांपैकीं सुमारें ३ लक्ष कामगार या उद्योगधंद्यांत कामावर आहेत. सध्यां असलेल्या ९७ कापड-गिरण्यांत ४१,२५,५४० चात्या आणि ८२,८२९ माग असून त्यांपैकीं ६५ गिरण्या बृहन्मुंबईंतच आहेत. बृहन्मुंबईंतील या गिरण्यांमध्यें ३१,६८,६३८ चात्या आणि ६३,४०९ माग बसविण्यांत आले असून, त्या ठिकाणीं २,४९,६०० कामगार रोज काम करीत असतात. उरलेल्या गिरण्यांपैकीं ६ औरंगाबाद विभागांत, ९ नागपूर विभागांत, १६ पुणें विभागांत, १ पश्चिम खानदेशमध्यें

आहे. औरंगाबाद विभागांतील गिरण्यांमध्यें १,६१,७६० चात्या आणि ३,६२१ माग आहेत, तर नागपूर विभागांत ३,१६,६२८ चात्या व ५,८५४ माग आहेत. पुणें विभागांतील गिरण्यांत ४,२९,३६६ चात्या व ८,९४५ माग आहेत, तर पश्चिम खानदेश जिल्ह्यांत ४९,१४८ चात्या व १,०४० माग आहेत. १९७·७ कोटी रुपयांच्या उत्पादक भांडवलांपैकीं केवळ सुती कापडाच्या उद्योगधंद्यांतच सुमारें शें. ५० म्हणजे रु. ९७·१ कोटींचें भांडवल गुंतलेलें आहे.

सुती कापड-धंद्यापुढील समस्या

महाराष्ट्रांतील सुती कापड-उद्योगधंद्यापुढें एकूण चार समस्या आहेत—

(१) पहिली समस्या म्हणजे कच्च्या मालाची. कच्चा माल महाराष्ट्रांत भरपूर प्रमाणांत उपलब्ध आहे हें खरें; परंतु लांब धाग्याच्या कापसाचें उत्पादन महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर होत नाहीं. फाळणीपूर्वी लांब धाग्याच्या कच्च्या कापसाचा पुरवठा सिंध व पंजाब ह्या प्रांतांतून होत असे. परंतु आतां हे प्रांत पाकिस्तानांत गेले आहेत. त्यामुळें हा पुरवठा जवळजवळ बंद झाला आहे आणि मिळालाच तर किंमत फार द्यावी लागते. तेव्हां महाराष्ट्रांतील कापूस-उत्पादनाच्या प्रदेशांतच लांब धाग्याच्या कापसाचें उत्पादन करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे तरच हा प्रश्न सुटण्याची शक्यता आहे.

(२) महाराष्ट्रांतील सुती कापडाच्या उद्योगधंद्यापुढील दुसरी समस्या म्हणजे रंगांची. चांगल्या तऱ्हेचे पक्के रंग अजून महाराष्ट्रांत किंवा भारतांतसुद्धां तयार होत नाहींत व यासाठीं आपल्याला परदेशांवर अवलंबून राहावें लागतें. या बाबतींत महाराष्ट्रांतील कारखानदारहि उदासीन आहेत. ही परिस्थिति ताबडतोब बदलली पाहिजे.

(३) सध्यां महाराष्ट्रांत घरगुती उद्योगधंदे—चरखा, हातमाग वगैरेंचा उपयोग करणारे—व आधुनिक पद्धतीच्या कापडगिरण्या यांमध्यें स्पर्धा उत्पन्न होऊं पाहात आहे. अनेक कारणांमुळें सरकार घरगुती उद्योगधंद्यांना उत्तेजन देत आहे. अशी अन्तर्गत स्पर्धा दोन्ही प्रकारच्या उद्योगधंद्यांना मारक ठरेल. तेव्हां ह्या दोन्ही प्रकारच्या उद्योगधंद्यांत बाजारपेठेचें वांटप केलें पाहिजे म्हणजे दोन्हीहि प्रकारच्या उद्योगधंद्यांचा विकास होईल.

(४) महाराष्ट्रांतील सुती कापडाच्या उद्योगधंद्यासमोर उभी असलेली शेवटची समस्या म्हणजे यंत्र-सामुग्रीची. कापड-गिरण्यांत लागणाऱ्या यंत्र-सामुग्रीकरितां भारताला अजून परदेशांवर अवलंबून राहावें लागतें. उद्योग-

धंद्यांच्या पुढील विकासाच्या दृष्टीनें ही गोष्ट अतिशय वाईट आहे. तेव्हां लवकरांत लवकर यंत्र-सामुग्री तयार करणारे कारखाने भारतांत स्थापन केले पाहिजेत. ह्या दृष्टीनें प्रयत्न करण्यास सुरुवात देखील झाली आहे. परंतु अजून बरेंच करावयाचें बाकी आहे.

कापड-गिरणींच्या धंद्यावर अवलंबून असणारे इतर धंदे

१. खळ—महायुद्धापूर्वीं खळ परदेशांतून आणविली जात असे. महायुद्धाच्या काळांत ही आयात बंद पडली. त्यामुळें भारतांत गहूं, ज्वारी व मका ह्यांपासून खळ तयार करण्याचे कांहीं कारखाने उघडले गेले.

२. तारा (Wire Healds) :—गिरण्यांना लागणाऱ्या तारा व इतर तत्सम पदार्थांचें उत्पादन करण्यासाठीं मुंबईत एक कारखाना आहे. परंतु एकंदर गरजेच्या मानानें ह्या कारखान्याचें उत्पादन फार कमी आहे.

३. धोटे, चात्या व रिळें यांचे कारखाने—महायुद्धापूर्वीं ह्या वस्तूंसाठीं भारत इतर देशांवर अवलंबून होता. महायुद्धाच्या काळांत ह्या वस्तूंचें उत्पादन महाराष्ट्रांत सुरूं झालें. ह्या धंद्यासाठीं चांगलें लाकूड मिळणें आवश्यक असतें. सह्याद्रीच्या जंगलांत योग्य असें लाकूड मिळूं शकेल असें तज्ज्ञांचें मत आहे.

४. कापसांतील सरकी काढण्याचे व कापूस दाबून गठ्ठे बांधण्याचे कारखाने—कच्च्या कापसाच्या उत्पादनाचें ठिकाण व गिरण्या हे दोन्ही जवळ-जवळ असतात असें नाहीं. अशा वेळीं उत्पादनाच्या ठिकाणापासून गिरण्यांपर्यंत कापूस नेणें जरूर पडतें. अशा वेळीं नुसता कापूस नेणें त्रासाचें व दगदगीचें होतें. म्हणून कापूसउत्पादनाच्या ठिकाणींच सरकी काढण्याचे व कापूस दाबून गठ्ठे बनविण्याचे कारखाने निघाले आहेत. गठ्ठे बनविल्यामुळें कापूस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेणें फार सोयीचें होतें व बराचसा त्रास व खर्च वांचतो. १९५९ सालअखेर महाराष्ट्रांत सरकी काढण्याचे व गठ्ठे बांधण्याचे एकूण ३५९ कारखाने होते व त्यांतील दैनंदिन सरासरी कामगार-संख्या १३६१४ होती. सर्वांत जास्त कारखाने–१०४–पूर्व खानदेशांत असून त्यांतील दैनंदिन सरासरी कामगारसंख्या ४६४४ होती.

इतर वस्त्रव्यवसायांचे महाराष्ट्रांतील कारखाने

ह्यांमध्यें रेशमाच्या गिरण्या, लोकरीच्या गिरण्या, लेसच्या गिरण्या; गालिचे, सतरंज्या वगैरे तयार करणारे कारखाने; गंजीफ्रॉक्स, पायमोजे वगैरे तयार करणारे कारखाने; दोर, दोरे व सुतळ्या बनविणें वगैरे उद्योगधंद्यांचा समावेश होतो.

रेशमाच्या गिरण्या

फार पूर्वकाळापासून महाराष्ट्रांत रेशीम उत्पादन करून त्याच्यापासून कापड उत्पादन करण्याचा धंदा चालू आहे. अर्थात् त्या वेळीं हा धंदा हस्त-व्यवसाय म्हणून चालविण्यांत येत होता. कृत्रिम रेशमाचें उत्पादन करावयास सुरुवात झाल्यापासून हा धंदा मोडकळीस येत चालला आहे.

कृत्रिम रेशमाचें उत्पादन महाराष्ट्रांत दुसऱ्या महायुद्धानंतर सुरूं झालें. १९४६ सालीं तीन मोठे कारखाने भारतांत स्थापले गेले. त्यांपैकीं एक मुंबईला आहे. ह्या कारखान्यांत कृत्रिम रेशमी सूत तयार होतें. परदेशांतून सूत आणून त्यापासून कापड विणण्याचे कारखाने मात्र महाराष्ट्रांत बरेच आहेत. ह्या धंद्याला अजूनहि पुष्कळ वाव आहे. कृत्रिम रेशमाच्या व्यवसायाचे महाराष्ट्रांत १९५९ सालअखेर ४६७ कारखाने होते व त्यांतील दैनंदिन सरासरी कामगार-संख्या २४,८६६ होती.

गंजीफ्रॉक, पायमोजे वगैरे विणण्याचे कारखाने

ह्या धंद्यामध्यें महाराष्ट्राचा भारतांत दुसरा क्रमांक लागतो. अर्थात् ह्या धंद्यांचे फारसे मोठे कारखाने नाहींत. हस्तव्यवसाय म्हणून हा धंदा बऱ्यापैकीं चालतो. १९५९ सालअखेर महाराष्ट्रांत गंजीफ्रॉक, पायमोजे वगैरे विणण्याचे एकूण ४५ कारखाने होते व त्यांतील दैनंदिन सरासरी कामगारसंख्या १५५१ होती.

लोकरीचे कारखाने

महाराष्ट्रांत हा उद्योगधंदा फारशा मोठ्या प्रमाणावर नाहीं. मुंबई–ठाणें विभागांत लोकरीच्या नऊ गिरण्या असून यांमध्यें ५५,७७२ चात्या व ४२६ माग चालू असतात.

ह्याशिवाय महाराष्ट्रांत लेसच्या गिरण्या, गालिचे, सतरंज्या वगैरे तयार करण्याचे कारखाने, दोर, दोरे व सुतळ्या बनविणें वगैरे इतर उद्योगधंदे चालू आहेत; पण ते फारसे महत्त्वाचे नाहींत.

• • •

५

★

प्रमुख उद्योगधंदे

साखर-कारखाने

मागील प्रकरणांत आपण महाराष्ट्रांतील पहिल्या क्रमांकाच्या म्हणजेच सुती कापडाच्या उद्योगधंद्याची माहिती पाहिली. ह्या प्रकरणांत महाराष्ट्रांतील दुसऱ्या क्रमांकाच्या उद्योगधंद्यांची—साखर कारखान्यांची—माहिती देण्याचें योजिलें आहे.

ऊंस आणि त्यापासून तयार होणारे पदार्थ भारतीयांना प्राचीन काळापासून माहीत आहेत. हिंदु शास्त्रांत व वेदांमध्यें साखरेचा उल्लेख बऱ्याच ठिकाणीं सांपडतो. आधुनिक पद्धतीवर साखरेचा कारखाना भारतामध्यें विसाव्या शतकाच्या सुरुवातीला निघाला. हा कारखाना उत्तर प्रदेशांत होता. भारतांतील साखरेचा पहिला कारखाना जरी इतक्या लवकर निघाला तरी १९३०–३१ सालापासून पुढेंच ह्या उद्योगधंद्याची खरी वाढ झाली. टारिफ बोर्डाच्या शिफारशीनुसार १९३२ पासून १५ वर्षेपर्यंत या धंद्याला संरक्षण देण्यांत आलें. या संरक्षणामुळेंच या धंद्याची खरी वाढ झाली. नाहींतर जावा, मॉरिशस् वगैरे देशांतून आयात होणाऱ्या साखरेशीं टक्कर देऊन भारतांतील साखरेच्या उद्योगधंद्याला प्रगति करणें फार जड गेलें असतें. १९३० सालीं भारतांत साखरेचे फक्त ३० कारखाने होते व एकूण उत्पादन १,५८,००० टन होत असे. १९३५ मध्यें साखरेचे कारखाने १३० झाले व उत्पादन १० लक्ष टनांवर गेलें. परदेशांतून आयात होणाऱ्या साखरेचें प्रमाण एकदम घटलें. उंसाच्या लागवडीखालीं असलेली जमीन ३४ लक्ष एकरांवरून ४६ लक्ष एकरांवर गेली.

१९२९ च्या जागतिक मंदीचा साखर-उद्योगधंद्यावर चांगला परिणाम झाला. भांडवल-गुंतवणुकीचे मार्ग बंद झाल्यामुळें भांडवल पडून राहिलें होतें. ह्याच वेळीं सरकारनें धंद्याला संरक्षण दिलें. त्यामुळें पडून राहिलेलें सर्व भांडवल भांडवलदारांनीं साखर-उद्योगधंद्यांत गुंतवण्यास सुरुवात केली. त्यामुळें ह्या धंद्याची चांगलीच वाढ झाली. याच सुमारास सरकारनें उंसाच्या लागवडी-खालीं असलेल्या जमिनीबाबत संशोधनास प्रोत्साहन देणें सुरू केलें. त्याचबरोबर उंसाची लागवड व साखरेचें उत्पादन या बाबतींत केंद्रीय सरकार व कांहीं प्रांतिक सरकारें यांनीं कायदे पास केले. या कायद्यांमुळें साखरेच्या धंद्यांत व्यवस्थितपणा आला. १९३७ मेमध्यें साखरेबाबत एक आंतरराष्ट्रीय करार करण्यांत आला. ह्या करारान्वयें भारतानें ५ वर्षेपर्यंत ब्रह्मदेश सोडून इतर कोणत्याहि देशाला साखरेची निर्यात करावयाची नाहीं असें ठरलें. भारतानें या कराराला संमति दर्शविली. ह्या करारामुळें भारतांतील साखरेच्या उद्योगधंद्याचें फार नुकसान झालें. ह्या काळांत साखरेच्या उत्पादनांत खूप वाढ झाली. पण बाजारपेठ मात्र भारत व ब्रह्मदेश ह्या देशांपुरतीच मर्यादित राहिली. त्यामुळें पुरवठा जास्त व मागणी कमी अशी परिस्थिति निर्माण झाली. साखरेच्या किमती एकदम घसरल्या. त्यामुळें साखर-कारखान्यांवर मोठें गंडांतर येण्याची भीति उत्पन्न झाली. साखरेचे भाव टिकवून धरण्याकरितां ह्या काळांत शुगर सिंडिकेट स्थापन करण्यांत आली. त्यामुळें हा धोका टळला.

युद्धजन्य परिस्थितीमुळें सरकारनें १९४२ सालीं साखरेच्या उद्योग-धंद्यावर नियंत्रण घातलें. व्यापाऱ्यांनीं साखरेच्या किंमती भरमसाट वाढवूं नयेत व सर्व भारतीयांना साखर थोडी का होईना पण निश्चितपणें मिळावी हा या नियंत्रणामागील हेतु होता. हा हेतु बऱ्याच प्रमाणांत साध्य झाला; परंतु नियंत्रणाच्या काळांत साखरेच्या उत्पादनांत मात्र फारशी वाढ झाली नाहीं. याला असंतुष्ट कामगार, उसाचा अपुरा पुरवठा, उसाचा निकृष्ट दर्जा, वाहतुकीच्या अडचणी इत्यादि अनेक कारणें आहेत. डिसेंबर १९४७ मध्यें नियंत्रण काढून घेण्यांत आलें. ह्यामुळें उत्पादन वाढलें परंतु त्याबरोबर किंमतीहि वाढल्या. त्यामुळें साखर-उद्योगधंद्याविरुद्ध देशांत फार ओरड सुरू झाली. तेव्हां सप्टेंबर १९४९ मध्यें सरकारनें साखरेवर परत नियंत्रण बसवलें. तेव्हां गूळ व खांड-सारी साखरेचें उत्पादन जास्त प्रमाणांत होऊं लागलें. कारण ह्या वस्तूंवर नियंत्रण नव्हतें. साखरेकरितां पुरेसा उसाचा पुरवठा होईना. ह्याच वेळेस गुळाचा खप एकदम वाढला. ह्याला फार चमत्कारिक कारण सांगितलें जातें. मुंबई राज्यांत व इतर कांहीं राज्यांत ह्या काळांत दारूबंदी जाहीर करण्यांत आली. तेव्हां हातभट्टींतून चोरट्या दारूचें उत्पादन करण्यास सुरुवात झाली.

ही बेकायदा दारू तयार करण्यासाठीं लोक मोठ्या प्रमाणावर गूळ विकत घेऊं लागले. १९५० सालीं गुळावर देखील नियंत्रण बसविण्यांत आलें. तरीपण साखरेच्या उत्पादनांत वाढ होईना. तेव्हां सरकारनें आपलें धोरण पुन्हां बदललें व १९५०–५१ मध्यें फक्त १० लाख टन साखरेवरच सरकारचें नियंत्रण राहील व त्यापेक्षां अधिक साखर उत्पन्न केल्यास त्यावर नियंत्रण रहाणार नाहीं असें जाहीर केलें. त्याचा फायदा होऊन साखरेचें उत्पादन वाढलें.

साखरेच्या धंद्याला मिळालेलें संरक्षण १९४७ सालापर्यंत चालू होतें. १९४७ सालीं आणखी दोन वर्षें संरक्षण चालू ठेवावें असें ठरलें. १९४९ मध्यें आणखी एकच वर्ष संरक्षण देण्यांत आलें. १९५० पासून हा उद्योगधंदा असंरक्षित आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत साखरेचें उत्पादन १९५५–५६ अखेर १५ लाख टनांपर्यंत वाढवावें असें ठरलें होतें. परंतु हें उद्दिष्ट १९५२ सालींच पूर्ण करण्यांत आलें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठीं २२·५ लाख टन साखर हें उद्दिष्ट ठरविलें आहे व हें उद्दिष्ट पूर्ण होईल यांत कांहीं शंका नाहीं.

भारतांतील साखरेचे कारखाने मुख्यत्वेंकरून उत्तर प्रदेश, बिहार व मुंबई ह्या प्रांतांत आहेत. इतर प्रांतांत कारखाने अत्यंत लहान प्रमाणावर आहेत. साखरेच्या उत्पादनांत पहिला क्रमांक उत्तर प्रदेशाचा लागतो. अगदीं अलीकडच्या काळापर्यंत दुसरा क्रमांक बिहारचा लागत होता, परंतु आतां मुंबई राज्यानें आघाडी मारली आहे. मुंबई राज्यांतील साखरेचे सर्व कारखाने नवीन झालेल्या महाराष्ट्र राज्यांतच आहेत. तेव्हां साखरेच्या उद्योगधंद्यांत महाराष्ट्र राज्याचा दुसरा क्रमांक लागतो असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

महाराष्ट्रांत साखरेच्या उद्योगधंद्याला उशीरा सुरुवात झाली. मुख्य कारण म्हणजे पाण्याचें दुर्भिक्ष्य. जमीन व हवामान ह्या दोन्ही गोष्टी उंसाच्या उत्पादनाला अनुकूल असून देखील केवळ पाणी नाहीं म्हणून उंसाचें उत्पादन महाराष्ट्रांत शक्य झालें नाहीं. जेव्हां कालवे काढून ह्या जमिनीला भरपूर प्रमाणांत पाणी मिळण्याची व्यवस्था झाली तेव्हां मात्र ह्या कालव्यांशेजारील जमिनींत उंसाच्या लागवडीला मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली. महाराष्ट्रांतील जमिनीला पाटाचें विपुल पाणी व यांत्रिक साधनांचें साहाय्य मिळाल्याबरोबर त्या ठिकाणीं उत्तर प्रदेश व बिहार येथील उत्पादनाला मागें टाकणारें पीक निघूं लागलें. महाराष्ट्रांतील एकरीं उत्पादन साखरेचें आगर समजल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशांतील एकरीं उत्पादनाच्या तिप्पट आहे ही गोष्ट विशेष

उल्लेखनीय आहे. वालचंदनगर साखर-कारखान्याच्या चालकांनीं एका एकरांत १२२·४ टन ऊंस काढून सर्व हिंदुस्थानांत उंसाच्या उत्पादनांत विक्रम प्रस्थापित केला.

खाजगी भांडवलाचे १३ व सहकारी कारखाने १३ मिळून एकुण २६ कारखाने आज महाराष्ट्रांत चालू आहेत. हे कारखाने पुढील विभागांत वसलेले आहेत :--अहमदनगर जिल्हा ११, कोल्हापूर जिल्हा ४, पुणें जिल्हा ३, उत्तर सातारा जिल्हा २, दक्षिण सातारा जिल्हा १, सोलापूर जिल्हा २, नाशिक जिल्हा २ व उरलेला एक कारखाना औरंगाबाद विभागांत गंगापूर येथें आहे. महाराष्ट्रांतील साखर कारखाने व त्यांची दैनंदिन ऊंस गाळण्याची शक्ति ह्यांचें कोष्टक खालीं दिलें आहे—

खाजगी भांडवलाचे कारखाने	जिल्हा	दैनंदिन ऊंस गाळण्याची शक्ति (टन ऊंस)
१. दि सासवड माळी शुगर फॅक्टरी, लि. माळीनगर,	सोलापूर	१०००
२. दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. श्रीपूर,	सोलापूर	१०००
३. वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. वालचंदनगर,	पुणें	१५००
४. दि. रावळगांव शुगर फॉर्म लि. रावळगांव,	नाशिक	९५० ते १०००
५. दि बेलापूर कंपनी लि. हरिगांव,	अहमदनगर	१०००
६. दि महाराष्ट्र शुगर मिल्स लि. टिळकनगर	,,	१०००
७. बेलवंडी शुगर फार्म लि. बेलवंडी	,,	२५० ते ३००
८. गोदावरी शुगर मिल्स लि. साखरवाडी	,,	१०००
९. दि सोमय्या शुगर फॅक्टरी लक्ष्मीवाडी	,,	१०००
१०. श्री चांगदेव शुगर मिल्स लि. चांगदेवनगर	,,	८००
११. दि फलटण शुगर वर्क्स लि. साखरवाडी,	उत्तर सातारा	८५०
१२. दि. कोल्हापूर शुगर मिल्स लि. कसबे बावडा,	कोल्हापूर	८५० ते ९००
१३. गंगापूर शुगर मिल्स लि. गंगापूर,	औरंगाबाद	१०००

सहकारी कारखाने

१. दि प्रवरा सहकारी साखर-कारखाना लि.	प्रवरानगर, अहमदनगर	१००० ते १२००
२. कोपरगांव सहकारी साखर-कारखाना लि.	कोपरगांव, अहमदनगर	८०० ते १०००
३. अशोक सहकारी साखर-कारखाना लि.	श्रीरामपूर, अहमदनगर	१०००
४. राहुरी सहकारी साखर-कारखाना लि.	राहुरी, अहमदनगर	१०००
५. गणेश सहकारी साखर-कारखाना लि.	राहता, अहमदनगर	१०००
६. माळेगांव सहकारी साखर-कारखाना लि.	माळेगांव, बारामती, पुणें	१०००
७. श्री छत्रपति शिवाजी सहकारी साखर-कारखाना लि.	भवानीनगर, बारामती, पुणें	७००
८. श्रीराम सहकारी साखर-कारखाना लि.	फलटण, उत्तर सातारा	८००
९. शेतकरी सहकारी साखर-कारखाना लि.	सांगली, दक्षिण सातारा	१०००
१०. श्रीपंचगंगा सहकारी साखर-कारखाना लि.	इचलकरंजी, कोल्हापूर	१०००
११. वारणा सहकारी साखर-कारखाना लि.	कोडोली, कोल्हापूर	१०००
१२. भोगावती सहकारी साखर-कारखाना लि.	परीटे, कोल्हापूर	१०००
१३. गिरणा सहकारी साखर-कारखाना लि.	मालेगांव, नाशिक	१०००

या कारखान्यांखेरीज आणखी दोन सहकारी व एक खाजगी भांडवलाचा मिळून तीन नवे कारखाने उभारले जात आहेत. खाजगी भांडवलाचा कारखाना चितळे शुगर वर्क्स लि०, चितळेवाडी, माळशिरस, जिल्हा सोलापूर येथे उभारला जात असून त्याची दैनंदिन ऊस गाळण्याची शक्ति ८०० टनांची आहे. दोन सहकारी कारखान्यांपैकीं एक उत्तर सातारा जिल्ह्यांत रेठरें बु॥ तालुका कराड येथील कृष्णा सहकारी साखर-कारखाना व दुसरा कोल्हापूर

जिल्ह्यांत दूधगंगा–वेदगंगा सहकारी साखर-कारखाना याप्रमाणें उभारले जात आहेत. त्यांची दैनंदिन उंस गाळण्याची शक्ति–अनुक्रमें ८०० ते १००० टनांची आहे. या प्रत्यक्ष उभारणी होत असलेल्या कारखान्यांखेरीज आणखी कांहीं नवे सहकारी कारखाने महाराष्ट्रांत निघण्याचा संभव असून, त्यांपैकीं कांहींची नोंदणी होऊन त्यांना सरकारी परवानाहि मिळाला आहे.

सहकारी साखर-कारखान्यांचा एक संघ स्थापन झाला असून चालू असलेल्या व नव्या निघणाऱ्या सहकारी साखर-कारखान्यांना मार्गदर्शन करणें, त्यांच्या अडचणींचें निवारण करणें, त्यांची कारभारयंत्रणा कार्यक्षम व सुसूत्र करणें, त्यांच्या भांडवलपुरवठ्याच्या व इतर कच्च्या मालाच्या गरजांबाबत सामुदायिक प्रयत्न करणें व सर्व सहकारी कारखाने एकसूत्रबद्ध चालतील असा प्रयत्न या संघाकडून केला जातो. ह्या सहकारी साखर-कारखान्यांना सरकारनें सक्रिय सहानुभूति दाखविली आहे. इंडस्ट्रिअल फायनान्स कार्पोरेशन व महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह बँक ह्यांनींहि ह्या कारखान्यांना कर्जाऊ भांडवल पुरविलें आहे. १९५७–५८ सालांतील भारतांतील साखरेच्या उत्पादनाचे आंकडे उपलब्ध आहेत. त्या वर्षीं निरनिराळ्या प्रदेशांची उत्पादनाची टक्केवारी खालीलप्रमाणें आहे —

उत्तरप्रदेश	४७%
महाराष्ट्र	१६%
बिहार	१३%
आंध्र व मद्रास	११%
इतर	१३%
एकूण	१००%

महाराष्ट्राचा साखर-उत्पादनांत भारतांत दुसरा क्रमांक लागतो हें यावरून स्पष्ट दिसतें. परंतु त्याचबरोबर हीहि गोष्ट लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं, उत्तरप्रदेशाचें उत्पादन महाराष्ट्राच्या तिप्पट आहे. महाराष्ट्रांत साखरेच्या उद्योगधंद्याची अजून वाढ होणें सहज शक्य आहे. त्या दृष्टीनें जोराचे प्रयत्न करावयास पाहिजेत. महाराष्ट्र राज्याच्या औद्योगीकरणासाठीं तयार करण्यांत आलेल्या मास्टर प्लॅनमध्यें ह्या गोष्टीकडे लक्ष देण्यांत आलेलें आहे.

साखरेच्या उद्योगधंद्याबाबत काय करावयास पाहिजे?

(१) साखरेच्या उद्योगधंद्याबाबतचा पहिला प्रश्न आहे तो उसाच्या लागवडीचा. इतर पिकांच्या उत्पादनांत कांहींहि घट न होऊं देतां उंसाच्या

लागवडीखालील जमीन वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अर्थात् ह्या गोष्टीला निश्चितपणें मर्यादा आहे. तेव्हां उंसाचें दर एकरीं उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचबरोबर उंसांतील रसाचें प्रमाण जास्तींत जास्त वाढविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. ह्यासाठीं सतत संशोधनाची आवश्यकता आहे. खाजगी प्रयत्नानें हें संशोधन होण्याची शक्यता कमी आहे म्हणून सरकारनें ह्या बाबतींत पुढाकार घेतला पाहिजे.

(२) साखरेच्या उद्योगधंद्यांत शेती व उद्योग ह्या दोन भिन्न क्षेत्रांचा अत्यंत निकटचा संबंध येतो. ह्या दोन्ही क्षेत्रांत जास्तींत जास्त सहकार्य झालें पाहिजे तरच साखरेचें उत्पादन वाढूं शकेल.

(३) साखरधंद्याची माहिती घेण्यासाठीं व तसेंच उंसाच्या लागवडीचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठीं भारतीयांना इतर देशांत पाठविलें पाहिजे.

(४) साखरेच्या धंद्यांत वाया जाणाऱ्या वस्तूंपासून इतर पदार्थ उत्पादन करण्यासाठीं सहायक उद्योगधंदे साखरेच्या कारखान्याशेजारींच उभारले पाहिजेत. वाया जाणाऱ्या वस्तूंचा नीट उपयोग केल्यास साखरेच्या किंमतींतहि घट करतां येण्याची शक्यता आहे.

(५) महाराष्ट्रांतील कारखान्यांची कार्यक्षमता इतर देशांतील कारखान्यांच्या मानानें फार कमी आहे. याला मुख्य कारण म्हणजे बहुतेक कारखान्यांतील यंत्र-सामुग्री जुनी किंवा जुनाट पद्धतीची आहे. जास्त खर्च आला तरी ह्या यंत्रांच्या ठिकाणीं आधुनिक यंत्र-सामुग्री बसविली पाहिजे.

वरील सर्व प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविल्यास महाराष्ट्रांतील साखरेच्या उद्योगधंद्याचें भवितव्य उज्ज्वल होईल ह्यांत कांहींच शंका नाहीं.

साखर-कारखान्याशेजारीं काढतां येण्याजोगे जोडधंदे

साखर-कारखान्यांशेजारींच उंसाच्या वाया जाणाऱ्या पदार्थांपासून खालील जोडधंदे काढतां येण्याजोगे आहेत. वर लिहिल्याप्रमाणें प्रत्येक साखर-कारखान्याशेजारीं हे सहायक उद्योगधंदे उभारले पाहिजेत म्हणजे फारसा जास्त खर्च न करतां उत्पन्न जास्त मिळवितां येईल व वाटल्यास साखरेची किंमतदेखील कमी करतां येईल. हे जोडधंदे खालीलप्रमाणें—

१. अल्कोहोल किंवा औद्योगिक मद्यार्कांचा उद्योगधंदा

साखर-कारखान्यांतून उपलब्ध होणाऱ्या मळीपासून या उद्योगधंद्याचा विकास करतां येतो. येथील अल्कोहोल हें निरनिराळ्या प्रकारच्या उद्योग-

धंद्यांसाठीं प्रारंभिक सामुग्री म्हणून वापरण्यांत येतें. तथापि सध्यां पॉवर अल्कोहोल म्हणून त्याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यांत येतो व तो औद्योगिक कामांसाठीं मर्यादित प्रमाणांत वापरण्यांत येतो. देशांत उंसाच्या मळीपासून तयार होणाऱ्या १८ दशलक्ष गॅलन मद्यार्कापैकीं १२,६५,००० गॅलन मद्यार्क पुणें विभागांत वसलेल्या पांच भट्ट्यांमधून तयार करण्यांत येतो. औद्योगिक कामांसाठीं पॉवर अल्कोहोलला वाढती मागणी आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन नाशिक येथील जुन्या भट्टीऐवजीं अहमदनगर जिल्ह्यांतील चितळी येथें ७१ लक्ष रुपये खर्चून एक नवीन मोठी भट्टी स्थापन करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य सरकारनें घेतला आहे. या नवीन भट्टीची क्षमता दर दिवसाला सुमारें ९००० गॅलन राहील. भट्टीची इमारत व राहाण्यासाठीं घरें बांधून झालीं आहेत. परदेशांतून मागविण्यांत आलेली यंत्रसामुग्री येऊन पोंचली असून ती उभारण्यांत येत आहे.

२. पुठ्ठ्यांचे व साधे कागद

उंसाच्या वाया जाणाऱ्या चोयट्यांपासून पुठ्ठ्याचे व साधे कागद करतां येण्याची शक्यता आहे. ह्या बाबतींतील संशोधन व प्रयत्न सध्यां वालचंदनगर येथील कारखान्यांत सुरू आहेत.

३. ह्याशिवाय वर्णविनाशक कर्बाचे (डीकलरायझिंग कार्बन) उत्पादन करण्याचा कारखाना देखील साखरेच्या कारखान्याशेजारीं उभारतां येण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रांतील गुळाचा धंदा

गुळाचा धंदा महाराष्ट्रांत फार प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. जेथें जेथें ऊंस पिकविला जातो तेथें तेथें आपल्याला उंसापासून गूळ करण्याचे लहानमोठे कारखाने आढळतात. पूर्वीं गूळ करण्यासाठीं बैलांच्या चरकाचा उपयोग करीत असत. परंतु हल्लीं बैलांच्या चरकाची जागा यांत्रिक चरकानें घेतली आहे. यांत्रिक चरकानें काम झटपट होतें. यांत्रिक शक्तीवर मोठ्या प्रमाणांत हा धंदा प्रथम श्री. चितळे यांनीं चितळेनगरला सुरू केला. महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं गुळाचे कारखाने असले तरी कोल्हापूर, सांगली व फलटण हीं ठिकाणें या बाबतींत आघाडीवर आहेत. कोल्हापुरी गूळ हा भारतांत सर्वोत्कृष्ट समजला जातो. गूळ तयार करणाऱ्या कारखान्यांची जिल्हावार संख्या व दैनंदिन सरासरी कामगारसंख्या ह्यांची आंकडेवारी खालीं दिली आहे—

		कारखाने	कामगार
१. पुणें	जिल्हा	१६६	१३३१
२. कोल्हापूर	,,	४५	३६६
३. उत्तर सातारा	,,	२४	३०
४. सोलापूर	,,	५९	१००९
५. नाशिक	,,	११४	६१६
६. अहमदनगर	,,	१८१	३६०
७. पूर्व खानदेश	,,	३०	माहीत नाहीं.
८. पश्चिम ,,	,,	१४	५१
९. औरंगाबाद	,,	१८	२५६
१०. बीड	,,	५	२५
		एकूण ६५६	४०४४

● ● ●

६

★

प्रमुख उद्योगधंदे (पुढें चालू)

इंजिनिअरिंगचे उद्योगधंदे

ह्या उद्योगधंद्यांत लोखंड, पोलाद व इतर इंजिनिअरिंग कामाचे कारखाने, रेल्वे वर्कशॉप्स्, विजेचे कारखाने, जहाज-दुरुस्तीचे कारखाने, धातु-कामाचे कारखाने, खनिज पदार्थ शुद्ध करण्याचे कारखाने, लहान हत्यारें (कटलरी) व इतर लोखंडी सामान यांचे कारखाने, मोटार-दुरुस्तीचे व जोडणीचे कारखाने वगैरे उद्योगधंद्यांचा समावेश होतो. हे उद्योगधंदे औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचे आहेत. आधुनिक उद्योगधंदे यंत्रांच्या साहाय्यानें चालविले जातात. साहजिकच ही यंत्रसामुग्री तयार करणारे उद्योगधंदे अत्यंत महत्त्वाचे ठरतात. ह्या उद्योगधंद्यांना मूलभूत उद्योगधंदे (basic industries) असें म्हणतात. भारतामध्यें ह्या उद्योगधंद्यांना त्या मानानें उशीरा सुरुवात झाली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत भारत यंत्रसामुग्रीसाठीं इतर देशांवरच अवलंबून होता. नंतर भारतांत हे उद्योगधंदे सुरूं झाले. तरी देखील भारताच्या सर्व गरजा ह्या उद्योगधंद्यांनीं भागविल्या जात नव्हत्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय सरकारनें ह्या उद्योगधंद्यांचें महत्त्व ओळखलें व ह्या उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं प्रयत्न सुरू केले. सध्यां चालू असलेल्या निरनिराळ्या धरणांच्या योजना आणि त्यांपासून वीज उत्पन्न करण्यासाठीं उभारलेलीं वीजकेंद्रें, भारतांत नवीन निघणारे भिलाई, रुरकेला, दुर्गापूर हे लोखंड व पोलादाचे कारखाने, चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स् सारखे कारखाने वगैरे गोष्टी ह्या प्रयत्नांची साक्ष देतील. इंजिनिअरिंगच्या उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत महाराष्ट्र राज्यामध्यें अलीकडील अनेक वर्षांत अनेक प्रकारची उल्लेखनीय वाढ झालेली आहे. ह्या उद्योगधंद्यांची आतां आपण थोडक्यांत माहिती करून घेऊं.

१. लोखंड, पोलाद व इतर इंजिनिअरिंग कामाचे कारखाने

ह्या उद्योगधंद्यांतील महाराष्ट्रांतील अग्रेसर कारखाना म्हणजे किर्लोस्कर-वाडी येथील होय. १९१० सालीं ह्या कारखान्याची स्थापना झाली. ह्या कारखान्यांत सध्यां अनेक प्रकारचीं लहानमोठीं यंत्रें तयार होतात. शेतीचीं अवजारें (उदा०—नांगर, चरक, मोटा, पंप, रहाट, शेंगायंत्रें वगैरे) ह्या कारखान्यांत मुख्यत्वेंकरून तयार होतात व सर्व भारतांत वापरलीं जातात. त्याचबरोबर खुर्च्या, पाळणें, पलंग इत्यादि घरगुती व हॉस्पिटलचें पोलादी फर्निचर, निरनिराळ्या प्रकारांचे व उपयोगांचे हातपंप व यंत्रशक्तीवर चालणारे मोठमोठे पंप, लेथ, ड्रिलिंग मशीन्स, शेपिंग मशीन्स इत्यादि यंत्रसामुग्री, तेलावर चालणारीं ५, ८ व १६ हॉर्सपॉवरचीं एंजिनें, इलेक्ट्रिक मोटारी इत्यादि विविध प्रकारचा मालदेखील ह्या कारखान्यांत तयार होतो. ह्या मालाचा नुसत्या भारतांतच उपयोग होतो असें नाहीं, तर पूर्व आफ्रिका, मध्यपूर्व युरोप, इंडोनेशिया, ब्रह्मदेश इत्यादि परदेशांतहि ह्या मालाची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. सध्यां या कारखान्यांत गिरण्याचे मागहि तयार करतात. १९४६ मध्यें किर्लोस्करांनींच पुणें येथें 'किर्लोस्कर ऑईल एंजिन्स् हा कारखाना काढला. ह्या कारखान्यांत आधुनिक उत्पादन-पद्धतीप्रमाणें दीड हॉर्सपॉवरपासून दीडशें हॉर्स–पॉवरपर्यंतचीं इंजिनें तयार करण्याची मालकांची योजना आहे. हीं तेल–इंजिनें चांगलींच लोकप्रिय झालीं आहेत. किर्लोस्कर–कारखाने संपूर्णपणें महाराष्ट्रीय आहेत. किर्लोस्करांनीं महाराष्ट्राबाहेरहि कांहीं कारखाने काढले आहेत.

ह्या उद्योगधंद्यांतील महाराष्ट्रांतील आणखी एक महत्त्वाचा कारखाना म्हणजे सातारा येथील कूपर इंजिनियरिंग वर्क्स लिमिटेड हा होय. ह्या कारखान्याचे व्यवस्था–दलाल शेठ वालचंद हिराचंद हे आहेत. ह्या कारखान्यांत ५ अश्वशक्तीपासून २५६ अश्वशक्तीचीं डिझेल तेलाचीं इंजिनें बनवितात. ह्याशिवाय शेपिंग मशीन्स, मशीन टूल्स् इ०, विणकामाची यंत्रसामुग्री, यांत्रिक भाग, डॉबिज्, ड्रॉप बॉक्सेस् इ०, नांगर, फाळ इ० भारतीय शेतकऱ्यांच्या उपयोगाचीं शेतीचीं अवजारें ह्या कारखान्यांत तयार केलीं जातात. मुंबईतील गिरण्यांना लागणारी यंत्रसामुग्री तयार करण्याचें काम सध्यां या कारखान्यांत सुरू आहे. याशिवाय भिवंडी येथें जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि० हा कारखाना आहे. ह्या कारखान्यांत भात व धान्य सडण्याचीं यंत्रें, उंसाचे चरक, तेलाच्या गिरण्या वगैरे यंत्रसामुग्री तयार होते. ह्याशिवाय इतर अनेक लहान कारखाने महाराष्ट्रांत सध्यां सुरू आहे. ह्या कारखान्यांची जिल्हावार आंकडेवारी खालीं दिली आहे–

	कारखान्यांची संख्या	दैनंदिन सरासरी कामगारसंख्या
मुंबई शहर	२२९	१२,२३२
मुंबई उपनगर	८५	६,७१९
ठाणें जिल्हा	१५	३,२००
पुणें जिल्हा	३३	२,७८०
कोल्हापूर जिल्हा	३०	१,१५०
दक्षिण सातारा जिल्हा	५	१,०७२
उत्तर सातारा ,,	६	१,९५१
रत्नागिरी ,,	२	९
सोलापूर ,,	५	४७१
नाशिक ,,	१	४६
अहमदनगर ,,	७	२९७
औरंगाबाद ,,	४	५२
नागपूर ,,	३१	५२३
अकोला ,,	१	६
अमरावती ,,	६	५१
वर्धा ,,	२	८४
	एकूण ४६२	३०,५४३

२. रेल्वे वर्कशॉप्स (आगगाडीचे कारखाने)

	कारखान्यांची संख्या	कामगार
मुंबई शहर	१६	२०,३४४
मुंबई उपनगर	३	६७४
ठाणें जिल्हा	३	१५
पुणें जिल्हा	२	७१
नाशिक जिल्हा	२	९४८
सोलापूर ,,	२	४९३
पूर्व खानदेश जिल्हा	१	२९
नागपूर ,,	२	१११७
	३१	२३,६९१

रेल्वे-डब्यांची व एंजिनांची दुरुस्ती, डब्यांना रंग देणें व इतर अनेक रेल्वेसंबंधींचीं कामें करण्यासाठीं रेल्वेनें प्रमुख रेल्वे-केंद्रांत रेल्वे-वर्कशॉप्स् उघडलेलीं आहेत. हीं सर्व रेल्वेच्या म्हणजे भारत सरकारच्या मालकीचीं आहेत. हीं केंद्रें मागील पानावर दिलीं आहेत.

३. विजेचे कारखाने

वीज हा औद्योगीकरणाचा पाया आहे. आधुनिक यंत्रें चालविण्यासाठीं शक्तीची (Power) गरज असते. ही शक्ति पुरविण्याचे निरनिराळे मार्ग आहेत. उदा०—तेल, कोळसा, वाफ वगैरे. परंतु ह्या सर्वांत वीज सर्व दृष्टींनीं श्रेष्ठ आहे. महाराष्ट्राचें औद्योगीकरण घडवून आणावयाचें असेल तर प्रथम विजेच्या उत्पादनाकडे लक्ष दिलें पाहिजे. वीज तयार करण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला पाण्यापासून वीज तयार करणें व दुसरा कोळशापासून वीज तयार करणें. ह्या दोन्ही प्रकारांनीं वीज निर्माण करणारे अनेक कारखाने महाराष्ट्रांत आहेत. महाराष्ट्रांतील या कारखान्यांतील एकूण विजेचें उत्पादन ६ लक्ष किलोवॅटपेक्षां जास्त आहे. महाराष्ट्रांतील वीज उत्पादनाचीं मुख्य केंद्रें व त्यांचें उत्पादन खालीलप्रमाणें :—

(१) चोला वीज केन्द्र	१,३६,००० किलोवॅट
(२) तुर्भे ,, ,,	१,२५,००० ,,
(३) खोपोली, भिवपुरी व भिरा केन्द्रें	२,७४,००० ,,

उरलेली वीज पुणें विभागांतील छोटें वीजकेन्द्र, भाटघर, राधानगरी व विदर्भातील खापरखेडा आणि बल्लारशा ह्या केन्द्रांत निर्माण होते.

विजेचें एवढें उत्पादन पुरें होत नाहीं. त्यासाठीं विजेचें उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ह्यासाठीं तुर्भे व चोला ह्या ठिकाणीं वीज उत्पन्न करणारीं कोळशाचीं जादा यंत्रें बसविण्यांत आलीं आहेत. तरीपण कोयना-योजना पूर्ण झाल्याखेरीज विजेचा पुरवठा पुरेसा होणार नाहीं. कोयना-योजना पूर्ण झाल्यावर त्या योजनेपासून एकूण ५ लक्ष किलोवॅट वीज निर्माण होऊं शकेल. ही योजना लवकरांत लवकर पूर्ण करण्यासाठीं आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. ही योजना एकूण ३ टप्प्यांत पूर्ण करण्यांत येणार आहे. पहिला टप्पा ऑक्टोबर १९६१ पर्यंत पुरा होणार असून, त्यांत एकूण २,४०,००० किलोवॅट वीज निर्माण होणार आहे. ह्याशिवाय इतर केन्द्रांची उत्पादन-शक्ती वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. औरंगाबाद विभागांतील पूर्णा-योजनेची पहाणी सुरू आहे.

विजेच्या इतर साहित्याची निर्मिति व दुरुस्ती करणारे कारखानेहि महाराष्ट्रांत आहेत. ह्यांत विजेचीं यंत्रें, दिवे (बल्बखेरीज), विजेचे पंखे व इतर सामान, बॅटरीज्, इन्शुलेटेड वायर्स, केबल्स व इतर वस्तूंच्या कारखान्यांचा समावेश होतो.

	कारखान्यांची संख्या	कामगार
मुंबई शहर	१०५	५९४०
मुंबई उपनगर	५२	२७६५
ठाणें जिल्हा	१	१०१
पुणें जिल्हा	१०	६८१
कोल्हापूर जिल्हा	१	१३
कुलाबा जिल्हा	१	१३
	१७०	९५१३

४. जहाजदुरुस्तीचे कारखाने

महाराष्ट्र राज्यांत मुंबई हें भारतांतील अत्यंत महत्त्वाचें बंदर आहे. तेथें अत्यंत मोठ्या प्रमाणावर परदेशांशीं व्यापार चालतो. साहजिकच समुद्रमार्गें मालाची व उतारूंची वाहतूक करणाऱ्या अनेक कंपन्या मुंबईमध्यें आहेत. ह्या कंपन्यांना आपलीं जहाजें दुरुस्त करण्यासाठीं मुंबईमध्यें जहाजांच्या दुरुस्तीचा कारखाना उघडणें जरूर पडतें. वाहतुकीचें काम करणाऱ्या बहुतेक कंपन्यांचे असे स्वतःचे कारखाने मुंबईला आहेत. या ठिकाणीं लहान बोटीहि बांधल्या जातात. परंतु जरुरीच्या मानानें ह्या उद्योगधंद्याची प्रगति फार कमी आहे. मुंबईमध्यें हा उद्योगधंदा मोठ्या प्रमाणावर करतां येणें शक्य आहे व त्याची जरुरीहि आहे. सध्यां मुंबईस जहाज-दुरुस्तीचे ११ कारखाने असून, त्यांतील दैनंदिन सरासरी कामगारसंख्या ४३०६ आहे.

५. धातुकामाचे कारखाने

महाराष्ट्रांत पुणें, नाशिक व सांगली हीं तीन ठिकाणें तांब्या-पितळेच्या भांड्यांसाठीं प्रसिद्ध आहेत. पूर्वी हा धंदा घरगुती धंदा म्हणून चालविण्यांत येत होता. यंत्रांचा उपयोग सुरू झाल्यापासून ह्या धंद्याचे कारखाने निघाले आहेत व घरगुती धंदा फक्त मर्यादित प्रमाणांत चालू आहे. ओगले (ओगलेवाडी), जेधे (पुणें), चव्हाण (पुणें) वगैरेंचे कारखाने विशेष प्रसिद्ध आहेत. पुण्यांत श्री. देवल यांचा देवल भांड्यांचा कारखाना आहे. या कारखान्यांत पितळावर चांदीचा मुलामा देऊन भांडीं तयार करतात. अलीकडे

तांबे-पितळेचीं भांडीं बाजूला पडून स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांचा वापर जास्त प्रमाणांत सुरू झाला आहे. स्टेनलेस स्टीलचीं भांडीं बनविण्याचेहि कांहीं कारखाने महाराष्ट्रांत सुरूं झाले आहेत. सध्यां महाराष्ट्रांत खालीलप्राणें धातु-कामाचे कारखाने आहेत—

मुंबई शहर ४६, मुंबई उपनगर २०, ठाणें जिल्हा ५, पुणें जिल्हा ४, उत्तर सातारा जिल्हा १, नाशिक जिल्हा १, अहमदनगर जिल्हा १, पूर्व खानदेश जिल्हा १, नागपूर जिल्हा २, अकोला जिल्हा १, भंडारा जिल्हा ५.

६. खनिज पदार्थ शुद्ध करण्याचे कारखाने

महाराष्ट्रांत खनिज संपत्ति फारशी नाहीं. साहजिकच खनिज पदार्थ शुद्ध करण्याचे कारखाने देखील अतिशय थोडे आहेत. मुंबईत कांहीं खनिज पदार्थ अर्धवट शुद्ध करून त्यापासून वस्तु बनविण्याचे कारखाने आहेत. विदर्भांत भंडारा व नागपूर जिल्ह्यांच्या उत्तरेकडील भागांत मँगेनीजचे भरपूर सांठे आहेत. कनिष्ठ दर्जाचें अशुद्ध मँगेनीज चांगलें करून दर दिवसाला ६०० टन उत्पादन काढूं शकणारा एक कारखाना भंडारा जिल्ह्यांतील डोंगरी बुद्रुक येथें नुकताच स्थापन करण्यांत आला आहे.

७. लहान हत्यारें (कटलरी) व इतर लोखंडी सामान यांचे कारखाने

ह्या वस्तूंचे बरेच कारखाने महाराष्ट्रांत आहेत. ह्या कारखान्यांची सर्वांत जास्त संख्या अर्थातच मुंबई शहर व उपनगरें यांत आहे.

८. मोटारदुरुस्तीचे व जोडणीचे कारखाने

अलीकडे मोटारींचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. महाराष्ट्र राज्यांतील उतारूंची वाहतूक सरकारनें आपल्याकडे घेतली आहे. मोठ्या शहरांतील बस-वाहतूक त्या त्या शहरांच्या नगरपालिकांच्या ताब्यांत आहे. त्याशिवाय खाजगी मोटारींचा उपयोगहि अत्यंत मोठ्या प्रमाणावर चालू आहे. तेव्हां मोटारदुरुस्तीचे व जोडणीचे कारखाने बहुतेक मोठ्या शहरांत असणें अगदीं साहजिक आहे. मुंबईत तर हे कारखाने अनेक आहेत. त्याशिवाय पुण्याजवळ दापोडी येथें स्टेट ट्रॅन्सपोर्ट सेंट्रल वर्कशॉप असून तेथें मोटार-जोडणी व मोटार-दुरुस्ती हीं दोन्ही कामें होतात. मुंबईतील मोटारच्या धंद्यांत सुरुवातीला केवळ मोटारींची आयात करण्यांत येत असे. क्रमाक्रमानें मोटारींचें उत्पादन, उपयुक्ततेचीं वाहनें व स्कूटर्स यांचें उत्पादन करण्याचें काम तीन मोठ्या कारखान्यांमध्यें होत आहे. मोटारींच्या उद्योगधंद्यांच्या आश्रयानें

मोटारींचे निरनिराळे सुटे भाग तयार करण्याच्या आनुषंगिक उद्योगधंद्याची झपाट्यानें प्रगति होत आहे. सायकली तयार करण्याच्या उद्योगधंद्याची प्रगति होत असून दरवर्षी २,३०,००० सायकली करण्याची या धंद्याची क्षमता आहे.

९. पेट्रोल वांटपाच्या कंपन्या

कालटेक्स, बर्मा-शेल, स्टँडर्ड व्हॅक्यूम इत्यादि कंपन्यांचे पेट्रोलचे सांठे व वांटप करण्याचीं ठिकाणें महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं आहेत. मुंबईला बर्मा-शेल कंपनीनें एक मोठा तेल शुद्ध करण्याचा कारखाना (रिफायनरी) उघडला आहे. महाराष्ट्रांत सध्यां एकूण दोन कारखाने तेल शुद्ध करण्याचे आहेत. ते दोन्ही मुंबई उपनगरांत असून त्यांतील दैनंदिन कामगारसंख्या २२९६ आहे. पेट्रोल भरणें व सांठा करण्याचे कारखाने पुढीलप्रमाणें— मुंबई ३, पुणें जिल्हा ५, कोल्हापूर जिल्हा १, नाशिक जिल्हा ४, पश्चिम खानदेश १, नागपूर जिल्हा ३, अकोला जिल्हा ३, अमरावती जिल्हा १, भंडारा जिल्हा १.

●●●

७

★

प्रमुख उद्योगधंदे (पुढें चालू)

महाराष्ट्रांतील काचधंदा

भारतांत काच प्राचीन काळापासून अस्तित्वांत होती. वेद, महाभारत वगैरे प्राचीन ग्रंथांत काचेचा उल्लेख आढळतो. भारतांत प्राचीन काळीं काच असली तरी ती महाराष्ट्रांत होती काय हा प्रश्न वादग्रस्त आहे. अर्थात् आपल्याला अर्वाचीन काळाचा फक्त विचार करावयाचा असल्यामुळें, ह्या प्रश्नाच्या खोलांत शिरावयाचें आपल्याला कारण नाहीं. काचधंद्यामध्यें बांगड्यांचे कारखाने, मणी व कृत्रिम मोती तयार करण्याचे कारखाने, बाटल्या, तावदानाच्या काचा, रासायनिक उपकरणें वगैरेचें उत्पादन करणारे कारखाने ह्यांचा समावेश होतो.

बांगड्या तयार करण्याचा उद्योगधंदा हा मुख्यत्वेंकरून घरगुती स्वरूपाचा आहे. महाराष्ट्रांत मुंबई, तळेगांव-दाभाडें, चिंचणी, तारापूर, पेमगिरी, नशिराबाद, नेरी, पालासखेडें, पाळनेर, पाळधी, चोपडें, आसारा वगैरे बांगड्यांच्या उत्पादनाचीं केंद्रें आहेत.

१९३७–३८ पर्यंत मणी व कृत्रिम मोती यांची परदेशांतून भारतांत मोठ्या प्रमाणावर आयात होत असे. भारतांत उत्तर प्रदेश व पंजाब येथें मण्यांचें उत्पादन होतें. परंतु महाराष्ट्रांत मात्र अजूनहि ह्यांचा कारखाना नाहीं. परंतु सरकारनें पुण्याला काढलेल्या (Village Industries Experimental Workshop) ह्या संस्थेमध्यें मणी व कृत्रिम मोती तयार करण्याचे प्रयोग चालू आहेत व लवकरच हा उद्योगधंदा महाराष्ट्रांत सुरू होईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी भारतांत बाटल्यांचें उत्पादन अगदीं कमी होतें. परंतु गेल्या २० वर्षांत उत्पादन बरेंच वाढलें आहे. १९४४ सालीं मुंबई प्रांतांत बाटल्या तयार करणारे एकूण ३२ कारखाने होते. आता फक्त मुंबई शहर व उपनगरें मिळूनच ३२ कारखाने आहेत.

तावदानाच्या काचा तयार करणारे भारतांत ४-५ कारखाने आहेत. महाराष्ट्रांत मात्र तावदानाच्या काचा तयार करणारा एकहि कारखाना नाहीं.

रासायनिक उपकरणें भारतांत अगदीं अलीकडच्या काळांत तयार होऊं लागलीं आहेत. पुण्याच्या Village Industries Experimental Workshop मध्यें ह्याबाबत प्रयत्न चालू आहेत व उपकरणांचा दर्जा जास्तींत जास्त वाढविण्याबाबत संशोधन सुरू आहे. सध्या महाराष्ट्रांत दि बॉंबे ग्लास वर्क्स लि० मुंबई, विजय ग्लास वर्क्स मुंबई, दि इंडस्ट्रिअल अँड इंजिनिअरिंग ॲपरेटस् मुंबई, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव दाभाडें व ओगले ग्लास वर्क्स, ओगलेवाडी ह्या कारखान्यांत रासायनिक उपकरणें तयार होतात.

चिनीमातीच्या भांड्यांचे कारखाने

गेल्या १५ वर्षांमध्यें चिनीमातीचीं भांडीं तयार करावयाचे कारखानेहि महाराष्ट्रांत निघालेले आहेत. या कारखान्यांत बरण्या, कपबशा, सट वगैरे माल तयार होतो. या बरण्यांचा प्रयोगशाळांत ॲसिड्स वगैरे सांठविण्यासाठीं उपयोग होतो. कारण ॲसिड्सची प्रक्रिया न होणारा असा हा एकच पदार्थ आहे. तळेगांव येथील पैसा-फंड-काचकारखान्यांत चिनीमातीच्या भांड्यांच्या उत्पादनासाठीं एक वेगळा विभाग आहे. महाराष्ट्रांत एकूण ७-८ कारखान्यांत ह्या प्रकारचें उत्पादन होतें.

महाराष्ट्रांतील मिठागरें

मिठाचें उत्पादन करण्याचे दोन प्रकार आहेत :—(१) समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करणें व (२) मिठाच्या खाणींतून मीठ काढून तें शुद्ध करणें. महाराष्ट्रांत नैसर्गिक मिठाच्या खाणी नाहींत. परंतु महाराष्ट्राला मोठा समुद्रकिनारा आहे. समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करण्याचा उद्योगधंदा महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर चालतो. महाराष्ट्रांतील मिठागरें मुख्यत्वेंकरून ठाणें, कुलाबा व रत्नागिरी ह्या तीन जिल्ह्यांत आहेत. अलीकडच्या काळांत महाराष्ट्रांतील मिठाच्या उत्पादनांत बरीच वाढ झाली आहे. त्यामुळें अन्तर्गत गरजा भागवून कांहीं मीठ परदेशीं पाठविणें देखील शक्य होतें. सध्यां महाराष्ट्रांत खालीलप्रमाणें मिठागरें आहेत—मुंबई शहर ८, मुंबई

उपनगर २५, ठाणें जिल्हा ६०. मिठाच्या धंद्याचें वैशिष्ट्य म्हणजे ह्या धंद्याला फारसें भांडवल लागत नाहीं. हा धंदा सर्व वर्षभर चालत नाहीं. कांहीं हंगामांतच चालतो. मिठाचे अनेक उपयोग आहेत. मिठानें नाशवंत पदार्थ बऱ्याच काळपर्यंत टिकवितां येतात. मिठाचा खत म्हणून चांगला उपयोग करतां येतो. त्याशिवाय खाण्याच्या पदार्थांना मिठाशिवाय चव येत नाहीं ही गोष्ट तर प्रसिद्धच आहे. महाराष्ट्रांत सर्व प्रकारचें मीठ तयार होतें. परंतु उत्पादनाच्या पद्धतीमध्यें सुधारणा केल्यास त्याच भांडवलांत व मजुरांच्या संख्येंत जास्त मिठाचें उत्पादन करतां येणें शक्य आहे.

महाराष्ट्रांतील मच्छीमारीचा धंदा

महाराष्ट्रांत हा धंदा प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. ओढे, सरोवरें, नद्या व समुद्र या सर्व ठिकाणीं मच्छीमारीचा धंदा चालतो. हा धंदा करणाऱ्यांची एक स्वतंत्र जातच निर्माण झालेली आहे ही एकच गोष्ट ह्या धंद्याचा प्राचीनपणा सिद्ध करण्यास समर्थ आहे. अर्थात् पूर्वी ह्या धंद्याकडे एक नैसर्गिक देणगी ह्या दृष्टीनेंच पाहिलें जात असे; म्हणजे एखाद्या ठिकाणीं मासे असणें अगर नसणें व मासे असल्यास ते कोणत्या प्रकारचे असणें ह्या गोष्टी देवाधीन मानल्या जात. हल्लीं मात्र ह्या धंद्याला आधुनिक स्वरूप आलेलें आहे व उत्तम जातीचे मासे आणून त्यांची एखाद्या ठिकाणीं पैदास करण्यास सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रांत सर्व ठिकाणीं जरी हा धंदा चालत असला तरी देखील समुद्रकांठीं हा धंदा साहजिकच मोठ्या प्रमाणावर चालतो. सरकारचें या धंद्याकडे विशेष लक्ष आहे. महाराष्ट्र सरकारनें ह्या धंद्याकडे विशेष लक्ष देण्यासाठीं, या धंद्याच्या बाबतींत संशोधन करण्यासाठीं व या धंद्याच्या लोकांना शास्त्रीय पद्धतीनें शिक्षण देण्यासाठीं एक स्वतंत्र मच्छीमारीचें खातें काढलें आहे. मुंबईला महाराष्ट्र सरकारचा शार्क व इतर जातींच्या माशांपासून तेल काढण्याचा कारखाना आहे. पंचवार्षिक योजनांमध्यें सुद्धां ह्या धंद्याचा विकास करण्यासाठीं योजना आंखलेल्या आहेत. मासळीचा उपयोग अनेक प्रकारें करतां येतो. ताजे अन्न म्हणून तर तिचा उपयोग होतोच, त्याशिवाय मासळी सुकवून किंवा खारवून बरेच दिवस टिकवितां येते. त्यामुळें समुद्रकांठापासून लांब राहाणाऱ्या लोकांना देखील मासळीचा उपयोग करतां येतो. त्याशिवाय मासळीचा खत म्हणूनहि चांगला उपयोग करतां येतो. ह्या धंद्याचा बराच विकास करतां येण्याजोगा आहे व हल्लींच्या अन्नधान्याच्या तुटवड्याच्या काळांत पूरक अन्न म्हणून मासळीला फार महत्त्व आलेलें आहे.

बिस्किटाचे व इतर खाद्यवस्तूंचे कारखाने

प्रत्येक मोठ्या शहरांत थोड्याफार प्रमाणांत हे उद्योगधंदे आढळून येतात. पाव भाजावयाच्या भट्टया दुसऱ्या महायुद्धापासून बऱ्याच प्रमाणावर आढळून येतात. अर्थात् मुंबईमध्यें हा उद्योगधंदा फारच मोठ्या प्रमाणावर चालतो. कारण पाश्चिमात्य संस्कृतीची छाप पडल्यामुळें पाव व केक्सचा वापर मुंबईकरांमध्यें मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. बिस्किटाचे कारखाने मात्र संख्येनें फार नाहींत. मुंबईचे दोन-चार कारखाने व पुण्याचा साठे यांचा कारखाना हे सोडले तर महाराष्ट्रांत बिस्किटांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारे कारखाने आढळत नाहींत.

धान्यें सडण्याच्या गिरण्या

धान्य सडण्याचा प्रश्न फक्त तांदुळाच्याच बाबतींत येतो. कारण वरचें टरफल काढल्याशिवाय तांदुळाचा उपयोग करतां येत नाहीं. साहजिकच धान्य सडण्याच्या गिरण्या भात पिकणाऱ्या भागांत आढळतात. महाराष्ट्रांतील भात पिकणारा भाग म्हणजे कोंकण हा होय. तेव्हां ह्या गिरण्या मुख्यत्वेंकरून कोंकणांतच आढळतात. मुंबई शहरांत देखील भात सडण्याच्या कांहीं गिरण्या आहेत. कारण कांहीं वेळेला भात मुंबईंत आणून तेथें तें सडलें जातें. पूर्वी हा धंदा घरगुती स्वरूपाचा होता. अलीकडेच ह्या यंत्रांचा उपयोग करण्यांत येऊं लागला आहे.

तंबाखूपासून तयार होणाऱ्या पदार्थांचे कारखाने

तंबाखूचे अनेक उपयोग आहेत. तंबाखूचा दंतमंजनांत उपयोग केला जातो. कारण तंबाखू ही दांताला चांगली असते. त्याचबरोबर तंबाखूचा खाण्यासाठीं देखील उपयोग करतात. तंबाखूपासून विड्या, सिगरेट हे पदार्थ तयार होतात. त्याचप्रमाणें तपकीरहि तंबाखूपासूनच तयार करतात. तंबाखूचे असे हे विविध उपयोग असल्यामुळें तंबाखूचा खप फार मोठ्या प्रमाणावर होतो. महाराष्ट्रांत बऱ्याच ठिकाणीं तंबाखूचें पीक येण्याजोगें आहे. विशेषतः दक्षिण महाराष्ट्र हा तंबाखूच्या उत्पादनासाठीं प्रसिद्ध आहे. ह्या ठिकाणीं तंबाखूपासून तयार होणाऱ्या पदार्थांचे कारखाने आहेत व त्यांच्यांत वाढ करणेंहि शक्य आहे. महाराष्ट्रांत विड्यांचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होतें; परंतु हा धंदा अजूनहि घरगुती उद्योगधंदा म्हणून चालतो. ह्या धंद्यामध्यें अजून यंत्रांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत नाहीं. विड्यांचें यंत्र शोधून काढण्याचें एक-दोन प्रयत्न झालेले आहेत. ह्या प्रयत्नांना जर यश

आलें तर हा धंदा घरगुती स्वरूपाचा रहाणार नाहीं. सिगरेटचे कारखाने महाराष्ट्रांत फारसे नाहींत. मुंबई शहर व उपनगरें ह्यांतील ५–६ कारखाने सोडले तर महाराष्ट्रांत नांव घेण्याजोगे सिगरेटचे कारखाने नाहींत. तपकिरीचे कारखाने मुख्यत्वेंकरून पुणें व पंढरपूर येथें आहेत. पुणें येथील वर्तको तपकिरीचा कारखाना प्रसिद्ध आहे. सरकारहि ह्या धंद्याकडे विशेष लक्ष देत आहे व तंबाखूबाबतच्या संशोधन-कार्यास मदत करीत आहे. तंबाखूपासून उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचे खालीलप्रमाणें कारखाने आहेत—

सिगरेट

मुंबई ३, मुंबईचीं उपनगरें ३.

विड्यांचे कारखाने

पुणें जिल्हा २९, रत्नागिरी १, सोलापूर ४८, नाशिक ७१, अहमदनगर १०३, पूर्व खानदेश ९, पश्चिम खानदेश १०, औरंगाबाद १७, बीड २.

तपकिरीचे कारखाने

पुणें जिल्हा १, दक्षिण सातारा जिल्हा ३, नाशिक २.

तेलाच्या गिरण्या

धान्यें भरडून त्यांच्यापासून तेल काढण्याचा उद्योगधंदा महाराष्ट्रांत फार प्राचीन काळापासून आहे. तेल काढणाऱ्या लोकांची एक स्वतंत्र जातच–तेली–महाराष्ट्रांत निर्माण झाली आहे. तेल काढण्याचा धंदा महाराष्ट्रांत सर्वत्र चालतो. परंतु जेथें करडई–शेंगादाणे वगैरेचें पीक येतें तेथें ह्या गिरण्या जास्त प्रमाणांत आढळतात. उदा०—विदर्भ, खानदेश वगैरे. पूर्वी बैलांचे चरक वापरण्यांत येत होते. आतां यांत्रिक चरकांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यांत येतो.

पिण्याच्या दारूचे कारखाने

प्रांतांत दारूबंदी होण्यापूर्वी दारूचे बरेच कारखाने महाराष्ट्रांत होते. दारूबंदी जारी झाल्यानंतर मात्र हे सर्व कारखाने बंद करण्यांत आले. सरकारच्या मालकीचा नाशिकला एक दारू गाळण्याचा कारखाना आहे. तो मात्र अजून चालू आहे. सैन्यांत व इतर प्रांतांत खपविण्यासाठीं येथें दारू तयार होते. सध्या दारूच्या ऐवजीं नीरा तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत. प्रत्येक मोठ्या शहरांत नीरा–केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. नीरेपासून गूळ तयार करण्याचे प्रयत्नसुद्धां सुरू आहेत.

औषधें तयार करण्याचे कारखाने

पूर्वी अनुभवी व तज्ज्ञ वैद्य आपलीं औषधें स्वत: तयार करीत असत. परंतु मागणी वाढल्यामुळें त्यांनीं औषधें मोठ्या प्रमाणावर तयार करून विकण्यास सुरुवात केली. ह्यांतूनच पुढें औषधांचे कारखाने निर्माण झाले. महाराष्ट्रांत सध्यां आयुर्वेद व अलोपॅथी ह्या दोन्ही प्रकारच्या औषधांचे कारखाने आहेत. कांहीं कारखान्यांत सुसज्ज प्रयोगशाला आहेत व ह्या प्रयोगशालांमध्यें नवीन नवीन औषधें तयार करण्याचे प्रयत्न सतत चालू आहेत. कांहीं कारखान्यांना जोडूनच हॉस्पिटल्स् आहेत. त्यामुळें औषधांची परिणामकता ताबडतोब अजमावून पहातां येते. वरील खाजगी कारखान्यांशिवाय सरकारनें पुण्याजवळ 'हिंदुस्थान ॲन्टिबायॉटिक्स्' नांवाचा मोठा औषधांचा कारखाना उघडला आहे. ह्या कारखान्यामध्यें पेनिसिलीन व इतर संबंधित औषधें तयार करण्यांत येतात. सध्यां महाराष्ट्रांत पेनिसिलीनचा कारखाना सोडून इतर कारखाने खालीलप्रमाणें आहेत. मुंबई शहर ५२, मुंबई उपनगरें २१, ठाणें जिल्हा ४, पुणें जिल्हा ४, कोल्हापूर जिल्हा १, दक्षिण सातारा जिल्हा १, उत्तर सातारा जिल्हा १, कुलाबा जिल्हा २, अहमदनगर जिल्हा १, नागपूर जिल्हा १.

रंगाचे कारखाने

रंगाच्या उत्पादनाला भारतामध्यें पहिल्या महायुद्धानंतर खरी सुरुवात झाली. अर्थात् त्यापूर्वी देखील रंग तयार होत होते. परंतु त्यांचा दर्जा चांगला नव्हता. तेव्हां परदेशांतून रंगाची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागत असे. १९२५ नंतर मात्र आपल्याकडे आधुनिक पद्धतीनें रंगाचें उत्पादन होऊं लागलें. महाराष्ट्रांत सध्यां खालीलप्रमाणें रंगाचे कारखाने आहेत. मुंबई शहर ७७, मुंबई उपनगर ४५, ठाणें जिल्हा १०, पुणें जिल्हा ७, नागपूर जिल्हा १.

काड्याच्या पेट्यांचे कारखाने

काड्याच्या पेट्यांचे कारखाने महाराष्ट्रांत अनेक आहेत. अंबरनाथ येथील Wimco हा काड्यांच्या पेट्यांचा कारखाना सर्वांत मोठा आहे. या मोठ्या कारखान्यांशिवाय घरगुती उद्योगधंदा देखील चालू आहे. गरीब कुटुंबांतील बायकांना फावल्या वेळांत काम पुरविण्यासाठीं ही घरगुती उद्योगधंद्याची योजना आहे व त्याचा फायदा अनेक गरीब कुटुंबांना होत आहे. महाराष्ट्रांतील काड्याच्या पेट्यांचे कारखाने पुढीलप्रमाणें—मुंबई उपनगर १, ठाणें जिल्हा १, भंडारा जिल्हा ९.

साबणाचे कारखाने

महाराष्ट्रांत साबण तयार करण्याचे कारखाने मुख्यतः मुंबई शहर व उपनगर यांत आहेत. त्यांपैकीं लिव्हर ब्रदर्स, गोदरेज सोप फॅक्टरी, स्वस्तिक ऑईल मिल्स, टाटा ऑईल मिल्स वगैरे मोठे आहेत. ह्याशिवाय ग्रामोद्योगामध्यें देखील साबण तयार करण्याचे उद्योगधंदे आहेत. महाराष्ट्रांत साबणाचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्रांतील साबणाचे कारखाने खालीलप्रमाणें-- मुंबई शहर १७, मुंबई उपनगर १, ठाणें जिल्हा २, पुणें जिल्हा १, कोल्हापूर जिल्हा १, नागपूर जिल्हा २, अकोला जिल्हा १.

कागदाचे कारखाने

महाराष्ट्रांत बऱ्याच पूर्वीपासून कागदाचें उत्पादन सुरू आहे. परंतु यंत्रांच्या साहाय्यानें कागद तयार करणारा महाराष्ट्रांतील पहिला कारखाना म्हणजे मुंढवें येथील डेक्कन पेपर मिल्स् हा होय. तेव्हांपासून आतांपर्यंत महाराष्ट्रांत इतर बरेंच कागदाचे कारखाने स्थापन झाले आहेत. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर कागदाचा खप दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रांतील जंगलांत कागदाच्या गिरण्यांना लागणारा कच्चा माल भरपूर प्रमाणांत आहे. तेव्हां ह्या उद्योगधंद्यास महाराष्ट्रांत अजून वाव आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्रांतील कागदाचे कारखाने पुढीलप्रमाणें—मुंबई शहर २, मुंबई उपनगर २, पुणें जिल्हा ३, उत्तर सातारा १, कुलाबा १, नाशिक १, पूर्व खानदेश २.

स्टेशनरी मालाच्या उत्पादनाचे कारखाने

छापण्याची व लिहिण्याची शाई, हरतऱ्हेचीं पाकिटें, फाइली, डिंक वगैरेंचे कारखाने मुंबई, पुणें वगैरे शहरांत आढळून येतात. शिसपेन्सिली तयार करण्याचे कारखाने देखील महाराष्ट्रांत आढळून येतात. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर ह्या मालाच्या खपांतहि वाढ होत आहे.

वरील प्रमुख उद्योगधंद्यांशिवाय इतरहि अनेक उद्योगधंदे महाराष्ट्रांत आढळून येतात. फर्निचर तयार करण्याचे कारखाने मोठ्या शहरांतून आढळून येतात. परंतु ह्यांचे खरे ग्राहक म्हणजे शाळा, कॉलेजें वगैरे संस्था व सरकारी व बिनसरकारी कचेऱ्या हे होत. माल अगोदर तयार करून विक्रीस ठेवण्यापेक्षां ऑर्डरप्रमाणें माल तयार करून देण्याकडे ह्या कारखानदारांचा जास्ती कल दिसतो. त्याचप्रमाणें यांत्रिक साधनांनीं जंगलांतील लांकूड काप-

ण्याच्या गिरण्याहि महाराष्ट्रांत आढळून येतात. दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात होईपर्यंत विटा भाजण्याचें काम बहुतेककरून घरगुती उद्योगधंद्यांनीं होत असे. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून सैन्यासाठीं व इतर खाजगी कामासाठीं देखील बांधण्यांत येणाऱ्या इमारतींसाठीं विटांना खूप मागणी येऊं लागली व मोठ्या भट्ट्या बांधून एकदम खूप विटा तयार करण्यांत येऊं लागल्या. शहरांमध्यें रस्ते तयार करण्यासाठीं खडीची मोठ्या प्रमाणावर गरज भासूं लागली. तेव्हां मोठ्या शहरांमध्यें यांत्रिक साधनांनीं खडी फोडण्याच्या कारखान्यांना सुरुवात झाली. लहान गांवांतून अजून हातांनींच खडी फोडण्यांत येते. कातडीं कमाविण्याचे व त्यापासून वस्तु तयार करण्याचे कारखाने देखील महाराष्ट्रांत आहेत; परंतु या उद्योगधंद्यांत अजून लहान प्रमाणावर काम करणारे कारखानेच पुष्कळ आहेत. जनावरांच्या हाडांपासून खत तयार करण्याचा उद्योगधंदा महाराष्ट्रांत लहान प्रमाणावर चालतो. रबर व प्लॅस्टिक यांचे कारखाने महाराष्ट्रांत दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत भरभराटीस आले. प्लॅस्टिकच्या वस्तूंचा वापर दिवसेंदिवस वाढत जात असल्यामुळें ह्या उद्योगधंद्याला महाराष्ट्रांत वाव आहे यांत शंका नाहीं. ह्याशिवाय सरकारनें सैन्यासाठीं लागणारें सर्व प्रकारचें साहित्य व दारूगोळा यांचें उत्पादन करण्यासाठीं महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं कारखाने उघडले आहेत. महाराष्ट्रांतील चित्रपटव्यवसाय हाहि एक उल्लेखनीय उद्योगधंदा आहे. मुंबई हें ह्या व्यवसायाचें केंद्र असून भारतांत तयार होणाऱ्या चित्रपटांपैकीं जवळजवळ निम्मे चित्रपट मुंबई शहरांत तयार झालेले असतात. मुंबईशिवाय पुणें व कोल्हापूर हीं दोन्हीहि महाराष्ट्रांतील चित्रपट-व्यवसायाचीं केंद्रें आहेत. सध्यां भारतीय सरकार पुण्याला ‘ फिल्म इन्स्टिटयूट ऑफ इंडिया ’ नांवाची चित्रपटव्यवसायाचें शिक्षण देणारी एक संस्था काढीत आहे. ह्यासाठीं सरकारनें पुण्याचा प्रभात स्टुडिओ आपल्या ताब्यांत घेतला आहे. ही अर्थात् पुण्याच्या दृष्टीनें अभिमानाची गोष्ट आहे. परंतु ह्याचा दुसरा परिणाम असा झाला आहे कीं, पुण्यांतील खाजगी चित्रपट-व्यवसाय बऱ्याच प्रमाणावर कोल्हापूर या ठिकाणीं गेला आहे. महाराष्ट्रांत चित्रपट-व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो व जवळजवळ ५-६ हजार कामगारांना तरी काम पुरवितो.

● ● ●

८

★

लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग

आतांपर्यंत आपण महाराष्ट्रांतील प्रमुख उद्योगधंद्यांची माहिती बघितली. त्याचबरोबर आपल्याला हेंहि लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं महाराष्ट्रांत अनेक लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग चालू आहेत व ह्या उद्योगधंद्यांमार्फत जीवनोपयोगी सर्व वस्तूंचें उत्पादन होतें. सूत काढणें, हातमागांवर कापड विणणें, रेशमी काम, कातडीं कमाविण्याचे उद्योगधंदे, तेल काढणें, गूळ तयार करणें, हातकागद तयार करणें वगैरे कामें या लघु उद्योगधंद्यांत व कुटीरोद्योगांत होतात. यांपैकीं बऱ्याच उद्योगधंद्यांची व्यवस्था अलीकडे सहकारी संस्थांमार्फत पाहिली जाते. या उद्योगधंद्यांमुळें बऱ्याच लोकांना काम मिळतें म्हणून अलीकडे सरकारहि ह्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देत आहे. सध्यां राज्यांत २,००० वर औद्योगिक सहकारी संस्था असून त्यांच्या सभासदांची संख्या १॥ लक्ष आहे. यांचें खेळतें भांडवल ५ कोटि रुपयांच्या आसपास आहे.

लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग यांचे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासांत एक विशिष्ट स्थान आहे. राज्य–सरकार तसेंच केंद्र-सरकार ह्यांनीं भारताच्या अर्थव्यवस्थेमध्यें लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग ह्यांचें कोणतें स्थान असावें हें निश्चितपणें जाणलें आहे व त्यांचे त्या दिशेनें प्रयत्न सुरू आहेत. तेव्हां लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग ह्यांचा थोडा तपशीलवार विचार केला तर फारसें अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटतें. अर्थातच हा विचार आपण भारताच्या दृष्टीनें करीत असलों तरी महाराष्ट्र हा भारताचा अविभाज्य घटक असल्यामुळें खालील सर्व विवरण महाराष्ट्रालाहि लागू आहे.

लघु उद्योगधंदे व ग्रामोद्योग म्हणजे काय ?

प्रथम आपणाला लघु उद्योगधंदे व ग्रामोद्योग कोणत्या उद्योगधंद्यांना म्हणावयाचें हें स्पष्ट केलें पाहिजे. श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनी लहान उद्योगधंदे व कुटीरोद्योग यांची खालीलप्रमाणें व्याख्या केली आहे. "कुटीरोद्योग म्हणजे लोकांनीं आपल्या घरांत चालविलेला उद्योगधंदा होय. त्यांचीं हत्यारें अत्यंत सामान्य असतात व तीं ते आपल्या हातानें चालवितात. बहुतकरून कुटीरोद्योग परंपरागत चालत आलेले असतात. लघु उद्योगधंदे कुटीरोद्योगांपेक्षां थोडे वेगळे असतात. ह्या उद्योगधंद्यांमध्यें एक मालक असतो व बाकीचे त्यानें नेमलेले कामगार असतात." लघु उद्योगधंद्यांत वीज किंवा इतर शक्तींनीं चालणारे नवे उद्योगधंदे त्याचप्रमाणें परंपरागत चालत आलेले हस्तव्यवसाय यांचा समावेश होऊं शकतो. ह्या उद्योगधंद्यांच्या दोन कसोट्या आहेत. एक म्हणजे हा उद्योगधंदा लहान प्रमाणावर उत्पादन करणारा असतो व दुसरी म्हणजे ह्या उद्योगधंधांमध्यें लहान प्रमाणावर का होईना नोकर नेमणारा एखादा मालक असतो.

फायदे—

मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांशीं तुलना करतां कुटीरोद्योग व लहान उद्योगधंदे यांचे खालीलप्रमाणें फायदे आढळून येतात—

(१) ह्या उद्योगधंद्यांना थोडें भांडवल लागतें.

(२) भांडवलाच्या मानानें ह्या उद्योगधंद्यांत जास्त कामगार लागतात. त्यामुळें ह्या उद्योगधंद्यांमुळें जास्त लोकांना रोजगार मिळतो. बेकारी निवारण्याकरितां ह्या उद्योगधंद्यांचा चांगला उपयोग होण्यासारखा आहे.

(३) ह्या उद्योगधंद्यांसाठीं फारशा तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता भासत नाहीं. जें थोडेंफार तांत्रिकज्ञान लागतें तें ह्या उद्योगधंद्यांतील लोकांना लवकर आत्मसात् करतां येतें. त्यामुळें मोठ्या तंत्रज्ञांची मोठ्या प्रमाणावर नेमणूक करण्याची आवश्यकता ह्या उद्योगधंद्यांत भासत नाहीं.

(४) ह्या उद्योगधंद्यांचा सामाजिक रचनेवर फारसा परिणाम होत नाहीं. मोठ्या कारखान्यांमुळें समाजांत अनेक प्रश्न निर्माण होतात. उदा०—लोकसंख्येची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर गति. कारण ज्या ठिकाणीं कारखाना निघतो त्या ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर कामगार लागतात व इतर भागांतून त्या भागाकडे लोकांची रीघ लागते. एवढ्या लोकांची त्या शहरांतच राहण्याची सोय होणें शक्य नसते. त्यामुळें त्या शहरांत गर्दी होते,

गलिच्छ वस्त्या निर्माण होतात. जीवनोपयोगी वस्तूंचे भाव वाढतात. जमिनीच्या व घरांच्या किंमती कडाडतात. ह्या गलिच्छ वस्त्या इतर अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांना जन्म देतात. लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग ह्यांमुळें समाजांतील अशा तऱ्हेचे गहन प्रश्न निर्माण होत नाहींत.

लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग यांचे वरीलप्रमाणें फायदे असल्यामुळें त्यांचें देशाच्या आर्थिक विकासांत काय स्थान असावें असा प्रश्न साहजिकच निर्माण होतो. १९५३ सालीं बँकॉक येथें भरलेल्या Ecafe working party नें ह्याबाबत पुढील सूचना केल्या आहेत—(१) ज्या पदार्थांचें उत्पादन मोठे उद्योगधंदे जास्त कार्यक्षमतेनें व कमी खर्चांत करूं शकतात त्या पदार्थांच्या उत्पादनाच्या क्षेत्रांत लघु उद्योगधंद्यांनीं पडूं नये. (२) ज्या पदार्थांच्या उत्पादनांत लघु उद्योगधंद्यांना नैसर्गिक रीतीनें कांहीं फायदे असतील त्या पदार्थांच्या उत्पादनावर ह्या उद्योगधंद्यांनीं जास्त जोर द्यावा.

लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग यांचें भारताच्या आर्थिक व्यवस्थेंतील स्थान

ह्या उद्योगधंद्यांना भारताच्या आर्थिक व्यवस्थेंत अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. सध्यां भारतापुढें एक अत्यंत निकडीचा प्रश्न उभा आहे, आणि तो म्हणजे बेकारी-निवारणाचा. त्याचबरोबर भारताचें औद्योगीकरण झपाट्यानें होत आहे. यंत्रांच्या जास्त उपयोगानें बेकारी वाढते कारण एक यंत्र अनेक लोकांचें काम करूं शकतें. तेव्हां भारताच्या औद्योगीकरणाबरोबर बेकारी वाढतच जाणार. ह्या बेकारी निवारणाकरितां कांहींतरी तांतडीची उपाययोजना करावयास पाहिजे. ह्या दृष्टीनें लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग अत्यंत महत्त्वाचे आहेत. कारण हे उद्योगधंदे अनेक लोकांना रोजगार देऊं शकतात. त्याचबरोबर सध्या भारतांत आधुनिक यंत्रसामुग्री व तंत्रज्ञ पुरेसे उपलब्ध नाहींत. लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग ह्यांना आधुनिक यंत्रसामुग्री व तंत्रज्ञ ह्यांची फारशी आवश्यकता भासत नाहीं. तेव्हां ह्या दृष्टीनेंहि लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग उपयुक्त आहेत. त्याचबरोबर लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग हे अनेक ठिकाणीं विखुरलेले असतात. त्यामुळें गलिच्छवस्त्या, आरोग्य वगैरेंचे प्रश्न निर्माण होत नाहींत. त्याचबरोबर युद्धाच्या दृष्टीनेंहि हे उद्योगधंदे योग्य आहेत. कारण हे उद्योगधंदे विखुरलेले असल्यामुळें त्यांचा सहजासहजीं नाश करतां येणें शक्य नसतें.

वरील कारणांबरोबर हीहि गोष्ट येथें नमूद केली पाहिजे कीं, भारतांतील परिस्थिति लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग ह्यांच्या विकासाच्या दृष्टीनें अत्यंत

योग्य आहे. भारतामध्यें ठिकठिकाणीं पाण्यापासून वीज निर्माण करतां येणें शक्य आहे व ह्या विजेचा लघु उद्योगधंद्यांसाठीं चांगला उपयोग करतां येणें शक्य आहे. त्याचबरोबर ह्या उद्योगधंद्यांच्या पाठीमागें एक परंपरा आहे. त्यामुळें ह्या धंद्यांत चांगले कारागीर उपलब्ध आहेत. त्यांना थोडेंसें उत्तेजन दिलें कीं हे उद्योगधंदे मजबूत पायावर उभे राहूं शकतील. आर्थिक दृष्टीनें देखील ह्या उद्योगधंद्यांची उपयुक्तता पटवतां येते. भारतामध्यें यंत्र-सामुग्रीपेक्षां कामगार ठेवणें स्वस्त पडतें. कारण भारतांतील मजुरीचे दर कमी आहेत. त्याचबरोबर भारत हा कृषिप्रधान देश आहे व बऱ्याच काळपर्यंत राहील, यांत शंका नाहीं. तेव्हां भारतांतील लोकसंख्येपैकीं बरेच लोक खेड्यांतच राहाणार. तेव्हां प्रत्येक खेड्याच्या गरजा भागवणारे स्थानिक कुटीरोद्योग प्रत्येक खेड्यांत असणें इष्ट आहे.

सरकारचेंहि ह्या उद्योगधंद्यांकडे विशेष लक्ष आहे. ह्या धंद्यांपुढील समस्यांचा विचार करण्यासाठीं सरकारनें सहा अखिल भारतीय मंडळें (All India Boards) नेमलीं आहेत. प्रत्येक मंडळ एका विशिष्ट प्रकारच्या उद्योग-धंद्यासाठीं आहे. त्याचबरोबर पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांमध्यें ह्या उद्योगधंद्यांच्या विकासाच्या योजना आंखल्या आहेत.

पहिली पंचवार्षिक योजना

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें ह्या उद्योगधंद्यांची तांत्रिक बाजू सुधारण्यावर व ह्या उद्योगधंद्यांची कार्यक्षमता वाढण्यावर भर दिला. ह्याशिवाय प्रत्येक उद्योगधंद्याला विकासासाठीं एखादें ठराविक क्षेत्र राखून ठेवलें पाहिजे, असें ठरविण्यांत आलें. ह्या उद्योगधंद्यांबाबतच्या धोरणाचीं खालील सूत्रें ठरविण्यांत आलीं — १. उत्पादनाचीं क्षेत्रें राखून ठेवणें. २. त्या वस्तूंचें उत्पादन करणाऱ्या मोठ्या उद्योगधंद्यांची यापुढें वाढ न करणें. ३. मोठ्या उद्योग-धंद्यांवर कर बसविणें. ४. लघु उद्योगधंद्यांना व कुटीरोद्योगांना कच्चा माल पुरविण्याची चांगली व्यवस्था करणें व ५. संशोधनांत एकसूत्रता आणणें. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें केंद्र-सरकार लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योगांसाठीं एकूण १५ कोटी रुपये खर्च करणार होतें. सर्व राज्यसरकारांनीं मिळून एकूण १२ कोटी रुपये खर्च करावयाचे होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं ह्या उद्योगधंद्यांवर एकूण ३१·२ कोटी रुपयांचा खर्च झाला.

द्वितीय पंचवार्षिक योजना

द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्यें लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग यांच्या-संबंधीं ज्या तरतुदी केल्या आहेत त्या कर्वे-समितीच्या अहवालावर आधारलेल्या

आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग यांसाठीं एकूण २०० कोटी रुपयांची तरतूद आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग यासंबंधीचा विचार खालील तीन कल्पनांवर आधारलेला आहे—१. प्रत्येक उद्योगधंद्यामधील मोठ्या व लहान कारखान्यांसाठीं उत्पादनाचा समान कार्यक्रम आंखणें. २. औद्योगिक उत्पादनाच्या विकेंद्रीकरणाची आवश्यकता. ३. उत्पादनाच्या लहान केंद्रांना तांत्रिक, आर्थिक वगैरे सर्व मदत देणें.

अशा रीतीनें लघु उद्योगधंदे व कुटीरोद्योग यांचें महत्त्व सरकारनें ओळखलें आहे व या धंद्यांना सर्व दृष्टींनी मदत करण्याचें ठरविलें आहे. भविष्यकाळांत ह्या उद्योगधंद्यांचा चांगला विकास होईल व हे उद्योगधंदे सरकारच्या त्यांच्याबद्दलच्या सर्व अपेक्षा पूर्ण करतील अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

• • •

९

★

वाहतुकीचीं साधनें

गेल्या पांच प्रकरणांत आपण महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची माहिती पाहिली. ह्यापुढें आपण औद्योगिक विकासाला मदत करणाऱ्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करूं. ह्या गोष्टी म्हणजे (१) वाहतुकीचीं साधनें, (२) बँका व (३) औद्योगिक कामगार.

महाराष्ट्रांतील वाहतुकीचीं साधनें

वाहतुकीच्या साधनांशिवाय उद्योगधंद्यांचा विकास होणें कठीण आहे, ही गोष्ट अगदीं उघड आहे. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या सर्व गोष्टी नैसर्गिकरीत्या एके ठिकाणीं सांपडणें ही गोष्ट जवळजवळ अशक्य आहे. तेव्हां निदान कांहीं गोष्टी तरी दुसऱ्या ठिकाणाहून आणणें भाग पडतें. ह्या गोष्टी वेळेवर व भरपूर प्रमाणांत मिळणें ही गोष्ट वाहतुकीच्या साधनांवर अवलंबून आहे. त्याचबरोबर तयार झालेला माल शक्य तेवढ्या लवकर बाजारपेठेपर्यंत पोहोंचला पाहिजे. अलीकडच्या काळांत तर दूरवर माल विक्रीसाठीं धाडण्यांत येत असल्यामुळें वाहतुकीच्या साधनांची आवश्यकता जास्तच वाटते. त्याचबरोबर मोठ्या कारखान्यांना मोठ्या संख्येनें कामगार लागतात. हे कामगारदेखील लांबून येतात. ह्या सर्व कामगारांना कारखान्याशेजारीं राहावयास जागा मिळणें शक्य नसतें. तेव्हां त्यांपैकीं बरेच जण १०–१५ मैलांवरून रोज कामावर येतात. वाहतुकीच्या साधनांची चांगली सोय असल्याखेरीज ह्या गोष्टी होणें शक्य नाहीं. वाहतुकीचीं साधनें व औद्योगिक विकास ह्या गोष्टींचा किती घनिष्ठ संबंध आहे ही गोष्ट यावरून लक्षांत येते.

वाहतूक चार प्रकारें चालते. सडका, लोहमार्ग किंवा रेल्वे, जलमार्ग व हवाई मार्ग.

सडका किंवा रस्ते

३१ मार्च १९५८ अखेर महाराष्ट्र राज्यामध्यें एकूण २०,८१४·३८ मैल लांब रस्ते होते. त्यांपैकीं १३,२६०·०७ मैल लांब खडीचे किंवा पक्के रस्ते होते व ७,५५४·३१ मैल लांब कच्चे रस्ते होते. पक्क्या रस्त्यांचें प्रमाण दर शंभर चौरस मैलीं १२ मैल असें होतें. महाराष्ट्रांतील तीन विभागांत हेंच प्रमाण खालीलप्रमाणें होतें—

पश्चिम महाराष्ट्र	दर शंभर चौरस मैलीं	१५ मैल,
विदर्भ	दर शंभर चौरस मैलीं	८ मैल,
मराठवाडा	दर शंभर चौरस मैलीं	६ मैल.

पश्चिम महाराष्ट्राशीं तुलना करतां पक्क्या रस्त्यांच्या बाबतींत विदर्भ व मराठवाडा मागासलेले आहेत ही गोष्ट उघड आहे.

भारतामध्यें १९४३ सालीं नागपूर येथें रस्त्यांच्या विकासासाठीं एक योजना तयार करण्यांत आली. पुढील २० वर्षांमध्यें भारतामध्यें कोणते रस्ते तयार करावयाचे, ह्याची योजना नागपूरला तयार करण्यांत आली. ही योजना माफक स्वरूपाची होती. १९४७ सालीं भारत स्वतंत्र झाल्यावर व विशेषतः पंचवार्षिक योजनांना सुरुवात झाल्यावर नागपूर करारांतील योजना अपुऱ्या वाटूं लागल्या. तेव्हां १९६०–६१ ते १९८०–८१ ह्या वीस वर्षांकरितां रस्त्यांच्या विकासाची एक नवीन योजना तयार करण्यांत आली. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांमध्यें रस्त्यांच्या विकासाकडे लक्ष पुरविण्यांत आलेलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें रस्त्यांसाठीं खालीलप्रमाणें तरतुदी होत्या— पश्चिम महाराष्ट्र ६९४ लक्ष रुपये, विदर्भ १८९·६८ लक्ष रुपये व मराठवाडा १५७·३९ लक्ष रुपये. पुढें विदर्भ व मराठवाडा हे मागासलेले प्रदेश असल्यामुळें त्यांच्यासाठीं अनुक्रमें २५० लाख रुपये व १५० लाख अशी जादा तरतूद करण्यांत आली. वरील तरतुदींशिवाय पश्चिम महाराष्ट्रांतील कांहीं विशिष्ट विभागांच्या निकडीच्या गरजा भागविण्यासाठीं कांहीं जादा तरतूद करण्यांत आली. उदा०—उंसाच्या शेतांत खत नेण्यासाठीं व शेतांपासून कारखान्यांपर्यंत उंस नेण्यासाठीं रस्त्यांची आवश्यकता भासली व ह्यासाठीं १५० लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली. दक्षिण विभागांत रस्त्याच्या विकासासाठीं ३०० लाख रुपये मंजूर करण्यांत आले. ह्याच भागांत क्रॉस ड्रेनेज व पुलांच्या

बांधकामासाठीं सुमारें २६५ लाख रुपयांची एक योजना आंखण्यांत आली व १९५९–६० सालापासून ह्या योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली. पश्चिम महाराष्ट्रांतील कोंकण विभाग हा वाहतुकीच्या दृष्टीनें अत्यंत मागासलेला प्रदेश आहे. ह्या भागांत रस्ते बांधण्यासाठीं ७५ लाख रुपयांची योजना तयार करण्यांत आली असून ह्या योजनेस सुरुवातसुद्धां झाली आहे.

वरील रस्त्यांशिवाय पी. डब्लू. डी. खात्यानें राष्ट्रीय राजमार्ग व मध्यवर्ती रस्तेनिधि ह्याखालीं कांहीं योजना आंखल्या असून त्यांपैकीं कांहींना सुरुवात देखील झाली आहे. ह्यांमध्यें खालील तीन रस्ते महत्त्वाचे आहेत—

१. **पश्चिम-किनारा-रस्ता**—हा रस्ता मुंबई-कोंकण-गोवा असा आहे. ह्याची एकूण लांबी २८७ मैल असून तो ९६ मैल कुलाबा जिल्ह्यांतून व १९१ मैल रत्नागिरी जिल्ह्यांतून जातो. ह्या कामासाठीं सुमारें ५०० लाख रुपये खर्च येईल.

२. **ईस्टर्न एक्सप्रेस हायवे**—हा रस्ता शीवजंक्शन–चेंबूर–घाटकोपर–विक्रोळी–ठाणें कोप्री रोड–ठाणें मेंटल हॉस्पिटल असा आहे. येथें तो मुंबई–ठाणें ह्या मुख्य रस्त्याला मिळतो. ह्या रस्त्याची लांबी सुमारें १९ मैल असून तो बांधण्यास २॥ कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे.

३. **वेस्टर्न एक्सप्रेस हायवे**—हा रस्ता माहीम कॉजवे–वांद्रा–सांताक्रूझ विमानतळ–अंधेरी–जोगेश्वरी–मालाड–कांदिवली–बोरिवली असा आहे. शेवटीं तो वांद्रा–घोडबंदर रस्त्यास मिळतो. ह्या रस्त्याची लांबी १५ मैल असून तो बांधण्यास सुमारें ३ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. नं. २ व नं. ३ ह्या रस्त्यांचा खर्च केंद्र व राज्य सरकार दोघांनीं मिळून प्रत्येकानें निम्मा करावयाचा आहे. बृहन्–मुंबईच्या हद्दींतील रस्त्यांच्या भागाचा खर्च मात्र केंद्र सरकार $\frac{1}{3}$ व राज्य सरकार $\frac{2}{3}$ असा वांटून करावयाचा आहे.

ह्याशिवाय धरमतर पूल व टोक येथील गोदावरी नदीवरील पूल वाहतुकीस खुले झाले आहेत. ह्याशिवाय राज्यांतील निरनिराळ्या विभागांना जोडणारे रस्ते बांधण्यात येत आहेत. उदा०—अहमदनगर–औरंगाबाद रस्ता, अजंठापाडले रस्ता वगैरे....अशा तऱ्हेन महाराष्ट्र राज्यामध्यें रस्त्यांच्या विकासाचें काम जोरांत चालूं आहे व नजिकच्या भविष्यकाळांत उद्योगधंद्यांच्या विकासास रस्त्यांच्या बाजूनें तरी कांहीं अडथळा येणार नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं.

रेल्वेमार्ग किंवा लोहमार्ग

पश्चिम महाराष्ट्रांत एकूण १५६३·९१ मैल लांबीचे रेल्वेमार्ग आहेत. त्यांपैकीं १०६८·९९ मैल ब्रॉड गेज, २५३·१८ मैल मीटर गेज व २४१·७४ मैल नॅरो गेज आहेत. मराठवाड्यांत एकूण ५५३·८६ मैल लांबीचे रेल्वेमार्ग आहेत. त्यांपैकीं ९०·८६ मैल ब्रॉड गेज, ४२७·४९ मैल मीटर गेज व ३५·५१ मैल नॅरो गेज आहेत. विदर्भांत एकूण ५३८·३५ मैल लांबीचे रेल्वे-मार्ग आहेत. त्यांपैकीं ३९८·७१ मैल ब्रॉड गेज आहेत व १३९·६४ मैल नॅरो गेज आहेत. महाराष्ट्रांत भारतीय रेल्वेच्या सेंट्रल रेल्वे, वेस्टर्न रेल्वे व सदर्न रेल्वे ह्या तीन विभागीय रेल्वेंचे मार्ग आहेत. एकुण महाराष्ट्रांत रेल्वे-मार्गांचें प्रमाण दर हजार चौरस मैलीं २६ मैल असें आहे. पश्चिम महाराष्ट्रांत हेंच प्रमाण २८ मैल आहे तर विदर्भांत २६ मैल व मराठवाड्यांत २१ मैल आहे. रेल्वे-मार्गांच्या बाबतींत देखील मराठवाडा मागासलेला आहे हें ह्यावरून कळून येतें. महाराष्ट्रांतील जिल्ह्यांची ह्या दृष्टीनें पहाणी केली तर असें आढळून येतें कीं, सोलापूर जिल्ह्यांत सर्वांत जास्त रेल्वेमार्ग आहेत (२५५ मैल), तर रत्नागिरी जिल्ह्यांत रेल्वेमार्ग अजिबात नाहीं. भारतांत दर हजार चौरस मैलांस ३० मैल असें रेल्वे-मार्गांचें प्रमाण पडतें. म्हणजे भारताशीं तुलना करतां महाराष्ट्रांत रेल्वे-मार्ग कमी आहेत. मुंबई–पुणें व मुंबई–इगतपुरी ह्या मार्गां-वरील रेल्वेगाड्या विजेवर चालतात.

रेल्वे-मार्ग हे सर्व दृष्टीनें महत्त्वाचे आहेत. जवळपास रेल्वे नसली तर तो भाग मागासलेला रहातो. कोंकण–विभाग व मराठवाडा हे दोन विभाग मागासलेले आहेत. त्याचें एक कारण ह्या विभागांत रेल्वे-मार्ग अपुरे आहेत हें आहे. कोंकण विभागाला रेल्वे मिळावी म्हणून अनेक लोकांचे प्रयत्न चालू आहेत. महाराष्ट्रराज्य झाल्यामुळें आतां तरी ह्या विभागाला रेल्वे मिळून ह्या भागाचें भवितव्य उज्ज्वल होईल अशी बऱ्याच लोकांना आशा वाटत आहे. कुलाबा जिल्ह्यांत दिवा ते दासगांव हा रेल्वेमार्ग बांधण्याचें निश्चित ठरलें आहे. उरण हें मच्छीमारीचें प्रमुख केंद्रहि ह्या रेल्वे-मार्गानें जोडलें जाणार आहे. रेल्वेखात्यानें ४०५ मैल जुन्या मार्गांचें नूतनीकरण करण्याचें ठरविलें आहे. रेल्वेखात्यानें महाराष्ट्रांत ६१७ मैल लांब रेल्वेमार्ग नवीन बांधावेत अशी महाराष्ट्र राज्य सरकारनें केंद्र-सरकारला शिफारस केली आहे.

जलमार्ग

फार प्राचीन काळापासून मानव जलमार्गांचा उपयोग करीत आलेला आहे. नद्या, सरोवरें व समुद्र ह्या तिन्हींचाहि वाहतुकीसाठीं उपयोग होतो.

महाराष्ट्रांत वाहतुकीसाठीं उपयुक्त अशीं सरोवरें नाहींत. नद्या उथळ व कमी पाण्याच्या असल्यामुळें वाहतुकीच्या दृष्टीनें त्यांचा फारसा उपयोग नाहीं. राहता राहिला समुद्र; आणि ह्या बाबतींत मात्र महाराष्ट्राला जवळजवळ ३२० मैल लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. या भागांत वाहतुकीला योग्य अशा खाड्या व बंदरें आहेत. सर्वांत मोठें बंदर अर्थातच मुंबई हें आहे. मुंबई हें नैसर्गिक बंदर असून तेथून बोटींनीं व जहाजांनीं परदेशांशीं मोठ्या प्रमाणावर व्यापार चालतो. मुंबई रेल्वेनीं व रस्त्यांनीं अन्तर्गत प्रदेशांशीं जोडलेली असल्यामुळें अन्तर्गत प्रदेशांतून प्रथम मुंबईला माल येतो व तेथून तो परदेशांत जातो. तसेंच परदेशांहून मुंबईत आयात केलेला मालसुद्धां सुलभ रीतीनें सर्व भारतांत धाडतां येतो. मुंबई हें आंतरराष्ट्रीय महत्त्वाचें बंदर असल्यामुळें महाराष्ट्राला अभिमान वाटण्याजोगें हें शहर आहे, यांत शंका नाहीं. मुंबई-शिवाय ह्या किनाऱ्यावर एकूण ४९ लहानमोठीं बंदरें आहेत. यामध्यें मोरा, करंजा, दाभोळ, जयगड, रत्नागिरी, मालवण व वेंगुर्लें हीं बंदरें मालाच्या वाहतुकीच्या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. वेंगुर्लें या बंदरांतून सरासरी १ लक्ष टन मालाची वाहतूक होते. रत्नागिरी, देवगड, मालवण व वेंगुर्लें हीं महत्त्वाचीं बारमाही बंदरें आहेत. ह्या बंदरांचा विकास घडवून आणणें अत्यंत जरूर आहे. अविकसित अवस्थेंत देखील हीं बंदरें वाहतुकीच्या दृष्टीनें चांगली उपयोगी पडूं शकत आहेत. त्यांच्यावर खर्च करून जर त्यांची सुधारणा केली तर कोंकणांतील वाहतुकीचा प्रश्न बऱ्याच अंशानें सुटेल. राज्य-सरकारचें ह्या प्रश्नाकडे आतां लक्ष वेधलें गेलें आहे व ह्या बाबतींत कांहीं प्रगतीहि झाली आहे. महाराष्ट्रांतील बंदरांच्या विकासासाठीं पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें फक्त ३ लाख रुपये खर्च झाला, तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांतच बंदरांच्या विकासावर एकूण ३० लाख रुपये खर्च झाला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ह्या रकमेंत आणखी वाढ होईल असा अंदाज आहे. बंदरांच्या विकासाकडे सरकारचें चांगलें लक्ष आहे हें ह्यावरून सिद्ध होतें. भारत सरकारनें मध्यम प्रतीच्या बंदरांच्या विकासाचा विचार करण्यासाठीं एक समिति नेमली आहे. तसेंच कोंकण विभागाच्या वाहतुकीच्या समस्यांचा विचार करण्यासाठींहि एक समिति नेमली आहे. बंदराच्या विकास-योजनेंतील पूर्ण झालेलीं उल्लेखनीय कामें पुढीलप्रमाणें आहेत—मालवण, श्रीवर्धन, एलिफंटा व बोरिया येथील धक्के. तसेंच रत्नागिरी बंदरांत प्रवाशांना उतरण्याच्या सोयी उपलब्ध करून देण्याचें काम चालूं आहे.

विमानमार्ग

विमानमार्गाचा उपयोग अजून तरी उतारूंची वाहतूक करण्यासाठींच होतो, कारण हा अतिशय खर्चाचा आहे. मुंबई हा आंतरराष्ट्रीय विमानतळ असून तो भारतांतील व भारताबाहेरीलसुद्धां प्रमुख विमानतळांशीं जोडलेला आहे. ह्याखेरीज महाराष्ट्र राज्यामध्यें नागपूर, औरंगाबाद व पुणें येथेंहि विमानतळ असून ते भारतांतील सर्व विमानतळांशीं जोडलेले आहेत.

महाराष्ट्र राज्यांतील वाहतुकीच्या मार्गांच्या वरील अहवालाकडे दृष्टि टाकल्यावर असें आढळून येतें कीं, महाराष्ट्र राज्यामधील सध्यांचे वाहतुकीचे मार्ग अपुरे आहेत व त्यांच्यामध्यें बरीच वाढ व्हावयास पाहिजे. महाराष्ट्र राज्याची औद्योगिक प्रगति वेगानें न होण्याचें मुख्य कारण म्हणजे वाहतुकीचीं साधनें पुरेशा प्रमाणांत उपलब्ध नसणें हें होय. कांहीं विशिष्ट ठिकाणीं आपल्याला उद्योगधंद्यांची गर्दी आढळून येते. त्याचें मुख्य कारणसुद्धां हेंच आहे. ज्या ठिकाणीं वाहतुकीचीं साधनें मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत तेथें साहजिकच उद्योगधंद्यांची गर्दी होते. कारण उद्योगधंद्यांना आवश्यक असलेल्या गोष्टी तेथें मिळूं शकतात म्हणजेच प्रत्यक्ष त्या ठिकाणीं जरी त्या गोष्टी नसल्या तरी दुसरीकडून तेथें त्या आणवितां येतात. त्याचप्रमाणें तयार माल बाजारपेठेंत धाडणें देखील अतिशय सुलभ जातें. वाहतुकीचीं साधनें उपलब्ध झालीं तर महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं नवीन उद्योगधंदे निघणें शक्य आहे. उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण करण्यासाठीं वाहतुकीच्या मार्गांचें सर्व राज्यभर जाळें पसरविण्याची जरुरी आहे. राज्य-सरकारनें ही गोष्ट ओळखली आहे ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे व वर सांगितल्याप्रमाणें सरकारचे प्रयत्न जोरांत सुरूं आहेत.

● ● ●

१०

★

बँका

उद्योगधंद्यांच्या विकासाला मदत करणारी दुसरी गोष्ट म्हणजे बँका ही होय. अर्थातच येथें बँका म्हणजे व्यापारी बँका हा अर्थच अभिप्रेत आहे. कारण आपण उद्योगधंद्यांच्या विकासाचा विचार करीत आहोंत. उद्योगधंद्यांना योग्य प्रमाणांत व योग्य वेळीं आर्थिक साहाय्य देण्याचें काम ह्या बँका करतात. भांडवलाशिवाय किंवा पैशाशिवाय एकहि उद्योगधंदा चालणें शक्य नाहीं ही गोष्ट अगदीं उघड आहे. ज्या देशामध्यें बँकिंगचा विकास झालेला नाहीं त्या देशामध्यें इतर उद्योगधंद्यांचाहि विकास होणें कठीण आहे. आर्थिक साहाय्याशिवाय इतर अनेक सोयी बँका उद्योगधंद्यांना उपलब्ध करून देतात. ह्या सोयी जर उद्योगधंद्यांना मिळाल्या नाहींत तर त्यांना सध्यांच्या कार्यक्षमतेनें कार्य करणें कठीण जाईल. बँका ठेवींच्या रूपानें लोकांकडून पैसा जमा करतात व तो पैसा उद्योगधंद्यांना मदत देण्यासाठीं उपयोगांत आणतात. बँका नसत्या तर हा पैसा उद्योगधंद्यांकडे कधींच आला नसता. बँका व उद्योगधंद्यांचा विकास ह्यांचा परस्परसंबंध अत्यंत निकटचा आहे. पुढील आंकडेवारीकडे बघितल्यास ही गोष्ट लक्षांत येईल. १९५८ सालच्या परिस्थितीकडे पाहतां व शेडयूल्ड बँकांचा व्यवहार लक्षांत घेतां ४८ टक्के पैसा उद्योगक्षेत्राकडे दिलेला आढळून येतो. कापडधंद्यांत १९ टक्के, तागाच्या धंद्यांत ३, लोखंड व पोलाद ३, इंजिनियरिंग ९, साखर ३, केमिकल २ इत्यादि. महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या विकासाचा विचार करतांना साहजिकच महाराष्ट्रांतील व्यापारी बँकांचा विचार करणें जरूर आहे.

महाराष्ट्रांतील व्यापारी बँका

महाराष्ट्रांतील बँकांचा विचार करतांना मुंबईतील बँका व मुंबईबाहेरील महाराष्ट्रांतील बँका असे दोन विभाग पाडले पाहिजेत. कारण मुंबई हें भारताचें प्रमुख औद्योगिक व व्यापारी केंद्र असल्यामुळें ह्या शहरांतील बहुसंख्य बँका प्रगत अवस्थेमध्यें आहेत. महाराष्ट्रांतील इतर प्रदेशामध्यें ह्या बँकांइतक्या पुढारलेल्या बँका फारशा नाहींत.

विसाव्या शतकापूर्वी महाराष्ट्रामध्यें बँकांचा फारसा विकास झाला नव्हता. नांव घेण्याजोग्या अशा पूना बँक (स्थापना १८८९), डेक्कन बँक (स्थापना १८९०) व बाँबे बँकिंग कंपनी (स्थापना १८९८) ह्या तीनच बँका त्या वेळीं होत्या. ह्या तीनहि बँका आतां अस्तित्वांत नाहींत. १९०६ च्या स्वदेशीच्या चळवळींत महाराष्ट्रामध्यें भारताच्या आर्थिक पुनरुत्थानाच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून कांहीं बँका स्थापल्या गेल्या. ह्यांपैकीं बऱ्याच बँका सध्यां अस्तित्वांत आहेत. चालू शतकांत निघालेल्या, प्रसिद्धीस आलेल्या परंतु दुसऱ्या महायुद्धापूर्वी नामशेष झालेल्या अशा बँकांत इंडियन स्पेसी बँक, टाटा इंडिस्ट्रिअल बँक, पायोनिअर बँक, क्रेडिट बँक, शिलोत्री बँक वगैरे बँका प्रमुख होत.

मुंबईत मुख्य कचेरी असलेल्या बँका

महाराष्ट्रांतील विद्यमान व्यापारी बँकांमध्यें सर्वांत जुनी बँक म्हणजे बँक ऑफ इंडिया ही होय. स्वदेशीच्या आंदोलनांत तिचा जन्म झाला (स्थापना ७ सप्टेंबर १९०६). परंतु तिच्या संचालकांनीं—सर शापुरजी भरूचा वगैरे उद्योगपति—व्यवस्थापक म्हणून एका ब्रिटिश तज्ज्ञाची निवड केली. त्यामुळें पूर्णपणें स्वदेशी अशी बँक निघाल्याचें समाधान कांहींना लाभलें नाहीं. त्याचाच परिणाम म्हणून २१ डिसेंबर १९११ या दिवशीं सर फेरोझशहा मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही बँक मुंबईत स्थापन झाली. विद्यमान बँकांपैकीं सेंट्रल बँकेच्या नंतर ११ नोव्हेंबर १९१९ ला युनिअन बँक ऑफ इंडिया, ३१ जुलै १९३७ ला न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, १६ मे १९३८ ला देवकरण नानाजी बँकिंग कंपनी व ११ ऑगस्ट १९४३ ला गडोदिया बँक या नोंदविल्या गेल्या.

भारताच्या बँकिंग व्यवसायांत बँक ऑफ इंडिया व सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांनीं दोन परंपरा निर्माण केल्या आहेत. बँक ऑफ इंडियाची प्रवृत्ति सनातनी आहे. ही बँक बँकिंगच्या धंद्यांतील रूढ झालेल्या परंपरागत प्रथांना शक्य तोंवर चिकटून राहाते. बँकिगच्या सनातनी व्यवहारपद्धतीमुळें या बँकेवर

ठेवीदारांची धाव होण्याचे प्रसंग आले नाहींत. १९३० मध्यें तिच्या ब्रिटिश व्यवस्थापकाचा हात सविनय कायदेभंगाची चळवळ दडपण्यांत आहे अशी एक अफवा पसरली. त्यामुळें लोकांनीं दोन-तीन दिवस तिच्या मुंबईच्या कचेरीपुढें निदर्शनें केलीं. परंतु सदर अफवा निराधार असल्याचें आढळून आलें व ती राजकीय वावटळ संपली.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाची प्रवृत्ति पुरोगामी आहे. सेंट्रल बँकेनें १९२३ मध्यें टाटा इंडस्ट्रिअल बँक आपल्यांत सामावून घेण्याचा विक्रम केला. तिनें विवेकपूर्ण साहस करण्याची मनोवृत्ति दाखविली आहे व व्यापार–उद्योगधंद्यांना सढळ हातानें सवलती दिलेल्या आहेत. स्थापनेपासून पहिल्या पंचवीस वर्षांत या बँकेवर ९ वेळां ठेवीदारांची धाव होण्याचे प्रसंग आले. परंतु बँकेचे सूत्रधार कै. सर सोराबजी पोचखानवाला यांनीं या सर्व बिकट प्रसंगांना यशस्वीपणें तोंड दिलें. या बँकेनें स्वतःच्या मगदुरावर सर्व देशभर आपल्या शाखांचें जाळें पसरविलें आहे.

देवकरण नानजी कंपनीची वाटचाल सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या धर्ती-वर आहे. महाराष्ट्र, गुजराथ व सौराष्ट्र या भागांतच तिचा व्याप प्रधानतः आहे. इतर तीन बँकांनीं शाखांचें जाळें फारसें विणलेलें नाहीं. त्यांचीं कार्यक्षेत्रें मर्यादित आहेत.

मुंबईबाहेर महाराष्ट्रांत मुख्य कचेरी असलेल्या बँका

मुंबईबाहेर महाराष्ट्रांत मुख्य कचेरी असलेल्या विद्यमान बँकांपैकीं साताऱ्याची स्वदेशी कमर्शिअल बँक २० ऑगस्ट १९०७ रोजीं स्थापन झाली. या कंपनीचे पहिले चालक व पालक विमामहर्षि श्री. चिरमुले हे होत. या बँकेनें आपला व्याप सातारा जिल्ह्याबाहेर फारसा वाढवला नाहीं. परंतु लोकांत आपली पत चांगल्या प्रकारें वाढवली. ह्यानंतर १९३४ पर्यंत विद्यमान बँकांपैकीं ९ बँका निघाल्या. ह्यांपैकीं ६ बँका आतां विलीन झालेल्या दक्षिणी संस्थानांत स्थापन झाल्या. त्यांना त्यांच्या संस्थानिकांचा व दरबारांचा पाठिंबा मिळाला. आपापल्या परीनें त्यांनीं व्यापार-उदीमाच्या वाढीस हातभार लावला आहे. परंतु त्यांचें उद्दिष्ट मर्यादित व कार्यक्षेत्र त्यांच्या संस्थानापुरतेंच मर्यादित होतें. महाराष्ट्रीयांत बँकिंगचा धंदा करण्याची स्फूर्ति मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्याचें श्रेय 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज'ला आहे. ही संस्था १९३४ मध्यें पुण्यांत स्थापन झाली. ह्या संस्थेनें पुढच्याच सालीं आपले चेअरमन प्रा. वा. गो. काळे यांच्या नेतृत्वा-खालीं बँक ऑफ महाराष्ट्र लि. ही बँक काढली. गेल्या २५ वर्षांत ह्या बँकेनें

चांगलीच प्रगति केली आहे व महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एकूण ५२ शाखा उघडल्या आहेत. उच्च ध्येयानें व सेवावृत्तीनें प्रेरित होऊन 'बँक ऑफ महाराष्ट्र' ची स्थापना मराठा चेंबरनें केल्यामुळें एक नवीनच वातावरण निर्माण झालें व ठिकाठिकाणच्या मंडळींना स्थानिक प्रयत्नानें बँकिंगचे नवीन उपक्रम करण्याची स्फूर्ति मिळाली. १९३४ पासून १९४६ पर्यंत महाराष्ट्रांत १७ नवीन बँका स्थापन झाल्या.

महाराष्ट्रांतील बँकिंगची १९५९ सालांतील परिस्थिति

१९५९ सालच्या रिझर्व्ह बँकेच्या अहवालाप्रमाणें महाराष्ट्रांत एकूण १४ शेड्यूल्ड बँका, ३ वर्ग ए २ नॉन् शेड्यूल्ड बँका, ७ वर्ग बी नॉन् शेड्यूल्ड बँका व १ वर्ग सी नॉन् शेड्यूल्ड बँका आहेत. ह्या बँकांचीं नांवें, मुख्य कचेऱ्यांचीं गांवें, स्थापनादिन, वसूल झालेलें भाग–भांडवल, शिलकी निधि, एकूण ठेवी, प्रत्येकीं कचेऱ्यांची संख्या व १९५९ सालाकरितां भागीदारांना वांटलेल्या लाभांशाचा दर वगैरेंची माहिती कोष्टक क्रमांक १ मध्यें दिलेली आहे. पुढील कोष्टकावरून बँकांच्या परिस्थितीची कल्पना येईल.

महाराष्ट्रांत व्यापारी बँकेची एक तरी कचेरी असलेल्या गांवांची संख्या १९५९ अखेर १३३ होती व त्यांतील एकूण कचेऱ्यांची संख्या ५३८ (स्टेट बँक ८८ + इतर बँका ४५०) होती. बँक–कचेऱ्यांची सर्वांत मोठी संख्या साहजिकच मुंबई शहरांत असून लोकसंख्येच्या दृष्टीनेंहि सदर शहर सर्वांत मोठें आहे. मुंबईमध्यें व्यापारी बँकांच्या एकूण १८७ (स्टेट बँक ६ + इतर बँका १८१) कचेऱ्या आहेत. भारताच्या मध्यवर्ती बँकेची म्हणजेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थानिक मुख्य कचेरीहि मुंबईला आहे. हें शहर भारतांतील व्यापाराचें महत्त्वाचें केंद्र असल्यामुळें परदेशी बँकांच्याहि बऱ्याच कचेऱ्या या शहरांत आहेत. १९५१ च्या खानेसुमारीप्रमाणें ह्या शहराची लोकसंख्या २८,३९,२७० इतकी आहे. बँक-कचेरी असलेलें लहानांत लहान गांव पुण्याजवळील पिंपरी हें आहे. ह्या गांवाची लोकसंख्या फक्त ९५५ (१९५१ ची खानेसुमारी) आहे. ह्या गांवीं युनायटेड कमर्शिअल बँकेची उपशाखा आहे. हिंदुस्थान ॲन्टिबायॉटिक्स् लि. ह्या पेनिसिलीनच्या कारखान्यामुळें या गांवाची बरीच प्रगति झाली आहे. ह्या गांवाच्या आसपास आतां इतर बरेच नवीन उद्योगधंदेहि उदयास येत आहेत. व्यापारी बँकांची निदान एक तरी कचेरी असलेलीं महाराष्ट्रांतील गांवें, त्यांतील बँक-कचेऱ्यांची संख्या व लोकसंख्या ही माहिती कोष्टक क्रमांक दोनमध्यें दिली आहे.

कोष्टक

वर्ग ए १–शेडयूल्ड बँका—

बँकेचें नांव	मुख्य कचेरीचें गांव	स्थापना-दिन	वसूल भाग-भांडवल (सहस्र रुपये)
१. बँक ऑफ इंडिया	मुंबई	७–९–१९०६	३००००
२. सेंट्रल बँक ऑफ इंडिया	मुंबई	२१–१२–१९११	३१५००
३. देवकरण नानजी बँकिंग कंपनी	मुंबई	२६–५ –१९३८	५०००
४. गडोदिया बँक	मुंबई	११–८ –१९४३	१०००
५. न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया*	मुंबई	३१–७ –१९३७	१२६०
६. युनिअन बँक ऑफ इंडिया	मुंबई	११–११–१९१९	६०००
७. बँक ऑफ महाराष्ट्र	पुणें	१६–९ –१९३५	३१६८
८. बँक ऑफ नागपूर+	नागपूर	१६–११–१९३७	१०००
९. बँक ऑफ पूना	पुणें	१९–७ –१९४५	१२५०
१०. मिरज स्टेट बँक	मिरज	३०–४ –१९२९	६००
११. प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक	पुणें	१९–११–१९३६	७२१
१२. रत्नाकर बँक	कोल्हापूर	१०–६ –१९४३	५०३
१३. सांगली बँक	सांगली	५–१०–१९१६	४५०
१४. युनायटेड वेस्टर्न बँक	सातारा	१७–१०–१९३६	६५०

वर्ग ए २–नॉन् शेडयूल्ड बँका—वसूल भांडवल

१. बँक ऑफ कोंकण	मालवण	९–३ –१९४५	५१८
२. भारत इंडस्ट्रिअल बँक	पुणें	१४–४ –१९३८	४००
३. सेफ बँक	नागपूर	२४–२ –१९४५	१०७३

वर्ग बी–नॉन् शेडयूल्ड बँका—वसूल भांडवल व

१. बँक ऑफ औंध	सातारा	२५–८ –१९३८	१७०
२. बँक ऑफ कऱ्हाड	कराड	१२–३ –१९४६	२३०
३. भोर स्टेट बँक	भोर	१–८ –१९४४	२५०
४. कमर्शिअल बँक	कोल्हापूर	२२–४ –१९३६	१८८
५. गणेश बँक ऑफ कुरुंदवाड	कुरुंदवाड	१४–८ –१९२०	३८
६. सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक	सातारा	२०–८ –१९०७	२३९
७. सिंध नॅशनल बँक	उल्हासनगर		४००

वर्ग सी–नॉन् शेडयूल्ड बँका—वसूल भांडवल व

१. फलटण बँक	फलटण	१–७ –१९१८	५७
२. पूना इन्व्हेस्टर्स बँक	पुणें	१५–९ –१९४५	६५

* रिझर्व्ह बँकेच्या शिफारसीनुसार भारत सरकारनें ह्या बँकेला १५

\+ रिझर्व्ह बँकेच्या शिफारसीनुसार भारत सरकारनें ह्या बँकेला २५

५ लें.

(जॉइंट स्टॉक).

शिलकी निधी (सहस्र रुपये)	एकूण ठेवी. (सहस्र रुपये)	कचेऱ्यांची संख्या मुख्य कचेरी धरून	१९५९सालचा लाभांश टक्के.
३१०००.	९८०२८१	४८	१६.
३५९३३.	१७७२६९०	२९७	१२·०४-
५२००	३६८९९५	८३	८·७६.
११८	९२७७	८	......
२३	२६९१३	४४	......
५३२२	३२११२०	४६	११·४०
१४६०	१३०५४६	५२	९
६३	७६६९	१६	......
३५	१७४२	४	......
६२०	८०३५	८	८·५८
२४३	२८६१	२	......
१७०	५१९६	५	२
५००	२१६६०	१६	१७
३००	१८८३५	१३	७·२०

शिलकी निधि मिळून ५ लाख रुपये किंवा जास्त असणाऱ्या.

१७	१२३१	६	......
१३८	७६६२	७	३
५७	१२२६	४	......

शिलकी निधि मिळून १ लाख ते ५ लाख रुपये असणाऱ्या.

६९	१९९४	४	......
८४	३७३७	४	६·५०
४०	१४९३	४	......
१५५	३९६	१	......
१२७	८३३	२	११
२३७	४८४९	७	१०
३	३२५	१	......

शिलकी निधि मिळून ५० हजार ते १ लाख रुपये असणाऱ्या.

२८	२६१	१	......
१०	११४२	१	......

नोव्हेंबर १९६० पासून ३ महिन्यांचा मॉरिटॉरियम् दिला आहे.

नोव्हेंबर १९६० पासून ४३ दिवसांचा मॉरिटॉरियम् दिला आहे.

कोष्टक २ रें

[व्यापारी बँकांची निदान एक तरी कचेरी असलेलीं महाराष्ट्रांतील गांवें, त्यांतील बँक-कचेऱ्यांची संख्या व लोकसंख्या].

गांवाचें नांव	व्यापारी बँक-कचेऱ्यांची संख्या (३१-३-१९६०) स्टेट बँकेच्या कचेऱ्या.	इतर बँकांच्या कचेऱ्या	लोकसंख्या (१९५१ची खानेसुमारी)
स्तंभ क्रमांक (१)	(२ अ)	(२ ब)	(३)
१. अचलपूर	१	—	५०७९४
२. अहमदनगर	१	३	१०५२७५
३. अक्कलकोट	१	—	१८११२
४. अकलूज	१	२	२०२९२
५. अकोला	१	५	८९६०६
६. अकोट	१	—	२४२५५
७. अलिबाग	१	—	८१८१
८. अमळनेर	१	१	४४६४६
९. अमरावती	१	५	१०२८०६
१०. औंध	—	१	१२२३
११. आर्वी	१	१	१८२२३
१२. औरंगाबाद	—	३	६६६३६
१३. बांदा	—	१	४१५४
१४. बारामती	१	२	१७०६४
१५. बार्शी	१	५	४१८४९
१६. वसई	१	—	१९६४०
१७. भंडारा	१	१	२२६४०
१८. भवानीनगर	—	१	१०००
१९. बीड	—	१	२५६३६
२०. भिवंडी	१	२	२५७६४
२१. भोर	—	१	७३९३
२२. भुसावळ	१	—	५४३४६
२३. मुंबई	६	१८१	२८३९२७०
२४. ब्रह्मपुरी	१	—	७११७
२५. बुलढाणा	१	—	१०७९७

२६. चाळीसगांव	१	१	३०३४५
२७. चांदा	१	३	४०७४४
२८. चिपळूण	१	१	१५८४७
२९. चोपडा	१	—	२२८३२
३०. डहाणू	१	—	८९०४
३१. दारव्हा	१	—	१००७४
३२. दर्यापूर	१	—	१८०६५
३३. देवळाली	१	१	२७०७५
३४. देवगड	—	१	२४९३
३५. धामणगांव	१	१	१०८८३
३६. धुळें	१	३	७६८८०
३७. दोंडाईचें	१	—	१०९२०
३८. गडहिंग्लज	—	१	८५४६
३९. गोंदिया	१	२	३६६८६
४०. हिंगणघाट	१	२	३२८६८
४१. हिंगोली	—	१	२१२१४
४२. इचलकरंजी	१	३	२७४२३
४३. इस्लामपूर	—	१	१६११३
४४. जळगांव	१	४	६८४१२
४५. जालना	—	३	५८४७८
४६. जयसिंगपूर	—	२	८०४८
४७. कल्याण	१	५	५८९०००
४८. कणकवली	—	१	४४६७
४९. कऱ्हाड	१	३	२५७२१
५०. करमाळा	—	१	८२०६
५१. कोरेगांव	—	१	७२३०
५२. काटोल	१	—	१२८५१
५३. कवठे-महाकांळ	—	१	३७१७
५४. खामगांव	१	३	३६७३४
५५. खेड (रत्नागिरी)	१	—	६४८८
५६. खेड (पुणें)	१	—	११७५७
५७. खोपोली	—	१	१६९३
५८. भिगवण	१	—	[illegible]
५९. खडकी	—	२	४८५५२

६०. किर्लोस्करवाडी	—	१	१६८३
६१. कोल्हापूर	१	१२	१३६८३५
६२. कोपरगांव	१	२	११६१६
६३. कारंजा	१	१	२२०९८
६४. कुर्डुवाडी	१	१	१०८०२
६५. कुरुंदवाड	—	१	९७४४
६६. कुडाळ	—	१	५८५२
६७. लासलगांव	१	—	४२००
६८. लातूर	—	३	३५३७४
६९. लोणंद	—	२	५१२०
७०. लोणावळा	—	१	१६७७१
७१. मसूर	—	१	५८१४
७२. महाड	—	१	१०२६७
७३. मालेगांव	१	२	५५०२२
७४. मलकापूर	१	—	२४९४१
७५. मालवण	१	३	२९८५१
७६. मंगळवेढा	—	१	९२६५
७७. मनमाड	१	१	१८३५०
७८. मानवत	—	१	१५६४४
७९. मिरज	१	४	४०२२४
८०. मोमिनाबाद	—	२	१६०१३
८१. मूर्तिजापूर	—	१	१५३५२
८२. नागपूर	२	१९	४४९०९९
८३. नामपूर	—	१	४२९४
८४. नांदेड	१	३	६५०२४
८५. नानगांव	१	—	९१६९
८६. नांदुरा	१	—	१५७२२
८७. नंदुरबार	१	१	३०१४४
८८. नाशिक	१	८	९७०४२
८९. ओगलेवाडी	—	२	१२५९
९०. उस्मानाबाद	—	१	१५००७
९१. ओझर	—	१	६८१२
९२. पाचोरा	१	—	१५०४४

९३. पुसद	१	१	१५१२९
९४. पालघर	१	—	७१६८
९५. पाली	—	१	१२५१
९६. पंढरपूर	१	२	४०५१४
९७. पनवेल	१	१	१४८६१
९८. परभणी	१	१	३३४४६
९९. पेण	—	१	८६०७
१००. फलटण	१	२	१२१४२
१०१. फोंडेघाट	—	१	—
१०२. पिंपळगांव	—	१	६५५५
१०३. पिंपरी	—	१	९५५
१०४. पुणें	२	३५	५३९९९३
१०५. पुळगांव	—	१	१८९०९
१०६. परळी-वैजनाथ	—	२	१४५६७
१०७. रत्नागिरी	१	३	२७०८२
१०८. सेलू	—	१	१२८१९
१०९. संगमनेर	१	२	१६७५६
११०. सांगली	१	१२	५०२८७
१११. सातारा	१	४	४१०७०
११२. सावंतवाडी	—	२	१२४५१
११३. शहादें	१	—	१०४३७
११४. शिरपूर	१	—	१६३३२
११५. शिरोडें	—	१	५३७३
११६. शिरवळ	—	१	४५८७
११७. सोलापूर	१	९	२७७०८७
११८. श्रीरामपूर	१	२	१६३११
११९. सिन्नर	—	१	१३०६३
१२०. तासगांव	—	१	१२९१५
१२१. ठोणें	१	३	५०१५५
१२२. तुमसर	१	—	१८२५०
१२३. उदगीर	—	१	१६५२२
१२४. उल्हासनगर	—	२	११०५०
१२५. वैजापूर	—	१	१०३६४
१२६. वेंगुर्ला	—	२	२२७७८

१२७. वालचंदनगर	—	१	५६४०
१२८. वर्धा	१	२	३९८२७
१२९. वरोडा	१	१	११५१७
१३०. वाशीम	१	—	१८६७३
१३१. वणी	१	१	१४६७२
१३२. येवलें	१	—	२१३७८
१३३. यवतमाळ	१	५	३५९८०
	८८	४५०	

महाराष्ट्रांतील बँकिंगच्या परिस्थितीची संपूर्ण कल्पना येण्यासाठीं ह्या दोन कोष्टकांशिवाय इतर बरीच आंकडेवारी द्यावयास पाहिजे व ही आंकडेवारी सुद्धां निरनिराळ्या दृष्टिकोनांतून मांडून दाखवावयास पाहिजे. परंतु स्थळाभावीं फक्त दोनच महत्त्वाचीं कोष्टकें येथें दिलीं आहेत. ह्या कोष्टकांवरून महाराष्ट्रांतील बँकिंगबद्दल पुरेशीं माहिती मिळेल. वरील दोन कोष्टकांवरून तसेंच इतर आंकडेवारीवरून महाराष्ट्रांतील बँकिंगबाबत खालील गोष्टी आढळून येतात—

१. गेल्या पंधरा वर्षांत महाराष्ट्रांत एकहि नवीन बँक निघाली नाहीं. याचें कारण असें सांगतां येईल कीं, युद्धकालीं बँकांची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली. युद्धानंतर बँकांची संख्या वाढवण्यापेक्षां बँकिंगच्या धंद्याचा पाया मजबूत करावयास हवा, त्याची जाणीव झाली. त्यामुळें ह्या गोष्टीकडे जास्त लक्ष दिलें जात आहे. साहजिकच नवीन बँका निघाल्या नाहींत.

२. कोष्टक क्रमांक दोनवरून असें आढळून येतें कीं, कांहीं ठिकाणीं बँक-शाखांची गर्दी झालेली आहे; ह्याउलट अशीं अजून कित्येक गांवें दाखवतां येतील कीं, ज्या ठिकाणीं बँकेची शाखा चालणें शक्य असूनहि तेथें एकहि शाखा नाहीं. बँकांच्या वाढीच्या दृष्टीनें ही गोष्ट कांहीं चांगली नाहीं. तेव्हां नवीन शाखा काढतांना विचार करून योग्य ठिकाणीं शाखा उघडली पाहिजे. नवीन शाखांना परवानगी देतांना जर रिझर्व्ह बँकेनें योग्य धोरण अनुसरलें तर ह्या परिस्थितींत सुधारणा घडवून आणणें शक्य आहे. त्याचप्रमाणें गर्दीमुळें एखादी शाखा बरोबर चालत नाहीं असें जर कळून आलें तर त्या बँकेनें आपणहून ती शाखा बंद केली पाहिजे किंवा तसें करण्याचा रिझर्व्ह बँकेनें त्या बँकेला सल्ला दिला पाहिजे.

३. शिलकी निधि वसूल झालेल्या भांडवलाच्या रकमेइतका किंवा जास्त असेल तर तो शिलकी निधि बँकेच्या दृष्टीनें पुरेसा आहे असें म्हणण्यास

हरकत नाहीं. ह्या दृष्टीनें पाहतां महाराष्ट्रांतील फक्त ५–६ बँकांचा शिल्लक निधि पुरेसा आहे असें म्हणावें लागतें. बाकीच्या बँकांनीं शिल्लक निधीकडे जास्त लक्ष पुरविलें पाहिजे.

४. महाराष्ट्रांतील एकूण २६ बँकांपैकीं १३ बँकांनीं १९५९ सालाकरितां भागदारांना लाभांश वांटलेला आहे. करमाफ लाभांश कोणत्याहि बँकेनें दिलेला नाहीं. सर्वांत जास्त लाभांश सांगली बँकेनें दिलेला आहे—१७ टक्के. लाभांशाचा सर्वांत कमी दर २ टक्के आहे व तो कोल्हापूरच्या रत्नाकर बँकेनें दिलेला आहे.

५. मुंबईतील बँकांचे व्यवहार सर्व भारतांत पसरलेले आहेत; तर महाराष्ट्राच्या इतर प्रदेशांतील बँकांचें क्षेत्र महाराष्ट्र हेंच आहे. या बँकांनीं महाराष्ट्रांतील लहान लहान शहरांत आपल्या शाखा उघडल्या आहेत.

६. महाराष्ट्रांतील बँकांमध्यें वसूल झालेलें भांडवल व शिलकी निधि यांचें ठेवींशीं प्रमाण इतर राज्यांतील बँकांमधील प्रमाणापेक्षां जास्त आहे. म्हणजेच इतर राज्यांतील बँकांशीं तुलना करतां महाराष्ट्रीय बँका व्यवहारांत स्वतःच्या पैशाचा जास्त प्रमाणांत उपयोग करतात. लोकांचा विश्वास संपादन करण्याच्या दृष्टीनें ही चांगली गोष्ट आहे.

७. महाराष्ट्रांतील बँकांच्या ठेवींमध्यें फिक्स्ड् डिपॉझिट व बचत खात्यांमधील ठेवींचें प्रमाण जास्त आहे. त्यामुळें ह्या बँकांना ठेवींवरील व्याज म्हणून इतर बँकांपेक्षां जास्त रक्कम द्यावी लागते. साहजिकच तितक्या प्रमाणांत नफा कमी होतो.

८. महाराष्ट्रांतील बँकांना बरीच रक्कम रोख पैशांत ठेवावी लागते. याचीं कारणें तीन–बऱ्याच बँका लहान आहेत. बहुतेक बँकांच्या लहान गांवांत अनेक शाखा आहेत व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पैसे पाठविण्याच्या सोयी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नाहींत. ह्यामुळें बँकांचें नुकसान होतें; कारण एवढी मोठी रक्कम रोख ठेवावयास लागली नसती तर ही रक्कम दुसऱ्यांस कर्जाऊ देऊन तीपासून व्याज मिळवितां आलें असतें.

९. व्यापारी हुंड्यांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर नसल्यामुळें फायदेशीर रीतीनें पैसे गुंतवण्याचा हा मार्ग महाराष्ट्रांतील बँकांना उपलब्ध नाहीं.

१०. महाराष्ट्रांत बँकांवर दलाली कामें मोठ्या प्रमाणावर सोंपविण्यांत येत नाहींत. त्यामुळें येथील बँकांना दलालीपासून फारसें उत्पन्न होत नाहीं.

११. महाराष्ट्रांतील बँकांपुढें सध्यां उभा असलेला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे लहान बँकांच्या एकीकरणाचा होय. महाराष्ट्रांतील बँकांनीं कांहीं ठिकाणीं पुरेसा वाव नसतांना शाखा उघडल्या आहेत; त्यामुळें कोणत्याच शाखेला पुरेसें क्षेत्र मिळत नाहीं. आपापसांतील स्पर्धेमुळें ह्या बँका उत्तरोत्तर दुर्बल होत चालल्या आहेत. तेव्हां ही स्पर्धा कमी करण्याच्या व आपलें बल एकत्रित करण्याच्या दृष्टीनें त्यांतील कांहींनीं तरी एका मोठ्या बँकेंत विलीन होणें इष्ट आहे. बँकिंगमधील अनेक तज्ज्ञांनीं ह्या विषयाचा ऊहापोह केलेला आहे; परंतु त्याचा हवा तसा परिणाम झालेला नाहीं.

१२. महाराष्ट्रांतील बँका जनतेची सेवा करण्याचें काम समाधानकारक रीतीनें करीत आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या बँकांनीं आर्थिक मदत केल्यामुळेंच महाराष्ट्राच्या व्यापाराची प्रगति झाली आहे व महाराष्ट्रांत बरेच लहान लहान उद्योगधंदे निघाले आहेत. बाहेरच्या मोठ्या बँकांपेक्षां स्थानिक बँकाच तेथील लोकांशीं समरस होऊं शकतात व त्या लोकांना शक्य तेवढ्या सोयी उपलब्ध करून देतात. आतांपर्यंत महाराष्ट्रांतील बँकांनीं व्यापारी व औद्योगिक संस्थांशीं चांगलें सहकार्य केलें आहे व हेंच सहकार्य पुढें चालू राहील अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

वरील प्रकरणांतील आंकडेवारी ही "स्टॅटिस्टिकल टेबल्स् रिलेटिंग टु बँक्स् इन् इंडिया फॉर दि इअर १९५९" ह्या रिझर्व्ह बँकेच्या वार्षिकांतून घेतली आहे. ज्यांचें भांडवल व शिलकी निधि मिळून रक्कम रु. ५०,००० च्या आंत आहे अशा बँकांचा या यादींत समावेश नाहीं.

यांत शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची माहिती ३१ मार्च १९५९ अखेरची असून, इतर बँकांच्या कचेऱ्यांची त्यांचे जे ताजे अहवाल रिझर्व्ह बँकेला उपलब्ध होते त्या अहवालांच्या तारखेची समाविष्ट आहे. रु. ५०,००० हून भांडवल व शिलकी निधि मिळून रक्कम कमी असलेल्या बँका ही माहिती संकलित करतांना वगळल्या आहेत. तसेंच ज्या नॉन्शेड्यूल्ड बँकांनीं १९५८ व १९५९ ची आपली आंकडेवार माहिती दिलेली नाहीं त्याहि विचारांत घेतल्या नाहींत.

वरील प्रकरण लिहितांना श्री. आ. रा. भट यांच्या 'महाराष्ट्र–परिचय' (१९५२) या ग्रंथांतील लेखाचा उपयोग झालेला आहे.

ह्याच विषयावरील माझा लेख संपदा–डिसेंबर १९६० मध्यें प्रसिद्ध झाला आहे.

११

★

औद्योगिक कामगार

उद्योगधंद्यांच्या विकासाला कामगार हातभार लावतात ही गोष्ट सांगण्याची देखील गरज नाहीं. उद्योगधंद्यांना इतर सर्व गोष्टी जरी कितीहि अनुकूल असल्या तरी शेवटीं कामगारांनीं मन लावून काम करण्यावरच उद्योगधंद्यांचें भवितव्य अवलंबून आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या प्रयत्नांत कामगारांना अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे.

औद्योगिक कामगार हा वर्ग आधुनिक यंत्रशक्तीच्या जोरावर चालणाऱ्या कारखान्यांबरोबर अस्तित्त्वांत आला. त्यापूर्वी घरगुती उद्योगधंद्यांच्या पद्धतीनें उत्पादन होत असे. घरगुती उद्योगधंद्यांमध्यें बहुतेककरून मालक व नोकर असें नातें नसे. कुटुंबांतील सर्व माणसांच्या साहाय्यानें हे उद्योगधंदे चालविण्यांत येते. नोकर असलेच तर ते संख्येनें अतिशय थोडे असत. त्यामुळें औद्योगिक कामगार असा वर्ग त्या वेळीं अस्तित्वांत नव्हता. मग यंत्रशक्तीवर चालणारे आधुनिक कारखाने अस्तित्वांत आले. प्रत्येक कारखान्यांत हजारोंनीं कामगार लागूं लागले. त्या वेळीं प्रथम कारखानदार व कामगार हा भेद अस्तित्वांत आला. सुरुवातीला कामगारांची स्थिति अत्यंत वाईट होती. त्यांना दिवसाकांठीं १७–१८ तास काम करावें लागे. कामाची जागा देखील अत्यंत कोंदट व आरोग्याला विघातक असे, वेतन अगदींच कमी असल्यामुळें त्यांची स्थितीहि फारच हलाखीची होती. कांहीं काळानें कामगारांत जागृति निर्माण होऊं लागली व त्यांच्या संघटना निर्माण झाल्या. ह्या संघटना कामगारांच्या हक्काकरितां मालकांशीं झगडूं लागल्या व त्यामुळें औद्योगिक कलह निर्माण झाले. ह्या संघटनांच्या प्रयत्नांमुळें कामगारांच्या परिस्थितीमध्यें मात्र दिवसेंदिवस

सुधारणा होत गेली. मोठ्या प्रमाणावर औद्योगिक कलह होऊं लागल्यामुळें उद्योगधंद्यांवर व पर्यायानें देशाच्या आर्थिक परिस्थितीवर त्यांचा परिणाम होऊं लागला व सरकारला मध्यें पडणें जरूर वाटूं लागलें. सरकारनें कामगारांच्या हितासाठीं कांहीं कायदे केले व ते कायदे गिरणी-मालकांवर बंधनकारक ठरविले.

महाराष्ट्रांतील आधुनिक उद्योगधंद्यांबद्दल आपण मागें विचार केलाच आहे. ह्या सर्व उद्योगधंद्यांमध्यें मोठ्या संख्येनें कामगार नोकरीला आहेत. ह्याबाबतची आंकडेवारी खालीलप्रमाणें—

विभाग	नोंदलेले कारखाने	कामगार
मुंबई विभाग	५,४५९	५,७८,३०७
पुणें विभाग	१,७९२	१,३१,१६७
नागपूर विभाग	१,०७६	९३,५१९
औरंगाबाद विभाग	२७७	१८,५९४
एकूण	८,६०४	८,२१,९८७

ह्या कामगारांबद्दल प्रामुख्यानें लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे हे सर्व खेडेगांवांतून आलेले असतात. शेतीवर पोट भरेनासें झालें म्हणजे खेडेगांवांतील लोकांना कामधंद्यासाठीं शहरांत यावें लागतें. परंतु जरी हे लोक शहरांत आले तरी त्यांची खेडेगांवची ओढ कांहीं कमी होत नाहीं. हे लोक पूर्णपणें शहरी वातावरणांत कधींहि रुळत नाहींत. थोडीशी सुट्टी असली व गांवीं जाऊन येण्याइतका पैसा गांठीशीं असला, कीं हें लोक तावडतोब आपल्या गांवाकडे पळ काढतात. खऱ्या अर्थानें औद्योगिक कामगारांचा वर्ग त्यामुळें महाराष्ट्रांत अजून निर्माण झाला नाहीं असें म्हणावें लागतें. कामगार-संघटना मजबूत न होण्याचीं जीं कांहीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं हें एक आहे. ह्या खेडेगांवाच्या ओढीचा आणखी परिणाम म्हणजे कारखान्यांत कायमचे कामगार असे फार कमी असतात. पैसे जमले म्हणजे कामगार नोकरी सोडून सरळ गांवीं जातात व पैसे संपले म्हणजे परत नोकरीच्या शोधार्थ शहरांत येतात. हें कारखान्याच्या दृष्टीनें अर्थातच वाईट आहे. कारण नवीन कामगार घेतले म्हणजे त्यांना रुळायला थोडा तरी वेळ लागतोच व त्या वेळांत उत्पादन कमी होतें. अलीकडे सरकारनें अशी शिफारस केली आहे कीं, कारखानदारांनीं कामगारांना गांवीं जाऊन येण्यासाठीं अधूनमधून सुट्टी द्यावी, म्हणजे कामगार एकाच कारखान्यांत राहील व वरील तोटा दूर करता येईल.

इतर देशांशीं तुलना करतां भारतीय (यांत महाराष्ट्रांतील कामगार आलेच) कामगारांची कर्तृत्वशक्ति कमी आहे असें म्हटलें जातें. १९२७ च्या टॅरिफ कमिशननें खालीलप्रमाणें तुलनात्मक आंकडे दिलेले आहेत—भारतांत एक कामगार एकावेळेस १८० चात्यांकडे लक्ष पुरवूं शकतो. इतर देशांच्या बाबतींत हेच आंकडे जपान २४०, इंग्लंड ६०० व अमेरिका ११२० असे आहेत. भारतांत एक कामगार एका वेळेस फक्त दोन मागांकडे लक्ष पुरवूं शकतो, तर जपानमध्यें २½, इंग्लंडमध्यें ६ व अमेरिकेमध्यें ९ मागांकडे एक कामगार लक्ष पुरवूं शकतो. वरील आंकडेवारीवरून भारतीय कामगार इतर देशांतील कामगारांपेक्षां कमी कार्यक्षम आहे हें मान्य करावें लागतें. परंतु ह्या प्रश्नाचा जरा खोलवर विचार करणें जरूर आहे. भारतीय कामगार ज्या परिस्थितींत काम करतो ती परिस्थिति व इतर देशांतील परिस्थिति ह्यांत महदंतर आहे. भारतांतील कामगार अत्यंत हलाखीच्या परिस्थितींत आयुष्य काढतात. निकस अन्न व प्रापंचिक काळजा ह्यांचा त्याच्या कार्यक्षमतेवर साहजिकच परिणाम होतो. त्याचबरोबर त्याला कोणतेंहि शिक्षण घेणें शक्य नसतें. दमट, कोंदट, रोगट, गलिच्छ चाळींत थोडें भाडें देऊन राहिल्यानें श्रमिकांचें शरीर रोगाचें माहेरघर बनतें. असल्या स्थितींत कर्तृत्वाला खग्रास ग्रहण लागतें. त्याचबरोबर कारखान्यांतील कामाच्या जागादेखील कोंदट, दमट व आरोग्याला विघातक असतात. कामगारांना मिळणारा रोजगार अत्यंत अपुरा असतो. अशा परिस्थितींत कामगारांकडून चांगल्या कामाची अपेक्षा तरी कशी करतां येईल ? अशा परिस्थितींत देखील भारतीय कामगार कार्य करून दाखवितात, ही गोष्ट खरोखरच कौतुकास्पद आहे. भारतीय कामगारांची परिस्थिति जर सुधारली तर ते निश्चितपणें इतर देशांतील कामगारांच्या जोडीला येतील यांत कांहीं शंका नाहीं.

परंतु ही सुधारणा कशी घडवून आणावयाची ? ह्यासाठीं सर्व बाजूंनीं सतत परिश्रमांची आवश्यकता आहे. सरकार, कारखानदार व स्वतः कामगार ह्या सर्वांनीं मिळून ही सुधारणा घडवून आणावयाचा निश्चय केला पाहिजे. गेल्या कांहीं वर्षांत ह्या दृष्टीनें बरीच प्रगति झाली आहे, ही गोष्ट येथें नमूद केली पाहिजे. कारखानदारांत ह्या बाबतींत जागृति कांहीं प्रमाणांत तरी निर्माण झाली आहे. कामगारांच्या कल्याणाच्या जितक्या गोष्टी ते करतील तितक्या प्रमाणांत उत्पादनांत वाढ होते व त्याचा दर्जाहि वाढतो, ही गोष्ट आतां त्यांनीं ओळखली आहे. परंतु अशा कारखानदारांची संख्या सध्यां थोडी आहे. त्या संख्येंत बरीच वाढ झाली पाहिजे. कामगारांत एकी निर्माण झाली पाहिजे. त्यांच्या संघटना मजबूत पायावर उभ्या राहिल्या पाहिजेत. या संघटनांच्या द्वारें

कामगारांना आपल्या हक्कांचें संरक्षण करतां येतें, तसेंच स्वतःचें कल्याण साधतां येतें. सध्यां भारतांत निरनिराळ्या मजूर-संघटनांना सामावून घेणाऱ्या अखिल भारतीय स्वरूपाच्या चार मजूर–संघटना आहेत. त्या पुढीलप्रमाणें—(१) दि इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस किंवा इंटक. (२) दि ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस. (३) दि हिंद मझदूर सभा. (४) दि युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस. ह्या चारांमध्यें 'इंटक'ला सर्वांत जास्त पाठिंबा आहे व बहुसंख्य कारखान्यांत कामगारांचें जास्तींत जास्त प्रतिनिधित्व करणारी म्हणून ह्या संघटनेला मान्यता मिळाली आहे. भारतांतील कामगार-संघटनांचा आतांपर्यंतचा इतिहास पाहिला तर अजूनपर्यंत भारतांतील कामगार-संघटना बाल्यावस्थेंत आहे असें म्हणावेंसें वाटतें. कामगारांचे प्रतिनिधि निवडणें व राजकीय जाग्रति करणें यापलीकडे फारसें महत्त्वाचें काम या संघटनांनीं केलेलें नाहीं. संप व हरताळ यांच्या पलीकडील विधायक व कल्याणकारी कार्यक्रम अद्यापहि फारसे होत नाहींत. ह्या बाबतींत अजून बरेंच कार्य करावयाचें बाकी आहे.

१९४७ नंतर अधिकारावर आलेलें आपलें राष्ट्रीय सरकार मजुरांच्या हिताबद्दल जागरूक आहे व त्यांनीं मजुरांच्या कल्याणासंबंधीं अनेक कायदे संमत केलेले आहेत. ह्यासंबंधीं केंद्र-सरकार व महाराष्ट्र राज्यसरकार ह्या दोघांनींहि कायदे केलेले आहेत. सध्यां महाराष्ट्र राज्यामध्यें खालील कामगार–विषयक कायदे अंमलांत आहेत. औद्योगिक कलह निवारण कायदा, मुंबई औद्योगिक संबंधींचा कायदा, औद्योगिक कामधंदासंबंधींचा (स्थायी आदेश) कायदा, श्रमिक पत्रकार कायदा, किमान वेतन कायदा, दुकानें व संस्था-संबंधींचा कायदा, १९४८ चा फॅक्टरीसंबंधींचा कायदा, वेतन देण्याबाबतचा कायदा, मुंबई प्रसूतिविषयक कायदा, कपाशीमधील सरकी काढून त्याचे गठ्ठे बांधणाऱ्या कारखान्यासंबंधींचा कायदा, लहान मुलांच्या कामधंद्यांसंबंधींचा कायदा, इंडियन बॉयलर्स ॲक्ट, मुंबईला धुरापासून होणाऱ्या त्रासासंबंधींचा कायदा वगैरे. १९४८ च्या फॅक्टरी कायद्यान्वयें मजुरांचे रोजचे कामाचे तास ९ व आठवड्यांतील कामाचे तास ४८ ठरविण्यांत आले. लहान मुलांचे कामाचे तास रोजचे ४॥ ठरविण्यांत आले. मधल्या सुटीबाबत नियम करण्यांत आले. म्हणजे कामगार कारखान्यांत एकूण १० ते १०॥ तास राहूं शकतो. त्यांपैकीं ९ तास काम व बाकीचा वेळ विश्रांतीसाठीं उपयोगांत आणावयाचा असतो. त्याबरोबर रजेबाबत देखील नियम ठरवून देण्यांत आले. कारखान्यांमध्यें मजुरांच्या सुरक्षिततेसाठीं कांहीं गोष्टी मालकांनीं करणें आवश्यक आहे, असेंहि ह्या कायद्यांत ठरविण्यांत आलें. कारखान्यांतील मजुरांच्या कामाची जागा कशी

असावी ह्याबाबतचे नियमदेखील ह्या कायद्यांत करण्यांत आले. ह्याशिवाय किमान वेतन कायद्यान्वयें प्रत्येक धंद्यांतील किमान वेतन ठरवून देण्यांत आलें. मुंबई प्रसूतिविषयक कायद्यामध्यें स्त्री-कामगारांना प्रसूतीच्या वेळा द्यावयाची रजा व इतर सोयी याबाबत नियम करण्यांत आले. अशा तऱ्हेनें सरकारनें अनेक कायदे संमत करून कामगारांचें कारखान्यांतील काम सर्व दृष्टींनीं सुसह्य केलें आहे.

ह्याशिवाय कामगार व मालक ह्यांचे संबंध चांगले रहावेत, कांहीं मतभेद निर्माण झाले तर ते ताबडतोब मिटवितां यावेत व शक्यतों औद्योगिक कलह टाळावेत ह्यासाठींहि सरकारने तरतुदी करून ठेवल्या आहेत. ह्यासंबंधीचे नियम औद्योगिक कलह (निवारण) कायदा व मुंबई औद्योगिक संबंधींचा कायदा ह्या दोन कायद्यांत केले आहेत. १९४७ च्या औद्योगिक कलह निवारण कायद्यानें वादांचा निवाडा कसा करावा याबाबत योजना आंखून दिली. या कायद्यामुळें तडजोड घडवून आणणारे अधिकारी, चौकशीचीं न्यायालयें, त्याचप्रमाणें औद्योगिक न्यायमंडळें यांची स्थापना झाली आणि कोणताहि वाद अगर तंटा वरील मंडळातर्फे सामोपचारानें व सलोख्यानें सोडवून घ्यावयाचा प्रयत्न व्हावयास चालना मिळाली. या कायद्यानें संप व टाळेबंदी यांवर कांहीं प्रमाणांत बंधन घातलें गेलें. बेकायदा संप व टाळेबंदी यांची व्याख्या ठरवून दिल्यामुळें कायदेशीररीत्या संपावर जाण्यास अथवा कायदेशीर टाळेबंदीस परवानगी मिळाली. या कायद्यांत वेळोवेळीं सुधारणा होत गेल्या. मुंबई औद्योगिक संबंधींचा कायदा १९४६ सालीं संमत केला गेला व १९४८ व १९५३ सालीं त्यांत दुरुस्ती करण्यांत आली. ह्या कायद्यांत औद्योगिक कलह लवादाकडे नेण्याची मालक व कामगार ह्यांच्यावर सक्ती करण्यांत आली आणि लवादाकडे तंटयाबाबतचें कामकाज चालू असतांना संप करणें बेकायदेशीर ठरविण्यांत आलें. लहानसहान तंटयांकरितां लेबर कोर्टें नेमण्याची ह्या कायद्यांत तरतूद करण्यांत आली. सरकार फक्त कायदे करूनच थांबलेलें नाहीं. ह्या प्रश्नाकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टिकोन मानवतावादी आहे. म्हणून महाराष्ट्र-राज्य सरकारनें एक नवी योजना सुरू केली आहे. ही योजना म्हणजे नोकर-व्यवस्था सल्लागार योजना होय. ज्या लहान लहान उद्योगधंद्यांना कामगारांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यासाठीं एक खास अधिकारी नेमणें परवडत नाहीं त्या उद्योगधंद्यांची गरज ह्या योजनेनें भागते. सरकारी लेबर ऑफिसरांनीं आपल्या नजरेस आलेल्या औद्योगिक तंटयांत शक्य तों तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करावा अशी त्यांना सूचना देण्यांत आली आहे. मालक किंवा नोकर

यांना कामगारविषयक प्रश्नांबाबत कांहीं मार्गदर्शन किंवा सल्ला हवा असल्यास तोहि त्यांना ह्या अधिकाऱ्यांकडून मिळूं शकतो.

राज्यसरकारनें कामगारांच्या तांत्रिक शिक्षणाची विनामूल्य सोय केली आहे. राज्यसरकारच्या कुर्ला व सोलापूर येथील कारखान्यांत औद्योगिक कामगारांना व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना सुतारकाम, सांचेकाम, लोहारकाम, टर्निंग, फिटिंग, रंगकाम, शिवणकाम वगैरे व्यवसायांचें शिक्षण विनाशूल्य देण्यांत येतें. ह्याशिवाय 'बॉम्बे लेबर इन्स्टिटयूट' मध्यें 'डिप्लोमा इन् लेबर वेल्फेअर' हा अभ्यासक्रम शिकविण्यांत येतो. हा डिप्लोमा घेणारे विद्यार्थी फॅक्टरी अॅक्टनुसार कल्याण-अधिकारी म्हणून नियुक्त होण्यास पात्र ठरतात.

कारखान्याबाहेरील कामगार-कल्याणविषयक कार्य पश्चिम महाराष्ट्रांत मुंबई कामगार कल्याण मंडळ या कायद्यानें स्थापन झालेल्या मंडळाकडून व विदर्भ आणि मराठवाडा ह्या विभागांत कामगार-कल्याण खात्यातर्फे चालविलें जातें. ह्या मंडळानें व खात्यानें महत्त्वाच्या औद्योगिक केंद्रांत कल्याण-केंद्रें उघडलीं आहेत. ह्या कल्याण-केंद्रांत बैठ्या व मैदानी खेळांची सोय असते. स्त्री-कामगारांकरितां शिवण व भरतकामाचे खास वर्ग चालविण्यांत येतात. मुलांकरितां केंद्रांतून खेळाची खास सामुग्री ठेवण्यांत येते. ह्याशिवाय केंद्रांना जोडूनच कामगारांसाठीं वाचनालयेंहि चालविण्यांत येतात.

१९२३ सालीं कामगार नुकसान भरपाईचा कायदा संमत झाला. ह्या कायद्यांत वेळोवेळीं दुरुस्त्या होत गेल्या. हा कायदा कांहीं ठराविक उद्योग-धंद्यांनाच लागू होतो. काम करीत असतांना जर एखादा मजूर मरण पावला किंवा त्याला कांहीं दुखापत झाली तर त्याला किंवा त्याच्या वारसांस योग्य ती नुकसान-भरपाई मिळण्याची तरतूद या कायद्यांत केलेली आहे. ह्या कायद्याची जागा हळूहळू राज्य कामगार विमा कायदा (Employees' State Insurance Act) घेत आहे. हा कायदा प्रथम १९४८ सालीं संमत झाला व त्याच्यांत १९५१ मध्यें दुरुस्ती करण्यांत आली. ह्या कायद्यामध्यें कामगारांना आजारपण, पंगुत्व, (स्त्रियांच्या बाबतींत) मातृत्व वगैरेंच्याबाबत सवलती व मदत देण्याची तरतूद करण्यांत आली आहे. हा कायदा अर्थातच केंद्र-सरकारनें संमत केला असून तो सर्व राज्यांना लागूं आहे. महाराष्ट्र राज्यांत स्त्रियांच्या बाबतींत मुंबईचा प्रसूतिविषयक कायदा लागू आहे.

ह्याशिवाय कामगारांकरितां मोफत औषधोपचारांची सोय करण्यांत आली आहे. कामगारांकरितां घरें बांधण्याची योजना राज्य-सरकारनें हातीं

घेतली आहे. कामगारांची स्थिति सुधारण्याचा सरकार आटोकाट प्रयत्न करीत आहे. कामगारांनीं ही गोष्ट जाणून आपलें कर्तव्य नीट पार पाडलें पाहिजे व महाराष्ट्राच्या विकासांतील आपला वांटा उचलला पाहिजे. महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनीं औद्योगिक विकासासाठीं कामगारांना आवाहन केलें आहे. कामगार त्यांच्या आवाहनाला साद देतील अशी आपण आशा करूं या.

● ● ●

१२

★

औद्योगिक विकासाची भावी दिशा

भारतांतील इतर राज्यांशीं तुलना केल्यास महाराष्ट्र हा औद्योगिक दृष्ट्या सुधारलेला आहे असें आढळून येतें. औद्योगिक प्रगतींत पश्चिम बंगालचा पहिला व महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो. दोन्हींच्या औद्योगिक प्रगतींत फरक फारच थोडा आहे. ह्या गोष्टीबरोबर दुसरी गोष्ट आपल्याला लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं, महाराष्ट्राला औद्योगिक प्रगतींत हें जें स्थान मिळालें आहे ते मुंबई शहर व उपनगरें येथें जी उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे, त्यामुळें मिळालेलें आहे. महाराष्ट्र राज्याच्या चार विभागांकडे तुलनात्मक दृष्टीनें पाहिल्यास ही गोष्ट आपल्या ताबडतोब लक्षांत येते. हे चार विभाग म्हणजे मुंबई, पुणें, नागपूर व औरंगाबाद हे होत.

कोष्टक

महाराष्ट्र राज्याच्या चार विभागांची औद्योगिक प्रगति. आंकडे महाराष्ट्र राज्याच्या एकूण संख्येशीं असलेलें प्रमाण दाखवितात —

	लोकसंख्या (१९५१ ची खानेसुमारी)	कारखाने (१९५७ सालांतील)	कामगारांची सरासरी संख्या (१९५७ सालांतील)	विजेचा खप (१९५८)
१. मुंबई विभाग				
बृहन्मुंबई—	९·३	४४·१	६५·४	६८·०
बृहन्मुंबई सोडून इतर विभाग—	२०·०	१०·७	७·४	१९·४
	२९·३	५४·८	७२-८	८७·४

२. पुणें विभाग	२६·१	२३·२	१२·२	५·३
३. नागपूर विभाग	२३·८	१६·१	१०·९	६·९
४. औरंगाबाद वि.	२०·८	५·९	४·१	०·४
एकूण महाराष्ट्र	१००·०	१००·०	१००·०	१००·०

(आंकडेवारी Handbook of basic statistics of Maharashtra State ह्या सरकारी प्रकाशनावरून घेतली आहे.)

वरील कोष्टकावरून असें दिसून येतें कीं, मुंबई विभागाची लोकसंख्या महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या फक्त २९·३ % असली तरी ह्या विभागांत कारखाने मात्र महाराष्ट्रांतील एकूण कारखान्यांच्या जवळजवळ ५५ % म्हणजेच निम्याहून अधिक आहेत. हे कारखाने मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारे असल्यामुळें ह्या कारखान्यांतील कामगारांची संख्या राज्यांतील एकूण कामगारांच्या जवळजवळ ७३ % आहे व विजेच्या बाबतींत तर ह्या विभागानें उच्चांकच गांठला आहे. राज्यांतील एकूण विजेच्या खपाच्या ८७ % एवढी वीज ह्या विभागांत उपयोगांत आणली जाते. औद्योगिक प्रगतींत सर्वांत मागासलेला विभाग औरंगाबाद विभाग हा होय. पुणें व नागपूर विभाग ह्या दोन्हींच्या मध्यें येतात. मुंबई विभागांत जर आपण बृहन्मुंबई व इतर प्रदेश असे पोटविभाग पाडले तर बृहन्मुंबईमध्यें उद्योगधंद्यांचें केवढ्या मोठ्या प्रमाणावर केंद्रीकरण झालें आहे हें आपल्या लक्षांत येईल. मुंबई विभागांतील बृहन्मुंबई सोडून इतर प्रदेशाची औद्योगिक प्रगति पुणें व नागपूर विभागापेक्षां फारशी जास्त नाहीं. वरील आंकडेवारीवरून व विवेचनावरून तात्पर्य एवढेंच निघते कीं, महाराष्ट्र राज्य इतर राज्यांशीं तुलना करतां जरी पुढारलेलें राज्य असलें तरी महाराष्ट्रांतील बराच भाग औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या स्थितींत आहे. बृहन्मुंबई सोडली तर महाराष्ट्रांत औद्योगिक दृष्ट्या पुणें, नागपूर व सोलापूर हीं तीन शहरें व त्यानजिकचा थोडा प्रदेश हाच काय तो डोळ्यांत भरण्यासारखा आहे. ह्या मागासलेल्या भागांतदेखील औरंगाबाद विभाग व दक्षिण कोंकण प्रदेश हा फारच मागासलेला आहे. तेव्हां महाराष्ट्र राज्यांत औद्योगिक दृष्ट्या प्रगत, मध्यम-प्रगत, मागासलेले व फार मागासलेले असे सर्व तऱ्हेचे प्रदेश आहेत व ह्या सर्व प्रदेशांची औद्योगिक प्रगति कशी घडवून आणावयाची व त्याचबरोबर ह्या सर्व प्रदेशांचा औद्योगिक प्रगतींतील समतोल कसा राखावयाचा हेच प्रश्न आज महाराष्ट्रापुढें उभे आहेत.

महाराष्ट्र-राज्याची औद्योगिक प्रगति घडवून आणावयाची म्हणजे महाराष्ट्रांत नवीन उद्योगधंद्यांची स्थापना केली पाहिजे व असलेल्या उद्योगधंद्यांत वाढ केली पाहिजे. उद्योगधंद्यामध्यें मोठे कारखाने, लहान कारखाने, कुटीरोद्योग या सर्वांचा समावेश होतो. ह्यांपैकीं कुटीरोद्योगांमध्यें मानवी श्रमावर जास्त जोर दिला जातो. यंत्रांचा उपयोग फारसा केला जात नाहीं. त्यामुळें उत्पादनाचें प्रमाण कमी रहातें. साहजिकच कामगारांची कमाई कमी होते व ह्या उद्योगधंद्यांचा राहणीमान वाढण्याच्या दृष्टीनें फारसा उपयोग होत नाहीं. तेव्हां औद्योगिक प्रगति करावयाची असेल तर लहान व मोठे कारखाने ह्यांवरच जास्त भर दिला पाहिजे. हे कारखाने काढावयास बरेंच भांडवल लागतें. मोठ्या कारखान्यास चाळीस लाखांच्या आसपास भांडवल लागतें. तेव्हां हे कारखाने फक्त सरकार किंवा मोठे भांडवलदार यांच्याकडूनच निघण्याची शक्यता आहे. सरकारी क्षेत्रांतील कारखाने पंचवार्षिक योजनेप्रमाणें काढले जातात. येथें असें म्हणावेंसें वाटतें कीं दुसऱ्या राज्यांपेक्षां फारच कमी सरकारी कारखाने महाराष्ट्रांत आहेत. पिंपरी येथील 'हिंदुस्थान अँटिबायॉटिक्स लिमिटेड' हा पेनिसिलीन व तत्सम औषधांचा कारखाना व पनवेलजवळील नियोजित इंटरमीजिएट केमिकल प्लँट ह्याशिवाय नांव घेण्याजोगा असा एकहि सरकारी क्षेत्रांतील कारखाना महाराष्ट्रांत नाहीं. मोठे कारखानदार कारखाने काढतांना जेथें थोडेंबहुत औद्योगीकरण झालेलें आहे तेथेच कारखाने काढणार. त्यामुळें उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण वाढण्याची शक्यता जास्त. मोठ्या कारखानदारांच्या ह्या प्रवृत्तीला आळा घालण्यास व त्यांना मागासलेल्या प्रदेशांत कारखाने काढण्यास उत्तेजन दिलें पाहिजे.

परंतु मागासलेल्या प्रदेशांचा औद्योगिक उत्कर्ष व्हावयाचा असेल तर त्या प्रदेशांतील लोकांनीं बाहेरील भांडवलदार तेथें येऊन कारखाने काढण्याची वाट न पाहतां स्वतःच त्या प्रदेशांत उद्योगधंदे सुरू करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. ह्या लोकांना मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारे कारखाने काढणें जरी शक्य नसलें तरी लहान उद्योगधंदे सुरू करणें फारसें कठीण नाहीं. सहकारी पद्धतीनें कारखाने काढण्याची पद्धत जी नुकतीच महाराष्ट्र राज्यामध्यें सुरू झाली आहे त्यामुळें तर ही गोष्ट अधिकच सोपी झाली आहे. सध्यां राज्यामध्यें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारे एकूण १३ सहकारी साखरकारखाने आहेत व आणखी दोनांची नोंदणी झाली आहे. येथें भोर येथील कामगारांच्या सहकारी कापड कारखान्याचा उल्लेख केलाच पाहिजे. ह्या प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न आहे. ह्या कामगारांनीं मिळून एक लहान कापड गिरणी चालवावयास घेतली आहे. सर्व कामगारांनीं मिळून ३०,००० रुपयांचें

भाग-भांडवल जमवलें आहे. राज्य-सरकारनें तेवढेंच भांडवल घातलें आहे. ह्याशिवाय सरकारनें ५ लाख रुपयांचें मध्यम मुदतीचें कर्ज देखील ह्या कारखान्याला दिलें आहे. हा कारखाना व्यवस्थित चालला असून त्यांत थोडा फायदासुद्धां झाला आहे. ह्या कामगारांचें कौतुक करावें तेवढें थोडें आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतींत लहान व मोठ्या अशा दोन्ही प्रकारच्या उद्योगधंद्यांना स्थान आहे ही गोष्ट वरील विवेचनावरून स्पष्ट होतें.

महाराष्ट्राच्या भावी औद्योगिक विकासाच्या बाबतींत लक्षांत ठेवण्याची एक मुख्य गोष्ट म्हणजे औद्योगिक प्रगतींत प्रादेशिक समतोल राखला पाहिजे. म्हणजेच सध्यां राज्यांतील चार विभागांतील औद्योगिक प्रगतींत जी फार मोठी तफावत आहे ती कमी करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न केला पाहिजे. साधारणपणें नवीन कारखाने शक्य तों अप्रगत भागांत निघतील अशी खटपट करावयास पाहिजे. अप्रगत भागांत नवीन कारखाने सहजासहजीं निघणार नाहींत. कारण नवीन कारखान्यांना रेल्वे, रस्ते, पाणीपुरवठ्याची सोय, विजेचा पुरवठा, टेलिफोन, बँका, कार्यक्षम कामगार वगैरे ज्या अनेक सोयी लागतात त्या तेथें उपलब्ध नसतात. म्हणून अप्रगत प्रदेशांकडे कारखानदार आकर्षित व्हावयाचें असतील तर त्यांच्यासाठीं सरकारनें खास धोरण ठरविलें पाहिजे. ह्या बाबतींत औंध, इचलकरंजी, सांगली, कोल्हापूर वगैरे संस्थानांच्या माजी अधिपतींनीं चांगला धडा घालून दिलेला आहे. तोच राज्य-सरकारनें गिरवण्यास हरकत नाहीं. ह्या बाबतींत राज्य-सरकारनें खालील गोष्टी केल्या तरच मागासलेल्या प्रदेशांत मोठे कारखाने निघण्याची शक्यता आहे--- (१) ग्रामपंचायती किंवा स्थानिक स्वराज्यसंस्था उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालावर व यंत्रसामुग्रीवर ऑक्टॉय कर आकारतात त्यामुळें कारखानदार त्या भागांत कारखाना काढावयास तयार होत नाहींत. ह्या मालावर कर आकारण्याचें ह्या संस्थांनीं बंद करावें किंवा त्यांना बंदी करणारा कायदा राज्य सरकारनें करावा. (२) नवीन कारखान्यांना जागा विनामूल्य किंवा नाममात्र किंमतींत द्यावी. (३) सरकारनें नवीन कारखान्यांना भांडवली खर्चाकरितां दीर्घ मुदतीचीं कर्जें सवलतीच्या दरानें द्यावींत. ह्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांनींसुद्धां आपल्या हद्दींत कारखाने निघणें जेणेंकरून सुकर होईल अशा सर्व गोष्टी कराव्यात--जमिनी, पाणीपुरवठा व वीजपुरवठा ह्या तीन गोष्टींची हमी स्थानिक स्वराज्य संस्थांनीं घेतली तर त्यांच्या हद्दींत नवीन कारखानें निघणें सुलभ जाईल.

वर आपण असें सुचविलें आहे कीं, राज्य-सरकारनें रेल्वे, रस्ते, पाणी-पुरवठ्याची सोय, विजेच्या पुरवठ्याची सोय, टेलिफोन, बँका, कार्यक्षम

कामगार वगैरे नवीन कारखान्यांना लागणाऱ्या सोयी अप्रगत भागांत उपलब्ध कराव्यात म्हणजे त्या भागांत नवीन कारखाने निघतील. परंतु एक गोष्ट येथें लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, ह्या सर्व सोयी सर्व ठिकाणीं एकाच वेळीं उपलब्ध करून देणें शक्य नाहीं. ह्यासाठीं कांहीं विशिष्ट जागा निवडणें जरूर आहे. ह्यांनाच औद्योगिक वसाहती असें म्हणतात. उद्योगधंद्यांना जरूर त्या सर्व गोष्टी तेथें पुरवितां येतील अशा जागा निवडणें व तेथें कारखान्यांच्यासाटीं सर्व जरुरीच्या गोष्टींच्या सुखसोयी निर्माण करणें हाच औद्योगिक वसाहतींचा खरा अर्थ आहे. अशा ठिकाणीं कारखाना उभारणें फार सोपें व कमी खर्चाचें होऊं शकतें. निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या गरजा वेगवेगळ्या असतात. रसायनांच्या कांहीं कारखान्यांना पाणी अधिक लागतें, तर कांहीं कारखान्यांना सांडपाणी वाहून जाण्याची सोय हवी असते. कांहीं कारखाने विद्युत्‌शक्तिवरच सर्वस्वीं अवलंबून असतात. कांहींना परदेशांतून मोठ्या प्रमाणावर कच्चा माल आयात करावा लागतो. तर स्थानिक कच्च्या मालानेंहि कांहींचें काम भागूं शकतें. ह्या सर्व गरजांचा विचार करून कोठें कोठें औद्योगिक वसाहती काढावयाच्या व कोणत्या औद्योगिक वसाहतींत कोणत्या उद्योगधंद्यांना स्थान द्यावयाचें हें ठरवावें लागतें. अशी योजना आंखली तरच उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा जास्तींत जास्त उपयोग करतां येतो. या दृष्टीनें महाराष्ट्र राज्याच्या निरनिराळ्या विभागांत कोणतीं साधनें उपलब्ध आहेत, कोणत्या सोयी करणें शक्य आहे, कोणकोणत्या औद्योगिक वसाहती काढाव्या व त्यांत किंवा इतरत्र नवीन उद्योगधंदे कोणते काढणें शक्य आहे, अशा तऱ्हेची पहाणी करून राज्याच्या औद्योगिक विकासाची भावी दिशा दाखविणारा एक अद्ययावत् संदर्भग्रंथ महाराष्ट्र राज्य सरकारनें नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्याचें नांव 'मास्टर प्लॅन'. ह्या ग्रंथानें उद्योगपतींना बहुमोलाचें मार्गदर्शन होईल.

मास्टर प्लॅनमध्यें महाराष्ट्र राज्यांत सध्यां उपलब्ध असलेली औद्योगिक सामुग्री कोणती व किती आहे याविषयीं तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. त्याचबरोबर ह्या साधनसामुग्रींची भविष्यकालांत कशी व किती वाढ होणें शक्य आहे ह्याचाहि विचार करण्यांत आला आहे. त्याचबरोबर भौगोलिक रचना, हवामान, पाऊस आणि लोकसंख्या, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, औद्योगिक विकासाची सध्यांची पातळी ह्यांचीहि माहिती दिली आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून महाराष्ट्रांत नवीन उद्योगधंदे कोणते व कोणत्या विभागांत काढतां येतील ह्यासंबंधीच्या सूचना देखील ह्या प्लॅनमध्यें आहेत. ह्याच्याहि पुढें जाऊन अमुक एका उद्योगधंद्यासाठीं नेमकें कोणतें ठिकाण सर्वांत सोयीचें होईल ह्याबाबतच्या शिफारशीहि केल्या आहेत. या उद्योगधंद्यांची रोजगार पुरविण्याची

क्षमता तर वरील प्लॅनमध्यें सुचविण्यांत आलीच आहे, पण त्याचबरोबर त्यांना लागणारें भांडवल, वीज, पाणी वगैरेंची गरजहि सांगितली आहे. तथापि, ह्या शिफारशी लवचिक स्वरूपाच्या असून त्या म्हणजे या बाबतींतील अखेरचा शब्द आहेत असें नाहीं.

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालांत महाराष्ट्र विभागांत एकूण ११ औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचें योजिलें होतें. ह्या वसाहती खालील-प्रमाणें—कुर्ला, बाप्टी रोड (मुंबई), अटाळें (कल्याण), कोल्हापूर, हडपसर (पुणें), मालेगांव (नाशिक), कराड, नागपूर व परळी वैजनाथ. ह्यापैकीं कांहीं वसाहती स्थानिक-स्वराज्य संस्था चालविणार आहेत, कांहींसाठीं औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत, तर कांहीं सरकार स्वतः चालविणार आहे. कल्याणजवळ अटाळें येथील वसाहतींत रेयॉन, भारी रसायनें ह्यांसारख्या मूलभूत व अवजड उद्योगधंद्यांसाठीं योग्य त्या सोयी करण्यांत आल्या आहेत. मास्टर प्लॅनमध्यें धुळें, नाशिक रोड, कर्जत, खोपोली व चिपळूण-पोफळी भाग येथें औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची शिफारस केली आहे. त्याचप्रमाणें पाताळगंगा व कुंडलिका खोऱ्यामध्यें व ठाणें जिल्ह्यांत भिवंडी येथें छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची शिफारस केली आहे. ह्याशिवाय भविष्यकालांत औद्योगिक वसाहती स्थापण्यासाठीं पुढील ठिकाणांची शिफारस करण्यांत आली आहे—कामटी, कन्हान, वडनेरा, चांदा. छोट्या उद्योगधंद्यांसाठीं शेगांव, खामगांव, गोंदिया आणि कळमेश्वर. पुणें विभागांत इचलकरंजी. दक्षिणसातारा जिल्ह्यांत बुधगांव. औरंगाबाद विभागांत जळगांव, लातूर, हिंगोली आणि जालना.

महाराष्ट्राची वरीलप्रकारें औद्योगिक प्रगति घडून येण्यासाठीं एका मूलभूत गोष्टीची गरज आहे आणि ती गोष्ट म्हणजे वीज. वीज हा औद्योगी-करणाचा पाया आहे. वीज तयार करण्याचे दोन मार्ग आहेत—एक पाण्यापासून वीज तयार करणें व दुसरा कोळशापासून वीज तयार करणें. महाराष्ट्रांतील चालू विजेचें उत्पादन ६ लक्ष किलोवॅटपेक्षां अधिक आहे. सध्याचीं वीज उत्पादनाचीं मुख्य केंद्रें खालील होत—चोला, तुर्भें, खोपोली, भिवपुरी, भिरा, खापरखेडा, बल्लारशा, भाटघर व राधानगरी. विजेचें उत्पादन वाढविण्याच्या अनेक योजना सुरू आहेत. तुर्भें पारस वगैरे केंद्रांची कुवत वाढवण्यांत येत आहे. पेंच-योजना व दिना-योजना यांचें बांधकाम चालू आहे. औरंगाबाद विभागांतील पूर्णा-योजनेच्या कामाची पहाणी चालू आहे. तरीपण कोयना-योजना पूर्ण झाल्याखेरीज विजेचा पुरवठा

पुरेसा होणार नाहीं. कोयना-योजना पूर्ण झाल्यावर त्या योजनेपासून एकूण ५ लक्ष किलोवॅट वीज निर्माण होऊं शकेल. ही योजना लवकरांत लवकर पूर्ण करण्यासाठीं आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. ही योजना एकूण ३ टप्प्यांत पूर्ण करण्यांत येणार आहे. पहिला टप्पा ऑक्टोबर १९६१ पर्यंत पुरा होणार असून त्यांत एकूण २,४०,००० किलोवॅट वीज निर्माण होणार आहे.

स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हिस इन्स्टिटयूटनें कोयना-क्षेत्रांत उद्योगधंद्यांना कितपत वाव आहे याबद्दल १९५९ मध्यें पाहणी केली. कोल्हापूर, उत्तर व दक्षिण सातारा, सोलापूर, कुलाबा आणि रत्नागिरी जिल्ह्याचा उत्तर भाग हे विभाग ह्या पाहणीसाठीं निवडण्यांत आले होते. या पाहणीचा निष्कर्ष खालील-प्रमाणें—कोल्हापूर, रत्नागिरी आणि उत्तर सातारा जिल्ह्यांत खनिज संपत्ति विपुल आहे. कोल्हापूर व कुलाबा जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर बॉक्साइट, सांपडण्याची शक्यता आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत मॅंगनीज, लोखंड, इल्मेनाईट आणि क्रोमाइट सांपडूं शकेल. सोलापूर, सातारा व सांगली जिल्ह्यांत प्रत्येकीं एक व कोल्हापूर जिल्ह्यांत चार साखर-कारखाने नव्यानें निघाले असून त्यांचें उत्पादन लवकर सुरू होईल. कुलाबा जिल्ह्यांत कॉस्टिक सोडा, क्लोरिन, सोडा ॲश आणि रासायनिक क्षार यांचे कारखाने काढण्यास चांगला वाव आहे. उरण येथें सोडा ॲश व कॉस्टिक सोडयाचा कारखाना काढण्यासाठीं यापूर्वीच परवाने देण्यांत आले आहेत. नव्या कारखान्यांच्या बाबतींत खालील निष्कर्ष आहेत. खुद्द कोयनानगरला फॉस्फोरिक ॲसिड व सुपर फॉस्फेटचा आणि कराडला अमोनियम् सल्फेटचा कारखाना सुरू होऊं शकेल. येथील परिस्थिति कृत्रिम खत-कारखान्यास देखील अनुकूल आहे. उदगेरीस ॲल्युमिना व शेजारीस ॲल्युमिनियमचा कारखाना काढतां येईल. चिपळूणला कॅल्शम कार्बाइडचा कारखाना काढणें सोयीचें होईल. खोपोली आणि खापर्डी येथें कागद-कारखाना व रेयॉन-कारखाना काढतां येणें सहज शक्य आहे.

वरील प्रकरणांत महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची भावी दिशा कोणत्या तत्त्वांवर ठरविण्यांत आलेली आहे व त्या दिशेनें कितपत वाटचाल झाली आहे, याचा थोडक्यांत आढावा घेतला आहे. या सर्व माहितीवरून महाराष्ट्राचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे असें आपल्याला निश्चितपणें म्हणतां येईल.

● ● ●

भाग दुसरा

महाराष्ट्रांतील शेती

प्रास्ताविक

पहिल्या भागांत आपण महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांविषयीं थोडक्यांत विचार केला. आतां आपण महाराष्ट्रांतील शेतीची माहिती करून घेणार आहोंत. महाराष्ट्र राज्य हें कृषिप्रधान राज्य आहे. बहुसंख्य जनता अजूनहि शेतीवर अवलंबून आहे, ही गोष्ट खालील आंकडेवारीवरून सहज कळून येते.

व्यवसाय	व्यवसायावर अवलंबून असलेल्या लोकांची एकूण लोकसंख्येबरोबर टक्केवारी
शेती	६३·९७
शेतीशिवाय इतर उत्पादन	१३·१०
व्यापार	६·९९
वाहतूक	२·२५
इतर सेवा	१३·६९
	१००·००

(आंकडेवारी 'महाराष्ट्र-राज्य-परिचय' (महाराष्ट्र सरकार) वरून घेतली)

ह्यावरून महाराष्ट्राच्या आर्थिक विकासांत शेतीला किती महत्त्वाचें स्थान आहे हें दिसून येतें. या ठिकाणीं एक गोष्ट स्पष्ट करण जरूर आहे. अजून सुद्धां महाराष्ट्रांतील जवळजवळ ६४% जनता जरी शेतीवर अवलंबून असली तरी तशीच कायमची राहिली पाहिजे असें नाहीं किंवा तशी ती रहाणें इष्टहि

नाहीं. सध्यां देखील शेतीवर लोकसंख्येचा भार प्रमाणापेक्षां जास्त आहे अशी परिस्थिति आहे. तो कमी करणेंच इष्ट आहे. तेव्हां महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाकडे लक्ष पुरविलें पाहिजे, ही गोष्ट अविवाद्य आहे. परंतु त्याचबरोबर हीहि गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, नजिकच्या भविष्यकाळांत शेती हेंच महाराष्ट्रांतील बहुसंख्य जनतेच्या उपजीविकेचें साधन रहाणार. तेव्हां शक्य तेवढ्या लवकर शेतीचा सर्वांगीण विकास घडवून आणला पाहिजे.

शेतीविषयीं विचार करावयाचा म्हणजे शेती ज्या गोष्टींवर अवलंबून असते त्या सर्व गोष्टींचा विचार करावयास पाहिजे. ह्या गोष्टी म्हणजे—१. जमीन, २. हवामान व पाऊस, ३. पाणीपुरवठ्याचीं इतर साधनें, ४. शेतीचीं अवजारें, ५. शेतीचें कमाल व किमान क्षेत्र, ६. सहकारी शेती, ७. शेतीमालाची विक्री, ८. शेतकरी व त्यांची परिस्थिति वगैरे होत. त्याचबरोबर महाराष्ट्रांत सध्यां कोणकोणतीं पिकें येतात व त्यांत किती वाढ करणें शक्य आहे ह्याचाहि विचार करावयास पाहिजे. शेती ह्या शब्दाचा अर्थ थोडा व्यापक केला तर जंगलें व त्यांतून मिळणारे पदार्थ ह्यांचाहि विचार करावा लागेल. ह्या सर्व गोष्टींचें विवेचन ह्या विभागांत थोडक्यांत व सुबोध रीतीनें करण्याचा प्रयत्न केला आहे.

●●●

१

★

जमीन व हवामान

महाराष्ट्र राज्य २२·१ आणि १६·४ उत्तर अक्षांश आणि ७२·६ आणि ८०·९ पूर्व रेखांश यामध्यें वसलें आहे. राज्याचें एकूण क्षेत्रफळ १,१८,४५९ चौरस मैल आहे; म्हणजेच भारताच्या क्षेत्रफळाच्या १० टक्क्यांपेक्षां थोडें जास्त आहे. महाराष्ट्राच्या नैसर्गिक सीमा साधारणपणें खालीलप्रमाणें आहेत—उत्तरेस सातपुडा पर्वत आणि तापी व नर्मदा या नद्या, पूर्वेस वैनगंगा व दक्षिणेस पूर्वेकडून पश्चिमेस येतांना गोदावरी, भीमा व कृष्णा या नद्यांचे उत्तर प्रवाह व पश्चिमेस अरबी समुद्र. महाराष्ट्राचा भूभाग हा लाव्हा रसापासून तयार झाला आहे. ह्यामुळें महाराष्ट्र हा दऱ्याखोऱ्यांचा बनलेला आहे. महाराष्ट्रांत पुढील प्रमुख खोरीं आहेत :—तापी व पूर्णा नद्यांचीं खोरीं, मध्य गोदावरी खोरें, पेनगंगा व मांजरा नद्यांचीं खोरीं आणि भीमा व कृष्णा या नद्यांचीं खोरीं. या प्रत्येक खोऱ्यांत तीन प्रकारच्या जमिनी आढळतात. नदीच्या आसपासचा प्रदेश हा सुपीक असतो. कारण नदीबरोबर वहात आलेला गाळ हा ह्या सर्व जमिनीवर पसरतो. या जमिनीची पाणी ग्रहण करण्याची शक्ति चांगली असते. शेतीच्या दृष्टीनें ही जमीन अतिशय उपयुक्त असते. ह्यापुढचा भाग साधारण खोल व सपाट असा असतो. ह्या जमिनीची पाणी ग्रहण करण्याची शक्ति वरील जमिनीपेक्षां कमी परंतु बऱ्यापैकीं असते. ह्या जमिनीस उतार थोडा असल्यामुळें ह्या जमिनीची पाण्यामुळें फारशी धूप होत नाहीं. शेतीसाठीं ह्या जमिनीचा बऱ्यापैकीं उपयोग होतो. तिसऱ्या प्रकारची जमीन डोंगराच्या आसपासची होय. ही जास्त उताराची असते. ह्या जमिनींत मुरूम व दगड बरेच आढळतात. ह्या जमिनीची पाणी ग्रहण करण्याची शक्ति कमी

असते. शेतीच्या दृष्टीनें ह्या जमिनीचा फारसा उपयोग होत नाहीं. प्रत्येक खोऱ्यांत हे तीन प्रकार सांपडतात व प्रत्येक खोऱ्याचे साधारणपणें असे पांच पट्टे असतात.

परंतु वरील खोऱ्यांचें वर्णन कोंकण सोडून इतर भागालाच लागू होतें. कोंकणामध्यें फक्त दोनच प्रकार आढळतात. एक डोंगराच्या आसपासची उताराची जमीन व दुसरा समुद्रकिनारा. पहिल्या प्रकारचें वर्णन वर आलेंच आहे. समुद्रकिनाऱ्यावरील जमिनीमध्यें पहिल्या व दुसऱ्या प्रकारांचे मिश्र गुणधर्म असतात. या जमिनीची पाणी ग्रहण करण्याची व सांठविण्याची शक्तिहि मध्यम प्रकारची असते.

हवामान

हवामानांत एकूण चार गोष्टींचा समावेश होतो. पाऊस, उष्णता, थंडी व वारे. महाराष्ट्र हा उष्ण कटिबंधांत येतो. येथें वर्षाचे उन्हाळा, पावसाळा व हिवाळा असे तीन स्पष्ट भाग पडतात. महाराष्ट्राच्या हवामानावर अरबी समुद्राचा चांगला परिणाम झाला आहे. त्यामुळें समुद्रालगतच्या भागाचें हवामान समशीतोष्ण झालें आहे. समुद्रापासून अंतर्गत भागाकडे हवामान जास्त जास्त विषम होत जातें. दिवसाच्या कमाल व किमान उष्णतामानांत बराच फरक आढळून येतो. सह्याद्रीमुळें देखील महाराष्ट्रांतील हवामानावर बराच परिणाम झाला आहे. समुद्रसपाटीपासून जों जों उंच जावें तों तों हवा जास्त जास्त थंड होते जाते. एकूण महाराष्ट्राचा विचार केल्यास येथें हवामानाचे अनेक प्रकार आढळून येतात.

पर्जन्यमानाच्या दृष्टीनें विचार केल्यास महाराष्ट्रांत एकूण चार महिनेच पाऊस पडतो. सह्याद्रीमुळें ढग अडतात व पाऊस पडतो. सह्याद्रि नसता तर महाराष्ट्राचें कदाचित् वाळवंट बनलें असतें. पावसाचें प्रमाण मात्र भिन्न भागांत वेगवेगळें आहे. समुद्रकिनाऱ्यापासून सह्याद्रीच्या शिखरापर्यंत बराच पाऊस पडतो. सह्याद्रि ओलांडून देशावर आलें, कीं हें पावसाचें प्रमाण एकदम कमी होतें. समुद्रकिनाऱ्याला १०० इंच पाऊस, सह्याद्रीच्या शिखरांवर २५० इंचांपर्यंत पाऊस, सह्याद्रि ओलांडल्यानंतर पहिल्या १५।२० मैलांत ५० इंचांपर्यंत पाऊस व पुढें पुढें फक्त १५ इंच पाऊस असा पावसाच्या प्रमाणांत फरक होत जातो.

महाराष्ट्रांत वारे दोन दिशांनीं वाहतात. हे दोन्ही प्रकारचे वारे आपल्या बरोबरच ढग घेऊन येतात व हे ढग सह्याद्रीला अडले कीं पाऊस पडतो.

महाराष्ट्रांत सहसा मोठीं वादळें होत नाहींत. एकंदरींत महाराष्ट्रांत वाऱ्यापासून फारसा उपद्रव होत नाहीं.

महाराष्ट्रांतील जमीन व हवामान यांचा ढोबळ मानानें विचार केल्यास आपल्याला असें आढळून येतें कीं, महाराष्ट्रांतील निरनिराळ्या भागांत याबाबत भिन्नता आढळून येते. त्यामुळें महाराष्ट्रांत अनेक प्रकारचीं पिकें होतात. तांदूळ, गहू, बाजरी, ज्वारी, भुईमूग, गळिताचीं धान्यें, कापूस, ऊंस, तंबाखू वगैरे मुख्य पिकें महाराष्ट्रांत होतात.

वर आपण एकंदर महाराष्ट्राबद्दल सारांशरूपानें माहिती पाहिली. परंतु थोडें खोलांत जाऊन प्रत्येक विभागाची तपशीलवार माहिती घेतली तर ती निश्चितपणें जास्त उपयुक्त ठरेल. महाराष्ट्राचे एकूण तीन मुख्य विभाग पडतात. १. पश्चिम महाराष्ट्र २. विदर्भ व ३. मराठवाडा.

पश्चिम महाराष्ट्र

पश्चिम महाराष्ट्रांत दक्षिणोत्तर सह्याद्रीच्या रांगा आहेत. यामुळें या विभागाचे तीन भाग पडतात. एक सह्याद्रि व समुद्र यांमधील कोंकण भाग. दुसरा सह्याद्रीच्या पूर्वेकडील उतरणीचा भाग म्हणजेच घाटमाथा व तिसरा सपाट भाग–देश. कोंकणांत पाऊस बराच म्हणजे वर्षांत सुमारें १०० इंचांपेक्षां थोडा जास्तच पडतो. घाटमाथ्यावर देखील पावसाचें प्रमाण जास्त आहे. देशावर पाऊस मात्र कमी प्रमाणांत पडतो व पश्चिम महाराष्ट्राचा पूर्वेकडील भाग हा दुष्काळी भाग म्हणूनच ओळखला जातो. कोंकणांत पाऊस भरपूर असला तरी जमीन निकृष्ट प्रकारची आहे. सपाट जागा फार थोडी आहे. जमिनीला उतार जास्त असल्यामुळें पावसामुळें जमिनीची धूप फार होते. समुद्रकांठचा व नदीकांठचा असा थोडा भागच सपाट आहे. बाकी बहुतेक भाग डोंगराळ आहे. त्यामुळें शेतीच्या दृष्टीनें ह्या जमिनीचा फारसा उपयोग होत नाहीं. घाटमाथ्यावरील जमीन देखील फार चांगली म्हणतां येणार नाहीं. परंतु येथें पावसाची निश्चिति असल्यामुळें शेतीच्या दृष्टीनें हा भाग उपयुक्त आहे. खरीप व रब्बीचीं पिकेंहि ह्या भागांत निघतात. देशावरील जमीन काळी व सुपीक आहे. परंतु येथें पाऊस थोडा व अनिश्चित आहे. पाऊस चांगला झाल्यास ह्या भागांत चांगलें उत्पादन होतें. जेथें पाणीपुरवठ्याची सोय आहे तेथें बागाईत पिकेंहि चांगलीं निघतात. पश्चिम महाराष्ट्रांत लागवडीखालीं एकूण २०,८८७ हजार एकर जमीन आहे; म्हणजे एकूण जमिनीच्या ५७% जमीन लागवडीखालीं आहे. ह्यापैकीं १,३२७ हजार एकर जमीन बागायती

आहे. म्हणजे लागवडीखालीं असलेल्या एकूण जमिनीच्या ६४% जमीन बागायती आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या १६ टक्के भागावर जंगल आहे. पश्चिम महाराष्ट्रांतील मुख्य पिकें व त्यांखालीं असलेल्या जमिनीचें एकूण लागवडीखालील जमिनीशीं असलेलें प्रमाण खालीलप्रमाणें—

पिकें	पिकांखालीं असलेल्या जमिनीचें एकूण लागवडीखालीं असलेल्या जमिनीशीं प्रमाण.
ज्वारी	२८·६%
बाजरी	१७·१%
तांदूळ	७·६%
गहूं	३·६%
द्विदल धान्यें	१०·६%
कापूस	५%
भुईमूग	७·१%
ऊंस	१%

(आंकडेवारी 'महाराष्ट्राचें आर्थिक दर्शन' वरून. आंकडे १९५६-५७सालांतील).

विदर्भ

विदर्भामध्यें एकूण ८ जिल्हे आहेत. त्यांपैकीं चार म्हणजे अकोला, अमरावती, यवतमाळ व बुलढाणा हे वऱ्हाडचे चार जिल्हे होत. ह्यामध्यें नागपूर, वर्धा, चांदा व भंडारा हे चार जिल्हे मिळवून झालेल्या प्रदेशांस विदर्भ म्हटलें जातें. वऱ्हाडची जमीन काळीभोर व सुपीक आहे. ह्या जमिनीला कापसाची जमीन असें म्हणतात. नागपूरचा पूर्व भाग व भंडारा जिल्हा यांतील जमीन काळी व रेताळ आहे चांद्यामधील जमीन तांबडी व रेताळ आहे. ह्या दोन्ही जमिनींत भातशेती होते. विदर्भामध्यें वर्षाकाठीं सरासरी ४१ इंच पाऊस पडतो. विदर्भाच्या एकूण ३० टक्के भागावर जगल आहे. लागवडीखालील जमीन एकूण जमिनीच्या सुमारें ५०% आहे. विदर्भांतील बहुतेक शेती कोरडवाहू प्रकारची आहे. बागायतीचें क्षेत्र फारच थोडें म्हणजे लागवडीखालील जमिनीच्या ५·५% आहे विदर्भांतील मुख्य पिकें व त्याखालीं असलेल्या जमिनीचें एकूण लागवडीखालीं असलेल्या जमिनीशीं प्रमाण खालीलप्रमाणें —

पिकें	पिकाखालील जमिनीचें एकूण लागवडीखालील जमिनीशीं प्रमाण
ज्वारी	३०·४%
तांदूळ	९·७%
गहूं	७·२%
द्विदल धान्यें	१३%
गळिताचीं धान्यें	७·९%
कापूस	२८·७%

(आंकडेवारी 'महाराष्ट्राचें आर्थिक दर्शन' वरून. आंकडे १९५६-५७सालांतील)

मराठवाडा

मराठवाड्यांत औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड व उस्मानाबाद हे जिल्हे आहेत. मराठवाड्यांतील बहुतेक जमीन मध्यम प्रतीची काळी आहे. फक्त गोदावरी नदीच्या दोन्ही तीरांवरील जमीन चांगल्या प्रतीची काळी आहे. मराठवाड्यांत लागवडीखालीं एकूण ११,९८३ हजार एकर जमीन आहे; म्हणजे एकूण जमिनीच्या ७३·५% जमीन लागवडीखालीं आहे. जंगलांचा भाग एकूण जमिनीच्या ३·२% आहे. मराठवाड्यांत पाऊस वर्षाकाठीं सरासरी २७ ते ३३ इंचांपर्यंत पडतो. मराठवाड्यांतील बहुतेक शेती कोरडवाहू प्रकारची असून बागायत क्षेत्र एकूण लागवडीखालील जमिनीच्या फक्त २·५% आहे. मराठवाड्यांतील मुख्य पिकें व त्याखालीं असलेल्या जमिनीचें एकूण लागवडीखालीं असलेल्या जमिनीशीं प्रमाण खालीलप्रमाणें—

पिकें	पिकांखालील जमिनीचें एकूण लागवडीखालील जमिनीशीं प्रमाण
ज्वारी	३४%
बाजरी	६%
गहूं	४ ते ६%
तांदूळ	२·५%

द्विदल धान्यें	१९%
गळिताचीं धान्यें	१४·२%
कापूस	१६%

(आंकडेवारी 'महाराष्ट्राचें आर्थिक दर्शन' वरून. आंकडे १९५६–५७सालांतील)

महाराष्ट्रांतील शेतजमिनीची सध्यांची परिस्थिति पाहिल्यानंतर भविष्य-काळाच्या दृष्टीनें विचार करावयास पाहिजे. ह्या बाबतींत जो पहिला प्रश्न डोळ्यांसमोर उभा रहातो तो हा कीं, लागवडीखालील जमिनींत कशी व किती प्रमाणांत वाढ करतां येणें शक्य आहे?

लागवडीखालील जमिनींत वाढ करण्याचे तीन प्रकार आहेत. एक म्हणजे लागवडीयोग्य पड व इतर कारणांमुळें राहिलेली पड ह्या दोन्ही प्रकारच्या जमिनी लागवडीखालीं आणणें. दुसरा प्रकार म्हणजे ओसाड व नापीक जमीन लागवडीखालीं आणण्याचा प्रयत्न करणें व तिसरा म्हणजे इतर कारणांकरितां उपयोगांत आणली जाणारी जमीन शेतीकरितां वापरणें. ह्यापैकीं तिसरा प्रकार शक्य नाहीं. कारण दुसऱ्या कोणत्याहि कारणाकरितां जरुरीपेक्षां जास्त जमीन सध्यां उपयोगांत आणली जात आहे असें म्हणतां येणार नाहीं. ओसाड व नापीक जमीन लागवडीखालीं आणण्याची शक्यता फार कमी. कारण शेतीच्या दृष्टीनें अगदींच निरुपयोगी असलेली जमीन ओसाड व नापीक जमीन म्हणून राहिली आहे. पड जमीन लागवडीखालीं आणण्याची शक्यता त्या मानानें जास्त. परंतु ह्यासाठीं भांडवली खर्च फार मोठ्या प्रमाणावर करावा लागेल व ही शेती किफायतशीर होणें फार कठीण होईल. अर्थात् अशा तऱ्हेची पड जमीनसुद्धां महाराष्ट्राच्या एकूण जमिनीच्या ८।१० टक्क्यांपेक्षां जास्त येणार नाहीं. तेव्हां ही सर्व जमीन लागवडीखालीं आणणें शक्य झालें असें जरी गृहीत धरलें तरी देखाल लागवडीखालील जमिनींत जास्तींत जास्त ८।१० टक्के वाढ करतां येईल.

लागवडीखालील जमिनीच्या क्षेत्रांत जरी फारशी वाढ करतां येणें शक्य नसलें तरी सध्यां लागवडीखालीं असलेल्या जमिनीची योग्य काळजी घेण्याचें काम मात्र सहज करतां येण्याजोगें आहे. ही काळजी म्हणजे जमिनीचें संरक्षण करण्याची. ज्या जमिनीला उतार जास्त आहे त्या जमिनीचा वरचा थर हळूंहळूं खालीं घसरत जातो व वरील जमीन हळूंहळूं नापीक बनत जाते. ही धुपणी जर थांबवायाची असेल तर ह्या जमिनीवर झाडें लावलीं पाहिजेत किंवा चराऊ कुरण म्हणून जर ह्या जमिनीचा उपयोग करण्यांत यत असेल तर

कांहीं मर्यादेपर्यंतच गवत जनावरांना खाऊं दिलें पाहिजे. जमीन जर उघडी पडली तरच ती झिजण्याचा संभव असतो. परंतु ह्यापेक्षां दुसऱ्या प्रकारानें जमिनीची फार झीज होते. पाऊस पडल्यानंतर पावसाच्या पाण्याबरोबरच बरीचशी माती वाहून जाते. असें कांहीं वर्षें झाल्यास साहजिकच त्या जमिनीचा कस कमी होतो. अशा तऱ्हेनें होणारी जमिनीची धूप थांबविण्यासाठीं जमिनीस बांध-ताली घालण्याची आवश्यकता आहे. बांध व ताली घातल्यानें पावसाचें पाणी वाहून जात नाहीं. त्यामुळें माती जागच्या जागीं राहते. पाणी जमिनींत मुरत असल्यामुळें जमिनींत ओलावा जास्त रहातो व त्यामुळें पिकें काढणें सोपें जातें. त्याचबरोबर त्या भागांतील विहिरींचें पाणी वाढतें. त्यामुळें पाण्याची टंचाई बऱ्याच प्रमाणांत कमी होते. तेव्हां अशा प्रकारचे उपाय योजून जमिनीची धूप थांबविली पाहिजे व जमिनीचें योग्य प्रकारें संरक्षण केलें पाहिजे. जमीन-संरक्षणाचें महत्त्व व उपयुक्तता लक्षांत घेऊन महाराष्ट्र सरकारनें त्याचा शेतकी विकास योजनेंत कायमचा समावेश केला आहे. महाराष्ट्राच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जमीन-संरक्षणासाठीं २८०.५५ लक्ष रुपयांची तरतूद आहे. बांध घालणें व धूपप्रतिबंधक जंगलें लावणें हे दोन्ही उपाय योजण्यांत येत आहेत. पश्चिम खानदेशांतील धुळें व शिंदखेडा हे तालुके, दक्षिण सातारा जिल्ह्यांतील जत तालुका, पुणें जिल्ह्यांतील शिरूर तालुका, सोलापूर जिल्ह्यांतील उत्तर व दक्षिण सोलापूर हे तालुके येथें हजारों एकर जमिनीस बांध घातले आहेत. मराठवाडा व विदर्भ येथेंहि जमीन-संरक्षणाचे योग्य ते उपाय योजले जात आहेत. महाराष्ट्र राज्यांत सोलापूर, औरंगाबाद व केळापूर या तीन ठिकाणीं जमीनसंरक्षणासंबंधीचें शिक्षण देणाऱ्या संस्था असून, त्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतहि चालू राहणार आहेत. जमीन-संरक्षणाबरोबरच जमिनीचा कस कसा टिकवून धरतां येईल व तो कसा वाढवतां येईल या प्रश्नांचाहि विचार केला पाहिजे. यासाठीं खतांचा जास्त प्रमाणांत उपयोग केला पाहिजे. महाराष्ट्रांत खतांचा योग्य प्रमाणांत उपयोग न होण्याचीं अनेक कारणें आहेत. त्यांपैकीं मुख्य कारण म्हणजे शेतकऱ्याचें अज्ञान. त्याला खतें व त्यांचा उपयोग यांबद्दल माहिती करून द्यावयास पाहिजे व त्याबाबत योग्य सल्लाहि द्यावयास पाहिजे. दुसरें कारण म्हणजे त्याचें दारिद्र्य. बऱ्याच वेळां कळत असून सुद्धां परवडत नसल्यामुळें त्याला खतें विकत घेतां येत नाहींत. ह्यासाठीं सरकारनें पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना सवलतीच्या दरांत खतें पुरवावयाची योजना आंखली पाहिजे. गाईचें शेण हें एक उत्तम प्रकारचें खत आहे; परंतु त्याचा उपयोग

मुख्यत्वेंकरून जळणासाठीं केला जातो. त्यामुळें जवळजवळ फुकट मिळणारें उत्तम प्रकारचें खत वाया जातें. ह्याबाबत योग्य ती उपाययोजना करावयास पाहिजे. जमिनीचा कस कायम ठेवण्याचा दुसरा उपाय म्हणजे दरवर्षी पिकें बदलणें (Rotation of crops)–ह्या वर्षी जमिनींत एक पीक लावलें तर पुढील वर्षी दुसरेंच लावणें. असें केल्यानें जमिनीचा कस टिकून रहाण्यास मदत होते. कस कायम ठेवण्याचा तिसरा उपाय म्हणजे मिश्र पिकांचा उपाय (Mixed cropping). एकाच जमिनींत दोन प्रकारचीं पिकें एकदम लावल्यानें जमिनीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेतां येतो व एक पीक बऱ्याच वेळां दुसऱ्या पिकास संरक्षण देतें. अर्थात् कोणकोणतीं पिकें एकदम लावावयाचीं हें काळजी-पूर्वक विचार करून ठरविलें पाहिजे. ह्या सर्व उपायांनीं जमिनीचा कस कायम ठेवण्याचा व शक्य झाल्यास तो वाढविण्याचा आपण जास्तींत जास्त प्रयत्न केला पाहिजे. शेतीचें उत्पादन जास्तींत जास्त वाढविणें हें आपलें ध्येय आहे व त्यासाठीं लागवडीखालील जमीन वाढविणें, जमिनीचें संरक्षण करणें व जमिनीचा कस वाढविणें ह्या सर्व बाबतींत जोरदार प्रयत्न झाले पाहिजेत.

●●●

२

★

शेतजमिनीस पाणीपुरवठा

शेतजमिनीबाबत विचार केल्यानंतर साहजिकच पाणीपुरवठ्याचा विचार करावयास पाहिजे. महाराष्ट्रांतील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. हा पाऊस वर्षाकाठीं फक्त चारच महिने पडतो. कांहीं भागांत (उदा० कोंकण, घाटमाथा वगैरे) हा पाऊस निश्चित व बराच पडतो. इतर भागांत मात्र पाऊस कमी पडतो व त्याचीहि निश्चित नसते. हा भाग दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्याला १०० इंच पाऊस पडतो. सह्याद्रीच्या शिखरांवर २५० इंच पाऊस पडतो. सह्याद्रि ओलांडल्यानंतर पहिल्या १५/२० मैलांत ५० इंचांपर्यंत पाऊस पडतो व पुढें पुढें फक्त १५ ते २० इंच इतकाच पाऊस पडतो. ज्या भागांत पावसाचें प्रमाण कमी आहे त्या भागांत पाणीपुरवठ्याचीं इतर साधनें असणें अत्यंत जरूर आहेत. ज्या भागांत पाऊस भरपूर पडतो त्या भागांत देखील पाणी पुरवठ्याचीं इतर साधनें असणें आवश्यक आहे. कारण पाऊस फक्त चार महिने पडतो व बाकीचे आठ महिने जवळजवळ कोरडे जातात. पाणीपुरवठ्याचें दुसरें साधन म्हणजे नद्या. महाराष्ट्र राज्यांत पाणीपुरवठ्याच्या दृष्टीनें उपयुक्त असलेल्या नद्या पुढील होत. १. कृष्णा व तिला मिळणाऱ्या महत्त्वाच्या नद्या म्हणजे कोयना, नीरा, मुळा-मुठा, भीमा, घोड व कुकडी. २. गोदावरी व तिला मिळणाऱ्या महत्त्वाच्या नद्या म्हणजे मुळा, प्रवरा, दारणा, पूर्णा (मराठवाड्यांतील); मांजरा, मानार व विदर्भांतून वाहून गोदावरीला मिळणाऱ्या मोठाल्या नद्या म्हणजे पैनगंगा, वर्धा, पेंच, वैनगंगा इत्यादि. ३. तापी व तिला मिळणाऱ्या महत्त्वाच्या नद्या म्हणजे पूर्णा (विदर्भांत), वाघूर, गिरणा, पांझरा, बोरी व बुरे आणि अरुणावति व ४.) कोंकणांतील पश्चिमेकडे वहाणाऱ्या

नद्या. ह्या नद्यांच्या कांठीं असलेल्या जमिनीस ह्या नद्यांपासून पाणीपुरवठा होतो. परंतु ह्या नद्यांच्या पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्यासाठीं ह्या नद्यावर धरणें बांधलीं आहेत व त्या धरणांपासून पाट व कालवे काढले आहेत. कांहीं नवीन योजनाहि सध्यां सुरू आहेत. ह्यांचा तपशीलवार विचार आपण नंतर करणार आहोंत.

शेतीस पाणीपुरवठ्याचें विहिरी हें एक प्रमुख साधन आहे. पावसाइतकेंच विहिरींना पाणीपुरवठ्याच्या बाबतींत महत्त्व आहे असें म्हटलें तर ती फार अतिशयोक्ति होणार नाहीं. महाराष्ट्रांतील एकूण शेतीपैकीं ७० ते ७५% शेतीला विहिरीपासून पाण्याचा पुरवठा होतो. विहिरीपासून सर्व वर्षभर पाण्याचा पुरवठा होतो. कोंकणांत पाऊस पुष्कळ असला तरी जमिनींत फारसें पाणी मुरत नाहीं. बरेंचसें पाणी वाहून जातें. त्यामुळें कोंकणांत विहिरींचें पाणी वर्षभर पुरत नाहीं. उन्हाळ्यांत अनेक विहिरींचें पाणी आटतें. विहिरींना वर्षभर पाणी रहावें म्हणून वरकस जमिनींत झाडें लावणें, उतारावर गडगे घालणें वगैरे उपाय करतात. कोंकणांत विहिरीच्या पाण्यावर भाजीपाला व कांहीं ठिकाणीं पोफळी व नारळ ह्याशिवाय इतर बागाईत फारसें होत नाहीं. सह्याद्रीच्या शिखरांवर पाऊस भरपूर असला तरी दगड असल्यामुळें जवळजवळ सर्व पाणी वाहून जातें. ह्या भागांत विहिरी फारशा नाहींत. जेथें पाणी मुरूं शकतें अशा कांहीं ठिकाणींच ह्या भागांत विहिरी सांपडतात. उदा०— महाबळेश्वर, पांचगणी. मावळभागांतहि जमीन कडक दगडाची आहे व तिला उतारहि बराच आहे. त्यामुळें येथेंहि विहिरी फारशा नाहींत. यापुढील भाग म्हणजे संक्रमण भाग होय. या भागांत सर्वांत जास्त विहिरी आढळतात. येथें पाऊस ३० इंचांच्या वर पडतो व जमिनी खोल व मुरमाड आहेत. त्यामुळें पाणी जमिनींत मुरतें. ह्या भागांत दऱ्या व खोरीं असल्यानें नद्याहि आहेत व ह्या नद्यांना वर्षभर पाणी असतें. दोन नद्यांच्या मधील भागांत ज्या विहिरी असतात, त्यांना चांगलें पाणी असतें. या भागांत विहिरींच्या पाण्यावर बागाईत शेती मोठ्या प्रमाणावर करण्यांत येते. ह्यापुढील भाग म्हणजे देशभाग होय. हा भाग सपाट आहे व सह्याद्रींतून निघालेल्या नद्या ह्या भागांतून देखील वहातात. ह्या भागांत नद्यांची गति मंद आहे. हें पाणी जमिनींत मुरण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणें पावसाचें पाणी सुद्धां मुरतें. ह्यामुळें ह्या भागांत कांहीं ठिकाणीं चांगल्या बारमाही पाणी असलेल्या विहिरी आढळतात. यानंतरचा भाग म्हणजे मराठवाडा होय. येथील जमीन सपाट आहे व पाऊस ३० इंचांपर्यंत पडतो. त्यामुळें ह्या भागांत अनेक

विहिरी आढळतात. राहता राहिला खानदेश, नागपूर व वऱ्हाडचा भाग. ह्यापैकीं खानदेश व नागपूर हा भाग विहिरींच्या दृष्टीनें सोयीचा आहे. वऱ्हाडचा भूभाग कडक दगडाचा असल्यामुळें तेथें फारशा विहिरी आढळत नाहींत.

शेतजमिनीस पाणीपुरवठा करण्याचें आणखी एक साधन म्हणजे लहान लहान बंधारें व तळीं. अर्थात् हें पाणी बारमाही बागायती पिकांसाठीं उपयोगी पडणार नाहीं. पावसाळ्यानंतर पुढील ३–४ महिने ज्या नद्या वाहत असतात त्यांच्यावर ठिकठिकाणीं बंधारे बांधून तें पाणी आठमाही खरीप अगर रब्बी पिकांसाठीं उपयोगांत आणतां येईल. बागलाण, नाशिक व पश्चिम खानदेश-मध्यें आज अशीं धरणें चालू आहेत. इतरहि कांहीं ठिकाणीं असे बंधारे बांधणें शक्य आहे. बंधाऱ्याप्रमाणेंच लहान लहान तळींहि बांधून त्यांचा पाणी-पुरवठ्यासाठीं उपयोग करतां येईल. लहान लहान नदीनाल्यांचे प्रवाह अडवून अशा तऱ्हेचीं तळीं तयार करणें शक्य आहे. या तळ्यांपासून पाट काढून पाणी थोड्या अंतरांवरील शेतांनाहि पुरवितां येईल. दुष्काळी भागांतील पिकांना संरक्षण म्हणून ह्या तळ्यांचा चांगला उपयोग होईल.

शेतजमिनींस कृत्रिम तऱ्हेनें बारमाही पाणीपुरवठा करण्याचें सर्वांत महत्त्वाचें साधन म्हणजे नद्यांवर धरणें बांधून त्यांत नद्यांचें पाणी सांठवून ठेवणें व हें पाणी नंतर शेतीला कालव्यांच्या साहाय्यानें पुरविणें. महाराष्ट्रांतील प्रमुख नद्या वर दिल्याच आहेत. त्या नद्यांवरील पाटबंधाऱ्यांची माहिती खालीं दिली आहे.

(१) कृष्णा नदीचें खोरें

कृष्णा नदीचा उगम सह्याद्रीमध्यें झालेला आहे. ह्या नदीच्या उगमाच्या ठिकाणीं सुमारें २५० इंच पाऊस पडतो. त्यामुळें ह्या नदीला पाणी भरपूर असते. कृष्णानदीच्या खोऱ्याचें क्षेत्रफळ सुमारें ९७००० चौरस मैल आहे. त्यापैकीं २७,००० चौरस मैल भाग महाराष्ट्र राज्यांत मोडतो. तज्ज्ञांच्या मताप्रमाणें या नदीच्या खोऱ्यामध्यें २१·७ दशलक्ष एकर फूट पाण्याचा हम-खास उपयोग करतां येणें शक्य आहे. परंतु त्यापैकीं केवळ ३ दशलक्ष एकर फूट पाण्याचा पाटबंधाऱ्यासाठीं उपयोग करण्यांत येतो व त्याच्या साहाय्यानें एकूण १५० लक्ष एकर लागवडीयोग्य जमिनीपैकीं फक्त ४ लक्ष एकर क्षेत्राला पाटाचें पाणी देण्यांत येतें. या खोऱ्यांत दोन महत्त्वाचीं धरणें आहेत, खडक-

वासला येथील धरण १८७४–७५ सालीं पूर्ण करण्यांत आलें. या तलावाची पाणी सांठविण्याची क्षमता ३०९१ दशलक्ष घनफूट आहे. या धरणाचें पाणी मुख्यतः पिण्यासाठीं वापरण्यांत येतें. उरलेलें पाणी शेतीसाठीं देण्यांत येतें. साधारणपणें या धरणांतून १६,६०० एकर जमिनीला पाणी मिळतें. दुसरें भाटघर येथील लॉईड धरण. १९२८ सालीं याचें बांधकाम पूर्ण झालें. या धरणाची पाणी सांठविण्याची क्षमता २४,१९८ दशलक्ष घनफूट आहे. ह्या धरणांतील पाण्यानें सुमारें १,७०,००० एकर जमीन भिजते. या जमिनींत ऊंस, फळें, गहूं, ज्वारी, बाजरी, हरभरा वगैरे पिकें निघतात.

वरील धरणांशिवाय इतर कांहीं योजना ह्या खोऱ्यांत हातीं घेण्यांत आल्या आहेत. सर्वांत मोठी योजना म्हणजे **कोयना योजना** होय. कोयना योजनेचा मुख्य हेतु विजेचें उत्पादन हा आहे. ही योजना तीन टप्प्यांत पुरी करण्यांत येणार असून सर्व टप्पे पुरे झाल्यानंतर एकूण ५,७०,००० किलोवॅट वीज निर्माण होईल अशी अपेक्षा आहे. ह्या योजनेचा शेतीसाठीं अर्थातच उपयोग होईल. कोयना-धरणानें उत्तर व दक्षिण सातारा जिल्ह्यांतील एकूण १·६१ लक्ष एकर जमीन पाण्याखालीं येईल अशी अपेक्षा आहे. दुसरी योजना म्हणजे भोगावती नदीवर बांधण्यांत येणारे **राधानगरी येथील धरण**. ह्याचाहि उपयोग मुख्यत्वेंकरून विजेच्या उत्पादनासाठीं होणार आहे. ह्या योजनेपासून ४५०० किलोवॅट विजेची निर्मिति होईल. या धरणामुळें १५००० एकर उंस-शेतीला पाण्याचा पुरवठा होतो. ह्यामध्यें अजून ३००० एकरांची वाढ करतां येणें शक्य आहे. तिसरी योजना **घोड नदीवर** चिंचणी येथें मातीचें धरण बांधण्याची आहे. या धरणांतून दोन कालवे काढण्यांत येतील व त्यांनीं एकूण ५०,८०० एकर जमीन भिजेल. ह्या धरणाचें बांधकाम जवळजवळ पूर्ण झालें आहे. चौथी योजना **नीरा नदीवर** भाटघरच्या धरणाच्या खालीं **वीर येथें धरण** बांधण्याची आहे. ह्या धरणाची पाणी सांठविण्याची क्षमता ९८३५ दशलक्ष घनफूट असेल व एकूण ६,६०० एकर जमीन ह्या धरणांतील पाण्यानें भिजेल. ह्याशिवाय **वरसगांव व पानशेत** येथें मुठा नदीला मिळणाऱ्या दोन नद्यांवर मातीचीं धरणें बांधण्यांत येणार आहेत. पानशेत धरणाचें काम जवळ-जवळ पूर्ण होत आलें आहे. या दोन धरणांमुळें एकूण ८०,००० एकर जमिनीस पाटाचें पाणी मिळेल. ह्याशिवाय वारणा व कन्नूर या दोन लहान योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें आहेत. या सर्व योजनांमुळें एकूण ४ लक्ष एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल. वरील योजनांशिवाय कृष्णा खोऱ्यामध्यें इतर कांहीं योजनांची पहाणी सुरूं आहे. त्यापैकीं कांहीं खालीलप्रमाणें—नीरा नदीवर

नातंबी, गुंजवणी नदीवर माहोरी, भीमा नदीवर चासकमान, घोड नदीवर महाळुंगी, कुकडी नदीवर माडिक डोह, कोयना नदीवर पाडळी इत्यादि.

(२) *गोदावरी नदीचें खोरें*

गोदावरी नदी त्र्यंबकेश्वर येथें उगम पावते. हिच्या खोऱ्याचें एकूण क्षेत्रफळ १,१६,३०० चौरस मैल असून यापैकीं ६०,००० चौ. मैल महाराष्ट्राराज्यांत आहे. नदीपासून दर वर्षाला होणाऱ्या ४५·४४ दशलक्ष एकर फूट पाणीपुरवठ्यापैकीं फक्त १·५ दशलक्ष एकर फूट पाणी उपयोगांत आणण्यांत येतें व त्यामुळें ३,२५,००० एकर जमीन भिजते. ही नदी ज्या प्रदेशांतून वाहते, तो प्रदेश कमी पावसाचा प्रदेश आहे. त्यामुळें जेथें पाटबंधारे आहेत तेवढे भाग सोडून बाकीच्या भागांत अधूनमधून दुष्काळ पडतो. या खोऱ्यांत दारणा नदीवर लेक–बीले या नांवाचें धरण बांधलें आहे. या धरणांतून कालवे काढण्यांत आले आहेत. कालव्यांमध्यें पाण्याचा ओघ वळविण्यासाठीं गोदावरीवर नांदूर–मधमेश्वर येथें एक धरण बांधण्यांत आलें आहे. या कालव्यांतील पाण्यानें ६०,००० एकर जमीन भिजते. ह्या जमिनींत मिश्र पिकें काढतात. त्यांत उंसाच्या पिकाचें प्रमाण मोठें आहे. प्रवरा नदीवर भंडारदरा येथें विल्सन धरण आहे. ह्या धरणाची पाणी सांठविण्याची क्षमता ११२०० दशलक्ष घनफूट आहे. या धरणांतून दोन कालव्यांना पाणी पुरविलें जातें. या कालव्यामुळें मिश्र पिकांखालील ८०,००० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होतो.

गोदावरीला मिळणाऱ्या पैनगंगा, वर्धा, वैनगंगा, पेंच व कन्हान या नद्या विदर्भांतून वहात जातात. या नद्यांवर लहानलहान तलाव व जलाशय बांधले आहेत. ह्यांतून १·२७ लक्ष एकर जमिनीला पाणीपुरवठा होतो. या जमिनींतून तांदूळ, कापूस व ज्वारी वगैरे पिकें काढण्यांत येतात. नागपूर जिल्ह्यांत फळपिकें–विशेषतः संत्रीं मोठ्या प्रमाणावर काढण्यांत येतात.

गंगापूर धरण-योजना पहिल्या पंचवार्षिक योजनेंत पूर्ण करण्यांत आली. ह्या धरणाची पाणी सांठविण्याची क्षमता ५५०० दशलक्ष घनफूट आहे. आतां ही ७२०० दशलक्ष घनफुटांपर्यंत वाढविण्याची योजना आहे. ह्या धरणामुळें ६४००० एकर जमीन पाण्याखालीं येईल.

याशिवाय मुळा खोरें विकास-योजनेखालीं जलाशय व कालवे बांधून १,९५,००० एकर जमीन पाण्याखालीं आणण्याची योजना आहे. पूर्णा नदीवर येलदरी व सिद्धेश्वर येथें धरणें बांधण्याची योजना असून ह्या योजनेमुळें २,५२,००० एकर जमिनीला पाटाचें पाणी देतां येईल व सुमारें १५,०००

किलोवॅट विजेचें उत्पादन करतां येईल. मानार-योजना पूर्ण झाल्यावर सुमारें ४१,००० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल. याशिवाय या विभागांत २४ मध्यम आकारांच्या पाटबंधाऱ्यांच्या योजना आहेत. ह्या सर्वांमुळें सुमारें १ लक्ष एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें विदर्भांतील बोर, दिना, वाघ व इतियाडोह येथें जलाशय व कालवे बांधण्यांत येणार आहेत. गोदावरी खोऱ्यांतील ह्या सर्व योजनांमुळें सुमारें ७ लक्ष एकर जमिनीला पाणीपुरवठा होईल. वरील योजनांशिवाय खालील योजनांवर विचार चालू आहे— कडवा नदीवर करंजवन, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा विभागांतील गोदावरीच्या वरच्या बाजूकडील जलाशय, विदर्भांतील वर्धा, पेंच, पेण व कन्हान नद्यांवरील योजना इत्यादि.

(३) तापी नदीचें खोरें

ह्या खोऱ्याचें एकूण क्षेत्रफळ २३,४०० चौ. मैल असून त्यांपैकीं १९,५०० चौ. मैल क्षेत्र महाराष्ट्र राज्यांत आहे. ह्या खोऱ्यांतील एकूण पाणीपुरवठा वर्षांकाठीं ८ दशलक्ष एकर फूट आहे. त्यांपैकीं सध्यां फक्त ०·२५ दशलक्ष एकर फूट पाण्याचा शेतीसाठीं उपयोग होतो. ह्या पाण्याखालीं ७५,००० एकर जमीन भिजूं शकते. ह्या खोऱ्यांत गिरणा नदीवर पंझाण येथें एक धरण बांधण्यांत येणार आहे. ह्या धरणामध्यें २४,००० दशलक्ष घनफूट पाण्याचा सांठा होऊं शकेल. ह्याला जोडूनच मन्याड येथें एक लहान धरण बांधण्यांत येणार आहे. सध्यांचें जामडा धरण व त्याचे कालवे, ह्याची संपूर्णपणें पुनर्रचना करण्याचें ठरलें आहे. ह्या कालव्यांना पाण्याचा पुरवठा करण्यासाठीं दहिगांव येथें एक धरण बांधण्यांत येणार आहे. या योजनेमुळें १,४२,००० एकर जमिनीला पाटाचें पाणी मिळूं शकेल. विदर्भांतील नळगंगा नदीवर २००० दशलक्ष घनफूट पाणी सांठवितां येईल, एवढा जलाशय बांधला जात आहे. ह्याशिवाय विदर्भांतील कांटेपूर्णा योजनेचा संपूर्ण आराखडा तयार झाला आहे.

मोठ्या योजनांबरोबरच राज्यामध्यें अनेक मध्यम व लहान पाणीपुरवठ्याच्या योजना सुरू आहेत. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत अशा १६ मध्यम योजना होत्या व दुसऱ्या योजनेंतहि आणखी १६ मध्यम योजना आहेत. हीं सर्व बांधकामें पूर्ण झाल्यानंतर एकूण २,१६,००० एकर जादा जमीन पाटबंधाऱ्याखालीं येईल. ह्याशिवाय पहिल्या व दुसऱ्या योजनेंतील सर्व लहान योजना पूर्ण झाल्यास एकूण ३,५०,००० एकर जादा जमीन

पाटबंधाऱ्यांखालीं येईल अशी अपेक्षा आहे. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत एकूण सुमारें १५ लक्ष एकर जमीन पाटबंधाऱ्यांखालीं येईल अशी अपेक्षा आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा सुरू आहे. पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें त्यांत योग्य ती उपाययोजना सुचविण्यांत येईल. अन्नोत्पादनाच्या बाबतींत स्वयंपूर्णता हें आपलें ध्येय आहे व त्या दृष्टीनें योग्य ती वाटचाल सुरू आहे.

●●●

४

★

महाराष्ट्रांतील जंगलें

महाराष्ट्र राज्याच्या १५७·१५ लाख एकर भागावर जंगल आहे. म्हणजे एकुण जमिनीच्या २०·७% भागावर जंगल आहे. ह्यापैकीं १०२·६३ लाख एकर राखीव जंगल आहे. महाराष्ट्रांतील जंगलांची विभागवार माहिती खालीं दिली आहे.

पश्चिम महाराष्ट्र

पश्चिम महाराष्ट्रांत जंगलाचें एकूण क्षेत्र ५,८६९ हजार एकर म्हणजे एकूण क्षेत्राच्या १६% आहे. जंगलांच्या दृष्टीनें पश्चिम महाराष्ट्राचे सर्वसाधारणपणें तीन विभाग पाडतां येतील— १. खानदेश २. देश ३. कोंकण.

(१) **खानदेश**—या भागांत सातपुड्याचा दक्षिणेकडील उतार व त्यांतून निघणारे दक्षिणोत्तर तीन समांतर फाटे आहेत. या भागांतून तापी नदी वाहते. सातपुड्याच्या दक्षिण उतारावर व त्याच बाजूच्या तापी नदीच्या कांठावर चांगलें दाट जंगल आहे. सातपुड्यापासून निघणाऱ्या फाट्यावरहि दाट जंगल असून, मधील सपाट भागांत कांटेरी झुडपांचें जंगल आहे. या भागांत पाऊस साधारण व हवामान विषम आहे. ह्या परिस्थितीला तोंड देतां येईल अशा तऱ्हेची ह्या भागांतील वनस्पतींची रचना असते. झाडांची उंची सर्वसाधारणपणें कमी असते. मुळें लांबवर पसरणारीं व खोल जाणारीं असतात. साल जाड असते पानें लहान आकाराचीं, चीक असलेलीं व केसाळ असतात. कित्येक वनस्पतींना कांटे असतात. कित्येक झाडांचीं पानें उन्हाळ्यांत व हिंवाळ्यांत गळून पडतात. ह्या सर्व गोष्टींमुळें पाण्याची काटकसर होते. सालई, आंवळा,

हिरडा, गोरखचिंच, पांढरी सावर, कवठ, बेल वगैरे वनस्पति ह्या जंगलांत आढळतात.

(२) देश—ह्या प्रदेशाची समुद्रसपाटीपासूनची उंची सर्वसाधारणपणें १८०० फूट आहे. उत्तरेकडील बराचसा भाग साधारण सपाट असून मधून-मधून माथा सपाट असलेल्या टेकड्या आढळतात. बाकीचा पूर्वेकडील उतरता भाग, त्यांतून निघणाऱ्या शाखा, त्यामधील सपाटी, पूर्वेकडे हळूहळू उतरत गेलेला व पुढें विस्तृत झालेला सपाट प्रदेश आहे. ह्या भागांतून भीमा, गोदावरी, कृष्णा, कोयना वगैरे नद्या वाहतात. या डोंगराळ भागांत सुमारें ५० इंच पाऊस पडतो. सपाट प्रदेशांत तो १५ इंचांपर्यंत कमी होत गेलेला आहे. या भागांत कांटेरी झुडपें आढळतात. मोठीं जंगलें फारशीं नाहींत. गवताळ कुरणेंहि आढळतात. ह्या भागांत हिवर, शतावरी, खैर, बोर वगैरे वनस्पति आढळतात.

३. कोंकण— कोंकण, घाटमाथा, मावळ यांत ठाणें, कुलाबा व रत्नागिरी हे जिल्हे व मावळभाग येतो. या प्रदेशांत पाऊस बराच म्हणजे १०० ते २५० इंच इतका पडतो. परंतु हा पाऊस फक्त चार महिन्यांत पडत असल्या-मुळें बाकीचे आठ महिने कोरडे जातात. ह्या भागांत दोन तऱ्हेच्या वनस्पति आढळतात. पहिल्या प्रकारच्या वनस्पतींचें आयुष्य ४ महिन्यांपुरतेंच मर्यादित असतें. दुसऱ्या प्रकारच्या वनस्पति पावसाळ्यांत फोफावतात. परंतु बाकीच्या आठ महिन्यांत त्या कोरड्या हवेंत देखील राहूं शकतात. पहिल्या प्रकारांत निरनिराळ्या वेली, गवतें व लहान झुडपें यांचा समावेश होतो व दुसऱ्या वर्गांत कंदमुळापासून होणाऱ्या चवेणी, रानसुरण, नागदौणा वगैरे वनस्पति येतात. ज्या ठिकाणीं १२ महिने हवा दमट असते. अशा भरपूर पावसाच्या व नदीकांठच्या प्रदेशांत वेगळ्या तऱ्हेच्या वनस्पति आढळतात. ह्या वनस्पती वर्षभर हिरव्यागार असतात. अशा वनस्पतींच्या जंगलांना नित्य पर्णी (Evergreen) जंगलें अशी संज्ञा आहे. अशा जंगलांत करमळ, कोकम-कढीलिंब, जांभूळ, उंबर वगैरे वृक्ष व कर्दळी, रानसुरण अशा खुज्या वनस्पति सांपडतात. समुद्रकांठ व खाड्यांचे किनारे येथें खारट पाण्यावर बारीक झाडें-झुडपें व हरळी आणि लवी वगैरेसारखीं गवतें येतात.

विदर्भ

विदर्भाच्या एकूण ३२ टक्के जमिनीवर जंगल आहे. तज्ज्ञांच्या मतें एकूण भूप्रदेशाच्या १/३ भागावर जंगल असणें आवश्यक आहे. हें प्रमाण

विदर्भांत बरोबर आहे. विशेषतः चांदा जिल्ह्याचा बराच भाग जंगलमय आहे. एकंदर विदर्भांत जंगलाचें जें क्षेत्र आहे त्याच्या निम्में फक्त चांदा जिल्ह्यांत आहे. त्याखालोखाल भंडारा, अमरावती व यवतमाळमध्यें आहे.

मराठवाडा

मराठवाड्यांत जंगलाचें क्षेत्र अगदीं कमी आहे--एकूण क्षेत्राच्या सुमारें ३·२ टक्के. कांहीं प्रमाणांत गवताचीं कुरणें सुद्धां आहेत. चराऊ रानाचें क्षेत्र एकूण जमिनीच्या ४·३ टक्के आहे. ह्या भागांत वर्षाकांठीं सुमारें २७ ते ३३ इंच पाऊस पडतो.

जंगलवाढीच्या योजना

तज्ज्ञांच्या मतें एकूण प्रदेशाच्या १/३ म्हणजे जवळजवळ ३३% भागावर जंगल असणें आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याच्या फक्त २०·७% भागावर जंगल आहे. तेव्हां ह्या राज्यामध्यें जंगलाची वाढ करणें अत्यंत जरूर आहे. त्या दृष्टीनें सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. शेतीकारितां निरुपयोगी असलेल्या सर्व जमिनींत जंगलांची लागवड करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. जंगलवाढीसाठीं योजनाहि आंखण्यांत आल्या आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत जंगलवाढीकारितां १६०·४९ लाख रुपयांची तरतूद आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें खालील योजनांचा समावेश आहे:—

१. १६,००० एकरावर चराऊ जमिनींचा विकास करणें व गवताळ जमिनी अथवा कुरणांच्या सभोंवतीं २०० मैलांवर कांटेरी कुंपण घालणें. या योजनांच्या बाबतींत आतांपर्यंत बरीच प्रगति झाली आहे.

२. जंगलांमधून मिळणारे पदार्थ पद्धतशीर रीतीनें काढण्यासाठीं नवीन प्रकारचे उद्योगधंदे सुरू करणें. त्याचबरोबर अस्तित्वांत असलेल्या उद्योगधंद्यांची पुनर्रचना करणें.

३. जंगलांमध्यें ज्या नवीन वनस्पती लावावयाच्या त्या चांगल्या प्रतीच्या असणें जरूर आहे. त्यासाठीं त्या प्रकारच्या वनस्पतींच्या रोपट्यांच्या बागा करून त्यांची निगा राखणें.

४. उत्पादनाच्या दृष्टीनें विशेष उपयुक्त असणारे वृक्ष व इतर वनस्पति ह्यांची योग्य ठिकाणीं लागवड करणें. उदा०—औषधी वनस्पति, साग वगैरे इमारतींसाठीं लाकूड देणारे वृक्ष वगैरे.

अभयस्थानें व उद्यानें

जंगलाबरोबरच जंगलांतील पशुपक्ष्यांच्या जाती टिकून रहाव्यात म्हणून त्यांच्यासाठीं अभयस्थानें तयार करण्याच्या योजना आंखल्या आहेत. सध्यां दोन ठिकाणीं अशीं अभयस्थानें तयार करण्यांत येत आहेत. एक चांदा जिल्ह्यांत ताडोबा येथें व दुसरें कोल्हापूर जिल्ह्यांत राधानगरी येथें. ताडोबा येथें जंगली पशुपक्ष्यांना त्यांच्या नैसर्गिक वातावरणांत संरक्षित ठेवण्यासाठीं सुप्रसिद्ध ताडोबा सरोवराच्या सभोंवतालच्या ४५ चौरस मैलांच्या टापूंत एक राष्ट्रीय उद्यान तयार करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें अजंठा व वेरूळ येथील जगप्रसिद्ध लेण्यांना साजेशी पार्श्वभूमि तयार करण्यासाठीं तेथील टेकड्यांवर झाडें लावण्याची एक खास योजना हातीं घेण्यांत आली आहे. या टेकड्यांवर चंदनाचीं व त्याच प्रकारचीं इतर शोभिवंत झाडें लावण्यांत येणार आहेत.

जंगल-उत्पादन

महाराष्ट्र राज्याच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या प्रकारची जमीन, हवामान व पर्जन्यमान असल्यामुळें जंगल-संपत्तीहि विविध प्रकारची आहे. जंगलांपासून मिळणाऱ्या मालाचे दोन वर्ग पाडण्यांत आले आहेत. १. प्रमुख–ह्यांत सर्व प्रकारचें लाकूड व इंधन यांचा समावेश होतो. २. गौण–यांत विविध प्रकारच्या प्राणिज, वनस्पतिजन्य व खनिज पदार्थांचा समावेश होतो.

प्रमुख उत्पादन

राज्यांत इमारतींसाठीं व निरनिराळ्या फर्निचरसाठीं उपयुक्त असें लांकूड देणाऱ्या अनेक वनस्पति आहेत. यांमध्यें सर्वांत महत्त्वाची वनस्पति म्हणजे साग ही होय. ह्याशिवाय शिसवीचें लांकूड देखील फर्निचरसाठीं उपयुक्त आहे. उपयोगी लाकूड देणाऱ्या इतर कांहीं वनस्पतींची माहिती खालीं दिलेली आहे :—

(१) **अंजन** :–हा पानझडी प्रकारचा वृक्ष आहे. ह्याचें लाकूड इमारती व कोरीव कामाकरितां उपयोगांत येतें. याच्या अंतर्भागापासून उत्तम प्रकारचा वाख मिळतो. ह्याच्या पाल्याचा गुरांना चारा म्हणून चांगला उपयोग होतो.

(२) **उंडी** :–हा नित्यपर्णी प्रकारचा वृक्ष आहे. ह्याच्या लांकडाचा उपयोग इमारती कामासाठीं तसेंच होड्या व त्यांचे भाग तयार करण्यासाठीं होतो.

(३) **कडुनिंब :**–हा पानझडी प्रकारचा वृक्ष आहे. ह्याचें लांकूड टिकाऊ असतें व त्याला कीड लागत नाहीं. ह्याच्या लांकडाचा इमारती कामासाठीं तसेंच गाड्या, शेतीचीं औतें, फर्निचर, होड्या व मूर्ति करण्याकडे उपयोग होतो. ह्या वृक्षाचा औषधी दृष्टीनें सुद्धां चांगला उपयोग होतो.

(४) **करंज :**–हा नित्यपर्णी वृक्ष असून तो ज्या ठिकाणीं सतत पाण्याचा पुरवठा आहे–उदा० नदी, ओढा वगैरेच्या कांठीं–तेथें आढळतो. ह्याचें लांकूड भक्कम व कणखर असतें. ह्या लांकडाचा उपयोग इमारती कामांसाठीं व गाड्यांचीं चाकें करण्यासाठीं होऊं शकतो. ह्याच्या बियांपासून जें तेल निघतें त्याचा औषधी म्हणून चांगला उपयोग होतो.

(५) **आंभा :**–हा पानझडी वृक्ष असून ह्याचें लांकूड अत्यंत कठीण असतें. ह्या लाकडाचा एक विशेष आहे आणि तो म्हणजे ह्या लांकडास कधींहि वाळवी लागत नाहीं. म्हणून याचा उपयोग शेतीचीं औतें करण्यासाठीं व ज्या ज्या ठिकाणीं पाण्याचा सारखा संबंध येण्याची शक्यता असते त्या ठिकाणच्या लाकूड-कामासाठीं करतात. ह्याच्या पाल्याचा गुरांना चारा म्हणून चांगला उपयोग होतो.

(६) **नागचाफा** — हा नित्यपर्णी वृक्ष आहे. ह्याचें लाकूड जड व कठीण असतें. ह्या लांकडाचा उपयोग ज्या लांकूडकामाचा पाण्याशीं सारखा संबंध येण्याचा संभव असतो त्या कामासाठीं करतात. रेल्वेच्या रुळाखालीं घालण्यासाठीं म्हणूनहि ह्या वृक्षाच्या लाकडाचा चांगला उपयोग होतो.

(७) **फणस** — हा नित्यपर्णी वृक्ष आहे. ह्याचें लांकूड उत्तम उजळा घेते. इमारती व फर्निचरसाठीं ह्या लांकडाचा चांगला उपयोग होतो. ह्याचीं फळें अतिशय मधुर असतात. ह्याच्या पाल्याचा व फळांच्या सालीचा गुरांना चारा म्हणून चांगला उपयोग होतो.

(८) **बाभूळ** — हा कांटेरी वृक्ष आहे. महाराष्ट्र-राज्यामध्यें हा जवळ-जवळ सर्व ठिकाणीं आढळतो. ह्याच्या लांकडाचा इमारती कामासाठीं तसेंच गाड्या व शेतीचीं औतें करण्यासाठीं विशेष उपयोग होतो. ह्याच्या लांकडाचा सरपण म्हणूनहि चांगला उपयोग होतो. ह्याचा डिंक औषधी असतो.

(९) **शिमटी** — हा पानझडी जातीचा वृक्ष आहे. ह्याचें लाकूड फर्निचर, गाड्या, होड्या तसेंच कोरीव व कांतीव कामासाठीं उपयोगांत येतें. आगकाड्या व काड्याच्या पेट्या करण्यासाठींहि ह्यांच्या लांकडाचा उपयोग होतो. ह्याच्या पाल्याचा गुरांना चारा म्हणून चांगला उपयोग होतो.

(१०) हळदा — हा पानझडी वृक्ष आहे. ह्याचें लांकूड कणखर व टिकाऊ असल्यामुळें सर्व प्रकारचें फर्निचर, तेलाचे घाणे, कांतीव काम वगैरेंसाठीं ह्याचा चांगला उपयोग होतो.

वरील वृक्षांशिवाय हेदू, शिवण, शिरीष, वारस, रोहीतक, भोकर, बकुळ वगैरे अनेक वृक्ष आहेत व त्यांच्यापासून चांगल्या प्रकारचें लांकूड मिळूं शकतें.

महाराष्ट्र-राज्यांतील जंगलांत औषधी वनस्पतीहि अनेक सांपडतात. अडुळसा, अनंतमूळ, आंवळा, आस्कंद, कळलावी, काळीमुसळी, किराईत, कुचला, कोरफड, कुडा, गुळवेल, गोखरूं, जितसाया, टेटू, धायटी, निरगुडी, पाडळ, पुनर्नवा, बावची, बिबा, बेल, ब्रह्मी, रक्ताशोक, रानकांदा, रास्ना, लोध्र, वांकेरी, शतावरी, सालवण, सातवीण, हिरडा वगैरे औषधी वनस्पति महाराष्ट्र राज्यांत सांपडतात.

बाभूळ, ऐन, धावडा, खैर, किंदळ, जांभूळ, चिंच, हिरडा वगैरे वृक्षांच्या लांकडाचा इंधन म्हणून चांगला उपयोग होतो.

किरकोळ जंगल माल

किरकोळ जंगल-मालांत मुख्यत्वेंकरून खालील पदार्थ येतात—(१) तंतु व रेशीम. (२) गवत, बांबू व वेत, (३) तेलें, (४) साली आणि रंग, (५) डिंक व रेझीन, (६) प्राणिज व खनिज पदार्थ.

भेंडी, आपटा व आगवे ह्या झाडांपासून तंतु काढतां येतात व ह्या तंतूंपासून दोर तयार करतात. जंगलांत बांबूचीं बनें तसेंच वेत व गवत विपुल प्रमाणांत आढळतात. ह्यांचे उपयोग अनेक आहेत. उदा०—कागद करण्यासाठीं, कुडाचीं घरें बांधण्यासाठीं, टोपल्या वगैरे करण्यासाठीं इत्यादि. उंडी, कडूकवठ, कडूनिंब, करंज, कोकम, कोशिंब, नागचांफा, बकुळ, मालकांगोणी, मोहा, शेवगा वगैरे झांडाच्या बियांपासून तेलें निघतात. ह्या तेलांचा औषधी म्हणून चांगला उपयोग होतो. अलीकडे निलगिरी (युकॅलिप्टस्) तेल काढण्यासाठीं कांहीं भागांत युकॅलिप्टसचीं झाडें लावण्यांत आलीं आहेत. रोशा गवतापासून रोशेल तेल काढतात. ह्या तेलाचा सुगंधी द्रव्यें व साबण तयार करण्यासाठीं पुष्कळ उपयोग होतो. कांहीं झाडांपासून रंग तयार करतात. बाभूळ, धावडा, मोयी, कांडोल वगैरे वृक्षांपासून चांगल्या प्रकारचा डिंक मिळतो. सलालपासून मिळणारें रेझीन औषधीसाठीं व धूपासाठीं वापरण्यात येतें.

प्राणिज व खनिज पदार्थ

ह्यांत (१) लाख, (२) मध आणि मेण व (३) शिंगें आणि कातडीं यांचा समावेश होतो.

(१) **लाख** :– कुसुम, पळस व बोर ह्या वृक्षांवर लाख तयार करणारे लाकीफर लाका या जातीचे किडे पोसले जातात. हे किडे झाडांतील रस खातात व आपल्या शरिरांतून एक प्रकारचा पदार्थ बाहेर टाकतात. हीच अशुद्ध लाख होय. लाखेचा अनेक कामांसाठीं उपयोग होतो. उदा०:–– सिमेंट, वॉर्निश, सीलिंग वॅक्स, शिळाछपाईचीं कामें, ग्रामोफोन रेकॉर्ड्स् तयार करणें वगैरे.

(२) **मध व मेण** :– मधमाशा निरनिराळ्या फुलांतील मध एकत्र करून तो पोळ्यांत सांठवून ठेवतात. अशा प्रकारचीं पोळीं जंगलांत अनेक वृक्षांवर चिकटलेलीं आढळतात. ह्या पोळ्यांतून मध व मेण ह्या गोष्टी मिळतात. मधाचा अन्न व औषधी म्हणून उपयोग होतो. मेणाच्या मेणबत्त्या, सीलिंगवॅक्स वगैरे करण्यासाठीं उपयोग होतो.

(३) **शिंगें व कातडीं** :– वन्य पशूंना मारून त्यांचीं शिंगें व कातडीं विकणें हाहि एक फायदेशीर व्यवसाय आहे. वाघ, चितळ, सांबर वगैरेंच्या कातड्यांना बाजारांत चांगला भाव येतो. सांबर व चितळ यांच्या शिंगांचा उपयोग डिंक व शोभेच्या वस्तु तयार करण्याकडे होतो.

जंगलांत कांहीं खनिज पदार्थहि आढळतात. उदा०—इमारतीसाठीं लागणारा दगड, सडकेवर टाकण्यासाठीं लागणारी खडी, चुनखडी, मुरुम वगैरे जंगलांतील कांहीं भागांत बॉक्साइट, हेमूटाईट, कोळसा इत्यादि किंमती खनिज पदार्थांचे सुद्धां सांठे आहेत.

●●●

५

★

महाराष्ट्रांतील पिकें

महाराष्ट्र राज्य कृषिप्रधान राज्य आहे. त्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील पिकांची जास्त माहिती घेणें योग्य ठरेल. महाराष्ट्रांतील शेतीच्या उत्पादनाचीं दोन वैशिष्ट्यें आहेत. पहिलें म्हणजे ह्या राज्यामध्यें अनेक तऱ्हेचीं अन्नपिकें व बिगर-अन्नपिकें आढळतात व दुसरें वैशिष्ट्य म्हणजे अन्नपिकांचें एकूण शेतकी उत्पादनांत असलेलें महत्त्व. अन्नपिकें व इतर पिकें यांखालील क्षेत्राचें परस्परांशीं प्रमाण ७:३ आहे. महाराष्ट्रांतील महत्त्वाचीं पिकें, त्याखालील क्षेत्र व वार्षिक उत्पादन ह्यासंबंधीचें कोष्टक खालीं दिलें आहे. क्षेत्राचे आंकडे १९५६–५७ सालचे आहेत. वार्षिक उत्पादनाचे आंकडे हे १९५४–५५, ५५–५६ व ५६–५७ या सालांतील उत्पादनाची सरासरी आहे.

(आंकडेवारी 'महाराष्ट्राचें आर्थिक दर्शन' ह्या पुस्तकावरून)

पिकें	क्षेत्र (आंकडे १०० एकरांचे)	वार्षिक उत्पादन (आंकडे १००टनांचे)
तांदूळ	२९,९५५	११,७४१
गहूं	२३,०६४	३,६०८
ज्वारी	१,४१,१३८	२८,००९
बाजरी	४५,९१४	४,६१३
मका	६६२	१७०
नाचणी	५,८४७	१,६६३

हरभरा	११,८५७	१,८३८
तूर	१३,६९२	३,८१७
इतर डाळी	३६,७६७	९,४९१
ऊंस	२,५३४	७,००४
तीळ	३,१४६	२७०
एरंडी	१६९	१९
भुईमूग	२७,५४९	७,६४७
कापूस	६४,७५५	१०,३७०
तंबाखू	७५३	१३२

आतां आपण कांहीं महत्त्वाच्या पिकांची थोडक्यांत माहिती पाहूं.

अन्नपिकें

(१) **तांदूळ किंवा भात**—ह्या पिकास जमीन साधारण प्रतीची चालते, परंतु पाऊस मात्र भरपूर लागतो. म्हणून हें पीक ज्या भागांत पाऊस भरपूर पडतो त्याच भागांत साधारणपणें होतें. भाताच्या शेतांत सतत पाणी राहणें जरूर असतें म्हणून शेताभोंवतीं बांध घालावे लागतात. इतर धान्यांप्रमाणें भाताचें बीं एकदम पेरून चालत नाहीं. प्रथम पेरणी करण्याकरितां जमिनीचा जो लहानसा तुकडा, आंतील मूळ व कीड नाहींशीं करण्याकरितां भाजून तयार करतात, त्यास 'राब' म्हणतात. ह्या 'राब'मध्यें प्रथम पेरणी करतात व फूट-दीडफूट उंचीचें रोपटें तयार झालें म्हणजे तें शेतांत लावतात. पीक तयार होण्यास सुमारें चार महिने लागतात. शेतांत आलेलें भात सडल्यानंतर खाण्यास उपयोगी असे तांदूळ तयार होतात. भाताच्या अनेक जाती आहेत. त्यांपैकीं आंबेमोहोर, कमोद, चिमणसाळ वगैरे जाती उत्तम समजल्या जातात. महाराष्ट्रांत तांदूळ मुख्यत्वेंकरून कोंकणांत (ठाणें, कुलाबा व रत्नागिरी जिल्हा) होतो.

विदर्भांत भंडारा व चांदा, देशावर कोल्हापूर, पुणें व नाशिक या जिल्ह्यांतहि तांदुळाचें उत्पादन होतें. मराठवाड्यांत तांदुळाचें उत्पादन अगदींच थोडें होतें. तांदुळाखालीं महाराष्ट्रांत एकूण सुमारें ३० लक्ष एकर जमीन असून वार्षिक सरासरी उत्पादन ११·५ लाख टन आहे.

(२) **ज्वारी**:—ज्वारीचें पीक वर्षांतून दोनदां निघूं शकतें. एक खरीप हंगामांत व दुसरें रब्बी हंगामांत. या पिकास साधारण कसदार जमीन, उष्ण

हवा व मध्यम पाऊस लागतो. रब्बीच्या हंगामांतील ज्वारी खरिपाच्या हंगामांतील ज्वारीपेक्षां जास्त गोड व पौष्टिक असते. जोंधळ्याच्या पिकास तयार होण्यासाठीं ४–५ महिन्यांचा अवधि लागतो. तें ९ ते १० फूट उंच वाढतें. जोंधळ्याचा कडबा हें गुरांचें उत्तम प्रकारचें खाद्य आहे. महाराष्ट्र राज्यांत ज्वारीचें क्षेत्र एकूण १४१ लक्ष एकर असून वार्षिक सरासरी उत्पादन २८ लाख टन आहे. ह्यापैकीं सुमारें ११ लाख टन उत्पादन पश्चिम महाराष्ट्रांत होतें. पश्चिम महाराष्ट्रांत सर्वांत अधिक उत्पादन सोलापूर, नगर व दक्षिण सातारा ह्या जिल्ह्यांत होतें. त्याखालोखाल पू. खानदेश, उत्तर सातारा, पुणें, कोल्हापूर, प. खानदेश असा क्रम येईल. विदर्भांत सुमारें ९·५ लाख टन ज्वारी पिकते. भंडारा जिल्हा सोडून इतर सर्व जिल्ह्यांत ज्वारीचें उत्पादन होतें. मराठवाड्यांत ज्वारीचें उत्पादन सुमारें ७·५ लाख टन होतें. मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यांत ज्वारी पिकते.

(३) बाजरी:–बाजरीचें पीक साधारणपणें खरीप हंगामांत निघतें. ह्या पिकास पाऊस कमी व हवा उष्ण लागते. बाजरी तयार होण्यास पेरणीपासून सुमारें ४ महिने लागतात. बाजरीच्या पिकाची उंची साधारणपणें ५–६ फूट असते. महाराष्ट्र राज्यांत बाजरीचें एकूण क्षेत्र सुमारें ४६ लाख एकर असून वार्षिक उत्पादन सुमारें ४·५ लाख टन आहे. ह्यापैकीं ८४% बाजरी पश्चिम महाराष्ट्रांत पिकते. सर्वांत अधिक उत्पादन नाशिक जिल्ह्यांत होतें. त्याखालोखाल नगर, पुणें, पश्चिम खानदेश व उत्तर सातारा हे जिल्हे येतात. विदर्भांत बाजरीचें उत्पादन अगदीं थोडें म्हणजे एकूण राज्याच्या उत्पादनाच्या फक्त ३०% होतें. मराठवाड्यांत महाराष्ट्र राज्याच्या उत्पादनाच्या १३% बाजरी पिकते. यापैकीं निम्म्याहून अधिक औरंगाबाद जिल्ह्यांत व त्याखालोखाल बीडमध्यें होते.

(४) गहूं:— गव्हाचें पीक मुख्यत्वेंकरून रब्बीच्या हंगामांत निघतें. गव्हास कोरडी व थंड हवा लागते. गव्हासाठीं काळी व नदीकांठची मळईची जमीन योग्य असते. अशा जमिनींत ओलावा जास्त दिवस टिकवून ठेवण्याची शक्ति असल्यामुळें तेथें गहूं उत्तम होतो. गव्हाचें पीक तयार होण्यास पेरणीपासून सुमारें ४-५ महिने लागतात. गव्हाची शेती जिराईत किंवा बागाईत कोणत्याहि प्रकारची असूं शकते. जिराईत शेतींत शेतगहूं, बनशी वगैरे गव्हाच्या जाती निघतात. बागाईत शेतींत बक्षी, खपली वगैरे जाती निघतात. गहूं हा सर्व धान्यांत अत्यंत पौष्टिक आहे. महाराष्ट्र राज्यांत गव्हाचें एकूण क्षेत्र २३ लाख एकर असून वार्षिक उत्पादन सुमारें ३·५ लाख टन आहे. ह्यापैकीं ३४% उत्पादन पश्चिम महाराष्ट्रांत होतें. ह्या विभागांत गव्हाचें उत्पादन नाशिक व

त्याखालोखाल पश्चिम खानदेश व नगरमध्यें होतें. महाराष्ट्र राज्याच्या एकूण गव्हाच्या उत्पादनाच्या ४०% उत्पादन विदर्भांत होतें. सर्वांत जास्त उत्पादन नागपूर जिल्ह्यांत होतें. त्याशिवाय वर्धा, अकोला, अमरावती, बुलढाणा, चांदा व भंडारा या जिल्ह्यांत देखील गव्हाचें उत्पादन होतें. महाराष्ट्र राज्याच्या एकूण गव्हाच्या उत्पादनाच्या २५% उत्पादन मराठवाड्यांत होतें. औरंगाबाद व परभणी हे जिल्हे गव्हाच्या उत्पादनांत आघाडीवर आहेत.

(५) **डाळींचीं धान्यें** :— ह्यामध्यें तूर, हरभरा, मूग, उडीद, कुळीथ वगैरे धान्यें येतात. पश्चिम महाराष्ट्रांत हीं सर्व डाळींचीं धान्यें पिकतात. तुरीच्या उत्पादनाचे मुख्य प्रदेश म्हणजे सोलापूर जिल्हा व दक्षिण सातारा जिल्हा. हरभरा मुख्यत्वेंकरून नाशिक व नगर जिल्ह्यांत होतो. विदर्भांत तूर व हरभरा यांचें उत्पादन होतें. तुरीचें उत्पादन नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा व अकोला ह्या जिल्ह्यांत होतें. हरभऱ्याचें उत्पादन बहुतेक सर्व जिल्ह्यांत होतें. मराठवाड्यांत तुरीचें उत्पादन उस्मानाबाद, नांदेड, परभणी व औरंगाबाद या जिल्ह्यांत होतें. मराठवाड्यांतील हरभऱ्याच्या उत्पादनाचे मुख्य प्रदेश उस्मानाबाद व नांदेड हे जिल्हे होत.

व्यापारी पिकें

वर सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्र राज्यांतील शेतजमिनीचा फार मोठा हिस्सा अन्नपिकांखालीं आहे.—सुमारें ७०%. बाकीच्या भागावर म्हणजे सुमारें ३०% भागावर व्यापारी पिकें काढण्यांत येतात. ह्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या पिकांची माहिती खालीं दिली आहे.—

(१) **कापूस** :— महाराष्ट्र राज्यांतील कापूस हें एक महत्त्वाचें व्यापारी पीक आहे. परंतु येथील कापूस हा आंखूड धाग्याचा असतो. कापसाच्या पिकास कसदार जमीन, उष्ण व विषम हवा आणि बेताचा पाऊस ह्यांची आवश्यकता असते. पेरल्यापासून कापूस तयार होण्यास सुमारें पांच साडेपांच महिने लागतात. बोंडें जसजशीं फुटून तयार होतात, तसतशीं तीं वेचून कापूस काढावा लागतो. अलीकडे लांब धाग्याच्या कापसाची लागवड करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. महाराष्ट्रांत एकूण ६४ लाख एकर जमीन कापसाखालीं असून, वार्षिक उत्पादन सुमारें १० लाख टन आहे. ह्यापैकीं २२% कापसाचें उत्पादन पश्चिम महाराष्ट्रांत होतें. यापैकीं निम्म्याहून अधिक उत्पादन पूर्व खानदेशमध्यें होतें. त्याखालोखाल पश्चिम खानदेश, अहमदनगर, सोलापूर व

दक्षिण सातारा हे जिल्हे येतात. महाराष्ट्र राज्यांतील एकूण कापसाच्या उत्पादनाच्या ५६% कापसाचें उत्पादन विदर्भांत होतें. विदर्भांतील कापसाच्या उत्पादनाचें प्रदेश म्हणजे अकोला, अमरावती, यवतमाळ व बुलढाणा हे चार जिल्हे होत. वर्धा व नागपूर या जिल्ह्यांत देखील कापूस पिकतो. महाराष्ट्र राज्यांतील एकूण कापसाच्या उत्पादनाच्या २३% कापसाचें उत्पादन मराठवाड्यांत होतें. नांदेड, परभणी व औरंगाबाद हे मराठवाड्यांतील कापसाच्या उत्पादनाचे प्रदेश आहेत

(२) ऊंस -- उसास कसदार जमीन व पाण्याचा सतत पुरवठा ह्या गोष्टींची आवश्यकता असते. महाराष्ट्रांत जेथें कसदार जमीन आहे तेथें पुरेसा पाऊस पडत नाहीं म्हणून जेथें जेथें कालवे काढून जमिनीस पाण्याचा सतत पुरवठा करण्याची सोय केली आहे अशा ठिकाणींच उसाचें पीक येतें. उसाच्या मुख्य दोन जाती आहेत. एक नरम व दुसरा कडक. नरम जातीचा ऊंस जाड, उंच व सरळ असतो. नरम ऊंस साधारणपणें पांढरा व कडक ऊंस तांबडा असतो. उसाचे फूट दीडफूट लांबीचे तुकडे, डोळे वर करून शेतांत पुरतात व ह्या तुकड्यांस कोंब फुटून ऊंस तयार होतो. उसाच्या पिकास बरींच खतें द्यावीं लागतात. ऊंस तयार होण्यास सुमारें अकरा महिने लागतात. महाराष्ट्र राज्यांत उसाचें एकूण क्षेत्र २·५ लाख एकर आहे व वार्षिक उत्पादन सुमारें ७ लाख टन आहे. ह्यापैकीं ९१ टक्के उत्पादन पश्चिम महाराष्ट्रांत होते. उंसाचें उत्पादन मुख्यत्वेंकरून नगर व कोल्हापूर या जिल्ह्यांत होतें. विदर्भ व मराठवाडा यांमध्यें उसाचें उत्पादन फार थोडें आहे. उसापासून साखर व गूळ करण्याचे कारखाने महाराष्ट्रांत बरेच आहेत. महाराष्ट्रांतील उसाचें दर एकरीं उत्पादन भारतांत सर्वांत जास्त आहे.

(३) गळिताचीं धान्यें -- गळिताच्या धान्यांपैकीं भुईमुगाचें सुमारें ४०० हजार टन उत्पादन पश्चिम महाराष्ट्रांत होतें. हें उत्पादन बहुतकरून पूर्व व पश्चिम खानदेश, सोलापूर, उत्तर व दक्षिण सातारा या जिल्ह्यांत होतें. इतर गळिताच्या धान्यांचें उत्पादन पश्चिम महाराष्ट्रांत फारसें होत नाहीं. विदर्भांत जवस व तीळ यांचें उत्पादन होतें. मराठवाड्यांत भुईमुगाचें उत्पादन २८२ हजार टन होतें. तिळाचें उत्पादन मराठवाड्यांत सुमारें ६ हजार टन होतें.

(४) तंबाखू — तंबाखूचें उत्पादन महाराष्ट्र-राज्यामध्यें सुमारें १३ हजार टन होतें. त्यांतील ८५% उत्पादन पश्चिम महाराष्ट्रांत होतें. तंबाखूच्या

उत्पादनासाठीं कोल्हापूर व दक्षिण सातारा हे दोन जिल्हे प्रसिद्ध आहेत. विदर्भामध्यें तंबाखूचें उत्पादन अगदींच कमी म्हणजे १ हजार टनाच्या आसपास आहे. मराठवाड्यांतील तंबाखूचें उत्पादन तर त्यापेक्षांहि कमी म्हणजे सुमारें ७०० टन आहे.

(५) **फळबागा** — महाराष्ट्रांत जमीन व हवामान यांत अनेक ठिकाणीं फरक आढळतो. साहजिकच निरनिराळ्या प्रकारचीं फळें महाराष्ट्रांत होऊं शकतात. विशेषत: कोंकण विभाग हा फळपिकांविषयीं प्रसिद्ध आहे. रत्नागिरी जिल्हा आंब्याविषयीं प्रसिद्ध आहे. अनेक जातींच्या आंब्यांच्या बागा रत्नागिरीला आहेत. रत्नागिरी आंब्यांचा दर्जाहि उत्कृष्ट असतो. रत्नागिरी जिल्ह्याच्या ८५०० एकर जमिनीवर आंब्यांच्या बागा आहेत व वार्षिक उत्पादन २३,००० टन आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील दुसरें प्रसिद्ध फळ म्हणजे काजू. काजूच्या लागवडीचें क्षेत्र रत्नागिरी जिल्ह्यांत सुमारें ४९०० एकर असून वार्षिक उत्पादन सुमारें ६७०० टन आहे. कोंकणांतील तिसरें महत्त्वाचें फळ म्हणजे केळें हें होय. ठाणें जिल्हा केळ्यांसाठीं प्रसिद्ध आहे. तेथें केळ्यांच्या लागवडीखालीं २७०० एकर जमीन असून वार्षिक उत्पादन ३६००० टन आहे. केळीच्या झाडाच्या प्रत्येक भागाचा उपयोग होतो. ह्याशिवाय कोंकणामध्यें नारळाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होतें. नारळाच्या झाडाचा अनेक दृष्टींनीं उपयोग होतो. विदर्भामध्यें नागपूर, अमरावती व वर्धा या जिल्ह्यांत संत्र्यांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन होतें. नागपुरी संत्रीं ही संत्र्यांची प्रसिद्ध व उत्कृष्ट जात आहे. ह्या तीन जिल्ह्यांत मिळून संत्र्याच्या लागवडीखालीं सुमारें २४,००० एकर जमीन आहे व वार्षिक उत्पादन जवळजवळ १ लाख टन आहे.

महाराष्ट्र राज्यांतील अन्नधान्यांचें एकूण उत्पादन सुमारें ६२ लाख टन आहे; म्हणजे दर दिवशीं दर माणशीं अन्नधान्याचें प्रमाण १६·६५ औंस पडतें. एकंदरींत पहातां महाराष्ट्र राज्याची अन्नधान्यांची परिस्थिति फारशी असमाधानकारक नाहीं असेंच म्हणावें लागेल; अर्थात् शेतीचें उत्पादन जास्तींत जास्त वाढावयास पाहिजे, कारण किमान अटी पूर्ण झाल्या म्हणजे कृतकृत्य झालों असें मानावयाचें कारण नाहीं. त्याचबरोबर ही गोष्टसुद्धां लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं, लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे व तितक्या प्रमाणांत अन्नधान्यांचा पुरवठाहि वाढावयास पाहिजे. नुसतीं अन्नधान्यें नव्हेत तर इतरहि पदार्थ उदा० भाजीपाला, दूधदुभत्याचे पदार्थ, फळें, मासळी वगैरेंचें उत्पादन व पुरवठा वाढविण्याचा जास्तींत जास्त प्रयत्न करावयास पाहिजे.

●●●

६

★

शेतजमिनींचा आकार

(SIZE OF HOLDINGS)

महाराष्ट्रांतील बहुसंख्य शेतकरी लहान प्रमाणावर शेती करणारे आहेत. बहुतेकांची जमीन लहान असते व म्हणूनच आर्थिकदृष्ट्या फायदेशीर नसते. खालील कोष्टकामध्यें शेतजमिनीचें क्षेत्रफळ व त्या क्षेत्रफळाच्या किती जमिनी महाराष्ट्रांत आहेत हें दिलें आहे.

शेतजमिनीचें क्षेत्रफळ	जमिनीचे तुकडे
१ एकरापर्यंत	६,२६,४३१
१ एकर ते ५ एकर	१४,१५,०५६
५ ,, ते १० ,,	८,५५,६१०
१० ,, ते १५ ,,	४,६८,०४३
१५ ,, ते २० ,,	२,८९,९६७
२० ,, ते ३० ,,	२,९८,९४६
३० ,, ते ४० ,,	१,५३,८३३
४० ,, ते ५० ,,	८२,३८५
५० ,, ते ७५ ,,	८५,७४४
७५ ,, ते १५० ,,	४८,५३३
१५० ,, ते ३०० ,,	१०,०८०
३०० ,, ते १००० ,,	२,९२१
१००० एकरांपेक्षां जास्त	३५४

(आंकडेवारी Statistical Companion to the Maharashtra Agricultural Lands Bill 1961, ह्या सरकारी प्रकाशनाच्या आधारें).

वरील कोष्टकावरून महाराष्ट्रांतील शेतजमिनीचे किती लहान लहान तुकडे पडले आहेत याची कल्पना येईल, १ एकरापेक्षां कमी क्षेत्रफळ असलेलीं सुमारें ६ लाख शेतें आहेत व १ एकर ते ५ एकर क्षेत्रफळ असलेलीं महाराष्ट्रांत सुमारें १४ लाख शेतें आहेत. हें लक्षांत घेतलें आणि त्याचबरोबर ३०० एकरांपेक्षां जास्त क्षेत्रफळ असलेलीं शेतें किती कमी आहेत हें लक्षांत घेतलें म्हणजे महाराष्ट्रांतील शेती किफायतशीर न होण्याचें एक कारण जमिनीचे लहान लहान तुकडे हें आहे हें सहज लक्षांत येतें. महाराष्ट्र राज्यांतील शेतजमिनीचा सरासरी आकार सुमारें १२ एकर आहे. इतर देशांतील शेतजमिनीचे सरासरी आकार पुढीलप्रमाणें:– ऑस्ट्रेलिया ७७४·६ एकर, कॅनडा २२३·९ एकर, न्यूझीलँड ४९३ एकर, यू. एस्. ए. १६७·७ एकर, इंग्लंड ६२ एकर. इतर देशांशीं तुलना केल्यावर भारतांतील व महाराष्ट्रांतील शेतजमिनीचा लहान आकार जास्तच नजरेत भरतो.

जमिनीचे लहान-लहान तुकडे पडण्याचीं कारणें

(१) महाराष्ट्रांत शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या प्रमाणापेक्षां फार जास्त आहे. त्यामुळें प्रत्येक कुटुंबाच्या वांट्याला फार थोडी जमीन येते.

(२) महाराष्ट्रांत वारसा-हक्काबाबत जो कायदा आहे त्यामुळेंहि शेतजमिनीचे लहान लहान तुकडे पडले आहेत. हिंदु व मुसलमान वारसाकायद्यांप्रमाणें बाप मेल्यानंतर त्याची मालमत्ता त्याच्या सर्व मुलांमध्यें सारख्या प्रमाणांत वांटली जाते. त्यामुळें एखाद्याच्या मालकीची जमीन असली तर ती त्याच्या मुलांत वांटली जाते. प्रत्येक मुलाच्या वांट्याला जी जमीन येते त्या जमिनीचे सारखे तुकडे करून ते त्याच्या मुलांत वांटले जातात. असें वर्षानुवर्षें चालल्यामुळें सध्यांची परिस्थिति निर्माण झाली आहे. ह्यांत आणखी एक मुद्दा आहे. बापाची जमीन जर निरनिराळ्या प्रतीची असेल तर प्रत्येक मुलगा प्रत्येक प्रतीच्या जमिनींत वांटा मागेल. त्यामुळें जमिनीचे आणखीनच लहान लहान तुकडे होतील. उदा०—समजा एखाद्या इसमाची २० एकर जमीन आहे व ती सर्व एकाच प्रतीची आहे. त्या इसमाला चार मुलगे आहेत. त्या इसमाच्यां मृत्यूनंतर प्रत्येक मुलाच्या वांट्याला ५ एकर जमीन येईल. अशा तऱ्हेनें ५ एकराचा एक असे जमिनीचे एकूण चार तुकडे होतील; परंतु समजा हीच जमीन एकूण चार प्रतींची आहे म्हणजे त्या इसमाच्या जमिनींत प्रत्येक प्रतीची ५ एकर जमीन आहे. त्याच्या मृत्यूनंतर प्रत्येक मुलगा प्रत्येक प्रतीच्या

जमिनींत वांटा मागेल. त्यामुळें प्रत्येकीं १। एकर असे एकूण १६ तुकडे या जमिनीचे होतील; आणि त्याबरोबरच प्रत्येकाच्या वांट्याला येणारी ५ एकर जमीन एका ठिकाणीं नसेल. ती चार ठिकाणीं विभागलेली असेल. पहिल्या प्रकाराला Subdivision असें म्हणतात, तर दुसऱ्या प्रकाराला Fragmentation असें म्हणतात.

(३) आधुनिक उद्योगधंद्यांना सुरवात झाल्यामुळें ग्रामोद्योग व कुटीरोद्योग यांचा ऱ्हास झाला. त्यामुळें खेडेगांवांतील लोकांना करण्यासारखा असा शेतीशिवाय दुसरा व्यवसायच उरला नाहीं. तेव्हां प्रत्येकजण उपजीविकेकरितां शेतीवरच अवलंबून राहूं लागला व आपला वांटा मागूं लागला. त्यामुळें जमिनीचे लहान लहान तुकडे पडले.

(४) महाराष्ट्रांतील शेतकरी जमिनीच्या गहाणावर सावकाराकडून कर्ज घेत. कर्जफेड करतां आली नाहीं म्हणजे सावकार जमिनीचा कबजा घेत. त्यामुळें शेतकऱ्याजवळ स्वतःची अशी फारच थोडी जमीन उरे; आणि ही जमीन जेव्हां शेतकऱ्याच्या मुलांमध्यें वांटली जाई तेव्हां साहजिकच जमिनीचे अत्यंत लहान तुकडे होत.

जमिनीचें लहान-लहान तुकडे झाल्यामुळें झालेले तोटे

(१) प्रत्येकाच्या वांट्याला अतिशय थोडी जमीन आल्यामुळें त्याला जमिनीपासून उत्पन्न फारच थोडें मिळतें. तेवढ्या उत्पन्नांत त्याचें व त्याच्या कुटुंबाचें भागणें शक्य नसतें. ह्या कारणामुळेंच महाराष्ट्रांतील शेतकऱ्याची परिस्थिति हलाखीची असते; आणि शेतकऱ्याची परिस्थिति हलाखीची असली कीं शेतीवर तिचा परिणाम होतो. त्यामुळें महाराष्ट्रांतील शेतीचा दर्जाहि खालावला आहे.

(२) जमिनीचे लहान लहान तुकडे पडले कीं बांध, कुंपण वगैरेमध्यें बरीच जमीन फुकट जाते.

(३) लहान जमिनींत लागवड करण्यास जास्त खर्च येतो. एक एकर जमिनीची लागवड करण्यास जो खर्च येतो त्याच्या पन्नास पट खर्च पन्नास एकर जमिनीची लागवड करण्यास येत नाहीं. त्यामुळें निव्वळ उत्पन्न कमी येतें. म्हणून लहान प्रमाणावरील शेती आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होत नाहीं.

(४) जेव्हां एका शेतकऱ्याची जमीन चार किंवा पांच वेगवेगळ्या

ठिकाणीं असते तेव्हां त्याला सर्व ठिकाणीं योग्य देखरेख ठेवतां येणें शक्य नसते. नोकरांवरच त्याला अवलंबून रहावें लागतें. साहजिकच योग्य देखरेख नसल्यामुळें शेतीच्या उत्पादनावर परिणाम होतो.

(५) त्याचबरोबर जमीन वेगवेगळ्या ठिकाणीं विभागलेली असेल तर सर्व जमिनीला कृत्रिम तऱ्हेनें म्हणजे पाट किंवा कालवे यांच्या साहाय्यानें पाणीपुरवठा करणें फारच खर्चाचें जातें.

(६) जमिनीचे लहान लहान तुकडे असल्यामुळें जमिनीच्या सीमांबद्दल शेतकऱ्यांच्यामध्यें नेहमीं तंटेबखेडे चालू असतात. कोर्टकचेऱ्यांत शेतकऱ्याचें पैसेहि खूप जातात व शेतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळें शेतापासून उत्पन्नहि कमी मिळतें.

(७) शेताचा आकार लहान असल्यामुळें यंत्राचा वापर करतां येत नाहीं.

जमिनीचे लहान तुकडे केल्यापासून होणारे फायदे

जमिनीचे लहान लहान तुकडे केल्यानें अनेक तोटे होतात हें आपण वर पाहिलेंच आहे. हे तोटे बरेच असल्यामुळें जमिनीचे तुकडे पाडणें बंद केलें पाहिजे हें अगदीं योग्य आहे. परंतु जमिनीचे तुकडे केल्यानें कांहीं वेळां फायदे होण्याचीहि शक्यता असते. हे फायदे खालीं दिले आहेत. अर्थातच तोट्यांशीं तुलना करतां फायदे फारच थोडे आहेत व हे फायदे मिळविण्याकरितां जमिनीचे तुकडे करावेत असें कोणीहि म्हणणार नाहीं.

(१) शेतकऱ्याची सर्व जमीन एका ठिकाणीं नसून अनेक ठिकाणी विभागलेली असेल तर शेतकऱ्याला सर्व प्रतीच्या जमिनीचा फायदा घेतां येतो. कामाची विभागणीहि चांगल्या प्रकारें करतां येते; म्हणजे आज एका ठिकाणच्या जमिनीची पेरणी करावयाची, उद्यां दुसऱ्या ठिकाणच्या जमीनीची पेरणी करावयाची, असें वेळापत्रक त्याला योग्य प्रकारें बसवितां येते.

(२) जमिनीच्या वारसांमध्यें वांटण्या करण्याच्या पद्धतीमुळें प्रत्येकाला स्वतःच्या मालकीची अशी थोडी तरी जमीन असतेच, त्यामुळें सर्व शेतकऱ्यांमध्यें आर्थिक समता येण्यास मदत होते.

आर्थिक दृष्ट्या परवडेल असा शेतजमिनीचा किमान आकार किती असावा ?

शेतजमिनीचे लहान तुकडे करूं नयेत असें ठरल्यानंतर किती मर्यादेनंतर

जमिनीचे तुकडे करूं द्यावयाचे नाहींत, असा प्रश्न साहजिकच निर्माण होतो. म्हणजेच आर्थिक दृष्ट्या परवडेल असा शेतजमिनीचा किमान आकार किती असावा ह्यावर निर्णय घेतला पाहिजे. ह्यालाच Economic Holding असें म्हणतात. हा आकार अनेक गोष्टींवर अवलंबून असतो–भौगोलिक परिस्थिति, हवामान, सामाजिक संस्था व कायदे, शेतीची पद्धत व शेतीचा हेतु. उदा०:– अन्नपिकें काढावयाचीं कीं व्यापारी पिकें काढावयाचीं? ह्या प्रश्नावर अंतिम निर्णय देणें फार कठीण आहे. भारतामध्यें कांहीं तज्ज्ञांनीं हा आकार ठरवावयाचा प्रयत्न केला आहे. त्यांचीं नांवें व त्यांनीं ठरविलेले आकार खालीलप्रमाणें–

तज्ज्ञांचीं नांवें	Economic Holding
(१) कीटिंग (Keatinge)	साधारण प्रतीची व किमान एक तरी विहीर असलेली ४० ते ५० एकर जमीन.
(२) मॅन (Mann)	२० एकर.
(३) बडोदा आर्थिक चौकशी-समिति	३० ते ५० बिघे.
(४) ल्यूकास (Lucas)	१४ एकरांपेक्षां जास्त.
(५) डार्लिंग (Darling)	बटाई पद्धतीनें लागवड केली जात असल्यास १० ते १२ एकर.
(६) स्टॅनले जीव्हन्स् (Stanley Jevons)	२० ते ३० एकर.
(७) कॉंग्रेस ॲग्रेरियन कमिटी	१५ ते २० एकर.
(८) राघवाचार्य	४ ते ६ एकर.

प्लॅनिंग कमिशननें नेमलेल्या लॅंड रिफॉर्म पॅनेलनें शेतजमिनीच्या आकाराच्या बाबतींत पुढील मत दिलें आहे. "ज्या जमिनीपासून वार्षिक १६०० रु. ढोबळ उत्पन्न किंवा १२०० रु. निव्वळ उत्पन्न मिळत असेल व जी जमीन एका कुटुंबाला (५ माणसांच्या) दोन बैलांच्या साहाय्यानें नांगरतां येणाऱ्या जमिनीपेक्षां आकारानें कमी नसेल अशा जमिनीला Family Holding असें म्हणावें. जमिनीचें कमाल धारणा क्षेत्र ५ किंवा कमी माणसांच्या

कुटुंबाला Family Holding च्या तिप्पट असावें आणि कुटुंबामध्यें ५ पेक्षां जास्त माणसें असल्यास जास्त; परंतु कमाल धारणाक्षेत्र Family Holding च्या सहा पटीपेक्षां केव्हांहि जास्त असूं नये.''

शेतजमिनींचें एकत्रीकरण व तुकडे-बंदी

शेतजमिनींचे लहान लहान तुकडे केल्यामुळें किती तोटे होतात हें आपण वर पाहिलेंच आहे. हे तोटे टाळण्यासाठीं व शेतकी उत्पादन वाढविण्यासाठीं योग्य ती उपाययोजना करणें आवश्यक आहे. ही उपाययोजना दोन प्रकारें करावयास पाहिजे. एक म्हणजे सध्यां असलेल्या जमिनीचे लहान तुकडे करण्यास बंदी केली पाहिजे. एका विशिष्ट मर्यादेपेक्षां कमी आकाराचे जमिनीचे तुकडे करण्यास बंदी केली पाहिजे. त्याचबरोबर सध्यां जे लहान तुकडे अस्तित्वांत आहेत त्यांचें एकत्रीकरण करावयास पाहिजे. ह्याबाबत योग्य ती उपाययोजना महाराष्ट्र सरकारनें केली आहे. १९४७ सालीं ह्याबाबत प्रथम त्या वेळच्या मुंबई सरकारनें कायदा पास केला. या कायद्यामध्यें 'किमान शेत-जमीन' याची व्याख्या करण्यांत आली असून, किमान शेतजिमीनीपेक्षां कमी आकाराचे तुकडे करण्यास बंदी करण्यांत आली आहे. जमिनीच्या खरेदी–विक्रीवर निर्बंध घालण्यांत आले असून जमीन विकणें झाल्यास ती शेजारच्या जमीनमालकासच विकली गेली पाहिजे असें ठरविण्यांत आलें आहे. तो जमीनमालक जर जमिनीची योग्य किंमत देण्यास तयार नसेल तर सरकार ती जमीन विकत घेईल व शेजारच्या जमिनीच्या मालकाला लागवडीसाठीं देईल. या कायद्यान्वयें एकत्रीकरण अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली. ह्या एकत्रीकरण अधिकऱ्यांचें काम म्हणजे गांवासाठीं जास्तींत जास्त फायदेशीर योजना तयार करणें व ती मूर्तस्वरूपांत आणण्याची खटपट करणें. एकत्रीकरण योजनेचा सर्व खर्च सरकार देतें. हा कायदा जुन्या मुंबई राज्यांत महाराष्ट्राचा जो भाग होता त्यालाच फक्त लागू होता. १ एप्रिल १९५९ पासून हा कायदा नव्या महाराष्ट्र राज्यातील सर्व विभागांना लागू करण्यांत आला आहे. तुकडे जोडण्याच्या योजनांचें मूल्यमापन करण्याइतका वेळ जरी अजून लोटला नसला, तरी ज्या खेड्यांत ह्या योजना अंमलांत आल्या आहेत त्या खेड्यांतील शेतकींत व सामाजिक संबंधांत बरीच सुधारणा झाल्याचें आढळून आलें आहे.

सहकारी सोसायट्यांतर्फे तुकड्यांचें एकत्रीकरण घडवून आणणें शक्य आहे. ह्याबाबत एक चांगला मुद्दा असा कीं, सहकारी सोसायट्यांतर्फे झालेलें एकत्रीकरण हें आपखुषीनें केलेलें असेल. कायद्यानें सक्ती करून झालेल्या

एकत्रीकरणापेक्षां लोकांनीं आपणहून घडवून आणलेलें एकत्रीकरण फार चांगलें. कारण यामध्यें लोकांना एकत्रीकरणाचें महत्त्व निश्चितपणें पटलेलें असतें आणि त्यामुळें हें एकत्रीकरण कायम टिकूं शकतें. परंतु सहकारी सोसायट्यां-मार्फत एकत्रीकरण घडवून आणण्याच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत :— (१) सहकारी सोसायट्यांमार्फत एकत्रीकरण अत्यंत सावकाश होईल. (२) बहुतेक शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांकडे गहाण असतात. (३) लोकांमध्यें जागृति होण्यास फार वेळ लागतो. (४) महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांच्या आपल्या जमिनीबद्दलच्या भावना तीव्र स्वरूपाच्या असतात वगैरे......

जमीनधारणेचीं कमाल मर्यादा (Ceiling on Holding)

ज्याप्रमाणें शेतजमिनीच्या किमान आकाराबाबत निर्बंध घालण्यांत आले आहेत, त्याचप्रमाणें प्रत्येक जमीनमालकाजवळ जास्तींत जास्त किती जमीन असावी ह्याबाबतहि सरकारनें नियम केले आहेत. हे निर्बंध घालण्याचा मुख्य हेतु हा कीं, एका ठराविक मर्यादेपेक्षां जास्त असलेली जमीन खाजगी मालकां-कडून घेऊन ती गरजू लोकांस वाटावी व अशा रीतीनें विषमता कमी करावी. जमीनधारणेच्या कमाल मर्यादेसंबंधींचें विधेयक सध्यां महाराष्ट्र विधानसभेपुढें आहे. ह्या विधेयकांत जमीनधारणेच्या कमाल मर्यादा खालीलप्रमाणें ठर-विलेल्या आहेत.

(१)	बागाईत जमीन—१२ महिने भिजणारी	१६	एकर.
(२)	,, ,, —८ महिने ,,	२४	,,
(३)	,, ,, —४ ,, ,,	४८	,,
(४)	जिराईत जमीन	८४ ते १५६	,,

जमीनधारणेच्या कमाल मर्यादा जमिनीची वर्गवारी, हवामान, पाऊस, पिकांची सरासरी, पिकाच्या किंमतीची सरासरी, शेतीमाल, एकंदर आर्थिक परिस्थिति ह्यांचा विचार करून ठरविण्यांत आलेली आहेत. ह्या कमाल मर्यादा ठरवितांना शेतकऱ्याच्या कुटुंबांत पांच माणसें आहेत असें गृहीत धरलेलें आहे. जास्त असल्यास प्रत्येक अधिक माणसासाठीं कमाल मर्यादेच्या $\frac{1}{6}$ इतकी जमीन त्या कुटुंबास धारण करतां येईल. परंतु कोणत्याहि कुटुंबाला कमाल मर्यादेच्या दुप्पटीपेक्षां जास्त जमीन धारण करतां येणार नाहीं. जी जमीन जास्त म्हणून सरकार काढून घेईल. त्या जमिनीबद्दल सरकार मोबदला देईल.

●●●

७

★

सहकारी शेती

महाराष्ट्रांतील शेतजमिनीचे अनेक कारणांमुळें लहान लहान तुकडे पडले आहेत व त्यामुळें महाराष्ट्रांतील शेतीची परिस्थिति फारशी चांगली नाहीं हें आपण मागील प्रकरणांत पाहिलें आहे. ह्या परिस्थितींत जर कांहीं सुधारणा घडवून आणावयाची असेल तर प्रथम जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण करणें जरूर आहे. हें एकत्रीकरण घडवून आणण्याच्या बाबतींत सहकारी शेती फार उपयुक्त ठरेल. ह्या दृष्टीनें सरकारनें सहकारी शेतीचा पुरस्कार केला आहे. सहकारी शेतीचीं प्रमुख वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें :— (१) अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी एकत्र आणून एक शेत बनविलें जातें. (२) जमिनी एकत्र झाल्या तरी प्रत्येक शेतकऱ्याचा आपल्या जमिनीवरील मालकी हक्क कायम रहातो. (३) सहकारी शेतीची व्यवस्था सर्व शेतकरी मिळून पहातात. (४) सहकारी शेतीवर केलेल्या कामाबद्दल प्रत्येकाला वेतन दिलें जातें. (५) आलेल्या उत्पन्नाचा कांहीं भाग राखीव निधि म्हणून बाजूला काढून ठेवला जातो व बाकीच्या उत्पन्नाची सभासदांत वांटणी करण्यांत येते.

सहकारी शेतीचे प्रकार

सहकारी शेती-संस्थांचे चार प्रकार आहेत.—

(१) **सहकारी सुधारलेली शेती-संस्था**:—ह्या संस्थेचा मुख्य हेतु शेतीच्या आधुनिक पद्धतींचा स्वीकार करणें हा असतो. ह्या दृष्टीनें ही संस्था सुधारलेलीं हत्यारें, चांगल्या दर्जाचीं बीं-बियाणें, चांगलीं

Example of Holland -

खतें ह्यांच्या उपयोगास उत्तेजन देतें. त्याचबरोबर पाणी-पुरवठ्याची व्यवस्था व शेतीमालाच्या विक्रीची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करते. थोडक्यांत, ही संस्था एक प्रकारची 'सेवा सहकारी संस्था'च असते. ह्या संस्थेचा सदस्य आपल्या जमिनींची लागवड स्वतंत्र रीतीनें करतो. जमीन एकत्र आणली जात नाहीं.

(२) **सहकारी संयुक्त-शेती-संस्था:—** ह्या संस्थेच्या सदस्यांच्या मालकीची जमीन एकत्र करण्यांत येते, परंतु प्रत्येक सदस्याचा आपल्या जमिनीवरील मालकी हक्क कायम रहातो. ह्या संयुक्त शेतीची व्यवस्था पहाण्यासाठीं सदस्य एक व्यवस्था-समिति निवडतात. ह्या समितीच्या निर्णयानुसार सदस्य संयुक्त-शेतीवर काम करतात. ह्या कामाबद्दल त्यांना योग्य तें वेतन देण्यांत येतें. ह्या शेतीच्या उत्पादनाची संयुक्तपणें विक्री करण्यांत येते. येणाऱ्या उत्पन्नांतून शेतीचा खर्च वजा करण्यांत येतो आणि बाकी राहिलेला भाग सदस्यांना त्यांनीं संयुक्त शेतीवर काम करून मिळविलेल्या वेतनाच्या प्रमाणांत वांटण्यांत येतो. ह्या संस्थेचे उद्देश खालीलप्रमाणें असतात :—(अ) शेतीसाठीं जमिना विकत अगर खंडानें घेणें. (आ) संयुक्त शेती योग्य प्रकारें करण्याकरितां घरें, गुरांचे गोठे व गुदामें विकत घेणें, नवीन बांधणें अगर त्यांची दुरुस्ती करणें. (इ) शेतीसाठीं आवश्यक असलेल्या सर्व वस्तु विकत घेणें, शेतीच्या मालाची विक्री करणें व विक्री करण्यापूर्वी त्या मालावर कांहीं प्रक्रिया करणें जरूर असल्यास ती प्रक्रिया करण्याची व्यवस्था करणें. (ई) जमिनींत सुधारणा करण्यासाठीं, शेतीसाठीं यंत्रसामुग्री विकत घेण्यासाठीं व शेतकामासाठीं सदस्यांना कर्ज देण्यासाठीं म्हणून जमीन, पिकें व इतर मालमत्तेच्या तारणांवर कर्ज उभारणें. (उ) शेतीबरोबरच गुरें पाळणें, भाजीपाला लावणें, फळझाडें लावणें वगैरे उप-व्यवसाय करणें. (ऊ) सदस्यांमध्यें शेतीच्या बाबतींत सहकाराची भावना निर्माण करणें. (ए) सदस्यांमध्यें काटकसरीची व स्वावलंबनाची वृत्ति निर्माण करणें. (ऐ) वेळोवेळीं तज्ञांचा सल्ला मिळविण्याची व्यवस्था करणें व शेतकीविषयक ज्ञानाचा सदस्यांमध्यें प्रसार करणें. महाराष्ट्र राज्यांतील शेतीच्या लहान लहान तुकड्यांच्या समस्येवर उपाय-योजना म्हणून ह्या सहकारी संयुक्त-शेती संस्था फारच उपयुक्त ठरतील.

(३) **सहकारी खंडकरी शेती-संस्था—**ज्या ठिकाणीं खूप जमीन सरकारकडून किंवा जमीनदाराकडून कसण्यासाठीं मिळण्याजोगी असते, त्या ठिकाणीं सहकारी खंडकरी शेती-संस्था स्थापन करण्यांत येते. ही संस्था जमीत कसण्यासाठीं सरकारकडून किंवा जमीनदाराकडून घेते व

तिचे योग्य तुकडे पाडून ते आपल्या सदस्यांना कसण्यासाठीं देते. प्रत्येक सदस्य जमिनीचें भाडें देण्याचें कबूल करतो व संस्थेनें आंखलेल्या योजनेनुसार जमिनीची लागवड करण्याचें कबूल करतो. ह्या संस्थेचीं कार्यें खालीलप्रमाणें :– (अ) कसण्यासाठीं जमिनी विकत अगर खंडानें घेणें. (आ) शेतीला आवश्यक असणारीं हत्यारें व इतर गोष्टी संयुक्तरीत्या विकत घेणें व शेतमालाच्या विक्रीची संयुक्तपणें व्यवस्था करणें. (इ) सदस्यांना बियाणें, खतें व कांहीं गोष्टी विकत घेण्यासाठीं कर्ज मिळण्याची व्यवस्था करणें. जेथें नवीन जमीन प्रथमच लागवडी-खालीं आणावयाची असते तेथें अशा प्रकारची शेती-संस्था आतिशय उपयुक्त ठरते. भूमिहीन मजूर व निर्वासित हे लोक साधारणपणें या संस्थांचे सदस्य होतात.

(४) **सामुदायिक शेती–संस्था:—** ही संस्था सामुदायिक रीतीनें जमिनीची लागवड करण्यासाठीं अस्तित्त्वांत येते. सर्व सदस्य एकत्र येऊन शेती करतात व शेतीचें उत्पन्न ज्या प्रमाणांत सदस्यांनीं शेती यशस्वी करण्याकरितां मदत-श्रम किंवा अन्य साधनांनीं केली असेल त्या प्रमाणांत वांटण्यांत येतें. सामुदायिक शेती-संस्थेचीं वैशिष्ट्यें संयुक्त शेती संस्थेप्रमाणेंच आहेत. फरक एवढाच कीं, संयुक्त-शेती-संस्थेमध्यें जमीन सदस्यांच्या मालकीची असते तर सामुदायिक शेती संस्थेमध्यें संस्थेनें जमीन विकत अगर भाडेपट्ट्यानें कसण्यास घेतलेली असते.

सहकारी शेतीचे फायदे

(१) लहान तुकड्यांचें एकत्रीकरण करून एक मोठें शेत बनविल्यामुळें नवीन तांत्रिक ज्ञान व कौशल्य यांचा उपयोग करणें सुलभ जातें.

(२) सहकारी शेतीमुळें पाणीपुरवठ्याची व्यवस्था सुलभ रीतीनें करतां येते. त्याचबरोबर खतें व चांगलीं बीं-बियाणें मिळतात. जमीन-संरक्षणासाठीं योग्य ती उपाययोजना करतां येते.

(३) शेताचा आकार मोठा असल्यामुळें यंत्रसामुग्रीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेतां येतो. त्यामुळें उत्पादन-खर्च कमी येतो.

(४) संयुक्त व्यवस्थेमुळें गुरांचे गोठे चांगल्या तऱ्हेचे बांधतां येतात. धान्य सांठविण्याची चांगल्या प्रकारें व्यवस्था करता येते व शेतीमालाची विक्रीहि चांगल्या प्रकारें करतां येते.

(५) शेत-जमिनीचे तुकडे पडण्याची भीति नष्ट होते. पिकांचें संरक्षण सुलभ रीतीनें करतां येतें व श्रमविभागणी करतां येते.

(६) शेतकऱ्यांचे मालकी-हक्क कायम राखल्यामुळें जमिनीची लागवड करण्यास व शेतांत काम करण्यास त्यांना पूर्वीइतकाच उत्साह वाटतो.

(७) सहकारी शेतीमुळें शेतकऱ्यांमध्यें सहकाराची भावना निर्माण होते आणि सहकाराच्या तत्त्वाचा सर्व जीवनांत अंगीकार केल्यास त्यांचें जीवन सुखी व समृद्ध होण्याची शक्यता असते.

सहकारी शेतीचे तोटे

(१) शेतकऱ्याला आपला मालकी-हक्क कायम राहिल्याचें नुसतें मानसिक समाधान मिळतें. प्रत्यक्षांत त्याची जमीन सहकारी संस्थेच्या ताब्यांत जाते. त्यामुळें शेतकरी सहकारी संस्थेचा सदस्य होण्यास बऱ्याच वेळा नाखूष असतो.

(२) सहकारी शेती यशस्वी होण्यासाठीं प्रत्येक शेतकऱ्यानें शेतीवर शिस्तीनें व कळकळीनें काम केलें पाहिजे. एखादा शेतकरी जरी आळशी निघाला तरी त्याचा बाकीच्या शेतकऱ्यांवर वाईट परिणाम होण्याचा संभव असतो.

(३) सहकारी शेती संस्थेची संघटना व व्यवस्था योग्य प्रकारें केली पाहिजे. त्यासाठीं संघटना-कुशल व्यक्तींची आवश्यकता असते. अशा तऱ्हेच्या व्यक्ति मिळणें कठीण जातें.

(४) सहकारी शेती-संस्थेच्या सर्व सभासदांत एकी असली पाहिजे. त्यांच्यामध्यें गट पडले व त्या गटांत सत्तेसाठीं जर स्पर्धा सुरू झाली तर त्याच्या उत्पादनावर परिणाम होतो व एखादे वेळेस सहकारी संस्थाच नष्ट होण्याची भीति असते.

सहकारी शेतीची प्रगति

दोन्ही पंचवार्षिक योजनांमध्यें सहकारी शेतीचा पुरस्कार केला आहे. सहकारी शेती-संस्थांना आर्थिक व तांत्रिक मदत देण्याची तरतूद पंचवार्षिक योजनांत केली आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें सहकारी शेतीबद्दलचें धोरण पुढीलप्रमाणें सांगितलें आहे—(१) आर्थिक व तांत्रिक मदत व शेतीमालाची विक्री याबाबत सहकारी शेती-संस्थांना अग्रहक्क द्यावा. (२) सहकारी शेती—संस्थेची जमीन एका ठराविक मर्यादेपेक्षा कमी असतां कामा नये. ही मर्यादा एका कुटुंबास योग्य ठरविलेल्या जमिनीच्या

(Family holding) ४ ते ६ पट असूं शकेल. (३) जमिनींच्या तुकड्यांचें एकत्रीकरण करण्याच्या बाबतींत ज्या खेडेगांवांत सहकारी शेती-संस्था स्थापन झाल्या आहेत अशा खेडेगांवांना अग्रहक्क द्यावा. (४) सरकारच्या मालकीची पड-जमीन लागवडीखालीं आणावयाची असल्यास त्यासाठीं सहकारी शेती-संस्थांना अग्रहक्क द्यावा. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सहकारी शेतीबद्दलचा दृष्टिकोन पुढील शब्दांत सांगितला आहे. " ह्या योजनेचें प्रमुख उद्दिष्ट म्हणजे सहकारी शेतीच्या विकासासाठीं भक्कम पाया तयार करणें. हा पाया तयार झाल्यानंतर पुढील १० वर्षांत शेतजमिनीपैकीं बराचशा भागाची लागवड सहकारी शेती-संस्थांतर्फें करण्यांत येईल " महाराष्ट्र—राज्य सरकार सहकारी शेतीस उत्तेजन देत आहे. ३० जून १९५९ रोजीं महाराष्ट्रांत ६३ संयुक्त शेती-संस्था, ४५ खंडकरी संस्था आणि १४६ सामुदायिक शेती-संस्था अशा एकूण २५४ संस्था होत्या. ह्या संस्थांची सभासदसंख्या ८,१२४ होती आणि ५१,४९६ एकरांपैकीं ३३,२९५ एकर जमीन लागवडीखालीं आणली गेली. त्या वर्षीं सहकारी शेती-संस्थांनीं उत्पादन केलेल्या मालाची किंमत १७०४ लक्ष रुपये झाली. या संस्थांना सरकारी कर्ज आणि आर्थिक मदत या रूपानें अनुक्रमें १०·७० लक्ष आणि ४·१६ लक्ष रुपये देण्यांत आले. शेतीच्या व शेतकऱ्यांचा उत्कर्ष घडवून आणावयाचा असेल तर त्यासाठीं सहकारी शेती हा एकच उपाय आहे व त्या दृष्टीनें सहकारी शेतीचा जास्तींत जास्त प्रसार केला पाहिजे.

● ● ●

८

★

शेतीचीं अवजारें

शेती करण्यासाठीं साधनांची आवश्यकता असते. हीं साधनें संख्येनें थोडीं, आकारानें लहान व कमी किंमतीचीं असतात. महाराष्ट्रांतील शेतकऱ्याजवळ साधारणपणें पुढील अवजारें असतात– (१) नांगर–हा नांगर बैलजोडीच्या साहाय्यानें चालवितां येतो. शेतांतील माती खालीवर करण्यासाठीं ह्याचा उपयोग होतो. जुन्या प्रकारच्या नांगरानें शेतांतील वरील कांहीं इंच जमीनच फक्त खणून काढली जाते. ह्या नांगराचे फक्त दोनच फायदे आहेत. एक म्हणजे तो चालविण्यासाठीं फक्त एका बैलजोडीचीच आवश्यकता असते व दुसरा म्हणजे ह्या नागरानें जमीन नांगरल्यावर जमिनींतील आर्द्रता बाष्पीभवनाच्या योगानें नष्ट होत नाहीं. (२) लांकडी जूं–ह्यामुळें बैल नांगराला अगर मोटेला जोडतां येतात. (३) पेरणीसाठीं वांबूचें केलेलें एक साधन. ह्यामुळें बीं सर्वकडे सारखें पेरलें जातें. (४) पाटा– पेरणीपूर्वी जमीन सारखी करण्यासाठीं उपयोगांत आणलें जाणारें एक साधन. (५) लांकडाचें भक्कम दांडकें– मातीचीं ढेकळें मोडण्यासाठीं याचा उपयोग करतात. (६) मोट– विहिरींतून पाणी काढण्यासाठीं. (७) मोटेचा जाड व बळकट दोर. (८) मोट लावण्यासाठीं विहिरीवर उभें करण्यांत आलेलें लांकडी बांधकाम. (९) कुदळ. (१०) खुरपीं. (११) तण व गवत काढण्याचें पांच दांते असलेलें हत्यार. (१२) बैलगाडी– धान्यांची व माणसांची नेआण करण्यासाठीं वगैरे...... ह्या अवजारांमध्यें सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत व आतांपर्यंतहि ह्या अवजारांमध्यें कांहीं सुधारणा घडवून आणल्या गेल्या आहेत. परंतु झालेली प्रगति अत्यंत थोडी आहे व अजूनपर्यंत बरेंच काम करावयाचें बाकी आहे. आतांपर्यंत ह्या अवजारांमध्यें ज्या

कांहीं सुधारणा केलेल्या आहेत त्या सुधारणांमुळें हीं अवजारें जास्त परिणामकारक झालेलीं आहेत. तीं हलकीं असल्यामुळें तीं चालविण्यासाठीं बैल व माणसें ह्याचे पूर्वींपेक्षां कमी श्रम लागतात. त्यामुळें पूर्वींपेक्षां कमी बैलांत काम भागूं शकतें. प्रत्येक शेतकऱ्याजवळ आतां कमी बैल असल्यामुळें ह्या बैलांना तो चांगल्या प्रकारें खाऊपिऊं घालण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नवीन अवजारें जास्त परिणामकारक असल्यामुळें काम पूर्वींपेक्षा चांगलें व झटपट होतें.

शेतीचें यांत्रिकीकरण

शेतीचें यांत्रिकीकरण (mechanisation) हे शब्द अत्यंत व्यापक अर्थानें वापरले जातात. नांगरणी, पेरणी व कापणी यांसाठीं केलेल्या यंत्रांच्या उपयोगाचा त्यांत समावेश होतोच, परंतु त्याचबरोबर पाणी-पुरवठा, शेतीमालाची वाहतूक, शेतीमालावरील प्रक्रिया वगैरे शेतीच्या इतर सर्व अंगांमध्यें केलेल्या यंत्रांच्या उपयोगाचा त्यांत अंतर्भाव होतो. शेतीचें यांत्रिकीकरण म्हणजे पूर्वीं जीं कामें मनुष्य व बैल यांच्या श्रमानें होत असत तीं आतां यंत्रबळानें करणें. शेतीच्या यांत्रिकीकरणाचे दोन प्रकार आहेत. गतिशील यांत्रिकीकरण व स्थिर यांत्रिकीकरण. गतिशील यांत्रिकीकरणाचा मुख्य उद्देश पूर्वीं जीं कामें जनावरांच्या साहाय्यानें केलीं जात असत तीं यंत्र-बळानें करणें हा असतो; तर स्थिर यांत्रिकीकरणाचा उद्देश शेतीबाबतचीं जीं कामें अत्यंत त्रासदायक व कंटाळवाणीं असतात व जीं सध्यां माणसांना स्वतः किंवा जनावरांच्या मदतीनें करावीं लागतात तीं यंत्रांच्या साहाय्यानें करणें व अशा तऱ्हेनें शेतीच्या कामांतील त्रासदायकपणा दूर करणें हा असतो.शेतीच्या यंत्रांमध्यें साधारणपणें पुढील यंत्रांचा समावेश होतो :– (१) ट्रॅक्टर– यांचा नांगरणी-साठीं उपयोग होतो. (२) कम्बाईंड ड्रिल (Combined Drill)— याचा पेरणीसाठीं व पेरणी करीत असतांनाच खत टाकण्यासाठीं अशा दुहेरी उपयोग होतो. (३) कम्बाईंड हार्वेस्टर–याचा कापणीसाठीं व धान्य वेगळें करण्यासाठीं उपयोग होतो. (४) पोटॅटो हार्वेस्टर–बटाटे खणून काढणें, एकत्र गोळा करणें, त्यांची प्रतवारी लावणें, वजन करणें व ट्रकमध्यें बटाटे नेऊन टाकणें हीं कामें हें यंत्र करतें. (५) कॉटन पीकर–कापसाच्या बोंडांतून कापूस काढण्याचें काम हें यंत्र करतें. (६) शुगरकेन हार्वेस्टर– हें यंत्र ऊंस कापण्याचें व ट्रकमध्यें नेऊन टाकण्याच काम करतें. याशिवाय सरकी काढून कापसाचे गठ्ठे बांधणारीं यंत्रें, धान्यें सडण्याच्या गिरण्या वगैरे शेतीमालावर प्रक्रिया करणारीं यंत्रें आहेतच. शेतीमालाची वाहतूक करण्यासाठीं आधुनिक साधनांचा उपयोग करण्यांत येतो. शेतावर जंतुनाशक औषधांचे फवारे मारण्यासाठीं अलीकडे विमानांचा देखील

उपयोग करण्यांत येतो. अशा तऱ्हेनें शेतीचीं बहुतेक सर्व कामें अलीकडे यंत्रांच्या साहाय्यानें करतां येतात.

यांत्रिकीकरणाचे फायदे व तोटे

(१) **उत्पादनांत वाढ होते** :– यंत्रामुळें कामें चांगलीं व झटपट होतात. उदा–जर शेत साध्या नांगरानें (बैलजोडीच्या साहाय्यानें) नांगरलें तर शेतांतील वरच्या कांहीं इंचांतील जमीनच फक्त खणली जाते व शेत नांगरायला वेळहि फार लागतो. नांगराऐवजी जर ट्रॅक्टर वापरला तर जमीन खोलवर खणली जाते व ट्रॅक्टरचा वेग जास्त असल्यामुळें मोठें शेतसुद्धां थोड्या वेळांत नांगरलें जातें. शेतीचीं सर्व कामें जर चांगलीं व अगदीं वेळेंत झालीं तर साहजिकच शेतीच्या उत्पादनांत वाढ होते.

(२) **कार्यक्षमता वाढते**:—माणसें किंवा जनावरें यांच्यापेक्षां यंत्रांची काम करण्याची शक्ति केव्हांहि जास्त असल्यामुळें यंत्रांच्या साहाय्यानें शेती केल्यास ती जास्त चांगल्या प्रकारें करतां येते.

(३) एक यंत्र अनेक माणसें व जनावरें यांचें काम करूं शकत असल्यामुळें शेतीसाठीं कमी माणसें व जनावरें असलीं तरी चालतें.

(४) यांत्रिकीकरणामुळें उत्पादन–खर्च कमी होतो. यंत्रांमुळें एक ठराविक उत्पादन काढण्याकरिता जेवढा खर्च येतो, त्यापेक्षां जास्त खर्च तेवढेंच उत्पादन जनावरांच्या साहाय्यानें काढण्यास लागतो, ही गोष्ट प्रयोगानें सिद्ध करण्यात आली आहे.

(५) यंत्रांच्या साहाय्यानें पडीक जमीन लागवडीखाली आणणें सुलभ जातें.

(६) यंत्रांमुळें शेतकऱ्याचे श्रम व वेळ यांची बचत होते. त्याचें उत्पन्न वाढतें. साहजिकच यंत्रांमुळें शेतकऱ्याचें आयुष्य सुखी होण्यास मदत होते.

यांत्रिकीकरणामुळें एकच तोटा होतो आणि तो फारच गंभीर आहे. हा तोटा म्हणजे यंत्रांचा उपयोग केल्यास शेतीसाठी पूर्वीइतक्या माणसांची गरज लागत नाहीं, त्यामुळें बेकारी वाढते. भारतासारख्या देशांत जेथें आधीच बेकारी फार मोठ्या प्रमाणांत आहे, तेथें यंत्रांचा उपयोग करून आणखी बेकारी वाढवणें योग्य आहे काय याचा खरोखरच गंभीरपणें विचार

केला पाहिजे. त्याचबरोबर यंत्रें विकत घेण्यासाठीं फार मोठ्या भांडवलाची गरज असते. एवढें भांडवल भारतांतील गरीब शेतकरी जमा करणें शक्य नाहीं. येथील मजुरीचे दरहि फार कमी आहेत. त्यामुळें यंत्रांपेक्षा मजूर लावणें सोयीचें जातें.

शेतीच्या यांत्रिकीकरणाचे फायदे व तोटे आपण वर पाहिलेच आहेत. महाराष्ट्रांतील शेतीच्या यांत्रिकीकरणाच्या बाबतींत खालील अडचणी आहेत.– (१) यांत्रिकीकरणासाठीं शेतीचें क्षेत्र मोठें असावें लागतें. लहान लहान शेतांवर यंत्रांचा उपयोग करणें फार जड जातें. महाराष्ट्रांतील बहुसंख्य शेतें लहान आकाराचीं आहेत.

(२) यंत्रें विकत आणण्यासाठीं मोठ्या प्रमाणावर भांडवल लागतः महाराष्ट्रांताल बहुतेक सर्व शेतकऱ्यांची परिस्थिति गरिबीची आहे. अत्यंत साधी व कमी किंमतीचीं अवजारें घेण्यासाठींहि त्यांच्याजवळ पैसा नसतो. अशा स्थितींत महाराष्ट्रांतील शेतकरी आपणहून यंत्रें घेतील अशी कल्पनासुद्धां करणें शक्य नाहीं.

(३) महाराष्ट्रांत अगोदरच मोठ्या प्रमाणावर बेकारी आहे. त्यांतच शेतीवरील लोकसंख्येचा भार प्रमाणापेक्षां जास्त आहे. अशा स्थितींत जर का शेतीसाठीं यंत्रांचा उपयोग केला तर शेकडों लोकांना आपल्या रोजगाराला मुकावें लागेल व बेकारीच्या आधीच गंभीर असलेल्या समस्येंत जास्त भर पडेल.

(४) महाराष्ट्रांतील मजुरीचे दर कमी आहेत; त्यामुळें यंत्रांचा उपयोग करण्यापेक्षां मजूर लावणें जास्त सोयीचें जातें.

ह्यावरून शेतीचें यांत्रिकीकरण करण्यास महाराष्ट्रांत फारसा वाव नाहीं हें उघड आहे. परंतु त्याचबरोबर हेंही नमूद केलें पाहिजे कीं, कांहीं विशिष्ट क्षेत्रांत यंत्रांचा वापर करणें शक्य आहे. सहकारी शेती-संस्थांना आपल्या शेतींत यंत्रांचा उपयोग करणें शक्य आहे. पड-जमीन यंत्रांच्या साहाय्यानें लागवडीखालीं आणणें सुलभ जाईल. पाणी-पुरवठा, वाहतूक, शेतीमालावर प्रक्रिया यांसाठीं यंत्रांचा उपयोग करतां येणें शक्य आहे. सरकारी शेतांवर तर यंत्रांचा उपयोग करणें सहज शक्य आहे. जेथें जेथें सोयींचें आहे तेथें तेथें यंत्रांचा उपयोग करण्यास महाराष्ट्रांत सुरवात झाली आहे. राज्य सरकारनें

आपल्या शेतांवर यंत्रें वापरण्यास सुरवात केली आहेच. त्याचबरोबर इतर शेतकऱ्यांना ट्रॅक्टर्स घेण्यासाठीं राज्य-सरकार कांहीं मदतहि देतें. महाराष्ट्रांत सध्यां वापरांत असलेले ट्रॅक्टर्स, ऑईल इंजिन्स्, इलेक्ट्रिक पंप व उसाचें लोखंडी चरक ह्याबाबतची आंकडेवारी खालील कोष्टकांत दिली आहे.

	पश्चिम महाराष्ट्र	विदर्भ	मराठवाडा
ट्रॅक्टर्स	५६०	७००	१०३९
ऑईल इंजिन्स	२१,२१२	२७०१	२७०३
इलेक्ट्रिक पंप	४७४	१४८६	७३
उसाचे लोखंडी चरक	९,२३७	२११६	२७७१

वरील कोष्टकांवरून असें दिसून येईल कीं, महाराष्ट्र राज्यांत एकूण २२९९ ट्रॅक्टर्स, २६६१७ ऑईल इंजिन्स्, २०३३ इलेक्ट्रिक पंप व १४१२४ उंसाचे लोखंडी चरक वापरांत आहेत.

(आंकडेवारी 'महाराष्ट्राचें आर्थिक दर्शन' वरून)

●●●

१

★

ग्रामीण पत-पुरवठा व सहकारी चळवळ

महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति पाहिली तर बहुसंख्य शेतकरी कर्जबाजारी असल्याचें आढळून येतें. ह्या कर्जबाजारीपणाचीं कारणें अनेक आहेत. प्रमुख कारणें पुढीलप्रमाणें— (१) कुटीरोद्योगांचा ऱ्हास झाल्यामुळें शेतकऱ्यांना उपजीविकेसाठीं फक्त शेतीवरच अवलंबून रहावें लागतें. (२) शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या वाढली आहे परंतु लागवडी-खालील जमिनींत मात्र फारशी वाढ झाली नाहीं. (३) जमिनीचे लहान लहान तुकडे पडल्यामुळें शेती आर्थिक दृष्टया किफायतशीर राहिली नाहीं. (४) शेती करण्याच्या पद्धतींत म्हणावी तितकी सुधारणा झाली नाहीं. (५) पावसाची अनिश्चितता व कृत्रिम तऱ्हेनें पाणीपुरवठा करण्याच्या अपुऱ्या सोयी, त्यामुळें शेतीपासून अमुक एक उत्पन्न येईल असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. (६) बहुसंख्य शेतकरी अडाणी आहेत व त्याचबरोबर लग्न व इत प्रसंगीं मागचापुढचा विचार न करतां ते बराच पैसा खर्च करतात व (७) ग्रामीण विभागांत पत-पुरवठा करण्याच्या सोयी सदोष आहेत. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हा शेतीच्या विकासांतील एक मोठा अडथळा आहे व हा प्रश्न शक्य तेवढ्या लवकर सोडवला पाहिजे. वर अनेक कारणें दिलीं आहेत तीं सर्व कारणें दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ह्या प्रकरणांत आपण ग्रामीण विभागांत पत-पुरवठा करणाऱ्या संस्थांचा विचार करणार आहोंत. इतर कारणांबाबतचा ऊहापोह इतरत्र केलेला आहे.

शेतीसाठीं तीन प्रकारचीं कर्जें लागतात. (१) चालू कामासाठीं, बी-बियाणें, खतें, मजुरी वगैरेसाठीं अल्प-मुदतीचें कर्ज लागतें. (२) बैल-खरेदी, विहीर-दुरुस्ती ह्यासाठीं मध्यम मुदतीचें (२ ते ३ वर्षें) कर्ज लागतें. व (३) जमीन-खरेदी, एंजिन्स-खरेदी वगैरेसाठीं लांब मुदतीचें कर्ज लागतें.

शेतीसाठीं कर्जपुरवठा करणाऱ्या व्यक्ति व संस्था

(१) सावकार, २) सराफी पेढीवाले (Indigenous banker), (३) व्यापारी बँका, (४) सरकार व (५) सहकारी संस्था.

(१) **सावकार**—ह्या सावकारांचे तीन प्रकार आहेत. पहिला प्रकार धंदेवाईक सावकारांचा. पैसा कर्जाऊ देणें हा यांचा मुख्य व्यवसाय असतो. हे सावकार लहान-मोठीं सर्व कर्जें शेतकऱ्यांना देतात. लहान कर्जासाठीं ऋणकोचा शब्द हेंच तारण असतें. कांहीं वेळेला सावकार हिशेबाच्या पुस्तकांत कर्जाची नोंद करतात तर कांहीं वेळेला तीसुद्धा करीत नाहींत. मोठ्या रकमेचें कर्ज हवें असेल तर मात्र ऋणकोला वचन-चिठ्ठी (Promissory Note) लिहून द्यावी लागते. कर्जाची रकम मोठी असेल तर त्यासाठीं तारण म्हणून जमीन अगर सोनें वगैरे सावकाराकडे गहाण ठेवावें लागतें. हे सावकार कर्ज कशाकरितां हवें आहे वगैरे कोणत्याहि गोष्टींची चौकशी करीत नाहींत. कर्ज पैशांत किंवा इतर कोणत्याहि रूपांत दिलें जातें. व्याज चक्रवाढ पद्धतीनें आकारलें जातें. हे सावकार कर्जाच्या परतफेडीबद्दल फारसा आग्रह धरीत नाहींत. ठरलेल्या मुदतींत जर कर्जफेड करतां आली नाहीं तर मुदत वाढवण्यास ते फारशी खळखळ करीत नाहींत. परंतु व्याजाच्या बाबतींत मात्र ते फार कांटेकोर असतात; कारण तोच त्यांच्या उत्पन्नाच्या मुख्य मार्ग असतो. सावकार शेतकऱ्याला कर्ज देण्यास केव्हांहि तयार असतात व कर्ज मिळविण्यासाठीं अर्ज वगैरे औपचारिक गोष्टींत वेळहि घालवावा लागत नाहीं; त्यामुळें शेतकऱ्यांना सावकार सोयीचे वाटतात. सावकारांचा दुसरा प्रकार म्हणजे व्यापारी सावकारांचा होय. हे सावकार व धंदेवाईक सावकार ह्यांत जवळजवळ कांहींच फरक नाहीं. व्यापारी सावकारांचा पैसे कर्जाऊ देणें हा प्रमुख व्यवसाय म्हणतां येत नाहीं एवढाच फक्त फरक. तिसरा प्रकार म्हणजे जमीनदार सावकारांचा होय. ह्यांच्या सावकारीचा पद्धति वरीलप्रमाणेंच असतात; परंतु शेतकऱ्यांच्या दृष्टीनें हे सावकार अतिशय त्रासदायक असतात. हे स्वतः जमीनदार असल्यामुळें शेतकऱ्याची जमीन गिळंकृत करण्याच्या हेतूनेंच हे कर्जाचे व्यवहार करतात. अगदीं अलीकडच्या काळापर्यंत हे सावकार शेतकऱ्यांच्या अडाणीपणाचा व

अगतिकतेचा गैरफायदा घेत असत. त्यांच्याकडून भारी दरानें व्याज घेत असत व इतर अनेक प्रकारांनीं त्यांना फसवीत असत. परंतु अलीकडे सरकारनें ह्या बाबतींत कायदे केल्यामुळें शेतकऱ्यांची फसवणूक बऱ्याच प्रमाणांत कमी झाली आहे.

(२) सराफी पेढीवाले (इंडीजनस बँकर्स):—सराफी पेढीवाले आपल्या देशांत फार पूर्वीपासून अस्तित्वांत आहेत. हा व्यवसाय करणाऱ्यांची एक स्वतंत्र जातच निर्माण झाली आहे ही एकच गोष्ट ह्यांचें प्राचीनत्व व आर्थिक व्यवस्थेंतील महत्त्व सिद्ध करण्यास पुरेशी आहे. ह्या पेढीवाल्यांच्या अनेक शाखा असतात. प्रत्येक शाखेवरील व्यवस्थापकास मुनीम किंवा गुमास्ता असें म्हणतात. ह्या मुनीमांना किंवा गुमास्त्यांना मुख्य कचेरीकडे ठराविक काळानें हिशेब धाडावे लागतात व कांहीं वेळेला शाखांची मुख्य कचेरीकडून तपासणीहि होते. कांहीं कांहीं ठिकाणीं ह्या पेढीवाल्यांनीं आपल्या संघटना स्थापन केल्या आहेत. उदा.— मुंबईची Shroffs' Association किंवा दि मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स वगैरे...हा धंदा पिढीजात असल्यामुळें मुलाला ह्या धंद्याचें शिक्षण बापाकडून आपोआप मिळतें. ह्यांच्या व्यवसायाच्या पद्धति औपचारिक नसतात, त्यामुळें व्यवहाराला वेळ लागत नाहीं. ह्यांच्या कचेरीची मांडणी साधी असते. हिशेबाची पद्धत देखील चोख असते. ग्राहकांचा व पेढीचा बऱ्याच वेळां पिढीजात संबंध असल्यामुळें कोणाला किती व कोणत्या अटींवर कर्ज द्यावयाचें ह्याचा निर्णय पटकन् घेतां येतो. ह्या पेढीवाल्यांचा व्यवहार सचोटीनें व जबाबदारीची योग्य जाणीव ठेवून करण्यांत येत असल्यामुळें, ह्या पेढीवाल्यांना समाजांत बरीच मानमान्यता मिळते. हे पेढीवाले लोकांकडून ठेवींच्या रूपानें पैसे घेतात व ठेवीदारांना व्याज देतात. हुंडीचा व्यवहारहि हे पेढीवाले करतात. अडचणीच्या प्रसंगीं ते एकमेकांना मदत करतात. हे पेढीवाले सावकारामार्फत शेतकऱ्यांना कर्ज देतात. कांहीं वेळेला लेखी वचन-चिठ्ठी घेऊन हे कर्ज देतात. जमीन, घर व इतर मालमत्तेच्या तारणावर हे पेढीवाले मोठ्या रकमेची कर्जें देतात. आधुनिक व्यापारी बँका व सहकारी-संस्था ह्यांचाकडून मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या स्पर्धेमुळे यांच्या व्यवहाराला मर्यादा बसूं लागली आहे. रिझर्व्ह बँक व सराफी पेढीवाले यांचा प्रत्यक्ष संबंध घडून येणें भारतीय नाणें-बाजार व पेढीवाले या दोघांच्या दृष्टीनें इष्ट आहे व ह्या मार्गानें रिझर्व्ह बँकेचे योग्य ते प्रयत्न सुरू आहेत.

(३) व्यापारी बँका:—व्यापारी बँका व दि स्टेट बँक ऑफ इंडिया ह्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अशी फारशी मदत करत नाहींत, कारण त्यांचा तो व्यवसायच

नाहीं. कांहीं बँका मात्र मोठ्या जमीनदारांना प्रत्यक्ष कर्ज देतात. स्टेट बँक सुद्धां कांहीं वेळां व्यक्तिगत तारणावर अशीं कर्जें देते. अप्रत्यक्षरीत्या ह्या बँका शेतीला मोठ्या प्रमाणावर कर्ज देतात; कारण खेडेगांवांतील सावकार व सराफी पेढीवाले हे बऱ्याच वेळां व्यापारी बँकांकडून कर्ज घेऊन ते शेतकऱ्यांना देतात.

(४) **सरकारः—** सरकारनें ग्रामीण पतपुरवठ्याच्या बाबतींत १९ व्या शतकाच्या अखेरीस लक्ष घालण्यास सुरवात केली. सरकारनें सावकारांच्या वाईट कृत्यांना आळा घालण्यासाठीं, ऋणकोंना संरक्षण देण्यासाठीं व शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अशी कांहीं मदत देण्यासाठी ॲग्रिकल्चरल लोन्स ॲक्ट, युझिरिअस लोन्स ॲक्ट, लँड इम्प्रूव्हमेंट ॲक्ट वगैरे कायदे पास केले. ह्या कायद्यांनीं शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास खूपच मदत झाली आहे. सरकारी कायद्यांनी शेतकऱ्यांना अल्प मुदतीसाठीं व लांब मुदतीसाठीं तगाई कर्ज मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. १९४७ सालीं मुंबई प्रांतांत शेतकरी कर्ज निवारण कायदा करण्यांत आला. ह्या कायद्याचा हेतु मुंबई राज्यांतील जे शेतकरी कर्जांत बुडल्यामुळें आज शेती-उत्पादनांत उत्साहानें भाग घेऊं शकत नाहींत, त्यांना कर्जमुक्त करणें व ते कर्जमुक्त होईपर्यंत निरनिराळ्या आर्थिक व कायदेशीर सवलती देण्याचा आहे. त्याच सालीं मुंबई सरकारनें सावकारी नियंत्रण कायदा पास केला. या कायद्याचा उद्देश सावकारी कर्ज-व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचा आहे. ह्याशिवाय रिझर्व्ह बँकेमध्यें ॲग्रिकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंट या नांवाचें एक खातें निर्माण करण्यांत आलें असून हें खातें ग्रामीण विभागांतील पत–पुरवठ्याच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष देतें.

(५) **सहकारी संस्था—** सहकारी चळवळीचा एक मुख्य उद्देश शेतकऱ्यांना कर्ज–पुरवठा करणें हा आहे. सहकारी पद्धतीवर चालविलेल्या ग्रामीण पतपेढ्या महाराष्ट्रांत मोठ्या संख्येनें आहेत. ह्या बाबतींत इतर राज्यांच्या मानानें महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. कर्ज देण्याच्या पद्धतींत अलीकडे सुधारणा घडवून आणली आहे. पूर्वीं कर्ज देतांना शेतकऱ्यांच्या जमिनीचाच फक्त विचार करीत असत; परंतु पिकाची खात्री असल्याशिवाय कर्जफेडीची शाश्वती नव्हती. अलीकडे जमिनींतून निव्वळ उत्पन्न किती मिळेल ह्याचा विचार करून कर्ज देण्यांत येऊं लागलें आहे. ह्या योजनेमुळें शेतकऱ्यांना योग्य कर्ज मिळूं लागलें आहे व हें कर्ज फेडणें शेतकऱ्यांना फारसें कठिणहि जात नाहीं. ग्रामीण पतपुरवठ्याच्या क्षेत्रांत सहकारी पतपेढ्या फारच महत्वाचें कार्य करीत आहेत व सरकारहि ह्यांना सक्रिय सहानुभूति दाखवीत आहे. भविष्य काळांत सहकारी पतपेढ्या ग्रामीण पत-पुरवठ्याच्या क्षेत्रांत

सर्वांत जास्त महत्त्व मिळवणार ह्यांत शंका नाहीं. महाराष्ट्र राज्यांतील १९५८–५९ सालची ग्रामीण पत-पेढ्यासंबंधींची महत्त्वाची आंकडेवारी पुढीलप्रमाणें—

(आकडेवारी 'महाराष्ट्र–राज्य–परिचय', प्रसिद्धिविभाग, महाराष्ट्र सरकार, वरून)

शेतकी पतपेढ्यांची संख्या	१४,७३०
सभासद	११,८६,२६२
भाग-भांडवल	६,९४,०४,०००
भाग-भांडवलांतील सरकारची रक्कम	५८,०६,०००
राखीव व इतर निधि	२,५५,९४,०००
सभासदांना दिलेल्या खर्चांची रक्कम	२४,९६,११,०००

शेतकी पतपेढ्यांतर्फे मुख्यत्वेकरून अल्प मुदतीच्या कर्जांचा पुरवठा केला जातो. दीर्घ मुदतीच्या कर्जांचा पुरवठा भू-तारण बँकांमार्फत केला जातो. महाराष्ट्र राज्यांत दोन भू-तारण बँका आहेत. पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यासाठीं मुंबई भूतारण बँक व विदर्भासाठीं विदर्भ भूतारण बँक. ह्या बँका कर्जरोखे विकून रक्कम जमवितात. ह्या रकमेच्या परतफेडीची व व्याजाची हमी महाराष्ट्र-सरकार घेतें. ह्याशिवाय बँका फिनान्स कार्पोरेशन्सकडून कर्ज घेतात व अशा तऱ्हेनें जमलेल्या रकमेचा उपयोग शेतकऱ्यांना जमीन-खरेदी, विहीरी खोदणें वगैरेसाठीं दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्यासाठीं केला जातो. हीं कर्जें शेतकऱ्यांना कमींत कमी व्याजानें देण्याचा प्रयत्न केला जातो. ह्यासाठीं राज्य-सरकार कांहीं मदतसुद्धां देतें. अशा तऱ्हेनें सध्या सहकारी संस्थांमार्फत अल्प-मुदतीचीं तसेंच दीर्घ-मुदतीचीं कर्जें मिळण्याची शेतकऱ्यांच्या दृष्टीनें चांगली सोय झाली आहे.

वरील सर्व विवेचनावरून आपल्याला निश्चितपणें असें म्हणतां येईल कीं, ग्रामीण विभागांत भरपूर प्रमाणांत व चांगल्या प्रकारें पत-पुरवठा करण्याच्या दृष्टीनें योग्य प्रयत्न चालू आहेत. शेतकऱ्याला सहकारी संस्थांमार्फत योग्य ती मदत मिळण्याची व्यवस्था झाली आहे व त्यामुळें त्याला आतां पैशासाठीं सावकाराचे पाय धरण्याची मुळींच जरूर नाहीं. कर्ज काढल्यामुळें सावकारानें सर्वस्व हरण केल्याच्या गोष्टी आता भूतकाळांत जमा झाल्या आहेत. त्यामुळें शेतकऱ्यांना अभिमानानें जगता येण्याजोगी परिस्थिति निर्माण होत आहे. ह्याचें सर्व श्रेय सहकारी चळवळीला व ही चळवळ यशस्वी व्हावी म्हणून अविरत श्रम करणाऱ्या कार्यकर्त्यांना व आपल्या राष्ट्रीय सरकारला आहे.

सहकारी चळवळः—ग्रामीण पत-पुरवठ्यासंबंधीचें विवेचन येथें संपलें आहे. या विवेचनाच्या संदर्भात सहकारी पतपेढ्यांची माहिती दिली आहे. ह्या सहकारी पतपेढ्या सर्वसामान्य अशा सहकारी चळवळीचा एक भाग आहेत. सहकारी चळवळ ही महाराष्ट्रांतीलच नव्हे तर भारतांतील ग्रामीण विभागांत रहाणाऱ्या लोकांच्या दृष्टीनें एक कामधेनूच आहे असें म्हटलें पाहिजे. भारतांतील ग्रामीण विभागाचा विकास करावयाचा असेल तर तो सहकारी चळवळीनेंच शक्य आहे असें अनेक तज्ञांनीं सांगितलें आहे. भारत-सरकार तसेंच राज्य-सरकार ही चळवळ यशस्वी करण्याचा अत्यंत कसोशीनें प्रयत्न करीत आहेत. महाराष्ट्र-सरकारसुद्धां सहकारी चळवळ यशस्वी करण्यासाठीं योग्य ते प्रयत्न करीत आहेच. ग्रामीण जीवनाच्या बहुतेक सर्व क्षेत्रांत सहकारी तत्त्वांचा अंगीकार केलेला आढळून येतो आहे. कांहीं औद्योगिक क्षेत्रांतदेखील सहकारी तत्त्वांचा अंगीकार केलेला आहे. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांची थोडक्यांत माहिती येथें दिली आहे. इतरत्र देण्यांत आलेल्या माहितीची पुनरुक्ति केलेली नाहीं.

सहकारी चळवळीच्या कक्षेंत महाराष्ट्रांतील ८५ टक्के खेडीं आणि २५·६८% ग्रामीण जनता आली आहे. सहकारी संस्थांपैकीं सर्वांत जास्त संस्था ग्रामीण पतपुरवठ्याच्या क्षेत्रांत काम करतात. या संस्थांची माहिती वर आलेलीच आहे. सहकारी माल–विक्री संस्था शेतकऱ्यांनीं उत्पादन केलेला माल एकत्र गोळा करतात व तो योग्य किंमतीला व योग्य प्रकारें बाजारांत विकतात. ह्या संस्थांमुळें शेतकऱ्यांची दलालाच्या तावडींतून सुटका झाली आहे. सहकारी खरेदी संस्था शेतकऱ्यांना बी-बियाणें, खतें, वगैरेची खरेदी करून देतात. शेती–मालावर प्रक्रिया करण्यासाठींहि कांहीं सहकारी संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. खरेदी–विक्री संस्थांना गोदामाची आवश्यकता असते. हीं गोदामें बांधण्यासाठीं सरकार ह्या संस्थांना मदत व कर्ज देतें. महाराष्ट्र राज्यांत एक राज्य माल-विक्री संस्था, ९ जिल्हा माल-विक्री संस्था, १७५ तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, २४ कापूस-विक्री संस्था, २४ फळ-विक्री संस्था, ६ कॉटन जिनिंग आणि प्रेसिंग संस्था आणि इतर प्रकारच्या २९ संस्था आहेत. अन्नधान्य आणि इतर शेतीसाठीं उपयुक्त वस्तूंच्या वांटपाच्या क्षेत्रांत सहकारी संस्थांनीं उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सहकारी शेती संस्थांबद्दलची माहिती आपण मागें पाहिलीच आहे. कृत्रिम तऱ्हेनें जमिनीला पाणी-पुरवठा करण्यासाठींहि सहकारी संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. ह्या संस्थांना सरकारी मदत मोठ्या प्रमाणावर मिळते. दूध-पुरवठा संस्था शेतकऱ्यांना जोडधंदा मिळवून

देण्याच्या दृष्टीनें फार उपयुक्त ठरल्या आहेत. मच्छीमारीच्या व्यवसायांत देखील ३० जून १९५९ अखेर ९५ संस्था महाराष्ट्र राज्यांत कार्य करीत होत्या. मागासलेल्या वर्गांसाठीं घरें बांधणें, शेती करणें व धान्याचीं दुकानें काढणें हीं कार्यें सहकारी संस्थांमार्फत केलीं जातात. औद्योगिक क्षेत्रांत सहकारी साखर-कारखाने प्रसिद्ध आहेत. ह्या संबंधीची माहिती ह्या पुस्तकांत इतरत्र आली आहे. नागरी विभागांत नागरी कर्जपुरवठा संस्था, गृहनिर्माण संस्था आणि ग्राहक स्टोअर्स या संस्था उपयुक्त कार्य करीत आहेत. ३० जून १९५९ रोजीं या संस्थांची संख्या व सभासदांची संख्या पुढीलप्रमाणें— नागरी कर्ज-पुरवठा संस्था ९२८, सभासद-संख्या ३,६४,८५२, ग्राहक स्टोअर्स १०१९, सभासद-संख्या २,०९,००,०००, गृह-निर्माण संस्था १०२१, सभासद-संख्या ५७,४३४ राष्ट्रीय विकास मंडळाच्या धोरणविषयक ठरावानुसार सेवा सहकारी संस्था स्थापल्या जात आहेत. या संस्थांचे उद्देश खालीलप्रमाणें—(१) शेतीच्या कामासाठीं कर्जपुरवठा करणें. (२) कच्च्या मालाची खरेदी करणें. (३) शेत-माल एकत्र करून त्यांची विक्री-संस्था द्वारा विक्रीची सोय करणें. (४) बियाणें, खतें, जंतुनाशकें इत्यादींचें वाटप करणें व (५) ग्रामीण जनतेच्या घरगुती गरजा भागविणें. १९५९–१९६० सालीं महाराष्ट्र-राज्यांत एकूण ७,१५१ सेवा-संस्था अस्तित्वांत आल्या. महाराष्ट्र राज्यांत कुलाबा जिल्हा सोडल्यास इतर सर्व जिल्ह्यांत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत. औद्योगिक सहकारी संघ औद्योगिक संस्थांना तांत्रिक साहाय्य देणें, योग्य हिशेबनीस मिळवून देणें व त्यांना खरेदी-विक्रींत मदत करणें यासाठीं अस्तित्वांत आणले आहेत. महाराष्ट्रांत २६ जिल्ह्यांपैकीं २२ जिल्ह्यांत जिल्हा औद्योगिक सहकारी संघ आहेत. जंगल-कामगार सहकारी संस्था जंगल कामगारांची, जे बव्हंशीं आदिवासी आहेत, सर्वांगीण उन्नति घडवून आणण्याच्या उद्देशानें स्थापल्या आहेत. १९५८ अखेर अशा १७६ संस्था महाराष्ट्र राज्यांत होत्या.

१०

★

जमीनधारा पद्धति आणि जमिनींबाबत कायदे

जमिनीचे मालक किंवा जमीन कसणारे यांचे सरकारला कर देण्याबाबत हक्क व जबाबदाऱ्या ज्या पद्धतींनें ठरविल्या जातात त्या पद्धतीला जमीनधारा पद्धति असें म्हणतात. जमीनधारा पद्धतीकडे दोन दृष्टींनीं पहातां येतें. एक म्हणजे धारक व सरकार यांतील परस्परसंबंध व दुसरी म्हणजे जमीनधाऱ्याचा काल. पहिल्या दृष्टीनें जमीनधारा पद्धतींचे तीन प्रकार आहेत. (१) जमीनदारी, (२) महालवारी व (३) रयतवारी. दुसऱ्या दृष्टीनें जमीनधारा पद्धतीचे दोन प्रकार पडतात. (१) कायमधारा पद्धति, (२) बदलता धारा पद्धति.

(१) जमीनदारी पद्धत

पूर्वीपासून सरदार व इतर अधिकाऱ्यांना जमिनीसंबंधीचे निरनिराळे हक्क राजेलोक देत असत. भारतांत ब्रिटिशांचें राज्य सुरू झाल्यावर त्यांना धारा वसूल करण्यासाठीं ह्या सरदारांना हाताशीं धरणें सोईस्कर वाटलें. एका ठराविक प्रदेशांतील जमीन-धारा गोळा करून तो सरकारांत भरण्याची जबाबदारी कोणातरी एकावर टाकण्यास त्यांनीं सुरवात केली. ह्याच लोकांना पुढें जमीनदार म्हणण्यांत येऊं लागलें. ब्रिटिश लोकांच्या दृष्टीनें ही पद्धत फार सोईची होती; कारण जमीनधारा गोळा करण्याच्या जबाबदारींतून ते मुक्त झाले. कांहीं न करतां जमीन-धारा सरकारी खजिन्यांत येउन पडूं लागला. परंतु शेतकऱ्यांच्या दृष्टीनें ही पद्धत फार वाईट ठरली; कारण सरकारकडे ठराविक धारा भरल्यानंतर आपल्या ताब्यांतील शेतकऱ्यांकडून किती धारा घ्यावयाचा हें सर्वस्वीं जमीनदारावर

अवलंबून असे. त्यामुळें जमीनदारांनीं शेतकऱ्यांची फार पिळवणूक केली. अलीकडे अर्थातच शेतकऱ्यांना कायद्यांनीं संरक्षण दिलें आहे. बंगाल, बिहार, मद्रास, ओरिसा वगैरे प्रांतांत जमीनदारी अस्तित्वांत होती.

(२) महालवारी पद्धत

ह्या पद्धतीनें सरकारला सारा भरण्याची जबाबदारी संयुक्तपणें गांवावर टाकण्यांत आली. अर्थातच गांवांतील शेतकऱ्यांना व्यक्तिशः सुद्धां जबाबदार धरण्यांत येतें. पंजाब, उत्तर प्रदेश वगैरे प्रदेशांत ही पद्धत अस्तित्वांत आहे. मध्यप्रदेशांत ह्याच प्रकारची पद्धत अस्तित्वांत आहे परंतु तीस मालगुजारी पद्धत असें म्हणतात.

(३) रयतवारी पद्धत

ह्या पद्धतीला १७९२ सालीं मद्रासमधील बरमहाल जिल्ह्यांत सुरवात झाली. ह्यांत सारा भरण्यासाठीं प्रत्यक्ष रयत (शेतकरीच) जबाबदार धरला जाऊं लागला. महाराष्ट्र राज्यांत रयतवारी पद्धतच अस्तित्वांत आहे. मद्रास, केरळ व आसाम राज्यांत देखील हीच पद्धत अस्तित्वांत आहे. ह्या पद्धतीचीं पुढील वैशिष्ट्यें आहेत. (अ) ह्या पद्धतींत धारक हा प्रत्यक्ष सरकारकडून जमीन घेतो असें गृहीत धरलें जातें. सरकार व जमिनीचा धारक यांमध्यें कोणीहि मध्यस्थ नसतात. सर्व पडीक जमीन मात्र सरकारच्या मालकीची असते. (आ) जमिनीचा धारक नियमितपणें सरकारला सारा भरण्याबद्दल जबाबदार धरला जातो. सारा थकला तर सरकार जमिनीचा लिलांव करते. जमिनीच्या धारकाला जमिनीचा उपभोग घेण्याचा हक्क असतो व जोंपर्यंत नियमितपणें सारा भरला जातो तोंपर्यंत हा हक्क अबाधित रहातो. हा हक्क विकतां येतो, खरेदी करतां येतो व गहाण टाकतां येतो. (इ) जमिनीच्या धारकाला सर्व जमीन किंवा जमिनीचा कांही भाग कसण्यासाठीं म्हणून कुळांना खंडानें देतां येतो. कुळांना जमिनीबाबत कांहींच हक्क नसतात. न कसणारा धारक खंड मिळाला म्हणजे जमिनीकडे बघावयास तयार होत नाहीं. अशा वेळीं उत्पादन घटण्याचा संभव असतो. (ई) सरकारनें तगाई कर्जाच्या किंवा साऱ्याच्या थकबाकीवर जर जमिनीचा लिलांव केला तर खरेदीदाराला त्या जमिनीवर सम्पूर्ण मालकीहक्क मिळतो. (उ) प्रत्येक वर्षीचा सारा शेतांतील उत्पन्नांतून प्रथम वसूल केला जातो. थकबाकीचा बोजा प्रत्यक्ष जमिनीवर असतो.

प्रथम रयतवारी पद्धतींत उत्पन्नाच्या १/६ सारा घेतला जात असे. १९ व्या शतकांत २-३ वेळां ह्यांत बदल करण्यांत आले. १८७९ सालीं जमीन-महसुलाचा कायदा पास करण्यांत आला. १९३९ सालीं साऱ्याच्या बाबतींत नियमहि करण्यांत आले. दर ३० वर्षांनीं आकार ठरवावा. आकारणी करतांना जमिनीची वर्गवारी करावी. पूर्वींच्या ५ वर्षांच्या खंडाच्या सरासरीच्या ३५ टक्क्यांपेक्षां सारा जास्त असूं नये वगैरे नियम महत्त्वाचे आहेत.

कालाच्या दृष्टीनें जमीनधारा पद्धतीचे कायमधारा पद्धत व बदलता धारा पद्धत असे दोन प्रकार आहेत. कायमधारा पद्धतीमध्यें त्या जमिनीचा एकदा धारा ठरविला जातो व तो कधींहि बदलला जात नाहीं. जमीनदारी पद्धतींत बहुत करून धारा कायमचा ठरविला जात असे. बदलत्या धाऱ्याच्या पद्धतींत एका ठराविक कालाकरितां धारा ठरविला जातो. त्या कालानंतर परत धारा ठरविला जातो. महाराष्ट्र राज्यांत बदलत्या धाऱ्याची पद्धत आहे. दर ३० वर्षांनीं धारा बदलला जातो.

शेतजमीनविषयक कायदे

मालक व कुळें यांचे परस्परसंबंध, अनेक कारणांमुळें शेतजमिनीचे झालेले लहान लहान तुकडे, यामुळें महाराष्ट्र राज्यांत शेती हा आर्थिक दृष्ट्या न परवडणारा व्यवसाय झाला आहे. महाराष्ट्र राज्यांतील शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांकडे पाहिलें तर ठळक दोन वर्ग दृष्टीस पडतात. एक जमीन न कसणाऱ्या जमिनमालकांचा व दुसरा जमीन कसणाऱ्या परंतु जमिनीवर कोणत्याहि प्रकारचा मालकी हक्क नसणाऱ्या कुळांचा. एकदा खंड मिळाला कीं जमीन–मालक जमिनीकडे पाहावयास तयार नसतात. कुळांना जमिनी-बाबत शाश्वती नसते व त्यांची आर्थिक परिस्थितिसुद्धां चांगली नसते. त्यामुळें जमिनींत कायम प्रकारच्या सुधारणा सहसा होत नाहींत व त्यामुळें शेतीचें उत्पादन घटतें. ही परिस्थिति लोकनियुक्त मंत्रिमंडळें अधिकारावर येईपर्यंत राहिली. १९३७ सालीं मुंबई प्रांतांत कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आलें. १९३९ सालीं मुंबईचा शेतजमिनीबाबतचा कुळकायदा पास झाला. ह्या कायद्याचा हेतु फारच मर्यादित होता. कुळांना जमिनीबाबत थोडीतरी शाश्वती देणें हा ह्या कायद्याचा प्रमुख हेतु होता. ह्या कायद्यानें 'संरक्षित कुळें' हा कुळांचा एक नवीन वर्ग निर्माण केला. ह्या संरक्षित कुळांना जमीन कायमची व वंशपरंपरा खंडानें कसण्यास मिळेल अशी त्या कायद्यांत तरतूद होती. फक्त

अपवादात्मक परिस्थितींतच जमीनमालकांना ह्या कुळांना काढतां येतें. जमीन-मालकांना स्वतःला कसण्यासाठीं जर जमीन पाहिजे असेल तर त्यांना संरक्षित कुळांनासुद्धां काढतां येईल अशी या कायद्यांत तरतूद होती. १९४८ सालीं ह्या कायद्यांत कांहीं सुधारणा करण्यांत आल्या व ह्या कायद्याची व्याप्ति वाढवण्यांत आली. कांहीं विशिष्ट परिस्थितींत जमीनमालकांच्या जामिनी सरकारी व्यवस्थेखालीं घेणें व शेतजमिनींच्या हस्तांतरावर निर्बंध घालणें वगैरे नव्या तरतुदींची १९४८ च्या कायद्यांत भर घालण्यांत आली. कुळांकडून किती खंड घेतां येईल त्यावर देखील निर्बंध घालण्यांत आले. १९५२ व १९५३ सालीं कुळकायद्यांत परत कांहीं सुधारणा करण्यांत आल्या पण त्या किरकोळ स्वरूपाच्या होत्या. १९५५ सालीं कुळकायद्यांत परत सुधारणा करण्यांत आल्या. ह्या सुधारणा मूलभूत स्वरूपाच्या आहेत त्यामुळें १९५५ च्या कायद्याबद्दल थोडा जास्त विचार करणें जरूर आहे.

महाराष्ट्र राज्यांतील जमीन-सुधारणांचें मुख्य उद्दिष्ट "कसेल त्याची जमीन" हें आहे. १९५५ चा कायदा हें ह्या दिशेनें टाकलेलें पहिलें पाऊल आहे. ह्या कायद्यानें १ एप्रिल १९५७ हा 'कसणाऱ्याचा दिवस' ठरविण्यांत आला व त्या दिवशीं सर्व कुळें जमिनीचे मालक होतील असें जाहीर करण्यांत आलें. कुळांना मिळणाऱ्या जमिनींवर कोणाचाहि बोजा रहाणार नाहीं असेंहि ठरविण्यात आलें. ह्यासाठीं तीन अटी घातल्या गेल्या व ह्या तीन अटी जर पूर्ण झालेल्या असतील तरच कुळें जमिनीचे मालक होतील असें ठरविण्यांत आलें. ह्या तीन अटी पुढीलप्रमाणें—(१) जमीन-मालकानें कुळाकडून जमीन काढून घेण्यासाठीं न्यायालयांत दावा लाविलेला नसला पाहिजे. (२) कूळ जमीन स्वतः कसत असलें पाहिजे व (३) कुळाच्या ताब्यांतील जमीन कमाल धारणेच्या क्षेत्रापेक्षां जास्त असतां कामा नये. जमीन जास्त असल्यास त्याला फक्त कमाल धारणेच्या क्षेत्राइतकीच जमीन मिळेल. कुळानें मालकाला जमिनीची किंमत दिली पाहिजे. ही किंमत सरकारनें नेमलेलें ट्रायब्यूनल ठरवितें. ही किंमत धान्याच्या २० ते २०० पट असूं शकेल. ही किंमत कुळाला शक्य असल्यास त्यानें एकदम किंवा १२ वार्षिक हप्त्यांत द्यावी. जर तीन किंवा जास्त हप्ते कुळाकडे बाकी राहिले तर मालकाला जमीन परत घेता येते व खंडाची थकबाकीहि वसूल करतां येते.

कसणाऱ्यांच्या दिवशीं सर्व जमिनी कुळांच्या मालकीच्या होतील. ह्या नियमाला कांहीं अपवाद ठेवण्यांत आले आहेत. खालील लोकांच्या जमिनी कुळांकडे जाणार नाहींत असें कायद्यानें ठरविण्यांत आलें.—(१) ज्या

जमीनमालकांची जमीन किफायतशीर क्षेत्राइतकी किंवा त्याहूनहि कमी आहे. (२) ज्यांचें खंडासहित वार्षिक उत्पन्न १५०० रुपयांपेक्षां कमी आहे. (३) वरील दोनशिवाय विधवा, अपंग, अज्ञान इत्यादिकांच्या जमिनी कुळांकडे जाणार नाहींत. ह्या कायद्यानें किफायतशीर क्षेत्र (Economic Holding) खालीलप्रमाणें ठरवून दिलेलें आहे. कमाल धारणाक्षेत्र किफायतशीर क्षेत्राच्या तिप्पट असावें असेंहि कायद्यांत नमूद केलेलें आहे.

	किफायतशीर क्षेत्र	कमाल धारणाक्षेत्र
जिराईत जमीन	१६ एकर	४८ एकर
हंगामी बागाईत	८ ,,	२४ ,,
बागाईत	४ ,,	१२ ,,

नुकतेंच महाराष्ट्र सरकारनें जमीन धारणेच्या कमाल मर्यादेविषयीं विधेयक जाहीर केलें आहे. नजिकच्या भविष्यकाळांत तें विधिमंडळापुढें मांडलें जाईल. जमिनीची मालकांमधील वांटणी असमान आहे म्हणून जमीनधारणेची कमाल मर्यादा ठरवून, त्यावरील जमीन खाजगी मालकांकडून काढून घ्यावी आणि ती इतर गरजू लोकांस वांटावी व अशा तऱ्हेनें विषमता कमी करावी असा विधेयकाचा उद्देश सांगण्यांत आला आहे. जमीन-धारणेचें कमाल क्षेत्र ठरविण्यासाठी विधेयकांत जमिनीचे ४ प्रकार पाडण्यांत आले आहेत. (१) जिराईत, (२) चार महिने बागाईत, (३) आठ महिने बागाईत व (४) बारमाही बागाईत. बागाईत जमीन म्हणजे सरकारनें पुरविलेल्या पाण्यावर भिजणारी जमीन. स्वतः जमीन-मालकांनी केलेल्या सोयीमुळें जर जमीन भिजत असेल तर ती जमीन जिराईत समजावयाची. कमाल मर्यादा ठरवितांना जमीन-धारकाचें कुटुंब ५ माणसांचें आहे असें गृहीत धरलें आहे. कमाल क्षेत्रें खालीलप्रमाणें ठरविलीं आहेत--

चार महिने बागाईत	—४८ एकर
आठ महिने बागाईत	—२४ एकर
बारमाही बागाईत	—१२ एकर

जिराईत जमिनीचें कमाल क्षेत्र बागायतीप्रमाणें सर्व राज्याकरितां एकच ठरविलेलें नाहीं. तें स्थानपरत्वें बदलत जातें. जिराईत जमिनीचें कमाल क्षेत्र ८४ एकरांपासून १५६ एकरांपर्यंत ठरविलेलें आहे. जमीन-धारकाच्या कुटुंबांत ५ पेक्षां जास्त माणसें असल्यास प्रत्येक जास्त माणसासाठीं कमालमर्यादेच्या

एक-षष्ठांश इतकी अधिक जमीन त्या कुटुंबाला धारण करता येईल, मात्र कोणत्याहि कुटुंबाकडील एकंदर जमीन कमाल मर्यादेच्या दुपटीपेक्षां जास्त असणार नाहीं. जमीन-धारणेची कमाल मर्यादा कार्यवाहींत आणण्याचें काम प्रत्येक जिल्ह्याच्या कलेक्टरकडे सोपविण्यांत यावें असें विधेयकांत म्हटलें आहे. कमाल–मर्यादेच्या ह्या विधेयकामुळें सरकारकडे जी जमीन येईल, तिचें वांटप कशा तऱ्हेनें करावें ह्यासंबंधीचे नियम विधेयकांत दिले आहेत.

महाराष्ट्र राज्यांतील कुळ-कायद्यांची थोडक्यांत माहिती वर दिली आहे. सर्व मध्यस्थांचें उच्चाटन करून सरकार व कसणारा यांत प्रत्यक्ष संबंध निर्माण करणें, कसणाऱ्याला जमिनीचा मालक करणें, हे त्या कायद्यांचे मुख्य हेतु आहेत. भूमिहीनांना जमीन मिळवून देणें हाहि एक हेतू या कायद्यांचा आहे. जमीन धारणेच्या कमाल मर्यादेची कल्पना ह्या हेतूंतूनच निघाली आहे. ह्याशिवाय सरकार पडीक जमिनींचें भूमिहीनांत वांटप करीत आहे. आत्तांपर्यंत अशी एकूण ६२,००० एकर जमीन वांटण्यांत आली आहे. भूमिहीनांना शेतीचीं अवजारें विकत घेण्यासाठीं आर्थिक सवलती व कर्जें देण्यांत आलीं आहेत. पडीक व खार जमिनी लागवडीखालीं आणण्याचा एक कार्यक्रम विकास-योजनेखालीं आखण्यांत आला आहे. महाराष्ट्र राज्य-सरकारचें शेतकऱ्यांकडे चांगलें लक्ष आहे व भविष्यकाळांत शेतकऱ्याला चांगले दिवस येतील यांत कांहीं शंका नाहीं.

• • •

११

★

संकीर्ण समस्या

आतांपर्यंतच्या विवेचनांत न आलेल्या महत्त्वाच्या समस्यांचा ह्या प्रकरणांत विचार केला आहे.

शेतमालाची विक्री

ही एक महत्त्वाची समस्या आहे; कारण शेतकऱ्यानें कसून मेहनत करून उत्पादन केलेला माल जर योग्य किंमतीला विकला गेला नाहीं, तर त्याचे श्रम व्यर्थ जातात; किंवा मालाला चांगली किंमत येऊनहि ती जर मध्यस्थांनीं घेऊन शेतकऱ्याच्या पदरांत अत्यंत थोडी रक्कम टाकली तरी तेंच होतें. तेव्हां ह्या प्रश्नाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. सध्यांची शेतीमालाच्या विक्रीची व्यवस्था सदोष आहे. शेतांत उत्पादन झालेल्या मालाचा बराचसा भाग त्या त्या खेड्यांतच विकला जातो. ह्याला पुढील कारणें आहेत. (१) शेतकरी कर्जबाजारी असल्यामुळें त्याला पिकांपैकीं बराचसा भाग ठराविक किंमतीला सावकाराला द्यावा लागतो. (२) बहुतेक शेतकरी लहान प्रमाणावर उत्पादन करणारे असतात. त्यामुळे लांबच्या मोठ्या बाजारपेठेंत माल नेऊन विकणें त्यांना फायदेशीर होत नाहीं. (३) शेतकऱ्याजवळ माल सांठविण्यासाठीं योग्य जागा व इतर सोयी नसतात. साहजिकच माल खराब होण्यापेक्षां शक्य तेवढ्या लवकर विकून टाकणें त्याच्या दृष्टीनें सोयिस्कर असतें. (४) खेड्यांत रस्ते खराब असल्यामुळे माल दूर अंतरावर नेणें त्रासदायक होतें. शेतकऱ्याला गरज असल्यामुळें माल कमी किंमतीला विकावा लागतो. हा माल मध्यस्थ—कच्चे व पक्के अडते, दलाल वगैरे—विकत घेतात व जास्त

किंमतीला बाजारपेठेंत विकतात. शेतीमालाच्या विक्रींत ह्या मध्यस्थांचें फारच प्रस्थ आहे. बाजारभावांचा फायदा आज बहुतेक ह्या मध्यस्थांनाच मिळतो. बिचारा शेतकरी आहे तसाच रहातो. त्याचबरोबर अनियंत्रित बाजारपेठेंत शेतकऱ्यांना अनेक प्रकारचे योग्य, अयोग्य आकार द्यावे लागतात. त्यामुळे शेतकरी जर अनियंत्रित बाजारपेठेंत माल विकावयास गेला तर त्याचा बराचसा माल वांटण्यावारी जातो. त्याचबरोबर शेतकऱ्याच्या अडाणीपणाचा फायदा मध्यस्थ घेतात व त्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक करतात. प्रत्येक शेतकऱ्याचें उत्पादन लहान प्रमाणावर असल्यामुळें त्याला मालाचें प्रमाणीकरण, वर्गीकरण करतां येत नाहीं त्यामुळें मालाची विक्री होणें कठीण जातें व झालीच तर किंमत कमी येते. ह्या सर्व कारणांमुळें सध्यां शेतकऱ्याला त्याच्या मालाची वाजवी किंमत मिळत नाहीं. ह्या परिस्थितींत बदल घडवून आणणें जरूर आहे.

ह्या दृष्टीनें आतापर्यंत कांहीं प्रयत्नहि करण्यांत आले आहेत. १९३९ सालीं मुंबई सरकारनें नियंत्रित बाजारपेठांचा कायदा पास केला. ह्या कायद्यांत पुढील मुख्य तरतुदी आहेत. (१) नियंत्रित बाजारपेठांत कायद्यानें ठरवून दिलेल्याच पद्धतींनींच मालाची खरेदी-विक्री झाली पाहिजे. (२) बाजारांत कायद्यानेंच ठरविलेलीं वजनेंमापेंच वापरलीं पाहिजेत. (३) मालाच्या किंमती योग्य असल्या पाहिजेत. (४) बाजारपेठेंतील तंटाबखेडा लवादाकडे सोपवावा. (५) बाजारांतील किंमती सर्वांना कळाव्या अशी व्यवस्था केली पाहिजे. (६) कायद्यांत ठरवून दिलेल्या प्रमाणांप्रमाणें शेतीमालाचें वर्गीकरण केलें पाहिजे. ह्या कायद्यात सांगितल्याप्रमाणें प्रत्येक बाजारपेठेंत एक मार्केट-कमिटी स्थापना करण्यांत आली असून, तिच्याकडे बाजारपेठेच्या नियंत्रणाचें काम सोपविण्यांत आलें आहे. ह्या कमिट्या यशस्वी होण्याच्या मार्गांत अनेक अडथळे आहेत असें आढळून आलें आहे; परंतु ह्या कायद्यामुळें शेतीमालाच्या विक्रीच्या पद्धतींत बरीच सुधारणा झाली हें मान्य केलें पाहिजे. मध्यवर्ति सरकारनें १९३७ सालीं शेतीमालाबाबत प्रतवारी व मार्किंगबाबत कायदा पास केला. ह्या कायद्यानें मार्केटिंग ॲडव्हायसरला कांहीं शेतीमालाच्या वर्गवारीचीं चिन्हें (Agmark) देण्याबाबत अधिकार दिले आहेत. १९४७ सालीं मुंबई सरकारनें नियंत्रित गुदामांचा कायदा पास केला. शेतीमालाच्या सांठवणीबाबत ह्या कायद्यांत नियम केले आहेत. मध्यवर्ति सरकारनें शेतीमालाची विक्री व आनुषंगिक गोष्टींबाबत कांहीं कायदे पास केले आहेत. ह्या सर्व गोष्टींवरून एवढें निश्चितपणें म्हणतां येतें कीं सरकारचें ह्या समस्येकडे लक्ष आहे.

सहकारी संस्थांमार्फत शेतीमालाची विक्री केल्यास सध्यांच्या पद्धतींतील दोष दूर होतील, अशी आशा करण्यास खूप जागा आहे. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन जर सहकारी संस्था स्थापल्या व शेतीमालाची विक्री ह्या संस्थांमार्फत करण्यास सुरवात केली तर विक्रीचा खर्च कमी येईल. मध्यस्थांची हकालपट्टी करतां येईल व मध्यस्थांच्या कचाट्यांतून शेतकऱ्यांची सुटका होऊन बाजारभावांचा फायदा प्रत्यक्ष शेतकऱ्यांना मिळेल. शेतकऱ्यांना सावकाश कां होईना शेती–मालाच्या विक्रीबाबत संपूर्ण माहिती मिळेल व त्याचें परावलंबित्व दूर होईल. बाजारभावाकडे लक्ष ठेवून शेतकरी उत्पादन करील व अशा रीतीनें शेतकऱ्याची परिस्थिति सुधारेल. ह्या दृष्टीनें प्रयत्न होण्यास सुरवात झाली आहे परंतु अजून करावयाचें बरेंच बाकी आहे.

शेत-मजूर

स्वतःच्या मालकीची जमीन नसलेले व दुसऱ्याच्या जमिनीवर मोलानें काम करणारे शेत–मजूर महाराष्ट्रांत संख्येनें बरेच आहेत. गेलीं कित्येक वर्षें ही संख्या वाढत गेलेली आहे. ह्याचीं कारणें अनेक आहेत. (१) कर्जाची फेड न करतां आल्यामुळें बऱ्याच शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांकडे गेल्या. (२) ग्रामोद्योग व हस्तव्यवसाय यांचा ऱ्हास झाल्यामुळें शेतावर काम करण्याशिवाय दुसरा कोणताहि उपजीविकेचा व्यवसाय कारागिरांना उरला नाहीं.:(३) औद्योगिक क्रान्तीनंतर खेडेगांवांतील जुनी समाजरचना विस्कळित झाली. बलुतेदारांची पद्धत जवळजवळ नष्ट झाली व प्रत्येक काम पैसे टाकून करवून घ्यावयास सुरुवात झाली. शेतमजुरांत पुरुषांबरोबरच स्त्रिया व मुलें ह्यांचा मोठ्या प्रमाणांत समावेश होतो. शेतावर काम करण्यासाठीं मजूर कांहीं ठराविक हंगामांतच लागतात. नांगरणी, पेरणी त्याचप्रमाणें कापणीच्या वेळेलाच ह्या मजुरांना मागणी असते. त्यामुळें शेतमजुरांना वर्षभर सतत काम मिळत नाहीं. ह्या मजुरांची स्थिति हलाखीची असते. शेतावर मजुरी कमी मिळते आणि तीहि कायमची मिळत नाहीं. ह्यांना पोटभर अन्न मिळावयाची मारामार पडते. रहाण्याच्या जागा आरोग्यास विघातक अशा असतात. साहजिकच ह्यांचीं शरीरें रोगांचीं माहेरघरें बनल्यास नवल नाहीं. कारखान्यांतील मजुरांची स्थिति शेतमजुरांच्या स्थितीशीं तुलना करतां कितीतरी चांगली आहे असें म्हणावें लागेल. १९४७ नंतर आपलें राष्ट्रीय सरकार अधिकारावर आल्यानंतर त्यानें शेतमजुरांची स्थिति सुधारण्याकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. दोन्ही पंचवार्षिक योजनांमध्यें शेतमजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं कांहीं उपाय सुचविण्यांत आले आहेत. महाराष्ट्र-राज्य-सरकारनें सरकारी पडीत जमिनी भूमिहीनांना

कसण्यासाठीं देण्यास सुरुवात केली आहे. जमिनीबरोबरच शेतीचीं अवजारें व खतें खरेदी करण्यासाठीं सरकार त्यांना आर्थिक सवलती व कर्जें देतें. परंतु अजून बरेंच करावयाचें बाकी आहे. देशापुढें उभी असलेली ही एक गंभीर समस्या आहे व ती सोडविण्यासाठीं कसून प्रयत्न झाले पाहिजेत.

भूदान-चळवळ

जमिनीची वांटणी विषम प्रमाणांत आहे. ही विषमता नष्ट करण्याचा एक उपाय कायदा हा आहे. परंतु कायदा करण्यापेक्षां ज्यांच्याजवळ जास्त जमीन आहे त्यांनीं जास्तीची जमीन आपखुशीनें जर भूमिहीनांना देऊन टाकली तर विषमता दूर होईल व कटुताहि निर्माण होणार नाहीं. ही कल्पना प्रत्यक्षांत उतरविण्यासाठीं जी चळवळ सुरू करण्यांत आली तीच भूदान चळवळ होय. आचार्य विनोबाजी भावे ह्यांनीं ही चळवळ १९५१ मध्यें तेलंगणामध्यें सुरू केली. गेल्या ९–१० वर्षांत ह्या चळवळीला लोकांचा सक्रिय पाठिंबा मिळाला आहे. आचार्य विनोबाजी भावे यांनीं ह्या चळवळीच्या साहाय्यानें, लोकशाही मार्गानें, जनतेच्या प्रेमानें आणि शांततेनें जमीन वांटपाचा प्रश्न सोडवतां येतो हें राष्ट्रास दाखवून दिलें व त्याची सत्यता राज्य-सरकारांना पटून त्यांनीं त्याला योग्य तें कायदेशीर स्वरूपहि देण्याचें प्रयत्न केले आहेत. सर्व भूमि ही देवाची आहे व म्हणून जरूरीपेक्षां जास्त जमीन स्वतःजवळ ठेवून घेणें हें योग्य नाहीं. तेव्हां लोकांनीं आपणहून जास्त जमिनीचें दान केलें पाहिजे, असें विनोबाजींचें लोकांना सांगणें आहे. दान मिळणारी जमीन एकत्र करून तिचें भूमिहीनांना वांटप केलें जातें. वांटप करतांना जमिनीचा सर्वांत लहान तुकडा केवढा असावा व त्याचबरोबर शेती व्यक्तिगत पद्धतीनें करावयाची कां सहकारी पद्धतीनें करावयाची हेंहि ठरवितां येतें. ह्याबाबत महाराष्ट्र-राज्यसरकारनें नियमहि केले आहेत. कांहीं इतर राज्यांत देखील अशाच प्रकारचे नियम केलेले आहेत. भूदान चळवळीचें काम अखंड चालू आहे. भूदानाबरोबरच आता ग्रामदानाचीहि चळवळ सुरू झाली आहे.

गुरांची जोपासना व दुग्ध-व्यवसाय

शेती-व्यवसायांत गुरांचें महत्त्व निर्विवाद आहे. अजून कित्येक वर्षें बैलांच्या साहाय्यानेंच भारतांत शेती केली जाणार ही गोष्ट अगदीं उघड आहे. त्याचबरोबर गाई व म्हशी ह्यांचें दूध व त्यापासून होणारे पदार्थ हा भारतीय

लोकांच्या आहारांतील एक आवश्यक भाग आहे. त्याशिवाय गुरांपासून मिळणारें शेण हें अतिशय उपयुक्त खत आहे. ह्याशिवाय गुरांच्या कातड्यापासून सर्व तऱ्हेचीं पादत्राणें तयार करण्यांत येतात व हाडांपासून खत व शिंगांपासून अनेक पदार्थ तयार करण्यांत येतात. गुरें ही एक राष्ट्रीय संपत्ति आहे व त्यांची योग्य तऱ्हेनें जोपासना होणें जरूर आहे. महाराष्ट्र सरकार लोकांमध्यें याबाबत योग्य ती जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे व स्वतःदेखील योग्य ते प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्राच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत यासाठीं १७४·७४ लक्ष रुपयाची तरतूद करण्यांत आली असून पहिल्या चार वर्षांत ५६·९९ लक्ष रुपये खर्च करण्यांत आले. पशुसंवर्धनाच्या कार्यक्रमांत गुरांच्या वैद्यकीय मदतींत वाढ, गुरांच्या सांसर्गिक रोगांचा प्रतिबंध, सेरा व हॅक्सीन यांचें उत्पादन, गुरांची निपज व सुधारणा आणि तांत्रिक कार्यासाठीं कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण या गोष्टींचा समावेश होतो.

दूधदुभत्याच्या व्यवसायाला व शुद्ध दुधाच्या पुरवठ्यास उत्तेजन देणें हें महाराष्ट्र सरकारचें धोरण आहे. दुधांत भेसळ होऊं नये म्हणून सरकारनें कायदा पास केला आहे. ह्याशिवाय कांहीं शहरांतील दूधपुरवठ्याची जबाबदारी सरकारनें स्वतःवर घेतली आहे. महाराष्ट्राच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत यासाठीं ४०७·९७ लाख रुपयांची तरतूद केली आहे. यापैकीं ३०० लाख रुपये मुंबई शहराची दूधपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठीं खर्च करण्यांत येणार आहेत व बाकीचे इतर महत्त्वाच्या शहरीं सरकारी दूधपुरवठा योजना सुरू करण्यासाठीं खर्च करण्यांत येणार आहेत. मुंबई शहराशिवाय पुणें, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर व नागपूर ह्या शहरांत सरकारी दूधपुरवठा योजना सुरू करण्यांत आल्या आहेत. ह्याशिवाय मिरज येथें कृष्णा व्हॅली मिल्क प्रोजेक्ट या नांवाची एक नवीन योजना सुरू करण्यांत येणार आहे. Toned milk

शेतकी शिक्षण व संशोधन

शेतकीचें शिक्षण देणारीं पांच महाविद्यालयें महाराष्ट्र राज्यांत आहेत. तीं पुणें, नागपूर, धुळें, अकोला व परभणी येथें आहेत. याशिवाय अनेक शेतकी शाळा आहेत. येथें शेतीशिवाय शेतीचीं अवजारें दुरुस्त करण्याचें व इतर पूरक उद्योगधंद्यांचें—उदा. —दूधदुभतें, कोंबड्या पाळणें, मधमाश्या पाळणें वगैरे—शिक्षण देण्यांत येतें.

याशिवाय राज्यांतील निरनिराळ्या भागांत संशोधन-केंद्रें व प्रायोगिक क्षेत्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत· येथें पिकांचा दर्जा सुधारण्याबाबत व पिकां-

वरील रोग व कीड यांचा प्रतिबंध करण्याबाबत संशोधन करण्यात येतें. इतर अनेक बाबतींत संशोधन या केंद्रांत सुरू असतें.

ग्रामोद्योग व कुटीरोद्योग

शेती हा व्यवसाय सतत वर्षभर चालू नसतो. बऱ्याच शेतकऱ्यांच्या जमिनी लहान असल्यामुळें शेतीपासून वर्षभर उपजीविका होईल एवढें उत्पन्न मिळत नाही. तेव्हा खेडेगांवांत कांहीं पूरक व्यवसाय सुरू करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर ज्यांच्या जमिनी नाहींत त्यांना खेडेगांवातच कांहीं व्यवसाय मिळण्याची सोय करणें जरूर आहे. ह्या दोन्ही दृष्टींनीं ग्रामोद्योग व कुटीरोद्योग यांचा विकास करण्याचें धोरण सरकारनें ठरविलें आहे व त्या दृष्टीनें सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. ह्या उद्योगधंद्यांबाबतचें विवेचन पहिल्या विभागांत एका स्वतंत्र प्रकरणांत केलें आहे.

समाजविकास योजना व राष्ट्रीय विस्तार योजना

समाज–विकास योजना––ह्या योजना ऑक्टोबर १९५२ पासून ५५ ठिकाणीं सुरूं करण्यात आल्या. ह्या योजनेचे तीन भाग करण्यांत आले आहेत. (१) मूलभूत सामूहिक विकासः—ह्यांमध्यें शेती, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण व रस्ते ह्यांचा समावेश करण्यांत आला आहे. (२) संयुक्त सामूहिक विकासः— ह्या भागांत लघु उद्योगधंदे, ग्रामोद्योग व कुटीरोद्योग ह्यांचा विकास व ग्रामीण समाजाची नवीन पद्धतीनें समाजरचना ह्या गोष्टींचा समावेश करण्यांत आला आहे. (३) शैक्षणिक केंद्रें––वरील कार्यें नीट पार पाडण्यासाठीं कळकळीनें कार्य करणाऱ्या माहीतगार कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे. हें कार्यकर्ते तयार करण्याचें काम ह्या विभागाकडून केलें जातें. ह्या कार्यकर्त्यांना ग्रामसेवक असें म्हणतात. प्रत्येक समाजविकास योजना एकूण तीन वर्षांत पुरी करावयाची आहे. प्रत्येक योजनेसाठीं ६५ लक्ष रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. भांडवली खर्च मध्यवर्ति सरकार ३।४ व राज्य सरकार १।४ असा करावयाचा असून चालू खर्च निम्मा निम्मा वांटून घ्यावयाचा आहे. ह्याशिवाय भारत-अमेरिकन विकासफंड व फोर्ड फाउंडेशनमधूनहि कांहीं मदत देण्यात आली आहे.

राष्ट्रीय विस्तार योजना

ह्या योजनला १९५३ सालापासून सुरुवात झाली. खेड्यांची सर्वांगीण

सुसूत्र वाढ करणें हा ह्या योजनेचा हेतु आहे. खेड्यांतील जनतेमध्यें प्रत्यक्षपणें मिसळून त्यांचे प्रश्न समजावून घेणें व त्यावर उपाययोजना सुचविणें, ह्या कार्यक्रमाचा ह्या योजनेंत समावेश आहे. एखाद्या प्रदेशांत राष्ट्रीय विकास योजना यशस्वी झाली कीं त्या प्रदेशाचा समाज-विकास गट बनविण्यांत येतो. ह्या गटाच्या दोन अवस्था असतात. पहिल्या अवस्थेंत खेड्यांतील लोकांना स्वतः काम करण्यास उत्तेजन दिलें जातें व स्वावलंबनानें ते लोक किती कार्य करूं शकतात तें पाहिलें जातें. ह्या अवस्थेची कालमर्यादा ५ वर्षें असतें. दुसऱ्या अवस्थेंत एका स्वतंत्र संघटनेकडे सामूहिक विकासाचें काम सोंपविण्यांत येतें व विकासकार्याची गति वाढविण्यांत येते.

ग्रामीण जीवन अधिक समृद्ध व प्रफुल्लित करणें हा ह्या योजनांचा हेतु आहे. जिल्हा लोकल बोर्ड, ग्रामपंचायती, विकास-अधिकारी व राज्य विकास समिति यांच्यावर ह्या योजना यशस्वी करण्याची जबाबदारी संयुक्तपणें टाकली आहे. पहिल्या योजनेंत ह्या योजनांसाठीं ९० कोटी रुपयांची तरतूद केली होती. दुसऱ्या योजनेंतील तरतूद २०० कोटी रुपयांची आहे. समाज-विकास योजना व राष्ट्रीय-विस्तार योजना ह्या दोन्हींनीं पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांत खूपच प्रगति केली आहे.

पुस्तकाच्या दुसऱ्या विभागांत आपण महाराष्ट्रांतील शेतीबाबतच्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार केला आहे. ह्या विवेचनावरून महाराष्ट्रांतील शेतीबाबतच्या महत्त्वाच्या प्रश्नांची रूपरेषा, ते प्रश्न सोडविण्याकरितां सरकारमार्फत व इतर संस्थांमार्फत चालू असलेले प्रयत्न व शेतीचा विकास घडवून आणण्यासाठीं काय केलें पाहिजे ह्याची स्थूलमानानें कल्पना येईल. शेतकऱ्यांमध्यें दिवसेंदिवस जागृति होत आहे. सरकार शेतीचा विकास घडवून आणण्यासाठीं व शेतकऱ्यांची परिस्थिति सुधारण्यासाठीं सतत प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्राची ही भूमि खऱ्या अर्थानें सुजला, सुफला आणि सस्यश्यामला होण्याची व शेतकरी संपन्न आणि सुखी होण्याचा काल जवळ आला आहे.

●●●

वाचनीय ग्रंथसंपदा

*

१. महाराष्ट्र परिचय, संपादक—कर्वे, जोगळेकर व जोशी.
२. महाराष्ट्र राज्य परिचय, प्रसिद्धि-विभाग, महाराष्ट्र सरकार.
३. महाराष्ट्राचें आर्थिक दर्शन, महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषद १९६०.
4. Problems of Maharashtra, Indian Committee for Cultural Freedom.
5. Handbook of Basic Statistics of Maharashtra State 1960, Government of Maharashtra.
6. Master Plan of Industrialisation of Bombay State, Government of Bombay.
7. Agricultural Problems of India, by Dr. C.B.Mamoria.
8. Problems in Indian Economics, by P. C. Jain.
9. Our Economic Problem, by P. A. Wadia and K. T. Merchant.
10. Industrial Evolution of India, by Prof. D. R. Gadgil.
११. भारताचा आधुनिक आर्थिक विकास, चोरघडे व चान्दरकर.
१२. भारतीय ग्रामीण अर्थशास्त्र, श्री. रा. धों. अभ्यंकर.
13. Five-Year Plans-I and II, Government of India and Bombay State.
14. Statistical Companion to the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Bill, 1961, Government of Maharashtra.
१५. महाराष्ट्र राज्य विशेषांक— किर्लोस्कर, तरुण भारत, विशाल सह्याद्रि, संपदा, महाराष्ट्र कॉंग्रेस पत्रिका, वैभव, उषःकाल व प्रसाद.
१६. नवभारत, नोव्हेंबर १९५५ व मार्च १९६१.

●●●

नवमहाराष्ट्रांतील विचारप्रवाह

काँग्रेसपक्ष (कार्य आणि भवितव्य)	श्री. पु. पां. ऊर्फ बाबुराव गोखले
प्रजासमाजवादी पक्ष (कार्य आणि भवितव्य)	श्री. ना. ग. गोरे
अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम	श्री. शंकरराव खरात
भारतीय मजूर-संघटना	श्री. बगाराम तुळपुळे
भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध	श्री. अ. भि. शहा
मानवतावाद	श्री. मा. प. मंगुडकर
औद्योगिक विकास	श्री. चिंतामणी गणेश वैद्य
महाराष्ट्रांतील शिक्षण	श्री. चंद्रकुमार डांगे
महाराष्ट्राची सामाजिक वाटचाल	श्री. विद्याधर पुंडलिक
महाराष्ट्रांतील स्त्रीजीवन-विकास	सौ. सरिता पदकी

जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणें २.

महाराष्ट्रांतील वाङ्मयीन प्रवाह

कथा	श्री. पंडित शेटे
कादंबरी	श्री. ल. ग. जोग
काव्य	श्री. कृष्ण बलवंत निकुम्ब
नाटक	श्री. विजय तेंडुलकर
निबंध व लघुनिबंध	श्री. ह. श्री. शेणोलीकर
चरित्र-आत्मचरित्र	श्री. गो. म. कुलकर्णी
टीका	श्री. वसंत दिगंबर कुलकर्णी
बालवाङ्मय	श्री. देवीदास बागूल

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणें २.